**नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक ३१/१२/२०२१ रोजी दुपारी १२.१० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग येथे आयोजित झालेल्या सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ५. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ६. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ७. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ८. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ९. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| १०. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ११. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १२. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १३. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १४. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १५. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १६. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १७. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १८. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १९. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| २०. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| २१. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| २२. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| २३. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| २४. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २५. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| २६. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २७. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २८. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २९. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| ३०. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| ३१. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| ३२. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३३. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ३४. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| ३६. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| ३७. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३८. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३९. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| ४०. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ४१. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ४२. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ४३. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ४४. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ४५. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ४६. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ४७. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ४८. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ४९. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ५०. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ५१. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ५२. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ५३. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ५४. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ५५. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ५६. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ५७. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ५८. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ५९. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ६०. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ६१. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ६२. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ६३. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ६४. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ६५. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ६६. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ६७. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ६८. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ६९. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ७०. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ७१. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ७२. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ७३. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७४. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ७५. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ७६. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ७७. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ७८. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ७९. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ८०. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ८१. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ८२. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ८३. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ८४. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ८५. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ८६. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ८७. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ८८. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ८९. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ९०. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ९१. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ९२. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ९३. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ९४. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ९५. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ९६. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ९७. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ९८. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ९९. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| १००. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| १०१. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| १०२. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| १०३. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| १०४. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| १०५. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| १०६. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| १०७. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| १०८. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| १०९. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ११०. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| १११. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ११२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११३. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ११४. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ११५. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ११६. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ११७. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ११८. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| ११९. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| १२०. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## **अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ३. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ४. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ५. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ६. | ५ | अ | रिक्त | |
| ७. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ८. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| ९. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १०. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| ११. | ८ | ब | श्रीमती अंसारी सय्यद बेगम निजामुद्दीन | |
| १२. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १३. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| १४. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| १५. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| १६. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| १७. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| १८. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| १९. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| २०. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| २१. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| २२. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| २३. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| २४. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| २५. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| २६. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| २७. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| २८. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| २९. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ३०. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ३१. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ३२. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ३३. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ३४. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ३५. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ३६. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |

**<u>उपस्थित अधिकारी</u>**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**
**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.

(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)

**<u>ठराव क्रमांक १९४</u> :-** मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>अभिनंदन प्रस्ताव</u>**

**<u>चंद्रशेखर बावनकुळे</u>**

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विधान परिषदेच्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भा.ज.पा.चे चंद्रशेखर बावनकुळे बहुमताने विजयी झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ.उषा देशमुख</u>**

विदर्भ साहित्य संघाचा यंदाचा सन्मानाचा ग. त्र्य. माडखोलकर स्मृती जीवनव्रती पुरस्कार मराठी साहित्यात आपल्या संयत आणि निरामय वृत्तीने लेखन करणा-या डॉ.उषा माधव देशमुख यांना जाहीर करण्यात आल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>अभिनंदन वर्धमान</u>**

भारतीय हवाई दलातील अधिकारी अभिनंदन वर्धमान यांना संरक्षण दलामध्ये दिल्या जाणा-या सर्वोच्च वीरचक्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**देवांशी जोशी**

वैद्यकीय भाषेत बौध्दीक अक्षम असलेल्या नागपूरच्या देवांशी अनिल जोशी हिला सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने देण्यात येणा-या राष्ट्रीय दिव्यांग सक्षमीकरण पुरस्कार या श्रेणीत रोल मॉडेल पुरस्काराने माननीय राष्ट्रपती महोदयांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. न्यूरोडायव्हर्सिटी श्रेणीत कुठलीही विशेष सवलत न घेता नागपूरात जन्मलेली देवांशी आता दिल्लीतील वसंतकुंज येथे एका शॉपिंग मॉलमध्ये फॅशन विभागात पूर्णवेळ कर्मचारी म्हणून काम करते. यापूर्वी २०१६ मध्ये उत्कृष्ट कर्मचारी म्हणूनही तिला राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. या विशेष कर्तुत्वाबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**अंजू बॉबी जॉर्ज**

वर्ल्ड एथलेटिक्स ने भारतीय महिला एथलीट अंजू बॉबी जॉर्ज ला वूमन ऑफ द ईयर अवॉर्ड बहाल केल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**संकल्प गुप्ता**

प्रतिभावंत बुध्दिबळपटू नागपूरकर संकल्प गुप्ताने भारताचा ७१ वा ग्रँड मास्टर किताब पटकावून शहराचे नांव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावले. त्याच्या या यशाबद्दल मनपाची ही सभा त्याचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**प्रश्न क्र.271**:- नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या केंद्रशासन पुरस्कृत "अमृत योजनेंतर्गत" ४२ESR+१GSR+ मुख्या जलवाहिन्याचे प्राकलन व मंजूर DPR संदर्भात प्रश्न.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, या ठिकाणी नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत 42 ईएसआर आणि 1 जीएसआर आणि मुख्य जलवाहिन्यांचे प्राकलन व मंजूर डीपीआर संदर्भात प्रश्न होता. त्यामध्ये वास्तविक वाप्कोस कंपनीला टेंडर देण्यात आलेले होते. मागच्या वेळेस मला या उत्तरामध्ये ही माहिती पुर्णपणे न देता अर्धवट माहिती दिलेली आहे. वाप्कोस ला टेंडर देतां असतांना वाप्कोस ला प्राकलन राशीवरती काम करावयाचे होते. हे कारण देत असतांना या ठिकाणी हे नमुद करण्यात आले वाप्कोस लिमीटेड कंपनीने बोलाविलेल्या निविदा प्राकलनीय दरापेक्षा जास्त प्राप्त झाल्यामुळे वाप्कोस ने सदर काम करण्यास असमर्थतता दर्शविलेली आहे. मा.महापौरजी, महानगरपालिका एखादे कामाचे टेंडर काढीत असतांना टेंडर काढल्यानंतर ज्या दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली. महानगरपालिका त्या दरावरती त्या कंपनीला वर्कआर्डर देते. परंतु कंपनीने पुन्हा नव्याने टेंडर काढले आणि ते दर त्याच्या पेक्षा अधिक आले म्हणून असमर्थतता दर्शविते हे चुकीचे आहे. मा.महापौरजी, यामध्ये महानगरपालिकेचा मोठया प्रमाणात तोटा होत आहे. जे 140 कोटीचे काम होते ते 250 कोटीपर्यंत वाढलेले आहे. वाप्कोस ने काम करण्यास असमर्थतता दर्शविली आहे यासाठी जे कारण दिले आहे ते आपल्या कराराचे भंग करणारे आहे. जर वाप्कोस ने कराराचा भंग केला तर त्याचे आर्थिक नुकसान महानगरपालिकेला किती होणार आहे याची माहिती प्रशासनाने दयावी.

उपमहापौर:- प्रशासनाने माहिती दयावी.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, या विभागाचे उपायुक्त कोण आहेत आणि कोण अधिकारी उत्तर देत आहे. याचे उत्तर सक्षम प्राधिकारीला द्यावयाचे आहे. आपण कोण आहात.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन. मै कार्यकारी अभियंता हूँ।

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, विभागाचे प्रमुख कोण आहेत. कोण आहेत उपायुक्त, कोण आहेत अपर

आयुक्त. या विभागाचे प्रमुख कोण आहेत. यासाठी सक्षम अधिकारी कोण आहे. त्यांनी उत्तर दयावे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, प्रवीणजी यांनी प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाचे उत्तर या विभागाचे प्रमुख कोण आहेत त्यांनी उत्तर दयावे. अधिकार डेलीगेट केले असेल तर त्यांनी उत्तर दयावे. जलप्रदाय विभागाच्या संदर्भात आपला पहिला प्रश्न होता. त्या संदर्भात चर्चा सुरु होती. या विभागाचे प्रमुखाकडून उत्तर देणे अपेक्षित आहे. एक्झक्युटीव्ह इंजिनिअर उत्तर देत आहे. या विभागाचे प्रमुख कोण आहेत त्याची माहिती दयावी. या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडून अपेक्षित आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.विभागाचे प्रमुख कोण आहेत.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, जलप्रदाय विभाग, आरोग्य अभियांत्रिकी विभाग या विभागाचा विभाग प्रमुख मी अधिक्षक अभियंता म्हणून या प्रश्नाचे उत्तर देत आहे. अमृत योजनेअंतर्गत 42 ईएसआर आणि 1 जीएसआर, मुख्य जलवाहिनीच्या कामांना 28.10.2016 ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. 26.61 कोटीचे प्रपोजल केले होते. त्यानंतर नागपूर महानगरपालिकेने पहिल्यांदा ज्या निविदा बोलाविल्या होत्या. त्या निविदा अधिक दराने प्राप्त झाल्या होत्या. एनआयटी ज्या कंपनीला दिलेली होती ती 53.58 टक्के अधिक दराने होती. प्राकलन राशी पेक्षा जास्त दराने प्राप्त झाली होती ती स्विकारली नाही. मग आपण तिसरी निविदा काढली ती 47.25 अधिक दराची होती.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- ती स्विकारली नाही त्यानंतर पुन्हा आपण रिटेंडर काढले तो टेंडर किती रक्कमेचा होता.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, आपण तिसरी निविदा काढली ती 47 टक्के अधिक होती. 277 रिवाईज झाले होते. नागरिकांचा विरोध होता म्हणून आपण जागा उपलब्ध करुन देवू शकलो नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, यामध्ये वाप्कोससोबत करारनामा केल्यामध्ये त्यामध्ये त्यांनी त्या दरावर काम करण्यास तयारी दर्शविली. त्यानंतर वाप्कोसने पुन्हा टेंडर केले त्यामध्ये आणि ते दर त्याच्या एस्टीमेट कॉस्ट पेक्षा अधिक आले म्हणून असमर्थतता दर्शवित आहे. असाच प्रकार आहे ना.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, त्यांनी नव्याने निविदा बोलाविल्या होत्या. त्यामध्ये त्यांना जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, काही काम त्यांनी पुर्ण केले होते आणि काही काम अपुर्ण केले होते. ते कुठले कुठले काम आहे त्याची यादी दिलेली आहे. 43 टाक्या होत्या. जागा उपलब्ध नाही म्हणून 13 टाक्याचे काम थांबविले होते. जागा मिळाली नाही म्हणून वाप्कोसने काम केले नाही. अनेक ठिकाणी म्हटले आहे की प्राकलनीय दरापेक्षा अधिकच्या निविदा आल्यामुळे वाप्कोस काम करण्यास तयार नाही. हे कारण महानगरपालिका कसे स्विकारु शकते. ज्या अर्थी एस्टीमेट रेट वर त्यांनी काम करण्यास तयारी दर्शविलेली होती. आपण त्यांच्याशी करारनामा केलेला आहे.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, वाप्कोसने काम केले होते. टाकीनिहाय जागा उपलब्ध नसल्यामुळे ती जागा दिली नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, प्राकलनीय दरापेक्षा अधिक आल्यामुळे त्यांनी काम करण्यास असमर्थतता दर्शविली या एकमेव प्रश्नाचे उत्तर आपण दयावे. जागा उपलबध नसल्यामुळे आपण जागा देवू शकले नाही हे माहीत आहे. एस्टीमेट दरावर त्यांनी काम करण्यास समर्थता दर्शविल्यानंतर त्या पध्दतीने न करता ते टेंडर करतात, कोटेशन करतात ते कशा पध्दतीने काम करतात हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी पुन्हा कामाची निविदा केल्या त्या दरापेक्षा अधिकच्या आल्या म्हणून काम करण्यास तयार नाही असे सांगितले आहे. मग त्यांनी करारनामाच कशाला केला.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, अधिकच्या निविदा आल्या म्हणून त्यांनी एकच टाकीचे काम करण्यास तयारी दर्शविलेली नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, ओंकारनगर, म्हाळगीनगर, प्रतापनगर

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- या ठिकाणी नागरिकांचा विरोध असल्यामुळे आपण जागा उपलब्ध करुन देवू शकलो नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, उत्तरामध्ये दिलेले आहे. त्यामध्ये कारण हेच दिलेले आहे. प्रशासनामुळे काम थांबले की वाप्कोसमुळे काम थांबलेले आहे.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- काही प्रस्तावामध्ये जागा प्रस्तावित केली होती ती खेळाच्या मैदानाच्या ठिकाणी होती. प्रतापनगर येथे प्रस्तावित टाकीसाठी जागा उपलब्ध करुन दिली होती ती खेळाचे मैदान होते त्यावर मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल झाले.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, प्रशासनाने जे लेखी उत्तर दिले आहे आणि आता जे वक्तव्य करीत आहे ते वेगळे उत्तर देवून राहिले. त्यामुळे आम्ही या दोन्ही उत्तरातील कोणत्या उत्तरावर विश्वास ठेवायचा.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, प्रतापनगर टाकीकरिता जी जागा प्रस्तावित केली होती त्या ठिकाणी खेळाचे मैदान होते. त्या ठिकाणी टाकी प्रस्तावित केली. ती जागा खेळाचे मैदान असल्यामुळे ती पीआयएल मा.उच्च न्यायालयात दाखल झाली होती. मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते की त्या ठिकाणी टाकी करता येणार नाही. त्यांना जागा जी उपलब्ध करुन दयावयाची होती ती तीन महिन्याच्या आत द्यावयाची होती. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यामुळे ती जागा आपण देवू शकलो नाही त्यामुळे दर वाढले असा मुद्दा आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, यांनी दिलेले लेखी उत्तर आणि सभागृहामध्ये देत असलेल्या उत्तरामध्ये अंतर येत आहे. त्यामुळे आम्ही कुठल्या उततरावर विश्वास ठेवायचा यांनी दिलेल्या लेखी उत्तरावर किंवा यांनी दिलेल्या तोंडी उत्तरावर. यांनी दिलेल्या लेखी उत्तरामध्ये 43 टाक्यामध्ये वेगवेगळी सात कारणे नमुद केलेली आहेत. त्यापैकी एक कारण असे आहे की नागरिकांचा विरोध आहे म्हणून त्या ठिकाणी टाकीचे काम सुरु होवू शकले नाही. दुसरे कारण असे आहे की जागा उपलबध झाली नाही म्हणून टाकीचे काम सुरु झाले नाही. तिसरे असे कारण आहे की मेसर्स वाप्कोस यांनी बोलाविलेल्या निविदा प्राकलन राशी पेक्षा जास्त दराने प्राप्त झाल्यामुळे मेसर्स वाप्कोस यांनी सदर काम करण्यास त्यांनी असमर्थतता दर्शविलेली आहे. या स्पेसिफिक उत्तराच्या संदर्भात मला उत्तर हवे आहे. अशा पध्दतीने जर आपण टेंडर काढले असेल त्या दरावर आपण काम करण्यास त्या कंपनीने मान्य केले असेल आणि तसा करारनामा केला असेल तर ते त्याला बंधनकारक आहे. हे बंधनकारक असल्यावर त्या कंपनीने टेंडर काढल्यानंतर प्राकलन दरापेक्षा अधिकचे आहे म्हणून असमर्थतता दर्शविणे आणि मनपा प्रशासनाने ते मान्य करणे या विलंबामुळे महानगरपालिकेचे अधिकचे नुकसान होत आहे त्यामुळे मेसर्स वाप्कॉस कंपनीला ते काम करण्यासाठी आपण ठरविलेले होते.

महापौर:- वाप्कोस कंपनीसोबत जो करारनामा झाला आहे. त्या करारनाम्यामध्ये अशी हमी दिलेली आहे काय? की जासत दर आले तर त्यांना कामामधून वगळण्याची संधी देवू.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- मा.महापौरजी, प्रतापनगर टाकीमध्ये जागा खेळण्याचे मैदान होते.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, उत्तरामध्ये असे नमुद केले आहे की पहिल्यांदा जागा दिली नाही म्हणून विलंब झाला आणि विलंब झाल्यामुळे दर वाढले. दर वाढल्यामुळे त्यांनी काम करण्यास असमर्थतता दर्शविलेली आहे. मात्र ओंकार नगर टाकी या ठिकाणी त्यांनी पुन्हा तसेच म्हटले, जागा उपलबध नाही या लेखी उत्तरामध्ये दिलेले नाही. मा.महापौरजी, लेखी उत्तरामध्ये म्हटले असते की जागा उपलब्ध नव्हती म्हणून त्यामुळे विलंब झाला. या लेखी उत्तरामध्ये दिलेले आहे की प्राकलनीय राशीपेक्षा अधिकचे टेंडर आले म्हणून त्यांनी असमर्थतता दर्शविली. म्हणून माझा प्रश्न असा होता की लेखी उत्तरावर विश्वास ठेवावयचा की तोंडी दिलेल्या उत्तरावर विश्वास ठेवायचा.

महापौर:- प्रशासनाने लेखी उत्तर देत असतांना त्याची पहिले खात्री करुन घ्यावी नंतरच उत्तर दयावे. दुस-यांदा

अशी चुक झाली नाही पाहिजे.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- मा.महापौरजी, ओंकारनगर टाकीची जी जागा होती ती बुध्द नगरची जागा होती ती लक्षात आली ती खाजगी जागा होती. त्याच्यामध्ये त्या ठिकाणी नवीन जागेचा शोध घेण्यात आला. ती जागा दोन टाकीकरिता अपेक्षित होती. त्या ठिकाणी मग नवीन प्रस्ताव तयार करण्यात आला त्या जागेवर डबल डेकर टाकी बनविण्याचा तयार केला.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी,आता तिसरे, ठराव क्र. 43 दिनांक 06.08.2021 स्थायी समितीने जास्तीचा खर्च नमुद केला. जर प्राकलनीय राशीवर त्याने काम करण्यास समर्थता दर्शविली तर मग अधिकचे टेंडर आले म्हणून त्याला अधिकचे दराचे टेंडर आले म्हणून अधिकचेअप्रुव्हल करतो काय? केले आहे काय?

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- मा.महापौरजी, स्थायी समितीने मंजूरी दिली आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, टेंडर अधिकचा आला म्हणून अप्रुव्हल दिले आहे की काम वाढले आहे म्हणून अधिक झाले आहे.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- मा.महापौरजी, दर वाढल्यामुळे अधिकचे दिले आहे. ओंकार नगर टाकीला जागा उपलब्ध नसल्यामुळे डबलडेकर टाकीचा प्रस्ताव तयार केला आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, छोटा ताजबाग, गांधीबाग, वंजारीनगर, बिनाकी आणि लकडगंज या पाच टाकीच्या संदर्भात ठराव क्र. 63 स्थायी समिती दिनांक 06.08.2019 ज्यादा रक्कम पुन्हा वाप्कॉस कंपनीला मंजुर केली आहे. ही कुठल्या कारणामुळे केली आहे. वाप्कॉसला टेंडरमध्ये अधिकची रक्कम आली म्हणून केली की कामामध्ये वाढ झाली होती म्हणून केली.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- मा.महापौरजी, कामामध्ये वाढ झाली म्हणून केले नाही. गोदरेज आणि ताजबाग या दोन टाक्या मुळ प्रस्तावामध्ये होत्या त्या दोन टाक्या तयार करणे आवश्यक होते.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, उत्तर पुर्णपणे खोटे आहे. गोदरेज आनंदम ही जागा आहे शंभर टक्के पहिल्याच याच्यात होती. जेव्हा सर्व्हे झाला तेव्हा या भागात कुठलीच जागा मिळत नव्हती. तेवहा महानगरपालिकेच्या लेआऊटमध्ये कुठलीही ओपन स्पेस मिळते त्यामुळे ती जागा ऑलरेडी मिळालेली होती. ती जागा पहिल्या दिवसापासून इनकारपेट करण्यात आली होती. त्यावेळी सर्व अधिकारी होते आणि हे जे कारण सांगत आहे हे खोटे आहे. गोदरेज आनंदमची जागा ही होतीच. आजही त्या टाकीचे काम सुरु झाले नाही अशी माझी माहिती आहे.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- मा.महापौरजी, टाकीचे काम सुरु झाले आहे परंतु मला जी माहिती देण्यात आली. मुळ टाकी ज्या घेण्यात आल्या होत्या त्यामध्ये....

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, गोदरेज आनंदमची जी टाकी आहे ते वाप्कॉस ला कधी टेंडर देण्यात आले होते.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, याचे टेंडर कुठल्या कंपनीने तयार केले.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- डीआरए ने केले.

श्री.प्रवीण दटके:- डीआरएने केले तर आनंदमची जागा होती काय?

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार)::- नव्हती

श्री.प्रवीण दटके:- कोण म्हणते नव्हती.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, या सर्व याच्यामध्ये आपण त्यांना अधिकची रक्कम देवून राहिलो ते कोणत्या कारणाने देत आहे ते कारण स्पष्ट होत नाही.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, करारनामा झाल्यानंतर वर्कआर्डर देत असतांना तीन महिन्याच्या आत जागा उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- वंजारीनगर टाकी -2 ची जागा उपलब्ध होती. आपली जागा होती, आपण वैध केली होती. ती कां झाली नाही.

कार्यकारी अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, प्लेग्राऊंडची जागा होती.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- प्लेग्राऊंडचे आरक्षण व्यवगत झाले काय?

श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, बॅनर्जी मॅडमला सर्व माहिती आहे त्यांनी उत्तर दयावे. या अगोदर जी पध्दत होती ती चुकीची आहे. विभागाचे जे विभाग प्रमुख आहेत त्यांनी उत्तर दिले पाहिजे परंतु विभाग प्रमुखाला काहीच माहिती राहत नाही. ही कोणती पध्दत आहे. सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाचा हा विषय आला असेल विभागाच्या अंतर्गत बैठका झाल्या नाहीत काय?

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन, वंजारी नगर-2 की यह पी.जी लँड है, मा.उच्च न्यायालय के आदेश के बगैर पी.जी. लॅन्ड पर काम नही कर सकते, हमको इस बात के लिये मा.उच्च न्यायालय के पास मे जाना पडा, उसका ऑनसर हमको मिला, जहां एक भी डिमांड हमने टाईम पर नही दी थी, इसलिये यह समस्या उठी।

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, विलंब कां झाला आणि या विलंबाचा भुर्दंड या शहरातील जनतेने कां भोगायचा.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, प्रफुल्लजी चा उपप्रश्न आहे जो जास्तीचा पैसा लागणार आहे तो महानगरपालिका देणार आहे काय? केंद्र सरकार देणार आहे की राज्य सरकार देणार आहे. कन्सलटंसीचा नाकर्तेपणा, तुमच्या विभागाचा नाकर्तेपणामुळे जनता याचा भुर्दंड कां भोगणार आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- ज्या न्यायप्रविष्ठ जागा होत्या, कोर्टामधून आदेश दयायचे होते म्हणून विलंब झाला हे समजू शकतो परंतु किती जागा होत्या ज्या न्यायप्रविष्ठ होत्या म्हणून वेळेवर ताबा दिला नाही. तीन महिने के कालावधी मे पजेशन देना था, तीन महिने कालावधी तुमने एक्सटेंड क्यु किया, क्या कारण था, तीन महिने के कालावधी मे उनको पजेशन नही दिया, कुछ भी कारण नही था, हमारे अधिकारी के गलती के कारण हम उसको विलंब कर रहे है और उसका भुर्दंड जनता पर आ रहा है।

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन, लन्ड मे प्राब्लेम था, वह पी.जी. लॅन्ड होने के कारण इतना टाईम लगा।

श्री. प्रफुल्ल गुडधे:- एक भी जगह ऐसी नही जिसमे प्राब्लेम नही है। ताजबाग, लकडगंज, गोदरेज आनंदम, बिनाकी, वंजारीनगर इसी पाच का बताओ, इसमे क्या प्राब्लेम है

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन यहां पर जो टांकीयो का निर्माण करना था, इन जगहो मे प्राब्लेम होने के कारण हम समय पर यह काम नही कर सके।

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, गोदरेज आनंदमची जागा यांना कोणत्या डिपार्टमेंटने हॅन्डओवर केली. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन जगहो के प्राब्लेम के कारण यह विषय प्रलंबित था

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, ती जागा गेल्या 7 वर्षापासून महानगरपालिकेच्या अधिनस्त झालेली आहे. इथे गोदरेज आनंदमच्या मर्जीमुळे होणार होती. ती कोणाच्या वापरात नव्हती ती 7 वर्षाच्या आधी जागा मिळाली आहे. यांनी माहिती दिलेली आहे पहिल्या दिवसापासून डीआरएने याचा प्लॉन तयार केला. 33 हजार स्केअर फुट जागा आहे जी 7 वर्षाआधी आपल्याला मिळाली आहे. खाजगी ऑपरेटरने जागा दिलेली नाही. खाजगी ऑपरेटरने आपल्या बिल्डींग परमीटच्या नियमाप्रमाणे बिल्डींग डिपार्टमेंटकडून इस्टेट डिपार्टमेंटने ती जागा आपल्याकडे घेतली.

इस्टेट डिपार्टमेंटने जागा दिली कुठल्या खाजगी ऑपरेटरने जागा दिली नाही. गोदरेज आनंदमने कंपनीला दिली नाही ती विभागाने विभागाला दिली आहे.

महापौर:- उत्तरामध्ये तफावत कां येत आहे.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय(श्रीमती बॅनजी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सदन 26.08.19 को मिला

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, महानगरपालिकेचे स्थावर डिपार्टमेंन्ट तुम्हांला वेळेमध्ये जागा देत नाही. ती जागा 10 वर्षापासून तुमच्याकडे आहे आणि एनआयटीला टेंडर द्यायच्या आधी दिली आहे. मा.महापौरजी आपण जवाहरलाल नेहरु योजनेचे उदघाटन केले होते, मा.नितीनजीच्या हस्ते केले होते. त्या वेळेच्या अर्बन डिपार्टमेंटच्या प्रमुख मनिषा म्हैसकर मॅडम आल्या होत्या, टेंडरवरती गेले म्हणून त्या कार्यक्रमामध्येच आदेश झाले होते. 60-60 टक्के टेंडर वरती जात आहे. हे काम आपण एनजीपीकडे सोपविले. त्यांनी याचे टेंडर काढले ते परत त्यांनी आपल्या विभागाकडे पाठविले. यांना स्पेसिफिक माहिती नाही. त्यामुळे मा.महापौरजी यांना माहिती नसेल तर हा प्रश्न राखुन ठेवावा.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, गिट्टीखदान आणि खामला या ठिकाणी नगररचना विभागाकडून 18.05.2019 ला नाहरकत प्रमाणपत्र मिळाले आहे. आपण अर्ज दिले कधी होते. नगररचना विभागामध्ये एक वर्ष झाले पडून राहिले असेल तर त्यामुळे या कामाला विलंब झाला. जागा आपल्याकडे होती. या विभागाकडून त्या विभागाला जागा हस्तांतरीत करण्यासाठी इतका वेळ जर लागत असेल किंवा विलंब होत असेल तर मा.महापौरजी या प्रशासनामध्ये चालू काय आहे. 24 बाय 7 पाणी पुरवठा योजनेमध्ये इतका गोंडबंगाल आहे. काहीच कुणाला माहिती नाही. आम्हांला काहीच माहिती नाही. कधीपर्यंत होणार आहे, केव्हा होणार आहे, किती एस्टीमेट लागणार आहे, किती टाक्या होवून राहिल्या, टाक्याची स्थिती काय? कुणाला काहीच माहिती नाही. सगळे अधांतरी आहे. वाप्कॉस कंपनी काम करीत असतांना प्राफीटचे जेवढे काम होते तेवढे करुन टाकले आणि बाकी काम करीत असतांना हात वर करुन टाकले आणि आपण काहीच करीत नाही मा.महापौरजी. आता रेट वाढले त्याची कारण मिमांसा करतांना वेळेवर जागेचा ताबा देवू शकलो नाही. प्रत्येक ठिकाणी सारखे कारण आहे. त्यात जर कारण एकच असेल तर प्रशासकीय दिरंगाईमुळे तर त्याची चौकशी व्हायला पाहिजे. समजा 43 टाकीमध्ये एक टाकीमध्ये जर प्रशासकीय दिरंगाईमुळे विलंब झाला असेल आणि त्याचा भुर्दंड या शहरातील जनतेवर बसला असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. अशा प्रकारे वर्षानुवर्ष 24 बाय 7 योजना चालू आहे. 10-12 वर्षापासून 24 बाय 7 योजना चालून राहिली अजूनपर्यंत पुर्ण होत नाही. फिडरलाईन होत नाही, डिस्ट्रीब्युशन लाईन होत नाही. टाक्यांचे काम होत नाही आणि दरवर्षी आपण वॉटर टेरीफ वाढवून राहिलो. प्रत्येक सभागृहामध्ये एक प्रस्ताव येतो आपल्याला पैसे द्यायचे आहे, कशासाठी द्यायचे आहे.आम्हांला काहीच माहिती नाही, याचा व्हाईट पेपर नाही. दिले नाही तर प्रोजेक्टला विलंब होईल आणि विलंब होवू नये म्हणून प्रत्येकवेळी आपण कोटयावधी रुपये देवून राहिलो. आणि या शहरामधील जनतेवरील बोजा वाढवून राहिलो. वॉटर टेरिफ दरवर्षी 5 परसेंट वाढवून राहिलो, ॲटोमेटीक वाढत जाते. या पाणीपुरवठा योजनेमध्ये नक्की सुरु काय आहे. याचा शेवट कुठे होणार आहे. याचे एस्टीमेट वाढवून राहिलो, मा.महापौरजी, हा गंभीर मामला आहे. या शहरातील जनतेच्या श्रमाचा पैसा, टॅक्समधून येणारा पैसा, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे जर विलंब होत असेल तर त्यामुळे एस्टीमेटचे पैसे वाढत असेल त्यामुळे नागरिकांचे नुकसान होणार असेल तर कुठे हे सगळे थांबले पाहिजेआणि याची सर्वकष चौकशी झाली पाहिजे. हे मोघम उत्तर देत आहे. यांनी दिलेल्या लेखी उत्तरामध्ये आणि आता देत असलेल्या तोंडी उत्तरामध्ये तफावत आहे. माझा हा प्रश्न आहे की प्रशासनामध्ये नक्की काय चालू आहे त्यामुळे माझा हा विषय राखून ठेवण्यात यावा. यावर पुन्हा चौकशी केली पाहिजे. कारण या ठिकाणी प्रशासन कन्फ्युज करण्याचे काम करीत आहे. या उत्तरामधील एकच पान कामाचे

आहे ज्यामध्ये 43 टाक्याचा कामाचा गोषवारा दिला आहे आणि हे सगळे थोथांड आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे हे निदर्शनास आणून देण्यासाठी मी प्रश्न अनेक दिवसापासून उपस्थित केला. ऑनलाईन तेवढया चांगल्या पध्दतीने हा प्रश्न झाला नसता प्रत्यक्षात हा प्रश्न प्रत्यक्षात झालेला आहे. यावर मा.महापौरजी आपण रुलिंग दयावे. याची सर्वकष चौकशी झाली पाहिजे.

श्री.मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, माझ्या भागातील नारी टाकी आहे त्याचे काय झाले त्याची माहिती देण्यात यावी. ठिकठिकाणी नारी, समता नगर ,गोकुळ लेआऊट त्याचे अंडरग्राऊंड केले आणि फक्त खोदून ठेवले आहे. रिस्टोरेशन झाले नाही. आणि दिक्षीत नगर, नारी, शेंडे नगर, सन्याल नगरमध्ये दुषित पाणी येत आहे. किती तरी वर्षापासून दुषित पाणी येत आहे. 1 डिसेंबर पासून त्याचे काम चालू होणार होत असे त्याचे म्हणणे आहे. 1 डिसेंबर गेले नवीन वर्ष सुरु होणार आहे. कामाला सुरुवात झालेली नाही. याचा अर्थ त्यांनी खोटी माहिती दिली आहे. मला याची माहिती दिली तर बरे होईल. नारी, म्हॉडा कॉलनीमध्ये टंकी मंजूर आहे परंतु तेथे काम कां सुरु झालेले नाही. कडु लेआऊट, सन्याल नगर, समता नगर, म्हाडा नगर येथे लाईन खोदून ठेवल्या आहे. पाईपलाईन कां टाकल्या नाही याची माहिती सभागृहात दिली तर मी आपला आभारी राहील.

श्री.जुल्फेकार भुट्टो:- मा.महापौरजी, मेयो हॉस्पीटल प्रिमाईसेस मे एक टांकी को मंजूरी मिली थी, अभी तक उसका काम शुरु नही हुआ। कारण सदर राजनगर से 70-80 साल पुरानी टाकी शांतीनगर तक जाती है। पिछली बार ऐसा विषय आया था, अगर किसी कारणवश उस टांकी मे कोई जर्क आ गया या कोई प्राब्लेम आ गया तो बहोत बडा इफेक्ट होगा। इसको ध्यान मे रखते हुए मेयो हॉस्पीटल परिसरमे एक टांकी को मंजुरी दी गई थी, परंतु उस टांकी का अभी तक काम क्यु नही शुरु हुआ और अपने ऑफीस से कया कार्यवाही शुरु है इसकी माहिती दी जाये नही।

श्री.दिपक चौधरी:- मा.महापौरजी, मेरा भी छोटा सा इस संदर्भ मे प्रश्न है, मेरे भाग मे टांकी का नियोजन किया, कुछ लोगो ने वहां पर अपोझ किया। मैने उदयनगर मे एक ग्राऊंड है वहा पर टाकी बांधने की रिक्वेस्ट की , मेरा यह प्रश्न है की मा.सुप्रीम कोर्ट मे यह विषय जाने के बाद नियम के अंतर्गत कितना समय लगता है। मेरे भाग मे बहोत प्राब्लेम है उस वजह से टांकी का काम हो नही पायेगा परंतु हायेस्ट जगह होने की वजह से पानी का फ्लो अच्छा रहेगा इस वजह से यह प्रस्ताव दिया था। इस बात को दो-चार महिने हो गये इसलिये वह टाकी प्रोसेस मे है या नही है। वहा पर टांकी बनने वाली है की नही ।

महापौर:- सभी सदस्योने अपनी बात रखी, मुलत: मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे व मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके ने इस विषय की अहमीयत को सभागृह के सामने लाया ये उत्तर और सभागृह मे दिये गये उत्तर मे कही ना कही विसंगती हुई है इनको देखते हुऐ जो मुल प्रश्न प्रफुल्लजी गुडधे इन्होने किया की किस अधिकारी के गलती के कारण विलंब हुआ है तो उसपर महानगरपालिका के प्रशासन व्दारा कौनसी कारवाई की जायेंगी यह सारी चिजों की तहकीकात होनी चाहिये, यह सारी चिजों मे भौगोलिक अडचनी है या तांत्रिक अडचनी है और यह कही व्यक्तीगत दिरंगाई से तो नही हुआ यह प्रश्न उन्होने रखा है, मै सभागृह के माध्यम से निर्देश देता हु की जलप्रदाय समिती के अध्यक्ष इस सारी घटना की तहकीकात करे और एक महिने के अंदर अपना अहवाल सभागृह के पटलपर रखे उसके पश्चात हम इस विषयपर चर्चा करेंगे, इसलिये इस विषय को यही पर कायम रखा जाता है।

**प्रश्न क्र. 283**:- डी.पी.डी.सी. फंड आणि शासकीय फंड संदर्भात प्रश्न

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मला उत्तर मिळालेले आहे. या उत्तरामध्ये त्यांनी सांगितले आहे की मी जो प्रश्न विचारला आहे तो इतका मोठा आहे की आम्हांला कर्मचारी नसल्यामुळे कामावर नियंत्रण ठेवायला अमके होणार नाही तमके होणार नाही असे विस्ताराने लिहिलेआहे. मा.महापौरजी, मी एक सोपा प्रश्न विचारला होता की, डी.पी.डी.सी. किंवा शासकीय फंडाचे जे कामे होतात आणि ते करीत असतांना ज्या लिगल गोष्टी आहेत. कुणी

बिलो असेल तर त्याची परफॉर्मस सेक्युरिटी डिपॉझीट दिली आहे काय? असे जे काही प्रश्न विचारले होते. ते भरले जातात तर त्याची माहिती आपण कुठे ठेवतो इतका सोपा प्रश्न आहे.यांना उत्तर द्यायचे नव्हते म्हणून यांनी सर्व डिपार्टमेंटला आणि झोनला ही कॉपी पाठवून दिली त्यामुळे आजपर्यंत मला उत्तर आले नाही. हा प्रश्न विचारुन मला चार महिने झालेले आहे. या चार महिन्यात मला या प्रश्नाचे उत्तर अजूनपर्यंत आलेले नाही. यामध्ये एक उप प्रश्न विचारला होता, एक छोटया कर्मचा-यावर कार्यवाही झालेली आहे. राहुल वासनिक नावाचे क्लर्क आहेत त्यांनी हा निधी कॉन्ट्रकटरला वापस केला म्हणून त्या माणसाला यांनी सस्पेंड केले. मा.महापौरजी, डी.पी.डी.सी.फंडाचा डिपॉझीट वापस करणे हा गुन्हा आहे. संबंधित इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर यांच्या डोळयाखालून फाईल जाते. तो डीडी आल्याशिवाय वर्कआर्डर दिल्या जात नाही. तो वर्कआर्डर छोटा कर्मचारी देत नाही. तो एक्झक्युटीव्ह इंजिनिअर देणार. त्यामुळे हे एकच प्रकरण नाही असे अनेक प्रकरणे आहेत. मी जेव्हा हा प्रश्न विचारला त्याच्या दहा दिवसानंतर यांनी डीडी जमा केला, त्याची रसीद आहे. मा.महापौरजी, हे एकच प्रकरण नाही तर अशा अनेक प्रकरणामध्ये झोन स्तरावर, एक्झक्युटीव्ह स्तरावर हे डीडी न घेता एकच डीडी अनेक प्रकरणांत वापरुन अशा प्रकारचा घोळ सुरु आहे. कार्यवाही कुणावर तर एका छोटया कर्मचा-यावर होते. जे.ई. आहे, एक्झक्युटीव्ह आहे त्यानंतर ही फाईल कॅफोपर्यंत आलेली आहे. हे काम दोन तीन लाखाचे नाही तर 50 लाखाचे काम होते. हा फंड मा. नितीनजी गडकरी यांनी पोलीस लाईन तलावाच्या सौदर्यीकरणासाठी त्यांच्या डी.पी.डी.सी. फंडातून दिला होता. यासाठी मला वाईट वाटते की उत्तम काम करणारे आयुक्त आपल्या याठिकाणी लाभलेले आहे आणि त्यांच्या नजरेखालून अशा चुकांना माफी आहे. डिपार्टमेंटल चौकशी लावली नाही लावली, काय झाले माहीत नाही. माझा तर या प्रशासनाचा जो प्रमुख आहे जे आयुक्त आहेत त्यांच्यावर आरोप आहे. त्यांची वैयक्तिक चुक नाही आहे परंतु त्यांच्या मनोवृत्तीमुळे, मी आजचा पेपर वाचला, स्टेटमेंट वाचले. दहा-वीस दिवसापासून पेपरमध्ये स्टेशनरी घोटाळा गाजत आहे त्यामुळे एकीकडे लोक जनप्रतिनिधीवर आरोप करीत होते आणि आज संपुर्ण प्रशासन गोत्यात आले आहे. आणि सगळे शांत आहेत. हे प्रकरण मा. आयुक्तांच्या स्तरावरुन जाणार असेल तर आपण मा.महापौरजी याची चौकशी करावी. माझे तर असे म्हणणे आहे मा. महापौरजी आपण चौकशी करावी. मला बोलतांना वाईट वाटते की या प्रशासनावर आता विश्वास उरलेला नाही. डीडी वापस करणे सुरु आहे आणि इंजिनिअर परत जाईल, एक्झक्युटीव्ह इंजिनिअर परत जाईल, कॅफो परत जाईल आणि आपण सांगतो की महानगरपालिकेत काम करणारी अनुभवी माणसे नाही म्हणून आपण सांगतो. अनुभवी माणसे नाही म्हणून सरकारकडून अधिकारी मागवितो. कॅफो सरकारकडून मागवितो, एक्झक्युटीव्ह इंजिनिअर सरकारकडून मागवितो, उपायुक्त सरकारकडून, मिना साहेब मागे बसले आहेत ते सरकारकडून, राम जोशी सरकारकडून हे सगळे सरकारकडून आलेले अधिकारी आहेत. मा.महापौरजी, सरकारकडून अधिकारी येत आहे तर अशा प्रकारच्या चुका कशा होतात. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे. सगळे सरकारचे अधिकारी आणि मग कार्यवाही एका छोटया कर्मचा-यावर होते. ज्यांनी वर्कआर्डर दिला त्याचे काय? आपणही या प्रकरणांत पुर्ण चौकशी करावी आणि जे दोषी असतील त्यांच्यावर महानगरपालिकेच्या कायदयाप्रमाणे आणि चारसौबिसी करणारे असतील तर फौजदारी कार्यवाही करावी अशी विनंती करतो. धन्यवाद.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, नागपूर शहर की जो महानगरपालिका है उस के बारे मे रोज पेपर मे आ रहा है की भ्रष्टाचार बहोत प्रमाण मे बढ गया है। ऐसे समय मे आज जो स्थिती है एक गाना याद आता है, 'बडी देर भई नंदलाला तेरी राह तके बीरजबाला' बार बार देखने को तरसे, कहां है मुरलीवाला रे' संकट मे आज है धरती जिसपर तुने जनम लिया, कोई नही है तुजबीन मोहन, भारत का रखवाला रे, ऐसी स्थिती आज नागपूर महानगरपालिका की है। और गाने मे अनुरोध किया जा रहा है की 'बडी देर भई नंदलाला और तेरी राह तके बीरज बाला' बार बार देखने को तरसे, कहां है मुरलीवाला रे' कोई नही है तुजबीन मोहन, भारत का रखवाला रे, ऐसे स्थिती

नागपूर महानगरपालिका की है और नागपूर शहर की जनता गुहार लगा रही है। और जो भ्रष्टाचार हुआ है उसकी पुरी इमानदारी से जॉच मा.आयुक्त साहब ने करना चाहिए। इस भ्रष्टाचार मे कोई पदाधिकारी तो नही है, जिसकी वजह से बात दबाई जा रही है, नागपूर शहर के जनता के पैसे को दुरुपयोग हो रहा है, इसकी चौकशी की जाये और नागपूर की जनता के सामने उजागर किया जाये।

महापौर:- प्रविणजी दटके यांच्या प्रश्नावर प्रशासनाने आपले निवेदन करावे.

अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा. महापौरजी, मा.सदन. मा.सदस्यांनी या मागच्या दहा वर्षामध्ये किती नियोजन करण्यात आले होते त्याबद्दल निवेदन करतो आहे की त्यामध्ये एकुण 3733 इतके महानगरपालिकेमार्फत देण्यात आले होते आणि या प्रश्नामध्ये कोणकोणत्या हेडमधून प्राकलनीय राशीच्या किती बिलो झाले त्यावर किती परफॉर्मस सेक्युरिटी डिपॉझीट दिले आहे.त्याबद्दल दिलेल्या उततरामध्ये एकुण 3721 निविदापैकी 1867 डीडी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये जमा केलेले आहे.मागील पाच वर्षाच्या कालावधीमध्ये मनपा कोषागारात रु. 22,28,39,745/- रक्कमेची सिक्युरिटी जमा करण्यात आलेली आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, ही वर्कआर्डर दयायच्या आधी जमा केली की नंतर जमा केली हा प्रश्न आहे. मी प्रश्न विचारल्यावर त्यांनी सात ते आठ डीडी पाठवून दिला. मला त्या डिपार्टमेंटच्या वासनिक साहेबांनी माहिती दिली. मी पैसे जमा केले किंवा नाही केला हा वेगळा प्रश्न आहे. मला याचे लेखी उत्तर मिळालेले नाही. आपण या विषयाची निष्पक्ष चौकशी लावावी. याच्या निवेदनावर माझा विश्वास नाही. मा.महापौरजी, आपण निष्पक्ष चौकशी आपल्या अंतर्गत लावावी.

अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा. महापौरजी, मा.सदन.लेखी उत्तर दिलेले आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, आता उत्तर दिले आहे.

महापौर :- सन्माननिय सदस्य प्रविणजी दटके इन्होने जो विषय उठाया है वह अत्यंत गंभीर है, कल डी.पी.डी.सी. की मिटींग थी उस मिटींग मे सन्माननिय मंत्री श्री.केदारजी थे उस मिटींग मे जिल्हा परिषद के इसी प्रकार के प्रकरण को लेकर के चर्चा हुई मुलत: यह मिटींग इस विषय पर चर्चा करने के लिये नही होती है लेकीन विषय की गंभीरता इतनी थी की केदारजीने इस विषय को लेकर चर्चा की इस प्रकार की करप्ट प्रॅक्टीसेस प्रशासन की सहयोग से जारी है मा.विधायक प्रविणजी दटकेजी ने जो विषय उठाया है मै उसकी जानकारी देता हु इसलिये इस विषय की संजीदगी को देखते हुऐ इस सभागृह के माध्यम मा.पोहेकरजी ने अपने निवेदन मे बताया ३७०० फाईल है जिन फाईलो मे इस डी.डी. जमा की है उन सारी फाईलो की जानकारी संबंधित स्थायी समिती के अंतर्गत पोहचायी जाये वहापर स्थायी समिती सभापती चिफ इंजिनिअर के साथ मे मिलकर के उन पहलु की तहकीकात करे और उस फाईल मे जो भी त्रुटी हुई है और जो अच्छाई है सभागृह के पटल पर रखे इसलिये १ महिने का समय दिया जाता है।

**<u>प्रश्न क्र. 284</u>**:- नागपूर महानगरपालिका प्रशासनाने अनेक अधिकारी व कर्मचा-यांना अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे हे खरे आहे का? संदर्भात प्रश्न

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, एक साधा प्रश्न विचारला होता की या महानगरपालिकेत अतिरिक्त जबाबदारी सोपवितांना काही नियम आहेत काय? स्थायी समिती, सभागृहाची परवानगी घ्यावी लागते काय? याबाबतीत कोणते नियम आहेत याची सविस्तर माहिती संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी दयावी.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदन. सामान्य प्रशासन विभागाचा आदेश क्र. 664 ओॲन्ड एम दिनांक 24.12.2021 च्या आदेशाने मला अतिरिक्त प्रभार मिळालेला आहे. उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग या अतिरिक्त जबाबदारीच्या अधिकाराने मी मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. मा.महापौरजी, मा.सदस्यांनी प्रश्न विचारला होता की नागपूर महानगरपालिकेत प्रशासनाने अनेक अधिकारी व कर्मचा-यांना अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे काय? हे खरे आहे का? होय . त्यात अतिरिक्त कार्यभार आणि हंगामी हया दोन

बाबी भिन्न बाबी आहेत. हंगामी निवड म्हटले तर ही एक तात्पुरती जबाबदारी एका ठराविक कालावधीकरिता फिक्स पेमेंटवर केलेली निवड ही हंगामी निवड असते. अतिरिक्त कार्यभार म्हटले तर मुळ विभागाचा कार्यभार सांभाळून अतिरिक्त जबाबदारी दुस-या विभागाची सांभाळणे हा अतिरिक्त कारभार आहे. मा.महापौर महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 58(1) अंतर्गत ही हंगामी नेमणुक वर्ग 1 मधून करावयाची असेल तर त्या करिता सभागृहाची मान्यता घेणे गरजेचे आहे. मा.सदस्यांनी विचारले की वर्ग 1 चा अधिकारी अनुपस्थित राहत असेल तर रजेकरिता स्थायी समितीच्या मान्यतेची गरज आहे काय? तर होय, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 1949 चे कलम 57(3) अंतर्गत जर वर्ग 1 चा अधिकारी जर 30 दिवसापेक्षा जास्त दिवसाच्या रजेवर जात असेल तर त्याची रजा स्थायी समितीकडून मंजूर करणे अपेक्षित असते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मी प्रश्न असा विचारला होता की क्लॉस वनच्या अधिका-यांना अतिरिक्त कार्यभार देत असतांना त्याचा कालावधी काय? त्याला या सभागृहाची किंवा स्थायी समितीची परवानगी लागते काय?

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदन. प्रशासकीय सोयीचे दृष्टीने....

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मला सोपे उत्तर दयावे. अतिरिक्त कार्यभार सोपवित असतांना त्याचा कालावधी निश्चित असतो काय? होय किंवा नाही. याच्याकरिता आयुक्तांची परवानगी लागते, या सभागृहाची परवानगी लागते की स्थायी समितीची परवानगी लागते.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदन. अतिरिक्त कार्यभाराकरिता मा.आयुक्तांच्या परवानगीची गरज असते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या सदनाची, स्थायी समितीच्या परवानगीची गरज नसते.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदन. हंगामी नेमणुकीकरिता गरज नसते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, या ठिकाणी विधी अधिकारी असतील तर त्यांनी सांगावे.

महापौर:- विधी अधिका-यांनी सांगावे.

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, मा.सदन. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 57 आणि 58 अंतर्गत यामध्ये हंगामी नियुक्तीबद्दलचा उल्लेख केलेला नाही.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, उल्लेख केला नसेल तर त्याचा अधिकार मा.आयुक्तांकडे आहेअसे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? मी सोपा प्रश्न विचारलेला आहे ज्याचा उल्लेख केला नाही ते सर्व अधिकार मा.आयुक्ताकडे आहे असे समजायचे काय?

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मला यामध्ये सांगायचे आहे की यामध्ये ॲक्टमध्ये उल्लेख नाही परंतु अतिरिक्त कार्यभार देतांना.....

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मला मान्य आहे. मला असे म्हणावयाचे आहे की या कायद्यात ज्या ज्या गोष्टी दिलेल्या नाहीत त्याचे अधिकार सर्व आयुक्तांकडे दिलेले आहेत काय? दुसरे, या कायद्यात आयुक्तांना काय अधिकार दिलेले आहेत, कुठल्या कलमात दिलेले आहेत याची माहिती आहे काय? ते वाचून दाखवावे म्हणजे ते क्लिअर होवून जाईल.

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, मा.सदन. प्रशासकीय अधिकारी किंवा जेष्ठ अधिकारी असल्याने मा.आयुक्त यांना प्रशासकीय जे सर्व अधिकार वापरण्याचे या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये नमुद केलेले आहेत.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, कलम 58 (अ) चे वाचन करावे

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, कलम 58 (अ) वाचले

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, परंतु नंतर कलम 45,(58) (अ) वाचले चे वाचन करावे

महापौर:-

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, परंतु नंतर कलम 45,(58) (अ) वाचले

श्री.प्रविण दटके:- महानगरपालिका म्हणजे काय? महानगरपालिका म्हणजे, आयुक्त, महानगरपालिका म्हणजे स्थायी समिती की महानगरपालिका म्हणजे महापौर ते सांगावे.

निगम आयुक्तः- मा.महापौरजी, मा.सदन. मी परत सांगतो, ॲक्टमध्ये दिलेले अधिकाराचा कुठेही वापर केलेला नाही. कायद्यान्तर्गत कुठलाही अधिकार हातात घेतलेला नाही. प्रशासकीय दृष्टीकोनातून हया नेमणुका केलेल्या आहेत.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, विधी अधिकारी ही उत्तर दयायला उभे आहेत आणि आपले प्रशासकीय अधिकारी सुध्दा उत्तर देत आहेत.

निगम आयुक्तः- मा.महापौरजी, मा.सदन. ॲक्टमध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे. कोणताही अधिकारी एक महिन्याच्या अधिक रजेवर जातो तर त्याचा अतिरिक्त कारभार देत असतांना अतिरिक्त कुठलेही मानधन देत नाही. त्यामुळे यामध्ये सभागृहाच्या अधिकाराचे हनन होत आहे असे नाही. हे कंम्प्लीटली प्रशासकीय दृष्टीकोनातून केले जाते. हीच पध्दत वापरली पाहिजे असे नियमात तरतूद दिलेली नाही आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, म्हणजे नियमात तरतूद नाही तर हे सगळे अधिकार मा.आयुक्तांना आहेत काय? विधी अधिकारी हे बरोबर आहे काय?

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, मा.आयुक्तांचे जे काही अधिकार आहेत.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, ते मला माहीत आहेत. कपले साहेब, तुम्ही महानगरपालिकेचे विधी अधिकारी आहात. मी तुम्हांला मा.महापौरजीच्या वतीने विचारतो की या पुस्तकात उल्लेख नाही आहे. माझे म्हणणे असे आहे की या पुस्तकात जे अधिकार जनरल बॉडीला नाही आहेत, स्थायी समितीला नाही आहेत, महापौरांना नाही आहेत ते सर्व अधिकार आयुक्तांना आहेत काय?

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, प्रशासन चालविण्यासाठी महानगरपालिकेचे हेड म्हणून आयुक्तांना तसा अधिकार आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, सभागृह, स्थायी समिती, प्रभाग समिती, महापौर यांच्या संबंधित काही नियम यात नसतील तर ते सर्व अधिकार आयुक्तांना आहेत काय? प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून, या पुस्तिकेत लिहिले आहे

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, प्रशासनाचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून महानगरपालिकेचे निगम आयुक्त हे आहेत.

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, प्रकरण 2 कलम 4 चे वाचन व्हावे.

विधी अधिकारी(श्री.कपले):- मा.महापौरजी, प्रकरण 2 कलम 4 चे वाचन केले(वाचले)

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, येथे सभागृहामध्ये प्रशासनासोबत भांडण उरकून काढावयाचे नाही. ठिकठिकाणी जे सभागृहाचे अधिकार आहेत ते वापरण्याची हिंमत या प्रशासनाने दाखविली आहे. 100 टक्के दरवाढ, शंभर पट बिल्डींग परमीटचे नियम हा अधिकार सभागृहाला असतांना आयुक्तांनी वापरलेला आहे. अनेक ठिकाणी या सभागृहाचा अवमान या प्रशासनाने केलेला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी पाईंट ऑफ आर्डर, 100 टक्के जी दरवाढ झाली ती एमआरटीपी ॲक्टच्या अमीडमेंटप्रमाणे दिलेली आहे हा अधिकार सभागृहाचा होता ते तरी स्पष्ट करुन सांगावे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मा. प्रफुल्ल गुडधे यांनी दरवाढीचा उल्लेख केला आहे. ही दरवाढ लागू

करीत असतांना त्यामध्ये 124' ब' चा उल्लेख केलेला आहे आणि विश्वस्त मंडळानी तो ठराव मंजूर करुन शासनाला पाठविला आहे. मग या विश्वस्त मंडळात कोण राहणार आहेत, आयुकत राहतील की कोण राहणार आहे. विश्वस्त म्हणून फक्त महानगरपालिका प्राधिकरण म्हणून वापरला नाही तर जे विविध प्राधिकरण आहेत त्याच्या अनुषंगाने विश्वस्त मंडळ हा शब्द वापरलेला आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, या विषयाला आपल्या कक्षेत बोलावून हे सगळे विषय तपासले पाहिजे. त्यामध्ये कोणाचा अधिकार आहे. सहा.आयुक्तांनी वापरायचा, सभापती ने वापरायचा की स्थायी समिती अध्यक्षांनी वापरायचा की आयुक्तांनी वापरायचा हे सगळे क्लिअरकट असावे. या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे हे सभागृह चालावे, सभागृह चालणार आहे. एका सहा.आयुक्तांची आपण अपाईंटमेंट केली. तो विषय समितीला अधिकार होता. प्रशासन आपले सरळ निर्देश देवून देते आपण तो मंजूर करुन घ्या. हे सर्व अधिकार प्रशासनाने वापरले. त्यावेळी इतका विश्वास होता आणि तो आपण मान्य केला. असे अधिकार प्रशासनाने वर्षानुवर्ष वापरले आहे. या सगळया विषयामध्ये एक एका अधिका-याकडे सात-आठ चार्ज दिलेले आहेत. यामुळे कामाला विलंब होतो. एलबीटीमधून उठला तर टॅक्समध्ये बसला, टॅक्समधून उठला तर जीएडीमध्ये बसला, जीएडीमधून बाजारात बसला असे सर्व आहे. एक अधिकार किती काम करणार आहे. एका माणसाकडे या विभागाचा चार्ज त्या विभागाचा चार्ज, एकच माणुस एकाच विभागात पाच-पाच, सहा-सहा वर्ष बसलेला आहे. मग स्टेशनरीचा घोटाळा होतो. प्रश्न विचारला तर वर्षानुवर्ष एकच अधिकारी उत्तर देत आहे. तेच ऑडीटर, तेच अधिकारी दहा-दहा वर्ष, पंधरा-पंधरा वर्ष त्याच ठिकाणी आहेत. मग असे घोटाळे होता. मला एवढेच महणावयाचे आहे की हे काम नीट, सुचारु पध्दतीने चालले पाहिजे मग मा.आयुक्त असतील, मा. अपर आयुक्त असतील.

श्री.कमलेश चौधरी:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, हा विषय उपस्थित झालेला आहे, अधिकार हननचा या संबंधित विषयावर बोलण्यासाठी मी उभा राहिलो आहे. याच्या अगोदर या विषयाबद्दल मी सभागृहामध्ये वारंवारं प्रश्न उपस्थित केला, स्थायी समितीचे जे अध्यक्ष होते त्यांनी 25-25 लाखाचे पत्राचे वाटप केले त्याचे सुध्दा अधिकार स्थायी समिती अध्यक्षांना नव्हते. या अनुषंगाने मी वारंवारं सभागृहात प्रश्न विचारले परंतु दर वेळेस गोलगोल उत्तर आम्हांला मिळालेले आहे. नंतर आयुक्त म्हणून मुंढे साहेब आले तेव्हा व्यवस्थित उत्तर मिळाले. तो मा.स्थायी समिती अध्यक्षांना अधिकार नाही आहे. आमचे एकच म्हणणे आहे या ठिकाणी मा.महापौरजी, हा जो प्रकार आहे हा अगोदर सुध्दा झालेले आहे आणि नेहमी होत असते. जे लोक प्रथमत: निवडुन आले त्यांना हा प्राब्लेम आहे. आम्हांला स्थायी समिती अध्यक्षांच्या दारावर उभे राहून आम्हांला पत्र दयावे तर आमची फाईल पुढे जाईल. त्यामुळे हे स्पष्ट झाले पाहिजे. अशा प्रकारचे अधिकाराचे हनन करण्याचा हा जो प्रश्न आहे. हा फक्त अधिका-याकडून झालेला आहे असे नाही तर पदाधिका-याकडून सुध्दा सुध्दा झालेला आहे. महानगरपालिका अधिनियमात सांगण्यात येते आणि जेव्हा आम्ही वाचतो तेव्हा आम्हांला कळते की 25 लाखाचे अधिकार मा.आयुक्तांना आहे. त्याचे सुध्दा वाटप आपण पदाधिका-यांच्या मार्फत केलेले आहे. फाईल तयार झालेल्या आहेत परंतु जोपर्यंत स्थायी समिती अध्यक्षांचे पत्र नाही तोपर्यंत प्रोव्हीजन होणार नाही. हा सगळा प्रकार चार-पाच वर्ष झाले आहे होत आहे महणून मा.महापौरजी याचा सुध्दा पाठपुरावा करण्यात यावा.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, जी तरतूद आहे ती मान्य आहे परंतु हे जे सांगत आहे ती तरतूद नाही. हा प्रश्न यांचा नाही आहे. त्यांनी आपला प्रश्न उपस्थित करावा आणि त्याला उत्तर मागावे.

श्री.कमलेश चौधरी:-मा.महापौरजी, मा.सदस्य जो महानगरपालिका अधिनियमात तरतूद आहे त्याला मान्य करीत नाही आहे काय?

श्री.सुनिल अग्रवाल:- पाईंट ऑफ इन्फोमशन मा.महापौरजी, जो अभी कमलेश चौधरी ने कहां 25 लाख के पावर मा.आयुक्त महोदय को है, फिर जितनी भी फाईल है वह बिना आदेश के पारीत हो रही है क्या?

इसकी जानकारी दी जाये I

श्री.कमलेश चौधरी:-मा.महापौरजी, प्रोव्हीजन चे जे अधिकार आहेत.स्थायी समिती अध्यक्षांच्या पत्राने जी तरतूद केली जाते ती चुकीची आहे ते मान्य आहे काय?

(बेल)

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, कलम 73 'क 'आणि'ड' चे वाचन करावे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी पुढच्या सभेत लेखी प्रश्न उपस्थित करावा.

महापौर:- मा.कमलेशजी, आपण पुढच्या सभागृहात लेखी प्रश्न विचारावा.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, या विषयाकरिता त्यांनी लेखी सुचना दयावी. सर्व गटनेत्यांना बोलावून हे सर्व अधिकार स्पेसिफाय करावे एवढीच माझी विनंती आहे.

महापौर:- सन्माननिय सदस्य प्रविणजी दटके ने यह विषय सभागृह के सामने जो उपस्थित किया और उस प्रश्न के माध्यम से सभागृह के अधिकार का हनन करने का काम प्रशासन तो नही कर रहा है ऐंसा प्रश्न उपस्थित किया है पुरातन समय मे जब नये नगरसेवक चुनकर के आते थे तो पहले सभागृह से उन्हे एक छोटीसी पुस्तिका दि जाती थी उस पुस्तिका मे सभी बाते थी यह परंपरा प्रशासनने क्यो बंद की इसकी जानकारी नही लेकीन प्रशासन ने यह परंपरा का फिरसे प्रारंभ करे भले ही यह पाच वर्षीय सत्र का अंतिम टप्पा चल रहा हो इसीके साथ साथ एक बार महानगरपालिका मे सभी पक्ष नेता और मा.आयुक्त महोदय आपस मे चर्चा करके इन सारे विषय को निष्पन्न कर सके इस दृष्टीसे सभी पक्ष नेता के नेतृत्व मे आयुक्तजी के साथ मे संयुक्त समिती गठीत की जाती है इसमे सभी विषय के उपर चर्चा करके आपसी सामजंस्य से रुपरेषा तय करके सभागृह के पटल पर रखी जाये, जो नियमो के अंतर्गत हो इस प्रकार के निर्देश दिये जाते है I

**<u>प्रश्न क्र. 285</u>**:- मनपा मध्ये तांत्रिक संवर्गातील एकल पदाच्या पदोन्नती संदर्भात प्रश्न.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, माझा जो प्रश्न होता शासन सेवा अधिनियमान्वये नियुक्ती पदोन्नती पात्रता धारण म.न.पा.स बंधनकारक आहे काय? त्या व्यतिरिक्त मनपामध्ये तांत्रिक संवर्गातील एकल पदाच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने 26.09.2021 च्या पदोन्नती डीपीसी द्वारे (वाचले) मला जे उत्तर देण्यात आले आहे ते समाधानकारक नाही आहे. त्याच्याबद्दल प्रशासनाने सविस्तर माहिती दयावी अशी विनंती करतो.

उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौर महोदय, मा.सदन. मा.सदस्यांनी आता जो प्रश्न विचारला त्याचे लेखी उत्तर दिले आहे. पहिला प्रश्न त्यांचा असा होता की शासन सेवा अधिनियमान्वये नियुक्ती पदोन्नती पात्रता धारण म.न.पा.स बंधनकारक असलयासंबंधाने माहिती या अनुषंगाने उत्तर देण्यात आले आहे. म.न.पा.ठराव क्र. 31 दि. 12.04.76 व त्यात सभागृहाने वेळोवेळी केलेले बदल आणि महाराष्ट्र शासनाकडून पदोन्नतीसंबंधीत दिलेले नियम या अनुषंगाने मार्गदर्शन तत्वाच्या आधारे पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येते. त्यानंतर मा.सदस्यांनी प्रश्न विचारला(वाचले) एकंदरीत मा.महापौरजी प्रश्न असा होता.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, एकल पदाची काही व्याख्या आहे काय?

उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौर महोदय, मा.सदन. मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. सांख्यिकी सहाय्यक हे एकल पद आहे आणि सांख्यिकी सहाययक या पदाला पदोन्नती नाही म्हणून त्यांना अधिक्षक या पदांवर पदोन्नती दिलेली आहे. मा. सदस्यांचा प्रश्न होता त्या अनुषंगाने 31.05.2008 मधील अधिसुचना सभागृहामध्ये सादर झाली होती आणि त्यानुसार सभागृहाने निर्णय दिलेला होता. सांखिकी सहायक व सहायक अधिक्षक या दोन्ही पदाची एकच वेतनश्रेणी असल्याने एकच जेष्ठता यादी तयार करण्यासाठी या सभागृहाने ठराव पारीत केला. हा पहिलाच ठराव या अगोदरच्या प्रकरणांत न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने

सभागृहाने निर्णय घेतला होता आणि या तांत्रिक सांख्यिकी पद आहे यांना अधिक्षक या पदाच्या यादीत पदोन्नतीवर पाठविण्यात यावे.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, यांनी फागो उके चा जो उल्लेख केला आहे त्यांची कोणत्या प्रवर्गामध्ये नियुक्ती करण्यात आली होती. ती जागा राखीव होती काय?

उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौर महोदय, मा.सदन. श्री.फागो संपत उके, हे सांख्यिकी सहायक या पदावर होते त्यांना ठराव क्र. 152 दिनांक 31.08.2010 नुसार अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आली होती.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, माझ्या माहितीनुसार ते पद व्हि.जे. एन.टी.करीता राखीव होते. हा संदर्भ या नवीन पदोन्नतीकरिता लागू होतो काय? एक्सटरनल यादीचे धोरण काय आहे.

उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग(श्री. मिलींद मेश्राम):- मा.महापौर महोदय, मा.सदन. त्यांचे पद सांख्यिकी सहायक होते त्यांना पदोन्नती देण्यात आली होती. सभागृहाचा जो निर्णय झालेला आहे. ठराव क्र. 218, दि. 31.05.2008 सांख्यिकी सहायक व सहायक अधिक्षक या दोन्ही पदाची एकच वेतनश्रेणी असल्याने एकच जेष्ठता यादी तयार करण्यात यावी.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, जेष्ठता यादी प्रकाशित झालेली आहे काय? जेष्ठता यादी प्रकाशित झालेली असेल आणि जेष्ठता यादीमध्ये ज्यांचे नाव असेल त्यांना पदोन्नती दिली असेल तर माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले असे मी सभागृहाला कळवेल.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेत वेगवेगळया पदाची वेगवेगळी जेष्ठता यादी तयार करीत असतो.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, अधिक्षक पदाच्या पदोन्नतीचा प्रश्न आहे. त्याच पदाबद्दल माझा प्रश्न आहे आणि मी बोलत आहे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, आपण पदोन्नती करीत असतांना विविध एकल पदाची आपण एकत्र यादी तयार करतो अदरवाईज आपण वेगवेगळया यादया तयार करतो. सांख्यिकी सहायक आणि सहाययक अधिक्षक या दोन्ही पदाचे पदोन्नती प्रस्ताव एकत्र तयार केलेले आहे. त्यांच्या डेट ऑफ जॉईनिंगनुसार त्याचे पदोन्नती करीत असतो.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, या पदाकरिता शैक्षणिक पात्रता आणि एलएसजीडीचा डिप्लोमा याची आवश्यकता आहे काय?

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, अधिक्षक पदासाठी शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता आहे. एलएसजीडी कम्पलसरी नाही आहे. एलएसजीडी असलेल्यांना आपण अतिरिक्त वेतनमान देत असतो. यापूर्वी म्हणजे पाचव्या वेतन आयोग लागणाच्या पूर्वी आपण अतिरिक्त वेतनमान देत होतो.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, अधिक्षक पदाच्या पदोन्नतीमध्ये ज्या व्यक्तीची योग्यता, जेष्ठता, पात्रता असून त्यांना डावलून जर दुस-या व्यकतीला पदोन्नती देत असेल तर त्यावर माझा आक्षेप आहे. सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर पदोन्नती घेत असेल तर माझा कोणत्याही प्रकारचा आक्षेप राहणार नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे आणि माझे समाधान झालेले आहे असे मी सभागृहामध्ये कळविणं. मा.महापौरजी, माझे एकच निवेदन आहे की सेवाजेष्ठता यादी प्रकाशित झाल्यानंतर जर पदोन्नती मिळत असेल आणि त्यावर आपले रुलिंग येत असेल तर मी तसे आपले निवेदन निश्चित कळविलं.

महापौर:- प्रशासनाने निवेदन करावे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, आपण सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द केलेली आहे. तांत्रिक

सहाय्यक सांख्यिकी पदावर श्री. प्रमोद वानखेडे आहेत आणि सेवाजेष्ठता यादी आपण प्रसिध्द केलेली आहे.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, त्याच्या पूर्वीची सेवाजेष्ठता यादी प्रकाशित केलेली आहे काय?

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, प्रकाशित केलेली आहे.

श्री.सुनिल अग्रवाल:-पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, पदोन्नती कमेटी से जिनको पदोन्नती दी गई है, उनको पदोन्नतीका आदेश दिया नही गया है क्या?

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, इसमे अॅक्च्युअल जो दुसरा संवर्ग है उसमे.....

श्री.प्रविण दटके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, अधिक्षक आणि सहा.अधिक्षक पदाच्या संवर्गात विभागाच्या हातून काही चुक झालेली आहे काय?

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो बरोबर आहे. सन 2013 साली राजस्व निरीक्षक या पदासाठी यादी प्रकाशित झाली होती त्यावेळी ही चुक झाली होती. मा.सदस्यांना लेखी सुध्दा कळविले आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, झालेली चुक दुरुस्त करण्याचे अधिकार कुणाला आहे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, सेवाजेष्ठता यादी आपण दरवर्षी प्रकाशित करीत असतो. त्यानंतर कुणाचा आक्षेप असेल तर त्याचा आक्षेप स्विकारुन त्याला हिअरिंगला बोलाविण्यात येते आणि त्यांनी आक्षेपाप्रमाणे जर चुक झाली असेल तर ती दुरुस्त करण्यात येते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, एका थुल नावाच्या कर्मचा-यावर हा अन्याय झालेला आहे त्याने पत्र दिले हिअरिंगसाठी, आता आम्ही काहीच करु शकत नाही असे राम जोशी, अति.आयुक्त यांचे म्हणणे आहे. आम्ही त्याला डावलून जो ज्युनिअर होता त्याला प्रमोशन दिले आहे. ही झालेली चुक दुरुस्त करण्यात तयार नाही आणि त्या व्यक्तीला न्याय देण्यात तयार नाही. त्याचा ज्युनिअर होता त्याला प्रमोशन देत आहे आणि थुल नावाचा व्यकती हा काही माझा नातेवाईक नाही. तो परीक्षेत प्रावीण्य प्राप्त केलेले आहे तो परीक्षा पास झाला. त्यांनी मा.आयुक्तांकडे रितसर जी काही कार्यवाही करावी लागते त्यासाठी अप्लीकेशन दिली. त्याच्या अप्लीकेशनवर एखाद्या नगरसेवकांला इंटरफेअर करावे लागते अजूनही त्याला न्याय मिळालेला नाही. त्यामुळे मा.महापौरजी, याही प्रकरणात न्याय देण्यात यावा.

महापौर:- प्रशासनाने आपली भुमिका नमुद करावी.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):- मा.महापौरजी, मी आधीच सांगितल्याप्रमाणे सन 2013 साली राजस्व निरीक्षक या पदासाठी यादी प्रकाशित झाली होती त्यावेळी ही चुक झाली होती. ती यादी प्रकाशित झाल्यानंतर यांचा कुठलाचा आक्षेप नव्हता.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, त्याचा आक्षेप नव्हता परंतु यांनी चुक केली होती. त्या गरीब माणसावर अन्याय झालेला आहे. त्याने आक्षेप घेतला नाही ही त्याची चुक झाली आहे काय?

महापौर:- आपल्या हाताने झालेली चुक दुरुस्त करु शकत नाही काय? काय अडचण आहे ते सांगावे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):-मा.महापौरजी, सन 2013 साली जी सेवाजेष्ठता यादी प्रकाशित झाली होती त्यात चुक झाली होती ती बरोबर झाली. मात्र सहा.अधिक्षक या पदावर पदोन्नती श्री.गौतम पाटील हे येत असल्यामुळे 2017 मध्ये त्यांना पदोन्नती देण्यात आली. त्या यादीवर 2021 मध्ये आक्षेप घेतलेला आहे. 2013 पासून साधारणत: साडे आठ वर्षानंतर त्यांनी आक्षेप घेतला. त्याची हिअरिंग सुध्दा जून महिन्यात घेतली होती. त्या सहा.अधिक्षक या पदावर त्यांचे कनिष्ठ श्री.थुल यांना यादीत दाखविण्यात आलेले आहे ती यादी स्विकृत करण्यात आलेली आहे. अधिक्षक पदावर यांना पदोन्नती यासाठी करता येत नाही कारण सहा.अधिक्षक या पदावर 2019 मध्ये त्यांची पदोन्नती झालेली आहे. त्यांना कनिष्ठ पदावरील पदोन्नतीला 3 वर्षाचा कालावधी झालेला आहे प्लस आता

त्यांच्या सारखे जेष्ठ असलेले ओपन संवर्गातील 2003 पासूनचे 97 पदे आहेत. पदोन्नतीचा जी.आर. आता रद्द झाल्यामुळे त्यांना आधी कंसीडर करावे लागेल.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, त्याच्यावर पुर्ण अन्याय झालेला आहे त्याला त्याची जी जागा आहे ती दिली पाहिजे. सेवाजेष्ठता यादीमध्ये चुक तुम्ही केली. त्याने आक्षेप घेतला नाही ही काय त्याची चुक आहे काय? चुक डिपार्टमेंटने केली आणि त्याचा भुर्दंड कर्मचा-याला भोगावा लागत आहे. चुक झालेली आहे असे डिपार्टमेंटने कबुल करीत आहे. म्हणून मागचा, पुढच्या नियमाच्या अधिन राहून त्याला मा.आयुक्तांनी न्याय दयावा अशी माझी मागणी आहे.

श्री. नितीन साठवणे:- मा.महापौरजी, सेवाजेष्ठता यादीनुसार जर यांनी नियमाला सुसंगत राहून यांनी पदोन्नती दिली तर मला कोणत्याही प्रकारचा आक्षेप राहणार नाही. मा.महापौरजी, आपल्याकडून रुलिंग देण्यात यावे. कोणालाही त्याच्या जागेवरुन डावलले जाणार नाही आणि नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महापौर:- पदोन्नती करीत असतांना विभागाने जेष्ठता यादीनुसार काम करणे आवश्यक आहे व त्याचे योग्य पालन व्हावे जर यामध्ये चुक झाली आहे तर ती चुक दुरुस्त करण्यात यावी. मी अनेकदा असे बघितले आहे की काही लोकांना सांगण्यात येते की येणा-या पेमेंटमध्ये कटौती होत आहे कारण की मागच्या वेळी चुकीचा स्केल लाऊन तुम्हाला पगार देण्यात आला जर प्रशासन चुक झाली असल्यामुळे पेमेंट परत घेते तर प्रमोशन मध्ये चुक झाली तर त्याच पध्दतीचा विचार येथे सुध्दा करावा, यामध्ये विधी अधिकारी यांच्याकडुन ओपिनीयन घ्यावे, थुल या कर्मचा-याला त्वरीत न्याय दयावा असे निर्देश या ठिकाणी देण्यात येते.

<u>**प्रश्न** 286</u>:- नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत कोणत्या ठिकाणी व किती होर्डीग्ज लावण्यात आली? या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त:- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, उत्तर समाधानकारक है।

श्रीमती हर्षला साबळे:- मा.महापौरजी, आपण जे होर्डिंग लावतो त्याचा कालावधी किती असतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त साप्रवि(श्री.मिलींद मेश्राम):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. महोदया, नंबर ऑफ प्रकारच्या जाहिराती आपण देतो. जसे सार्वजनिक ठिकाणी जाहिरात लागत असेल तर त्याची टेंडर प्रक्रिया लावण्यात येते. कायद्याच्या तरतुदीतील नियमाप्रमाणे जाहिरात प्रकाशित करणा-याला तीन वर्षाचा अधिकार दिलेला असतो. खाजगी मालमत्तेवर परवानगी देतो. घरमालकालाही जी परवानगी दिली जाते ती कमीत कमी तीन वर्षाची असते. इतर हेडपोस्टवर जाहिरात असते त्याचीही टेंडर प्रक्रिया केल्यानंतर परवानगी तीन वर्षाची असते. नंतर इलेक्ट्रिक पोलवरती जाहिरातीच्या बाबतीत सुध्दा टेंडर प्रक्रिया केल्यानंतर तीन वर्षाची परवानगी असते.

श्रीमती हर्षला साबळे:- मा.महापौरजी, ठीक आहे.

<u>**प्रश्न क्र.** 287:-</u> ज्या कंत्राटदारांचे कार्यादेश वॅटच्या टॅक्स पध्दती मधील होते व त्यांचे देयक जीएसटी च्या टॅक्स पध्दती देण्यात आले अशा संपूर्ण कंत्राटदाराची माहिती देण्यात यावी. या संदर्भात प्रश्न.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, प्रशासनाने निवेदन करावे.

अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर निवेदन करु इच्छितो, दिनांक 1.07.2017 नंतर भारत सरकारने जीएसटी मंजूर केल्यानंतर वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलप्रदाय विभाग अशा वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलप्रदाय विभाग सर्व विभागाने आपआपले परिपत्रक काढले. मात्र या संदर्भाने नगर विकास विभागाच्या कोणत्याही सुचना प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सध्यातरी महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, माझे उत्तर सर्व विभागाला विचारुन दिलेले आहे काय? आपल्या विभागाने एक पत्र दिले आहे. एक बील आहे असा परतावा वॉटरवर्क्स विभागाकडून दिलेला आहे. मला उत्तर दिलेले आहे. येथे राज्य सरकारकडून आलेले सी.ए. आहेत त्यांनी मार्गदर्शन करावे अशी माझी मागणी आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

मुख्य अभियंता(श्री.खवले):- मा.महापौरजी, मा.सदन. या ठिकाणी एक नव्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचा जी.आर. आलेला आहे. 31 जानेवारी 2021 त्याच्यामध्ये ब-यापैकी क्लिअरकट दिलेले आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, आपले सीएसआर असतील किंवा इतर कुठल्या गोष्टी असतील ते कुठल्या भरवश्यावर करतो. पीयुबीच्या भरवश्यावर करतो की आपल्या अर्बन डिपार्टमेंटच्या भरवश्यावर करतो. मा.महापौरजी, आपण एक जे.ई. दिला. मला दिलेलया उत्तरामध्ये एम.बी. हारवलेली आहे असे उत्तरमला दिलेले आहे. आपल्या वॉटरवर्क्स् विभागाने अकाऊन्ट विभागामार्फत असा परतावा दिलेला आहे. राखी नावाचा कॉन्ट्रक्टर आहे, आणि आता ही एम.बी. हरविलेली आहे. असे मला उत्तर दिलेले आहे.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्य श्री.प्रविण दटके साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भात पीडब्लूडीचा जी.आर. होता. प्रश्न विचारल्यानंतर हे माझ्या लक्षात आणून दिले. तो जी.आर.पीडब्लूडीने पाठविलेला होता. त्या जी.आर.मध्ये स्पष्ट आहे आता पर्यंत जे काही झाले कॅफोच्या पत्राच्या आधारावर एक-दोन मुद्दे मांडू इच्छितो. महत्वाचा विषय आहे त्यामध्ये आऊटगो होता. आपल्या खिशातून कसे करायचे, प्रतिपुर्ती कोणाकडून मिळणार काय? ही बाब होती. दुसरा महत्वाचा मुद्दा आहे जो पीडब्लूडीचा नवीन जी.आर. आहे. तो जी.आर. वाचला तर त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. महानगरपालिकेमध्ये सिवरचे काम करतो, रोडचे काम करतो त्यामध्ये डांबर, सिमेंट लागते त्यामुळे एक्टेंट डयुटीचे कम्पोनंट कां महत्वाचे होते. याचा अर्थ जे काही बील ट्रान्झेशनमध्ये आले त्याचा आकडा संकलीत केला पाहिजे. दुसरा,तो जी.आर.वाचला तर आपल्या लक्षात येईल जीएसटी गेल्यामुळे आपल्याला फायदा आहे. जसे टॅक्स कमी होणार. हे वसुलीचे झाले. त्यावर हे सांगितले की आयसोलेटेड पध्दतीने ज्या माणसाकडुन फक्त मला काही वेळेला दयावे लागते काही वेळेला वसुल करावे लागते. त्यामध्ये नेट आऊटफल्यु आपल्याकडून होत असेल यावर आपण शासनाकडून मार्गदर्शन घेवून टाकू. लकीला आता नवीन जी.आर.आलेला आहे आणि फर्स्ट पार्ट युडीएस कन्सल्ट करायचे आणि दुसरे 2017 च्या मधल्या काळावधीतील सगळे काढून यापुढे जाणे योग्य राहील.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, हा एक्ससाईज झाला असता तर महानगरपालिकेला भरपुर फायदा झाला असता. यातून पैसे वाचणार आहेत. परंतु यामध्ये कुणालाच काहीच करायचे नाही म्हणून मी हा प्रश्न विचारलेला आहे. एका कंत्राटदाराला प्रतिपुर्ती दिलेली आहे आणि बाकीचे बील थांबवून ठेवलेले आहे. त्यामध्ये महानगरपालिकेला पैसे द्यायचे आहेत. मा.आयुक्तांना एक प्रकरण लक्षात आणून देतो की आपल्या अकाऊन्ट विभागाच्या चुकीमुळे अनेक कंत्राटदाराला एकाच बीलाचे दोन-दोन वेळा भुगतान झालेले आहे. चार लाखाचे बील असेल तर त्याला आठ लाख मिळाले आहे आणि आजपर्यंत तो पैसा अकाऊन्ट विभागाने वसुल केलेला नाही. दोन वर्ष झाले मा.महापौरजी, बॅक ऑफ महाराष्ट्र यांनी महानगरपालिकेला कळविले आहे. आपल्या विभागाला पैसे वसुल करण्यासाठी वेळच नाही. एकाच कंत्राटदाराला डबल बील दिलेले आहे आणि आपल्या अकाऊन्ट विभागाने पैसे वसुल केलेले नाही. या कंत्राटदारावर मात्र जीव असल्यामुळे त्याची प्रतिपुर्ती केली आणि ज्या लोकांकडून पैसा घ्यायचा होता तो वसुल केला नाही. म्हणून मा.महापौरजी या दोन्ही विषयात पैसे वापस मिळविता आले तर त्या पैश्यातून शहराचा विकास करण्यास हातभार लागणार आहे.

महापौर:- मा.सदस्य ने जो विषय सभागृह के समक्ष चर्चा के लिये रखा यह विषय वारंवार वारंवार चर्चा के लिये आ रहा है प्रशासनिक कार्यप्रणाली मे त्रुटीया आ रही है । मा.आयुक्त को निर्देश दिये जाते है की प्रशासनिक

त्रुटीया वारंवार वारंवार दिख रही है तो कही ना कही प्रशासन मे काम करने वाला कर्मचारी अपने अनुशासन का दुरुपयोग करके काम कर रहा है ऐंसा परिलक्षीत होता है I जिस किसी व्यक्ती के कार्यकाल मे एक कॉट्रॅक्टर को दोबारा पेमेंट दिया गया है और अगर यह मानविय गलती है और उनको सुचना करने के बावजुद भी पेमेंट किया तो इसको मानवी गलती न मानकर के संबंधित व्यक्तीपर महानगरपालिका के नियमो के अंतर्गत जो कारवाई हो सकती है वह कारवाई प्रतिपादीत मा.आयुक्त करे I साथ ही साथ मा.आयुक्त महोदयजीने जी.एस.टी. और वॅट के संदर्भ मे जो निवेदन किया उस निवेदन के अनुरुप एक सक्षम समिती बैठाकर के इन सारे प्रकरणों का १५ दिन के अंदर निराकरण करे, क्यौकी जो आकडे आपने बताये है वह आकडे को देखकर १५ दिन के अंदर उसको कर सकते है इसलिये १५ दिन के अंदर निराकरण करके जी.एस.टी. और वॅट वाला जो विषय है उसको भी संपूर्ण रुप से दिशा मे लेने के लिये प्रशासन कार्य करे इस प्रकार के निर्देश दिये जाते है

**<u>प्रश्न क्र. 288:-</u>** मौजा नागपूर शिट नं. १५३ ख.नं. १७९ कनोजिया स्मॉल फॅक्टरी एरिया सीआरएस हा प्लॉट ३१९० स्के.मि. मध्ये येतो का? या संदर्भात प्रश्न जी विद्युत व्यवस्था प्रदान करण्यात येते त्याचे विद्युत शुल्क संदर्भात प्रश्न.

श्री.नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- मा.महापौरजी, हा विषय असा आहे की 3190 स्केअर मिटर जागा याच्या बाजुला पीयु. लॅन्ड आपल्या नागपूर महानगरपालिकेची आहे. मी. मा.आयुक्तांना विनंती करतो की ही जागा जी आहे त्या जागेवर लोकांनी अतिक्रमण केले आहे. काही लोकांनी त्यावर कब्जा केला आहे. कोर्टामध्ये केस चालू आहे. माझी एवढीच आयुक्तांना विनंती आहे की महानगरपालिकेला ही जागा कशी हस्तांतरीत करता येईल याबाबत कार्यवाही करावी.

महापौर:- महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही करुन ही जागा ताब्यात घेण्यासाठी चांगला वकील लावून सर्वकष प्रयत्न करावे असे निर्देश देण्यात येत आहे.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्यांनी ही लॅन्ड माझ्या लक्षात आणून दिली. ही माहिती मिळाल्यानंतर मी त्याचा सविस्तर आढावा घेतला आणि कोणत्या व्यक्तीच्या ताब्यात जागा आहे त्यांची बैठक सुध्दा आयोजित करणार आहे. 3000 स्केअर फुट जागा सी.आर.एस.अंतर्गत येत असून सदर जागा मंजूर विकास योजनेत औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हे प्रकरण जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

**<u>प्रश्न क्र. 289:-</u>** मनपात राज्य सरकारचे किती अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहेत? या संदर्भात प्रश्न

श्री. संदीप गवई:- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा होता की मनपात राज्य सरकारचे किती अधिकारी प्रतिनियुक्तीवर बदलून आलेले आहेत आजपर्यंत याचे उत्तर मला मिळालेले नाही. या प्रश्नाच्या माध्यमातून असे लक्षात आलेले आहे की मोठया प्रमाणामध्ये नागपूर महानगरपालिकेमध्ये आजपर्यंत जास्त मोठे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आणण्यात आलेले आहेत. जवळपास 49 अधिकारी या पाच वर्षात आलेले आहे. आता 17 अधिकारी कार्यरत आहेत. अशा प्रकारे मोठया प्रमाणामध्ये या महानगरपालिकेमध्ये जे कार्य आपण करीत आहे ते प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-याच्या माध्यमातून आपण धोरण ठरवीत आहे. महानगरपालिकेमध्ये मोठे धोरण आणीत आहे हे यांच्या माध्यमातून आपण ठरवीत आहे तरी सुध्दा आताच मा. नेते दटके साहेब यांनी आपल्या भाषणात सांगितले असे सक्षम अधिकारी असल्यावरही मोठया प्रमाणात महानगरपालिकेत घोटाळे होत आहे. मोठया प्रमाणात कामकाजामध्ये अनियमितता दिसत आहे. त्यामुळे अशा प्रकारचे मोठया प्रमाणामध्ये प्रतिनियुक्तीवर अधिकारी आणणे हे खरोखरच महानगरपालिकेच्या फायद्याचे आहे काय? तसेच 2016 मध्ये एक आकृतीबंध तयार करुन शासनाला पाठविला होता. शासन निर्णयानुसार भरती करण्यासाठी 2018 मध्ये या आकृतीबंधानुसार 201 पदे भरण्यात यावी असा निर्णय झाला होता आणि 2019 नंतर 4407 पदे सफाई कर्मचारी भरण्याचा निर्णय झाला होता. मी प्रशासनाला विचारु इच्छितो की यापैकी किती पदे भरण्यात आली आहेत?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर असे आहे की 2018 मध्ये शासन निर्णय झाले, 2018 च्या निर्णयाने शासनाने 201 वाढीव पदांना मान्यता दिली होती. त्यात सहा.आयुक्त, उपायुक्तांची 3 पदे होती. त्यातील 3 पदे प्रतिनियुक्तीवर आणि 4 पदे पदोन्नतीने भरण्याची परवानगी दिली होती. नवीन पदे भरण्यासाठी दिली नव्हती. जी अस्तित्वात पदे आहेत, वाढीव पदांना मान्यता दिली होती. त्यानंतर 20 सप्टेंबर 2019 मध्ये जो आकृतीबंध शासनाकडे पाठविला होता.विशेषत: सफाई कर्मचा-यांची 4407 पदे भरण्याचा आपला प्रस्ताव होता त्या अनुषंगाने शासनाने 4407 पदे अधिसंख्य सफाई कर्मचा-यांची पदे मंजूर केली होती. त्या अनुषंगाने ज्या अटी 20 वर्षाची अट होती त्या अटीची पुर्तता करणारी अधिसंख्य पदे आरोग्य विभागाकडून भरण्यात आलेली होती. त्यातील जवळपास 3500 पदे भरण्यात आली आहे. आपण जो शासनाला आकृतीबंध पाठविला होता त्यात 8760 पदे भरण्याचा प्रस्ताव पाठविला होता. सध्या आपल्याकडे 939 पदे मंजूर आहेत. त्यातील 4407 अधिसंख्य पदे शासनाने मंजूर केली आहे आणि 3500 अधिसंख्य पदे आपण भरलेली आहेत.

श्री. संदीप गवई:- मा.महापौरजी, ही आजची परिस्थिती आहे. मी मागच्या चार वर्षापासून प्रशासनाला मागणी करीत आहे. माझ्या प्रभागामध्ये जवळपास 10 सफाई कर्मचारी नाही आहे. प्रत्येक वेळी बिगार लावून मला काम करावे लागते. तयामुळे जनतेची गैरसोय होते. सध्याची काय परिसिथती आहे. किती सफाई कर्मचा-यांची आवश्यकता आहे. नागपूर शहराच्या लोकसंख्येनुसार किती सफाई कर्मचारी पदाची आवश्यकताआहे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):- मा.महापौरजी, मा.सदन. नागपूर शहराची लोकसंख्या विचारात घेता आरोग्य विभागाने सफाई कर्मचा-यांची बीट नुसार सफाई कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्री. संदीप गवई:- मा.महापौरजी, प्रशासनाने जे उत्तर दिले आहे ते समाधानकारक नाही आहे.

महापौर:- मा.सदस्यांनी विचारले आहे की या शहराची भौगोलिक सिमा आणि लोकसंख्या लक्षात घेता आणि सर्व क्षेत्राचा व्याप घेवून प्रशासनाला किती संख्या अपेक्षित आहे, किती सफाई कर्मचा-यामुळे काम व्यवस्थित होवू शकते याचा काही आराखडा तयार केला आहे काय?

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):- मा.महापौरजी, 2016 मध्ये जेव्हा आपण आकृतीबंध तयार केला होता तेव्हा या सर्व गोष्टीचा विचार करुन एकुण 8760 पदे लागतील असे आरोग्य विभागाकडून आले होते आणि त्याचा विचार करुनच हे बीट किती असतील त्याप्रमाणे 8760 पदांच्या अगेस्टमध्ये आपल्याकडे आधीची 3939 पदे मंजूर होती आणि शासनाने 4401 पदे मंजूरी केली होती. त्यात 20 वर्षाची अट होती ज्यांना काम करुन 20 वर्ष झाले आहे. असे काही ऐवजदार ज्यांचे 20 वर्ष पुर्ण झाले नसतील त्यांचे सुध्दा समाविष्ट करण्यात येईल.

श्री.दिपक चौधरी:- पाईंटऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, 2016 मध्ये आकृतीबंध मंजूर केला होता. परंतु आता शहरात किती किमी.चे रस्ते आणि आताची सफाई कर्मचा-यांची असलेली गरज याच्यावर आपण कधी संशोधन केलेले आहे काय? शहरामध्ये किती कि.मी.ने रस्ते वाढलेले आहे. आजची गरज काय आहे.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):- मा.महापौरजी, 2016 मध्ये जो आकृतीबंध शासनाकडे पाठविला होता त्यामध्ये या सर्व गोष्टीचा विचार केला होता. हा आकृतीबंध पुर्ण 20 वर्षाकरिता लागू होईल असा विचार करुनच असा आकृतीबंध आराखडा तयार केला होता.

श्री.दिपक चौधरी:- मा.महापौरजी, आजची परिस्थिती अशी आहे एखाद्या वार्डामध्ये 20 कि.मी. चे रस्ते असतील आणि त्या ठिकाणी 26 स्विपर लोकांची गरज असेल त्यातील 25 लोक रिटायर्ड झालेले आहेत तर त्या ठिकाणी 80 टक्के रस्तेच झाडले जातील. काही रस्ते झाडले जाणार नाही. आणि नियम असा आहे की एका कर्मचा-याला 900 मीटरचे रस्ते झाडायचे आहे. दुसरा असा एक प्रश्न आहे. 900 मीटर रस्ता झाडून झाल्यानंतर त्याचे काम संपले असा

काही नियम आहे काय? ते घरी जावू शकतात असा काही नियम आहे काय? की त्यांनी काम करीत राहायला पाहिजे. ते सकाळी 6 वाजता डयुटी जॉईंन करता तर 2.00 वाजेपर्यंत असले पाहिजे किंवा नाही यासाठी काही नियम आहे किंवा नाही.

सहा.आयुक्त, साप्रवि(श्री.धामेचा):- मा.महापौरजी, या संबंधात आरोग्य विभागाचे जे नोडल अधिकारी आहेत त्यांना माहिती आहे.

श्रीमती भावना लोणारे:- मा.महापौरजी, मला या संदर्भात एक प्रश्न विचारावयाचा आहे. माझ्या प्रभागात सफाई कर्मचा-यांच्या पाच वॅकेंट पोस्ट आहेत त्या कधीपर्यंत भरती करण्यात येईल. सफाई कर्मचारी नसल्यामुळे प्रभागात साफसफाई होत नाही. वॅकेंट पोस्ट कधी भरण्यात येईल याची माहिती देण्यात यावी.

नोडल अधिकारी, आरोग्य(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेमध्ये 939 पदे रिक्त होती ही सर्व पदे भरण्यात आलेली आहेत त्या व्यतिरिक्त 4407 ऐवजदार सफाई कर्मचारी कार्यरत होते. 4407 ऐवजदार कर्मचा-यांना अधिसंख्य पदावर समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. सध्या 4300 कर्मचारी कार्यरत आहेत त्यापैकी 3500 कर्मचा-यांना अधिसंख्य पदावर सामावून घेतलेले आहे. सध्या नवीन भरती केलेली नाही तरी 4407 मध्ये सामावून घेतलेले आहे.

श्री.दिपक चौधरी:-मा.महापौरजी, त्यामधले काही दुस-या विभागामध्ये कर्मचारी पाठविले आहे काय?

नोडल अधिकारी, आरोग्य(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, स्थायी सफाई कर्मचारी आणि अधिसंख्य कर्मचारी दुस-या विभागात कार्यरत आहेत. जवळपास 1800 कर्मचारी इतर विभागात कार्यरत आहेत.

श्री. विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, सफाई कर्मचा-यांना एक वॉच देण्यात आली होती त्या वॉचच्या द्वारे तो कोणकोणत्या भागात आहे. कुठे कुठे काम करीत आहे. यावर प्रशासनचे कंट्रोल राहावे म्हणून वॉच देण्यात आली होती. त्या संदर्भात सुध्दा प्रशासनाने माहिती उपलब्ध करुन दयावी की ती वॉच चालू आहे की बंद आहेत.

श्री.दिपक चौधरी:- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे, या शहरामध्ये गल्ली असो, मुख्य रस्ते असो त्यांना स्वच्छ करण्याची गरज भासते किंवा नाही. मग शहरासाठी या सफाई कर्मचा-यांची आवश्यकता असतांना त्यांना दुस-या विभागात पाठविले जाते. त्या विभागाकरिता वेगळया भरती करुन त्या लोकांना त्या ठिकाणी पाठविता येईल. शहराची आजची गरज लक्षात घेता या सफाई कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी प्रश्न उपसिथत केला की सफाई कर्मचा-यांना दुस-या विभागात पाठविल्यामुळे शहराच्या सफाईमध्ये कमतरता पडत आहे हे बरोबर आहे. परंतु आपण ही वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. आपल्या आस्थापनेवर 38 टक्के क्लॉस थ्री आणि क्लॉस फोर ची रिक्त पदे आहेत. त्याच्यामध्ये असे दिले आहे की सफाई च्या व्यतिरिक्त होणारी अन्य महत्वाची कामे आहेत. गार्डनची कामे, पाणीपुरवठयाची कामे, याकरिता काही कर्मचारी उपलब्ध कर्मचा-यांमधून उपलब्ध करुन दयावे लागते. मा.सदस्यांचा मुद्दा असा आहे, सफाई कर्मचा-यांना सॅनीटेशन मध्ये घेता येते काय? नक्की घेता येते, त्याचा आम्ही पाठपुरावा करतो आहे. 2016 साली पुढील 20 वर्षाकरिता किती कर्मचारी लागतील त्या संदर्भात नवीन आराखडा तयार करुन शासनाकडे पाठविला आहे. त्याचप्रमाणे दोन कारणामुळे एक महत्वाचा मुद्दा असा आहे. आस्थापना खर्च हा 53 टक्क्याच्या आतमध्ये राहिला पाहिजे. आज आपला आस्थापना खर्च 52 ते 55 टक्के आहे त्यावरआपल्याला काम करावे लागेल. आपले उत्पन्न वाढवावे लागतील आणि त्याच्यावरती कंट्रोल सुध्दा करावा लागेल. आस्थापना खर्च जास्त् असल्यामुळे शासनाकडुन परवानगी मिळत नाही. तरी सुध्दा आपण पाठपुरावा करीत आहे. भरतीची परवानगी मिळाली तर काही प्रमाणात आपणा भरती करु शकतो. दुसरे, पिंटू झलके यांनी प्रश्न उपस्थित केला, सफाई कर्मचारी काम करीत आहेत काय? सकाळी 6 वाजता आल्यानंतर पुन्हा कामावर जात नाही. त्यांचे महणणे

बरोबर आहे. सफाई कर्मचा-यांवर वॉच ठेवण्यासाठी एक चांगली टेक्नॉलॉजीचे सोल्युशन आहे आणि ते म्हणजे वॉच. त्याचा आपण चांगल्या प्रकारे उपयोग करुन घेत आहे. दोन-तीन महिन्यापुर्वी सहा.आयुक्तांनी डयुटीच्या वेळा तयार केली होत्या. त्यात दोन महत्वाचे काम केले होते. कर्मचारी प्रत्येक झोन झोनमधील कोणताही सफाई कर्मचारी 6.00 वाजता डयुटी जॉईन केल्यानंतर 10.30 वाजेपर्यंत त्याला दिलेले काम पुर्ण करायचे आहे आणि त्यानंतर त्याचा लंच ब्रेक असतो. 11.00 ते 2.00 त्याला कॉमन फॅसिलीटीनुसार गार्डन, ओपन स्पेस मध्ये स्वच्छता करावयाची आहे. याच्या अनुषंगाने त्याला वॉच देण्यात आलेली आहे. या वॉचच्या अनुषंगाने त्याचा पगार काढण्याची सुचना सुध्दा दिलेली आहे. मागे एजन्सीने नमुद केले होते 14 ते 15 लोक काम करीत नाही. कालच त्यांना सुचना दिली आहे की वॉच चा डेटा काढून त्याच्या अटेंडन्सप्रमाणे किती दिवस त्याने कुठले काम केले आहे.

श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, आपण चांगले काम करीत आहात. आपण हुशार आहात परंतु तुमच्या पेक्षा जास्त हे हुशार लोक आहेत. माझ्या वार्डात 200 सफाई कर्मचारी दाखविले जातात परंतु फक्त 25 लोक काम करायला राहतात. अशा प्रकारचे आकडे दिले जातात. 15 वर्षापासून मी स्वत: लक्ष देत आहे. तुम्ही आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त या तुमच्या स्तरावर लक्ष दयावे. या सभागृहात बसलेले सर्व नगरसेवक व्यथीत आहेत. मा.सदस्यय श्री.संदीप गवई यांनी विचारलेला प्रश्न खुप महत्वाचा प्रश्न आहे. या विषयावर, घोडपागे समिती झाली, किती तरी सभा झाल्या. किती तरी भाषणे झालीत. सफाई कर्मचारी त्यांना दिलेल्या घडीमध्ये पाणी टाकतात आणि सांगातात की घडी बंद झाली. याच्यावर कुठेतरी कार्यवाही करण्यात यावी. त्यांना जो पगार देत आहे तो व्यर्थ जात आहे या शब्दात मी बोलतो.

श्री.मनोज सांगोळे:- मा.महापौरजी, माझी विनंती आहे. दहा झोनला अकरा सहा.आयुक्त आहेत आहेत. जेवढया हजेरीच्या चौक्या आहेत, त्या चौकयावर आकास्मिक रेड मारण्यात यावी. ते किती काम करतात आणि कुठे काम करतात याची माहिती मिळून जाईल.

श्री.संदीप गवई:- मा.महापौरजी, अधिका-याने उत्तर दिलेले आहे की पदे कमी असल्यामुळे आपण उत्पन्नही वाढवू शकत नाही आहे आणि आपण चांगले कार्यही करु शकत नाही. आणि मा.आयुक्तांनी सांगितले की आपले उत्पन्न वाढले नाही म्हणून आपण पदे भरु शकत नाही आणि त्यांचा पगार देवू शकत नाही. हा विरोधाभास आहे मा.महापौरजी. सभागृहाच्या माध्यमातून एक विनंती करु इच्छितो, सन 2016 साली जो आकृतीबंध तयार केला सेवाभरतीचा तो परत एकदा सभागृहात आणून सर्व मा.सदस्यांची त्याच्यावरील आक्षेप असतील किंवा जे काही मत असतील ते जाणून घेतले पाहिजे. 2016 नंतर पाच वर्षानंतर नागपूर शहराची लोकसंख्या वाढली. नागपूर शहराचे क्षेत्र वाढले. यासाठी सर्व मा.सदस्यांचे मत जाणून परत या आकृतीबंधावर काही तरी खुलासा केला पाहिजे आणि शासनाला पाठविला पाहिजे एवढी विनंती करतो. आणि प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यांमार्फत या शहरासाठी धोरण ठरविले जाते. किती लोकांना आपल्या महानगरपालिकेत घेतले पाहिजे. स्थानिक कर्मचा-यांना पदोन्नती देवून त्यांच्या मार्फत या नागपूर शहरासाठी धोरण ठरविले तर ते जास्त चांगले राहील असे माझे मत आहे. या धोरणात्मक निर्णयावर आपण मा.महापौरजी रुलिंग दयावे. धन्यवाद.

महापौर:- नागपूर महानगरपालिका की रचना के अंतर्गत ॲडिशनल म्युनिसीपल कमीश्नर जो है वह महानगरपालिका से एक होना चाहिये ऐसा परिभाषित है, महानगरपालिका के कर्मचारीयो का नियमित रुप से प्रमोशन नही किया गया है इस कारण से वह सारे के सारे पद प्रलंबित हो कर के रह गये है मा.आयुक्त ने इस विषय पर व्यक्तिगत रुपसे ध्यान देना चाहिये और प्रमोशन के जितने विषय है उनको यथाशिघ्र प्रमोशन करना चाहिये। प्रशासन का संचालन करते समय अगर निचे के पद से वरिष्ठ पद तक पहुंचा हुआ कर्मचारी, अधिकारी अगर प्रशासन के साथ मिलकर कार्य करता है तो दैनंदिन अडचनो का जितना प्रॅक्टीकल लाभ उसको मिलता है उस दृष्टीसे यह करना नितांत आवश्यक है। सफाई कर्मचारीयों को लेकर के जो प्रश्न सभागृह के सामने उठा हमने

उसकी रेंडम चेकिंग करनी चाहिये। आयुक्त महोदय स्वयं सायकल से निकल जाते है उसी प्रकार के आदेश आयुक्त महोदय से अपने झोनल ऑफिसर को भी देना चाहिये सहा.आयुक्त को भी देना चाहिये उससे उनका स्वास्थ भी अच्छा रहेगा और स्वास्थ अच्छा रहने के साथ साथ प्रशासन के यह अधिकारी कर्मचारी ठिक से काम कर रहे है या नही उसकी जानकारी हो जायेगी इसलिये हवासे चलनेवाले यंत्र को आगे बढाने के लिये हम लोग आगे बढे। आयुक्त महोदय को उसमे महारत हासील है। हमने हमारे सहा. आयुक्तो को सप्ताह मे तीन दिन प्रभाग के अलग अलग इलाको मे जाकर के रेंडम चेकिंग करने के निर्देश दे जिससे इस प्रकार की जो गलतफहमी है वह दुर होंगी इस दिशा मे आयुक्त महोदय को सक्रीयता के साथ मे काम करने के निर्देश दिये जाते है।

**प्रश्न क्र. <u>290:-</u>** नागपूर शहरात प्रत्येक ठिकाणी मोकाट जनावरे फिरत असतात यावर काय कार्यवाही करण्यात आली? या संदर्भात प्रश्न

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मा.आयुक्त, मा.सदस्य. मैने प्रश्न प्रस्तुत किया है उसका मुल कारण यह है की जब भी सुबह होती है हम देखते है की मुर्गा कुकडुकु करके बांग देता है और सुबह हो गई पता चलता था परंतु आज जो अवस्था है वह यह है की सुबह से लेकर रात तक सिर्फ कुत्तो के ही आवाज सुनते है। माझा प्रश्न असा होता मा.महापौरजी की, नागपूर शहरात प्रत्येक ठिकाणी मोकाट जनावरे आहेत आणि त्याची काय व्यवस्था एनएमसी करीत आहे. मला याचे उत्तर मिळालेले आहे. मला म्हणावयाचे आहे की यावरती मी उप प्रश्न उपस्थित केला होता त्यावर माहिती त्यांनी सांगितले, आम्ही जे मोकाट जनावरे पकडतो त्यावर दंड घेत असतो. त्याच्या पलिकडे त्यांनी डिटेलस् दिले आहे. सन 2018-19 मोकाट जनावरे किती पकडले तर 800 च्या जवळपास, सन 2019-20- 700 च्या जवळपास आणि सन 2020-21- 500 च्या जवळपास पकडले असे त्यांनी माहिती दिली आहे. मला प्रश्न पडला की हा आकडा बघितला तर 800, 700, 500, मोकाट जनावरे पकडली आहे. मग मी उत्तरात मवेशी जनावरे किती पकडली म्हणून बघितले आणि मला प्रशासनाला विचारावयाचे आहे की मवेशी याचा अर्थ मोकाट जनावरे एवढीच याची परिभाषा आहे काय? तर आता मला सांगावे की मोकाट जनावरांची परिभाषा काय आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, मोकाट जनावरे ही जी कुणाच्या मालकीची नसतात अशी जनावरे मोकाट जनावरे असतात.

श्री.संजय बंगाले:- मा.महापौरजी, मा.सदस्या श्रीमती परिणिता फुके यांनी जो प्रश्न ठेवलेला आहे. मला प्रशासकीय अधिकारी, अति.आयुक्त किंवा उपायुक्त यांनी सांगावे की हा अतिशय गंभीर विषय नागपूर शहरात उपस्थित होत आहे. लोकांची महानगरपालिकेबद्दल अशी धारणा झालेली आहे की या विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेला काही घेणेदेणे नाही. कुणाला कितीही कुत्रे चावले काय, किती ही जखमी झाले, कितीही मेले. एक म्हण आहे, माणसाला कुत्रा चावला तर बातमी होते, मग आता माणसाने कुत्र्याला चावावे काय? हा प्रश्न या शहरामध्ये निर्माण झालेला आहे. म्हणुन मला या संबंधी संपुर्ण प्रक्रिया सांगण्यात यावी. नगरसेवकांकडे नागरिक तक्रार घेवून येतात की कुत्रा चावलेला आहे त्याला पकडण्यात यावे. नगरसेवक डॉ.महल्ले यांना फोन करतात. त्यांना फोन केल्यानंतर तक्रार कुणाची आहे. तक्रार घ्यायची असल्यास त्या गृहस्थाचा फोन नंबर दया. मग त्यांना फोन जातो, त्यांची तक्रार न घेता त्यांना सुप्रीम कोर्टाचा आदेश सांगितल्या जातो. मा. सुप्रीम कोर्टाने अशा प्रकारचे या संदर्भात आदेश केले आहे. या आदेशामुळे आम्ही गाडी पाठविण्याचा प्रयत्न करु. ही सगळी प्रक्रिया ही बोगस प्रक्रिया आहे. या बोगस प्रक्रियेमुळे काहीही आपण साध्य करु शकणार नाही. या संदर्भात मा.महापौरजी माझी विनंती आहे. मा.आयुक्तांनी या संदर्भात किती बैठका घेतल्या. या विषयावर किती कॉन्सेनट्रेट केले. जे उत्तर विभागाने दिलेले आहे की 700 जनावरे पकडली, 800 जनावरे पकडली. परंतु ही प्रक्रिया काय आहे, ही प्रक्रिया पैसे वाया घालविणारी प्रक्रिया आहे. या ठिकाणी महानगरपालिकेची एक गाडी येते त्यात चार कर्मचारी असतात. या कर्मचा-

यांची मानसिकता अशी असते आम्हांला कुत्रे पकडायचे नाही. तेथे आल्यावर ते लोकांना विचारतात कुत्रे पकडायचे आहे काय? मग त्यातील एखादा पशुप्रेमी असतो तो म्हणतो बिल्कुल कुत्रे पकडना नही. ज्याने तक्रार केली त्याचा विषयच नाही. तो व्यक्ती सांगतो मला कुत्रा चावलेला आहे. या ठिकाणी विषय त्याचा आहे की या नागपूर शहरात अशी टोळी आहे की त्यांना माणसाचे हित नको आहे त्यांना जनावराचे हित आहे. जनावरे पकडण्याच्या संदर्भात ते उभे होवून जातात आणि म्हणतात की कुत्रा नही पकडना है तुम वापस चले जाओ, हे सर्व कर्मचारी कुत्रे न पकडता वापस चालले जातात. फकत कुत्रे पकडण्याचे ते नाटक करतात. मागे मा.महापौरजी यांनी एक चांगला निर्णय घेतला, नागपूर शहरात जेवढया नाल्या आहेत आणि त्या नाल्यात असलेली जेवढे डुकरे आहेत. ती डुकरे पकडण्यासाठी तामीलनाडूवरुन एक टीम बोलाविण्यात आली होती. त्यांनी चांगले काम केले. कुत्रयांच्या बाबतीत मात्र प्रशासन गंभीर दिसत नाही. मा.महापौरजी, माझा प्रश्न आहे पशुवैद्यकीय अधिका-याला, यांनी सांगावे की याची प्रोसेस काय आहे. एका दिवसात किती नगरसेवकांचे फोन येतात, किती कुत्रे पकडले, किती कुत्र्यांवर ट्रिटमेंट केली. कुठे कुत्रे सोडले, कारण रात्रभरात ते कुत्रे पकडल्यावर अर्ध्या तासात परत त्या ठिकाणी येतात. या ठिकाणी प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मला आपल्या वतीने मला प्रशासनाला विचारावयाचे आहे की आपण जे उत्तर मला दिले त्यामध्ये नागपूर शहरातील कुत्र्यांची संख्या किती यावर उत्तर दिलेले नाही. कुत्र्यांची संख्या किती आहे कारण 2018 पर्यंत नागपूर शहरात कुत्र्यांची संख्या 89 हजार होती त्यानंतर डाटा उपलब्ध नाही आणि आपण एक कुत्र्यांच्या नसबंदीचा कार्यक्रम राबवित होता तो 2018 पासून बंद आहे का? बंद असेल तर कां बरे बंद झाला आहे आणि त्यावर काय प्रक्रिया होणार आहे याचे उत्तर देण्यात यावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. कुत्रे पकडण्याची प्रक्रिया काय आहे. आपण कुत्रे पकडू शकतो काय? बाहेर सोडू शकतो काय? या सभागृहासमोर हे सगळे आले पाहिजे. मा.सुप्रीम कोर्टाचे काय निर्देश आहेत तेही सांगण्यात यावे.

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग (डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, 2008 मध्ये मा.उच्च न्यायालयाने निर्णय घेतला होता ॲनिमल वेलफेअर बोर्ड मा.सुप्रीम कोर्टामध्ये पीटीशन दाखल केली होती. या पिटीशनमध्ये मा.सुप्रीम कोर्टाने नसबंदीच्या निर्णयाला स्टे दिला. त्या निर्णयानुसार 2001 मध्ये एनीमल बर्थ कंन्ट्रोल अधिनियम निर्माण झाला. या अधिनियमाअंतर्गत मोकाट कुत्र्यांना पकडून इतरत्र हलवणे अलाऊ नाही आहे. त्यांना पकडून त्यांचे पाप्युलेशन कंट्रोल करण्याकरिता त्यांची नसबंदी करणे, ही प्रक्रिया झाल्यानंतर ज्या जागेवरुन पकडले त्याच जागेवर सोडण्यात यावे, त्यांना इतरत्र कुठेही सोडता येणार नाही. चावणारे कुत्रे, पिसाळलेले कुत्रे असतील त्याचे दहा दिवसात ऑपरेशन करुन त्यांना सोडून दयायचे आहे.

श्री.नागेश मानकर:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, कुत्रे पकडण्याची पध्दत काय आहे. कुत्रे कशा पध्दतीने पकडले जातात.

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, एखाद्या कुत्र्याला रेबीज झाला असेल तर दहा दिवस ऑब्झवेशनमध्ये ठेवतो. त्या दहा दिवसात त्याचा मृत्यू झाला नाही तर त्याचे ऑपरेशन करुन त्यांला त्याच जागेवर सोडण्यात येते. मा.सदस्यांनी विचारले की कुत्रे पकडण्याची काय पध्दत आहे तर कुत्रे बटरफ्लॉय नेटद्वारे पकडले जातात. काही कुत्रे माणसाळलेले असतात त्यांना हाताने उचलले जाते. दुस-या कोणत्याही पध्दतीने कुत्रे पकडता येत नाही.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, प्रभागात जेव्हा गाडी येते तेव्हा एकही कुत्रा राहत नाही कर्मचारी कुत्रे पकडू शकत नाही. याचे ऑब्झवेशन केले असता असे दिसून आले की गाडीला एका विशिष्ट पध्दतीचा हार्न आहे आणि त्यामुळे ते कुत्रे पळून जातात. हे वारंवारं होत असते. तसेच मला कळले की म्हशी पकडण्याच्या ज्या गाडया

आहेत त्या प्रशासनाकडे दोनच गाडया आहेत. मला सांगा पुर्ण नागपूर शहरासाठी दोनच गाडया आहेत तर भांडेवाडीला एक गाडी असेल आणि मी फोन केला तर हिलटॉपला येण्यासाठी त्या गाडीला किती वेळ लागणार आहे. निश्चितच वेळ लागणार आहे. तोपर्यंत त्या गाई मालकाला माहिती होते आणि तो आपल्या गाई-म्हशी घेवून जातो. आपण असे बघतो की गाडी येण्याच्या आधी गाई मालक त्या ठिकाणी पोहचतो आणि आपली गाई-म्हधी घेवून जातो. कोणत्याही प्रकारची तक्रार त्या मालकाची येत नाही तर असे वाटते की कुठेतरी काहीतरी सांठगांठ आहे काय? किंवा ड्रायव्हरची तर सांठगांठ असली पाहिजे किंवा काहीतरी असले पाहिजे आणि हे कुठेतरी थांबले पाहिजे. कारण चुकुन त्या ठिकाणी गाडी पोहचली तरी प्रत्यक्षात त्या गाई मालकाच्या दहा गाई असतात आणि एक गाई उचलली तरी त्यांच्या नऊ गाई फिरत असतात. त्यामुळे आपण पुर्णपणे गाई पकडू शकत नाही आणि ते आपल्या गाई घरी घेवून जातो. मला असे वाटते की मा.आयुक्तांनी याकडे लक्ष दयावे की कुत्रे आणि मवेशी कां पकडले जात नाही. प्रत्येक ठिकाणी कुत्रे दिसतात, गाई-म्हशी दिसतात, प्रत्येक ठिकाणी गायांचे शेण पडलेले राहते. सिव्हील लाईनमध्ये कधीच दिसत नाही असे कां होते. मला असे म्हणायचे नाही परंतु आयुक्तांच्या घरासमोर कुत्रे राहत नाही, गाई-म्हशी राहत नाही. शेण पडलेले राहत नाही. जर ठिकाणी गाडी पाठवून साफसफाई केली जात असेल तर तशी एसओपी आमच्या स्लम भागामध्ये सुध्दा डेव्हलप केली पाहिजे. मला असे वाटते की हे नेहमीचे आहे सिव्हील लाईनमध्ये असा प्रकार होत नाही. आज परिसरात दौरा करतांना एकच प्रश्न नागरिकांमार्फत विचारण्यात आला की कुत्र्यांची व्यवस्था एनएमसी करणार आहे काय? कधीच कार्यवाही होत नाही त्यामुळे कुठे तरी जनावरांच्या मालकाची व अधिका-याची नक्कीच सांठगांठ आहे. असे वारंवारं कां होते. एक ऑब्झवेशन असे आहे की आपण जे दर पाठविले, विभागाने सांगितले की हत्तीसाठी 2000 रुपये उंटासाठी 1200 रु., आणि गाईम्हशी करिता 500 रुपये दंड, तर मला आता सांगा की जो माणुस रस्त्यावर गाईम्हशी ठेवून गोठे चालवितो त्याच्याकडून फक्त 500 रुपये दंड यांच्यावर 2000 रुपये दंड कां ठेवला नाही.

श्री. हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, रस्तेपर चलने का अधिकार गऊ को भी है।

श्री.कमलेश चौधरी:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, राज्य सरकारचा आदेश आहे. वरिष्ठ नगरसेवक प्रविणजी दटके सुध्दा बसले आहे. प्रविणभाऊ आणि मी सोबत बसलो होतो. 20 रुपयाच्या वर याच्यावरती शुल्क वाढविता येत नाही. तरी सुध्दा आम्ही सोबत बसुन एकदम 300 रुपये वाढवून दिले होते. राज्य सरकारच्या आदेशानुसार 20 रुपयाच्यावरती शुल्क वाढविता येत नाही ही त्याची पध्दत आहे. कॅटल फार्मचे जे आरक्षण आहे. आम्ही वारंवारं सांगितले की आम्हांला बनवून दयावे आणि आपले गोठे शहराच्या बाहेर नेण्यासाठी तयार आहे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मला व्यक्तीगत बोलावण्याचे नाही. मोकाट जनावरांमुळे ॲक्सीडेंट सुध्दा वाढलेले आहेत. माझ्या प्रभागामध्ये अभ्यंकर नगरमध्ये एक मुलीला कुत्रा चावलेला आहे आणि आठ-दहा कुत्र्यांनी तिच्यावर ॲटाक केला आहे. याला जबाबदार कोण राहणार आहे.

(बेल)

महापौर:- सन्माननीय नगरसेविकांला आपले वक्तव्य पुर्ण करु दयावे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा होता की जर एखाद्या व्यक्तीला कुत्र्याने चावले तर याला जबाबदार कोण राहणार आहे तर यांनी मला उत्तर दिले आहे की त्याचा मालक जबाबदार राहणार आहे आणि त्याच्याकडून आपण दंड वसुल करणार परंतु मला सांगावे की एखादे मोकाट कुत्र्याने चावले, माझ्या प्रभागात एका मुलीला कुत्रा चावला, ती बातमी पेपरमध्येही आलेली आहे. त्या मुलीवर सर्जरी करावी लागली. मला सांगा, त्या गरीब व्यक्तीने एवढा मोठा खर्च कसा करावा. याची जबाबदारी एनएमसी कां घेत नाही. प्रशासनाने ही माहिती त्यांना झाली तर त्यांनी काय केले? नागपूर शहरात अशी घटना घडलेली आहे याबद्दल प्रशासनाला माहीत आहे काय? प्रशासनाने उत्तर दयावे.

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, अभ्यंकर नगरला एका मुलीला कुत्रा चावलेला आहे त्यावर आपण कार्यवाही केलेली आहे.

श्रीमती नंदा जिचकार:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, हा स्ट्रीट डॉगचा विषय हा सगळयांसाठी घातक विषय आहे. परंतु माझे ऑब्झरवेशन असे आहे की मी जेव्हा अहमदाबादला गेली होती तेथे जेव्हा मी लोकांना विचारले की तुम्हांला स्ट्रीट डॉगचा त्रास आहे काय? त्यांनी सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारचा स्ट्रीट डॉगचा त्रास नाही. त्याचे कारण असे की त्यांच्याकडे कुठेही मटनाचे दुकान उघडयावर नाही तेथे कुठेही रस्त्यावर मटनाचे दुकान दिसत नाही. आपल्या कडील मोकाट कुत्रे हे खुखांर आहेत त्याचे कारण असे की आताच ताईने सांगितले सिव्हील लाईनमध्ये कुत्रे दिसत नाही स्लम एरियामध्ये कुत्रे दिसतात त्याचे कारण असे की मटनाची खुली दुकाने, अनलिगल दुकाने रस्त्यावर उघडयावर लावतात आणि तेथेच त्यांचा वावर जास्त असतो. आणि मटनाच्या वेस्टसाठी ती कुत्रे भांडतात आणि त्यामुळे ती खुखांर कुत्रे झालेली आहेत. त्यामध्ये असे करता येईल जे पशुप्रेमी आहेत त्यांना यात इन्वॉल करा, त्यांना ते कुत्रे दत्तक देता येईल असे काही तरी धोरण करावे लागेल. आज माकडाने कुत्र्यांचे जीव घेतलेले आहे हे सगळे आपल्या शहरातच कां होत आहे. गुजराथ मध्ये तसा त्रास नाही, मी आपल्या डोळयाने बघितले आहे. आपल्याकडे असलेले मच्छीमटनाचे दुकाने जे उघडयावर लागतात त्यांना या येणा-या वर्षामध्ये सिस्टेमेटीक पध्दतीने केले तर काही तरी होवू शकते. आता गोमाता चा विषय आहे. शहरातील जे तबले आहेत ते तबलेधारक गाईचे शेण, गोमुत्र सिवरलाईनमध्ये आणून टाकतात. त्यामुळे सिवरलाईन ब्लॉक होतात. शहरामध्ये तबले कां नको त्याकरिता काही कायदे आहेत, कानुन आहेत त्यानुसारच ते केलेले आहे.

श्रीमती परिणिता फुके:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, ताईने सांगितले पेटा संस्था आहे, डॉग लव्हर आहेत.माझा यावर एक मुद्दा आहे की महानगरपालिका अनेक गोष्टीकरिता पॉलिसी राबविते तशी काही पॉलिसी या एनजीओ बाबतीत लागू करता येईल काय? आणखी एक प्रकार शहरात दिसून येत आहे. लोक घरातील उरलेले अन्न, ब्रेडबिस्कीट आणून कुत्र्यांना खायला टाकतात त्यामुळे त्या ठिकाणी कुत्रे जमा होतात. अशा लोकांवर काही कार्यवाही करता येईल काय? मला कुणाचे मन दुखवायचे नाही परंतु हे हानीकारक आहे. त्यांना समजले पाहिजे, त्यांना या गोष्टीमुळे काय होवू शकत याच्याशी त्यांना काही घेणेदेणे नाही. मग अशा लोकांवर मनपातर्फे कुठली कार्यवाही करण्यात येते काय? त्यांच्याबाबतीत कुठली एसओपी करुन दिलेली आहे काय? असे व्यक्तीगत लोक करीत असतील तर त्यांच्यावर कुठली तरी पॉलिसी करायला पाहिजे. दुसरे, लोक कुत्रे पाळतात आणि त्यांना घाण करण्याकरिता बाहेर फिरवितात, त्यांची सुध्दा घाण सर्वत्र दिसते, विदेशातील लोक जेव्हा येथे येतात तेव्हा त्यांना या बाबतीत खुप आश्चर्य वाटते. यांच्याकरिता सुध्दा कोणती पॉलिसी महानगरपालिकेला लागू केली आहे काय? लागू केली असल्यास त्यांच्यावर कुठल्या प्रकारचे नियंत्रण आपण ठेवत असतो. दुसरा प्रश्न, शहरामध्ये डुकरांची ब्रिडींग वाढलेली आहे. जे लोक डुकरे पाळतात, माझ्या प्रभागाबाबत माहिती मिळाली आहे की माझ्या प्रभागात संजय नगरमध्ये डुकरांची ब्रिडींग होते. मी याबाबतीत झोनच्या सहा.आयुक्तांना सांगितले आणि त्यांना त्या भागातील दौरा करावा म्हणून सांगितले. मोरोणे साहेब सहा.आयुक्त होते त्यांनी दौरा घेतला होता. आताचे सहा.आयुक्त आहेत त्यांनी दौरा घेतला पाहिजे. मला सांगा, अशी ब्रिडींग आपण कोठल्याही जागी करु शकतो काय? तेथील नागरिक सुध्दा जेव्हा मॉर्निंग वॉक ला जातात तेव्हा त्यांना त्याचा त्रास होतो. वारंवारं सहा.आयुक्तांना याबाबतीत सांगितले जाते परंतु काहीही केले जात नाही. त्या ठिकाणी काही घटना घडली तर याला जबाबदार कोण राहणार आहे.

श्री.विक्रम ग्वालबंशी:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, गोरेवाडा प्रकल्प मे नागपूर महानगरपालिका की 71 एकर जगह दी गई है उसके ऐवज मे नागपूर महानगरपालिका को राज्य सरकार से गोरेवाडा मे ही जगह मिली थी । अभी तक हमारा नंदीग्राम योजना का जो प्रस्ताव है पश्चिम नागपूर से बहुत दूर है, प्रशासन ने अभी तक जो नागपूर शहर मे गोरेवाडा प्रकल्प मे जगह ली उसकी ऐवज मे सरकार से जो जगह मिली उसमे नंदीग्राम योजना मे पश्चिम

नागपूर के लिए 37 की कार्यवाही कर जगह आरक्षित की गई है क्या? प्रशासन से यह मेरा प्रश्न है।

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, नंदग्राम करिता गोरेवाडा येथे जागा आरक्षित होती. ती जागा खाजगी मालकीची होती. 25 एकरची जागा होती तसेच त्या जागेवर अतिक्रमण असल्यामुळे जागा अक्वॉयर करु शकलो नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, यह विषय ऐसा है की नागपूर महानगरपालिका की जगह थी जहां पर अपने जलप्रदाय विभाग के क्वार्टर बने है उसके सामने की जगह थी उसके ऐवज मे अपने मुदगल साहब आयुक्त थे तब मौजा गोधनी मे 25 एकर जगह मिली थी।

(बेल)

श्री. सुनिल हिरणवार:- मा.महापौरजी, आपके रहते हुए गोपालन के लिए नागपूर शहर के बाहर जानवर पालने के लिए महानगरपालिका को महाराष्ट्र सरकारने जगह दी है। गोपालन के लिए शहर के बाहर जगह अलॉट की गई, उस जगह पर नंदीग्राम प्रकल्प शुरु करने के बारे मे मा.महापौर महोदय ने सुचित किया था परंतु वह हो नही पाया। मेरी यही विनंती है की मा.महापौरजी आपके रहते गोपालन को न्याय मिले और केंद्र सरकार और राज्य सरकार को प्रस्ताव भेजा जाये।

श्रीमती परिणिता फुके:- नसबंदी आहे ती बंद आहे की सुरु आहे असा प्रश्न केला होता. जर बंद असेल तर कां बंद आहे.

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी,सध्या ती बंद आहे. ऑगस्ट 2020 पासून बंद केली आहे. या कार्यक्रमाकरिता आवश्यक ते प्रावधान उपलब्ध नाही.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, आवश्यक ते प्रावधान उपलब्ध नाही कारण आपण पत्राद्वारे 17 कोटीची मागणी केली होती. स्टेट गर्व्हमेंटकडून आली नाही त्याकरिता आपण पाठपुरावा केला आहे काय? स्टेट गर्व्हमेंटने पैसे दिले नाही तर महानगरपालिकेची काही जबाबदारी नाही आहे काय? दोन वर्ष झाली आहेत आणि हा कार्यक्रम बंद असल्यामुळे नागपूर शहरामध्ये कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे. मला सांगा, स्टेटने निधी दिली नाही तर आपण असेच कुत्रे वाढू देणार आहे काय? या अनुषंगाने आपण मा.आयुक्तांकडे मागणी केली होती काय? स्टेट गर्व्हमेंटकडे पाठपुरावा केला आहे काय?

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील पशुसंवर्धन विभाग, सहा.आयुक्त, उपायुक्त आणि महानगरपालिका यांनी एकत्रित प्रस्ताव 17 कोटीचा तयार करुन शासनाला सादर केलेला आहे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, परिस्थिती फारच गंभीर आहे. गल्लोगल्ली कुत्रे झालेले आहेत आणि दोन वर्षापासून कुत्रयांची नसबंदी झालेली नसल्यामुळे कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे. 17 कोटी रुपये राजय शासनाकडून मिळाले नाही म्हणून महानगरपालिकेने दोन वर्षापासून कोणतीही उपाययोजना केलेली नाही. फार वाईट परिस्थिती महानगरपालिकेची आहे. आपण एसओपीच्या मोठमोठया गोष्टी सांगतो परंतु त्यावर अंमलबजावणी व्हायला पाहिजे. अनेक कुत्रे शहरात आहेत, त्यांची सोय करणे हे महानगरपालिकेचे काम आहे. कर्मचा-यांना सॅलरी देतो त्यांना इन्सेटीव्ह दया की इतके कुत्रे पकडले तर तुम्हाला इतका इन्सेटीव्ह दिल्या जाईल असे तुम्ही प्रॅक्टीकली केले तर त्याच्यातून तुमची सॅलरी निघते की नाही बघा. असे खुप सारे उपाय आहेत ज्याद्वारे आपण आर्थिक व्यवस्था वाढवू शकतो. याच्याकडे लक्ष न देता त्याला महिन्याची सॅलरी देतो याच्यामुळे त्याला कुत्रे पकडले गेले काय किंवा नाही पकडले गेले काय? यांच्याशी काही घेणेदेणे नाही. त्यामुळे गाई पकडण्यासाठी आणि कुत्रे पकडण्यासाठी आपण त्यांना इंन्सेटीव्ह दया, असे काही करता येईल असे मला वाटते.याचा प्रशासनाने विचार करावा. मला बोलू दिले त्याबद्दल धन्यवाद.

श्री.प्रदीप पोहोणे:- मा.महापौरजी, शहरामध्ये सांड यांची सुध्दा संख्या वाढत चाललेली आहे. त्याच्यावर विभागाकडून बंदी घातली पाहिजे त्यांना पकडले पाहिजे.

महापौर:- मा.सदस्य जिस समय सभागृह मे प्रश्न करते है, उस समय प्रश्न करने के बाद प्रशासन जो उत्तर देता है उसको पुरा सुन लिया करे, बहुत सारे प्रश्नो का उसमे समाधान होता है, मा.महल्लेजी ने अपने उत्तर मे बताया कि, सुप्रिम कोर्ट के निर्देश और पशु कल्याण के निर्देश ऐसे है कि अगर आपने किसी एक श्वान को अगर एक इलाके से पकडा है तो उसकी सेवा करने के बाद उसको उसी स्थान पर लाकर छोडना है, बाहर ले जाकर के नही छोड सकते यह पुरे देश के लिये कानुन है, इसलिये एक पकडा, छे पकडा, सात पकडे यह विषय नही है, जब तक यह कानुन कायम है तब तक इस प्रकार की समस्या कायम रहेंगी उसपर एक ही उपाय है कि हमने उनकी नसबंदी करके उनकी बढने वाली संख्या पर प्रतिबंध लगाना चाहिये इस विषय को लेकर भी दुविधा है कि नसबंदी करना चाहिये या नही करना चाहिये कोविड के कार्यकाल मे प्रशासन ने इस गतीविधी को रोका था। मेरी कल ही पशुकल्याण मंत्री से चर्चा हुई उन्होने बताया कि नागपूर शहर के लिये १० करोड रुपयो की राशी इस काम के लिये आवंटित की गयी है, वह राशी इस सप्ताह मे नागपूर शहर को मिल जायेगी यह जो महानगरपालिका का एक विषय है जिसे हम नंदीग्राम योजना के नाम से जानते है यह नंदीग्राम योजना के विषय को लेकर के महानगरपालिका ने पुरी मुस्तदी के साथ मे प्रस्ताव तैयार किया और कोविड के कारण वह विषय भी प्रलंबित रहा। मा.मंत्री महोदय के दालान मे यह विषय भी महानगरपालिका ने प्रेषित किया है इस विषय पर मा.मंत्री महोदय से कल डीपीसी के बैठक थी उसमे मैंने चर्चा की, उन्होने कहां कि मेरे मंत्रालय से इतनी राशी मिलना संभव नही है लैकिन एकनाथरावजी से बात करके इतनी राशी नागपूर शहर के लिये दिलवाऊंगा कारण कि मैं किसान का बेटा हुँ इसलिये गाय के प्रति मेरी भी प्रतिबध्ता है इन सारी चिजों मे महानगरपालिका का प्रशासन कार्यरत है, महानगरपालिका के प्रशासन से इतना निवेदन है कि अगर नगरसेवक की सूचना आने के बाद अगर आप त्वरीत कार्यवाही करेंगे तो नगरसेवक को शिकायत करने का मौका नही मिलेगा यह वारंवार ध्यान मे आता है कि नगरसेवक की शिकायत और शिकायतकर्ता का फोन नंबर आपको मिलने के बाद हम उस स्थान पर श्वान को पकडने न जाते हुऐ उस शिकायतकर्ता की कॉन्सीलिंग करने लगते है और और कॉन्सीलिंग करते समय हम उसको अडचन गिनाने लगते है कि श्वान को पकडने मे हमको कितनी मेहनत करनी पडेगी शिकायतकर्ता ने अडचन सुनने के लिये अपना फोन नंबर नही दिया है इस बात को ध्यान मे रखना चाहिये अगर शिकायतकर्ता के घर तक पहुंचकर आपने सकारत्मक प्रयास किया और हमारी कानुनी अडचनो के अंतर्गत जो भी प्रयास है उसको भी किया उससे यह प्रतिपादीत होता है कि आपने शिकायत को अटेंड किया है इस दृष्टीसे हमलोग उस कार्यवाही को कार्यान्वित करे, नंदीग्राम योजना जो शासन के पास प्रलंबित है मा.आयुक्त महोदय व्यक्तिगत तौर पर उस बात पर ध्यान दे महानगरपालिका ने संपुर्ण नस्ती बनाकर के राज्य सरकार से उसके लिये पैसे मांगे है, टेक्नीकल त्रुटीयों का सारा का सारा निराकरण हो चुका है, अब केवल निधी मिलते ही हम वह काम प्रारंभ कर सके इसलिये प्रयास करे भाई विक्रम ग्वालबंशी ने इस सभागृह मे एक विषय रखा श्री जगदीश ग्वालबंसी इस सभागृह के सदस्य थे और जिस समय नागपूर महानगरपालिका ने वह जमिन गोरेवाडा के प्रकल्प को देने के लिये सभागृह मे प्रस्ताव लाया उस प्रस्ताव के साथ ही उन्होने यह कहां था कि हम एक ही शर्त पर यह जमिन दे कि बची हुऐ जगह का हम गोपालन के लिये उपयोग करेगें उस अट के साथ हमने उस विषय को मंजूरी दी थी, इस सभागृह से उस अट के साथ हमने श्री जगदीश ग्वालबंशी जी के भाषण के साथ उस विषय को मंजूरी दी है तो उस विषय को लेकर के प्रशासन ने स्वयं कारवाई करके उस जगह को उस काम के लिये आरक्षित करना चाहिये, यह प्रक्रिया प्रशासन ने तुरंत प्रारंभ करना चाहिये ऐसे निर्देश प्रशासन को दिये जाते है। मैं एक विषय आपको बताना चाहता हुँ कि, अभी राष्ट्रीय महापौर परिषद वाराणसी मे हुई थी, १२० महापौर वहां पर थे और हमारे केंद्रीय मंत्री भी वहां पर थे वहां पर महापौरो से पुछा गया कि, आपके शहर की सबसे भिषण समस्या क्या है, तो उन्होने यही कहां कि हमारे शहर

की सबसे भिषण समस्या कुत्तो की है अब आप सोचिये कि यह जो विषय है सुप्रिम कोर्ट के आदेश, पशु कल्याण के निर्देश इन सारी चिजों के कारण हम लोग जिस आक्रमकता से उसको प्रतिबंधित करना चाहिये वह नही कर पा रहे है यह कही न कही कानुनी पेचिदगी के कारण हो रहा है । प्रशासन इस दिशा मे संयुक्त रुप मे काम करे, एनजीओ जो इस क्षेत्र मे काम करते है उनकी संख्या बढाकर के उनको साथ मे लेकर के इस दिशा मे हम लोग काम करे जो सूचना नंदाताईने दी की हम सेक्टरवाईज किसी एक या दो झोन मे उसका प्रयोग भी करे मांस पर प्रतिबंध लगाने पर क्या कुत्तो की संख्या पर हम उस क्षेत्र मे प्रतिबंध लगा सकते है क्या इस दृष्टीसे एक या दो झोन को हमने प्रयोगीक तौर पर उपयोग मे लाकर के हमने उस दिशा मे प्रयास करना चाहिये ऐसे निर्देश दिये जाते है । रही बात जो खाजगी श्वान पालक है उनका रजिस्ट्रेशन महानगरपालिका मे हुआ है या नही इस ओर भी महानगरपालिका सजगता से ध्यान दे । मुझे मिली जानकारी के अनुरुप पुणे म्युनिसीपल कार्पोरेशन ने इस प्रकार की प्रक्रिया अपनाई है जो खाजगी श्वान पालक है वह अपने श्वानो को शौंच के लिये अगर सुबह लेकर के घुमता है तो उस श्वान के शौंच को उठाकर के डस्टबीन मे डालने की जबाबदारी उसकी होंगी अन्यथा दंड करेगें क्या यह प्रक्रिया का प्रावधान हम लोग हमारे यहां भी बना सकते है क्या ? अगर बना सकते है तो उस दिशा मे भी प्रशासन कारवाई करे इस प्रकार के निर्देश दिये जाते है ।

<u>**प्रश्न क्र.** 291:-</u> २९१ झोन स्तरावर पशुवैद्यकीय दवाखान्याची सुविधा आहे काय (क्लिनीक) ? या संदर्भात प्रश्न

श्री.राजेंद्र सोनकुसरेः- मा.महापौरजी, मी प्रश्न विचारलेला होता. झोन स्तरावर पशुवैद्यकीय दवाखान्याची सुविधा आहे काय? यावर सभागृहामध्ये चर्चा झाली , जनावरे कोणतीही असो, गाय, म्हशी, कुत्रे, कोणतीही जनावरे असो. ती जखमी झाली तर त्यांना उपचार मिळायला पाहिजे. परंतु त्यांना उपचार मिळत नाही. उपचारासाठी त्यांना फार लांबवर जावे लागते. नागपूर शहरात सेंट्रलमध्ये गांधीबाग येथे सेंट्रर आहे. मी वेटनरी हॉस्पीटलमध्ये एकदा गेलो होतो त्या ठिकाणी मिनीमाता नगर येथून एक 62 वर्षाची म्हातारी बाई एका बकरीला उपचारासाठी घेवून आली होती. तिला बकरीला ऑटोमध्ये आणले होते. तिला ऑटोचे 150 रुपये भाडे दयावे लागले होते. आणि जाण्याचे 150 रुपये याप्रमाणे तिला 300 रुपये खर्च करावा लागणार होता. त्या ठिकाणी 10 रुपयाच्या पर्चीवर उपचार मिळणार होते. त्या 10 रुपयाच्या पर्चीकरिता तिला 300 रुपये खर्च करावे लागले. माझे म्हणणे असे आहे मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेतर्फे नाही झोनवाईज तर विधानसभा क्षेत्रावाईज या मोकाट जनावरांना ही सुविधा मिळायला पाहिजे आणि जखमींना उपचार मिळाले पाहिजे. याकरिता क्लिनिक उघडले पाहिजे. आपल्या माध्यमातून गोरगरीबांना मदत म्हणून कुत्रा चावला असेल तर त्यांना इन्जेक्शन सुध्दा मिळायला पाहिजे.तसेच कुकुटपालन, पशुपालन यांना प्रशिक्षण् आणि मार्गदर्शन दिले तर जनावरांपासून आजार होणार नाहीत आणि जनावरांना वॅक्सीन सुध्दा देण्यात यावे. याकडे प्रशासनाकडून लक्ष देण्यात यावे जेणेकरुन पशुपालक आहेत त्यांचा आर्थिक फायदा होईल. आताच आपल्याला सांगितल्याप्रमाणे प्रशासनाकडून एक माहिती देण्यात यावी की आपल्याकडे जनावरांसाठी एम्बुलन्स किती आहेत त्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात यावी.

नोडल अधिकारी, आरोग्य विभाग(डॉ.महल्ले):- मा.महापौरजी, एकच एम्बुलन्स कार्यरत आहे.

श्री.राजेंद्र सोनकुसरेः- मा.महापौरजी, जनावरांची संख्या पाहता नागपूर शहरासाठी एक एम्बुलन्स पुरेशी आहे काय? महाराष्ट्र शासनाकडून मोकाट जनावरांकरिता एम्बुलन्सकरिता मागणी करायला पाहिजे. ज्या काही मोकाट जनावरांच्या बाबतीत समस्या सांगण्यात येतात त्याप्रमाणे मोकाट जनावरांसाठी सुध्दा सुविधा उपलबध झाल्या पाहिजे. मुक जनावरे आपल्या वेदना सांगू शकत नाही. पशुप्रेमीकरिता हा मोठा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. झोनवाईज नाही तर विधानसभा क्षेत्रावाईज या सुविधा जर उघडल्या तर मला असे वाटते आपण दिलेले निर्देश आहेत त्याच्या जवळपास जाता येईल आणि या समस्या काही प्रमाणात दूर होतील एवढेच मला म्हणावयचे आहेत.

महापौरः- नागपूर शहर मे पशुवैद्यकीय महाविद्यालय है, बिच मे चार, पांच वर्षपूर्व उनके माध्यम से एक पत्र नागपूर

महानगरपालिका को प्राप्त हुआ, वहां पढनेवाले जो बच्चे है उन बच्चो के इंटरशिप के लिये नागपूर शहर मे कही पर भी जगह नही है, इसलिये उनको दुर के इलाको मे भेजना पढता है, अगर नागपूर महानगरपालिका इस प्रकार की जगह उपलब्ध करवाकर दे तो वहां हॉस्पिटल का संचालन वह करने को तैयार है, जिसने उनके विद्यार्थी वहां आकर प्रॅक्टीस कर सकते है, अगर इस प्रकार की जगह नागपूर महानगरपालिका उपलब्ध करा सके तो जो पशु वैद्यकीय हॉस्पिटल है, उनकी संख्या बढ जायेगी, और महानगरपलिका का पर्सनल पशु वैद्यकीय दवाखाने का संचालन भी हो सकेगा,इसलिये पशु वैद्यकीय महाविद्यालय से चर्चा करके इस प्रकार के हम किसी निष्कर्ष पर पहुंचे, ऐसे निर्देश प्रशासन को दिये जाते है, और जो महानगरपालिका का एकमात्र हॉस्पिटल है उस हॉस्पिटल मे भी हमने एक्स-रे कक्ष और सोनोग्रॉफी कक्ष बनाकर रखा है, लैकिन वहां पर मशीने नही है, तो वहां पर भी यंत्रणा खडी करे अगर कोई छोटा जानवर वहां पर आता है तो उनकी संपुर्ण देखरेख हम करसके, इसलिये उनके लिये होनेवाले आयसोलेट और सोनोग्राफी की व्यवस्था हम वहां पर करे, इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है l

**<u>प्रश्न क्र. 292:-</u>** २९२ प्र.क्र. २३ अंतुजी नगर, गंथाळे लेआऊट ख.क्र. १०७/१ मौजा भांडेवाडी व न्यु सुरज नगर ख.क्र. ११० स्लम मध्ये अंतर्भुत करण्याचा प्रस्ताव मनपाला मिळाले होते या या संदर्भात प्रश्न

अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, माझा प्रश्न होता, प्रभाग क्र. 23 येथील अंतुजी नगर, गंथाळे लेआऊट खसरा क्र. 107/1, मौजा भांडेवाडी व न्यु सुरज नगर, ख्. क्र.110 स्लममध्ये अंतर्भुत करण्याचा प्रयत्न मी बरेच वर्षापासून, ब-याच महिन्यापासून करीत आहे. आपल्या कक्षेत या संदर्भात मा.महापौरजी यांनी निर्देश दिले आहे. माझी प्रशासनाला एवढीच विनंती आहे की या प्रश्नाच्या अनुषंगाने मा.महापौरजी यांनी काय निर्देश दिले होते त्याचे वाचन करावे. त्याचे कारण असे आहे की मी त्यांना म्हटले की मा. महापौरजीनी बैठकीत निर्देश दिले आहे त्या निर्देशाचे पालन न करणा-या अधिका-यावर काय कार्यवाही प्रस्तावित आहे. तर यांनी मला सांगितले की निर्देशाचे पालन करण्यात आले आहे. तर मा.महापौरजी यांनी जे निर्देश दिले होते त्याचे वाचन करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

महापौर:- निर्देशाचे वाचन करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):- मा.महापौरजी, मा.सदन. दिनांक 22.10.2021 रोजीच्या सर्वसाधारण सभेत प्रश्न क्र. 251 प्रभाग क्र. 23 वर प्रशासनाला निर्देशित केले होते की मा.सदस्यांनी जी सुचना केली आहे त्याप्रमाणे नियमाप्रमाणे तर्कसंगत जे आहे त्या दृष्टीने प्रशासनाने पावले उचवावी.

अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, विधी विभागाचे काय मत आहे त्याचे सुध्दा वाचन करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):- मा.महापौरजी, मा.सदन. (वाचले) विधी विभागाने असा अभिप्राय दिला होता की कलम 4 प्रमाणे कार्यवाही करावी.

अॅड धर्मपाल मेश्राम:- कलम 4 चे वाचन करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):- मा.महापौरजी, मा.सदन.(वाचले)

अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, जर ती वस्ती असेल तर त्याला स्लममध्ये अंतर्भुत करता येते असा त्याचा अर्थ होते किंवा नाही. जर मा.महापौरजी, त्या वस्तीच्या संदर्भात मागणी केली त्या वस्त्या कचरा डम्पींगच्या लगतच्या आहेत तर आरोग्याच्या दृष्टीने योग्य कशा होतील. कचरा डम्पींगच्या संदर्भातील प्रश्न सर्व जगभर आहेत. असे निदर्शनास आले आहे की अनेक संस्थाचे रिपोर्ट, अनेक सरकारचे रिपोर्ट, अनेक एनजीओचे रिपोर्ट कचरा डम्पींगच्या परिसरतील लोकांना दम्याचा, कॅन्सरचा, अशा विविध आजारांचे केंद्र हे डम्पींग सेंटर आहेत. फक्त स्लम डिक्लेअर झालेले नाही असे आम्ही समजायचे काय?

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):- मा.महापौरजी, मा.सदन. महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम 1971 च्या कलम 4 नुसार अंतुजीनगर व न्यु सुरजनगर या दोन्ही वस्त्यांच्या परिसरात जावून चाचणी केलेली आहे व हया दोन्ही

वस्त्या स्लममध्ये अंतर्भुत करणे योग्य वाटत नाही असा निर्णय सक्षम प्राधिकरणाने घेतला आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, कायद्याच्या पलीकडे तुम्हांला अधिकार आहेत काय?

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, त्या ठिकाणी दाटीवाटीची वस्ती आहे त्या ठिकाणी अनेक गरीब लोक राहतात. त्या ठिकाणी लोकांना अनेक रोगराईचे प्रश्न उद्भवत असतात. त्या ठिकाणी लोक हातावर घेवून खाणारे लोक आहेत. त्या ठिकाणी गरीब लोकांना सुविधा नाही. स्लम ॲक्टप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी अशा वस्त्या स्लम घोषित केल्या. त्याच्यानंतर संघर्षनगर जी वस्ती आहे 1997 साली मी जेव्हा नगरसेवक होताते त्या काळमध्ये स्लम घोषित करण्यात आली होती. त्या लगत त्या ठिकाणी स्लम एरिया आहे. त्या ठिकाणी विभागाने जावून बघावे.त्याच्यामुळे अधिकारी ज्या पध्दतीने उत्तर देत आहेत त्यांची ही पध्दत बरोबर दिसत नाही.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इर्न्फेमेशन मा.महापौरजी, संबंधित अधिकारी उत्तर देत आहे त्या परिसरातील आर्थिक सर्वेक्षण अहवाल आलेला आहे काय? आरोग्य पाहणी अहवाल आलेला आहे काय? शैक्षणिक अहवाल आलेला आहे काय? त्याच्या आधारावर ते मत देत आहे. ती वस्ती स्लम घोषित करावयाची नाही असे त्यांचे वैयक्तिक मत आहे. मला असे वाटते असे उत्तर सभागृहामध्ये चालणार नाही. तुमच्या कडे कुठला अहवाल आहे त्याच्या आधारावर तुम्ही उत्तर देत आहे. काही तरी अहवाल पाहिजे, त्या संदर्भातील काही तरी रेकार्ड असला पाहिजे. तो सभागृहाला दाखविण्यात यावा.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, संबंधित अधिकारी हे या सभागृहाची आणि सर्व मा.सदस्यांची दिशाभूल करीत आहे त्यांना समज देण्याची गरज आहे. तुम्ही सक्षम प्राधिकरण आहात परंतु तुम्ही सक्षम आहात काय ? हे तपासण्याची मा.महापौरजी या ठिकाणी गरज आहे.

महापौर:- मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांनी प्रश्न उपस्थित केला. या अनुषंगाने काय संदर्भ घेवून आपण घोषणा करीत आहे.

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):- मा.महापौरजी, जशी झोपडपट्टी असते तशी ती झोपडपट्टी नाही आहे मा.महापौरजी, ते दाटीवाटीचे क्षेत्र नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, दाटवस्तीचे क्षेत्र हे कसे निश्चित केले जाते. एखादे क्षेत्र दाटीवाटीचे ते टेनॉमीक्स डेन्सीटीवर डिसाईज केले जाते ? लेआऊट फॉरमेशनमध्ये आले म्हणून त्याला स्लम म्हणता येणार नाही असे नाही.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी, एक प्रश्न आहे ज्या ठिकाणी स्लम घोषित कले आणि त्या ठिकाणी आपण पट्टे वाटप केले. ज्या ठिकाणी जर सगळे लेआऊट रेग्युलाईज करायला सांगितले आणि त्यानंतर स्लम घोषित करुन पट्टे वाटप केले. तुम्ही म्हणत आहे की त्या ठिकाणी रस्ते आहेत. तर तुम्ही स्व:त अशी व्याख्या करीत असाल तर त्या ठिकाणी शासनाच्या निर्णयाने पट्टेवाटप केले आहे तर हा सुध्दा मुद्दा त्यामध्ये कॉरपोरेट होवू दया.

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):- मा.महापौरजी, मा.सदन. महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम 1971 च्या कलम 4 नुसार या वस्त्यांची पाहणी केली असता त्या ठिकाणी ही वस्ती दाटीवाटीची नाही. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे, मल -निस्सारण् , ड्रेनेजची व्यवस्था उपलब्ध आहे. वस्तीमध्ये काही ठिकाणी डांबरीकरण करण्यात आले आहे. या आधारावर या वस्त्यांना स्लम घोषित करणे योग्य होणार नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- जमीन कुणाच्या मालकीची आहे.

कार्यकारी अभियंता(श्री.बारहाते):-एनआयटीच्या मालकीची आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- हे अधिकृत लेआऊट आहेत किंवा अनधिकृत लेआऊट आहेत.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, मला मिळालेली माहिती अशी आहे की ते खाजगी लेआऊट आहेत. सुगत नगर हे एनआयटीच्या मालकीचे आहे. खाजगी मालकीचे लेआऊट सुध्दा आपण स्लममध्ये अंतर्भुत केलेले आहेत. नागपूर शहरातील 426 झोपडपट्टयापैकी 1/3 झोपडपट्टया हया खाजगी जागेवर बसलेल्या आहेत. त्या झोपडपट्टया सुध्दा आपण स्लममध्ये अंतर्भुत केल्या आहेत. याची माहिती प्रशासनाला असेल तर त्यांनी दयावी.

श्री. प्रफुल्ल गुडधे:- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी, या विषयात कन्फुजन निर्माण होत आहे. खाजगी अधिन्यास असतील तर त्या ठिकाणी स्लम घोषित करणे योग्य होणार नाही. स्लम खाजगी जागेवर सुध्दा करता येते या मताशी मी सहमत आहे. खाजगी जागेवर म्हणजे खाजगी जागा असेल आणि त्या जागेवर लोकांनी अतिक्रमण करुन झोपडे बसवलेले असतील आणि ते 25 च्या वरचे असतील आणि सन 2000 च्या आधीचे असतील तर त्या सर्व झोपडे प्रोटेक्टेड करता येतील आणि त्या ठिकाणी स्लम घोषित करता येईल आणि ती खाजगी मालकीची जागा असेल तर...

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, जो कायटेरिया दिला आहे तो फुलफील होतो आहे काय? अंतुजी नगरमध्ये 75 झोपडया आहेत आणि कचरा डम्पींगच्या अगदी भिंतीला लागून आहेत. सुरेंद्र नगर मध्ये जवळपास 300 घरे आहेत.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मानवी जिवनाला जर ते घातक असेल तर निश्चित रुपाने त्याल स्लम ॲक्ट अंतर्गत स्लम घोषित करायला पाहिजे या मताशी मी सहमत आहे. स्वास्थ्य आणि आरोग्याच्या द्दष्टीने महानगरपालिकेकडून जोपासना करतो. त्या ठिकाणी ते स्थायी झाले आहेत. निश्चित रुपाने ते स्लम घोषित करण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, हा जो परिसर आहे त्या ठिकणी काही लोकांचे लेआऊट जरुर आहे परंतु लेआऊटमध्ये लोकांच्या रजिस्ट्रया झालेल्या नाहीत तर लेआऊटचा मालक कुठे गेला लोकांना माहीत नाही. त्या ठिकाणी लोक राहतात त्यांनी सांगितले की त्या ठिकाणी लेआऊट नाही, सेप्टीक टँक आहे, अर्धा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन आहे. अर्धा ठिकाणी नाही आहे. त्यामुळे यांनी जी माहिती दिली ती चुकीची आहे. कारण तो जो भाग आहे अंतुजी नगर आणि सुरेंद्र नगरचा भाग आहे त्याला लागूनच असलेला सुभाष नगरचा डीपीआर केला आहे तोही लेआऊट होता परंतु त्यावर अतिक्रमण केलेले होते. बरेच लोकांच्या रजिस्ट्री वगैरे झालेल्या आहेत आणि. स्लम ॲक्ट अंतर्गत आपल्याला अधिकार आहे. आपण जयताळापासून तर भांडेवाडी पर्यंत स्लम डिक्लेअर केलेले आहे. आपण 24 झोपडपट्टया स्लम घोषित केल्या आहेत आणि याचा डीपीआर केला आहे ते आयडेंटीफाय स्लम आहेत. यासाठी अधिकारी म्हणतो म्हणून नाही तर आपण सभागृहाने निर्णय घ्यावा आणि स्लम घोषित करावे.
महापौर:- मा.आयुक्तांनी स्वत: त्या जागेचे सर्वेक्षण करावे आणि महानगरपालिकेव्दारा निर्धारीत नियमाप्रमाणे जर ती जागा स्लममध्ये बसत असेल तर मा.आयुक्तांनी त्या प्रकारचा निर्णय घ्यावा, असे निर्देश आयुक्तांना देण्यात येत आहे.

महापौर:- लक्षवेधी प्राप्त झालेली आहे. निगम सचिवांनी त्याचे वाचन करावे

निगम सचिव:- लक्षवेधीचे वाचन केले.

## <u>लक्षवेधी</u>

नागपूर महानगरपालिका अंतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने सुरु असलेल्या नरसाळा दहन घाटामध्ये होणा-या अंतिम संस्काराकरिता 2500 रु. आकारण्यात येत असून ही रक्कम त्या ग्रामीण भागतील नागरिकांना जास्त होत असून शहरातील इतर घाटांच्या धर्तीवर नरसाळा घाटातील अंतिम संस्कार हा निशुल्क व्हावा याकरिता ही लक्षवेधी स्विकारुन याबाबत प्रशासनाची नेमकी भुमिका काय?

कृपया माझी लक्षवेधी उपरोक्त नियमाच्या 1 (एक्स)नुसार स्विकृत करावी. ही नम्र विनंती

सुचक
भगवान मेंढे
नगरसेवक प्रभाग क्र.29

अनुमोदक
सौ. विद्या मडावी
नगरसेविका प्रभाग क्र.29

महापौर:- प्रशासन उत्तर दे।

उपायुक्त (श्री. देशमुख):- मा.महापौरजी, मा.सदन. नागपूर शहरातील नागपूर मनपाकडे 16 घाट आहेत त्यापैकी 6 घाटावर आपण ब्रिक्रेट आणि शवदाहिनीची व्यवस्था केलेली आहे. बाकी सगळया घाटावर लाकडांचा पुरवठा उपलब्ध आहे. पर्यावरण पुरक अशी व्यवस्था 6 घाटावर मोक्षधाम, भांडेवाडी, अंबाझरी, मानेवाडा, मानकापूर आणि सहकारनगर या घाटावर विद्युतदाहिनी ची व्यवस्था केल्यामुळे पर्यावरण पुरक दृष्टीकोनातून याचा वापर व्हावा म्हणून लाकडाचा पुरवठा करीत असतांना 2500 रुपये शुल्क आकारतो. इतर घाटावर आकारत नाही. नरसाळा, हुडेश्र्वर महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यामुळे आणि आवश्यकता पडल्यामुळे या ठिकाणी नव्याने घाट सुरु होते. या ठिकाणी घाटावर मा. स्थायी समितीच्या मान्यतेने निशुल्क लाकुड पुरवठा करु.

महापौर :- त्वरीत स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात यावा, जसे बाकी घाटांना आहे तसेच या घाटांना सुध्दा देण्यात यावे. मा.सदस्यगण, मुझे चार स्थगन प्रस्ताव प्राप्त हुऐ है, मै मा.निगम सचिव से निवेदन करुंगा की चारों प्रस्ताव जिसप्रकार से प्राप्त हुए उस तरह से वाचन करे।

निगम सचिव :- (स्थगन प्रस्तावाचे वाचन केले)

**स्थगण प्रस्ताव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अंतर्गत मनपाच्या सामान्य प्रशासन, जन्म-मृत्यू विभाग, आरोग्य विभाग, कर व कर आकारणी विभाग, वित्त विभाग तसेच इत्यादी विभागाअंतर्गत सुरु असलेल्या आर्थिक अनियमितता व कार्यपध्दतीतील भ्रष्ट आचरण या संदर्भात चर्चा घडवून आणण्यासाठी स्थगण प्रस्ताव.

अनुमोदक
नरेंद्र(बाल्या )बोरकर
नगरसेवक

सुचक
विजय(पिंटू) झलके
नगरसेवक प्रभाग क्र. 28-ड

महापौर :- मुझे चार स्थगन प्रस्ताव प्राप्त हुऐ है, चारों मे से पहला स्थगन प्रस्ताव विजयजी झलके इनका है और तिसरा जो स्थगन प्रस्ताव तानाजी वनवे का है, यह दोनो स्थगन प्रस्ताव मे एक जैसे विषय होने के कारण इसको चर्चा के लिये मंजूरी प्रदान की जाती है, इस विषय को लेकर के जितने भी नोटीस है, वह भी इसमे समाविष्ट है।

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, मैं आपला आभारी आहे कि, आपण अत्यंत महत्वाच्या विषयावर माझा स्थगन प्रस्ताव स्विकारला,व त्यावर बोलण्याची संधी मला मिळाली. मा.महापौरजी, गेल्या अनेक दिवसापासून नागपूर शहरातील वर्तमानपत्रात या महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातुन असो, कि आरोग्य विभागाच्या माध्यमातुन असो किंवा अन्य विभागाच्या माध्यमातुन असो, स्टेशनरी असो किंवा अन्य साहित्य असो यात घोटाळा झाल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. म्हणुन मी आपल्या स्थगन प्रस्तावामध्ये आर्थिक अनियमितता व भ्रष्ट आचरण, या शब्दाराचा वापर केलेला आहे, मी भ्रष्टाचार या शब्दाचा वापर केलेला नाही. महानगरपालिकेत भ्रष्टाचार झाला की नाही झाला हे चौकशी झाल्यावर कळेल, भ्रष्टाचार झाला किंवा नाही झाला याबाबत चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय होईल. मा.महापौरजी, गेल्या अनेक दिवसापासून या महानगरपालिकेची बदनामी समाजमाध्यमात होत आहे आणि हया महानगरपालिकेची बदनामी म्हणजे सर्व १५६ नगरसेवकांची बदनामी आहे. या संस्थेची बदनामी आहे, आणि या शहराची बदनामी आहे. मा.महापौरजी, या सर्व

विषयामध्ये प्रशासनाच्या वतीने काही कार्यवाही सुरु असल्याची माहिती आहे, या सर्व विषयामध्ये पत्रकार परिषद घेतल्यानंतर या सभागृहातील ज्येष्ठ सदस्या, मा.आभाताई पांडे यांनी सुध्दा हा विषय समोर आणला आहे. मा.महापौरजी, या पूर्वी कोविडच्या काळात खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप मा.सदस्या,श्रीमती आभाताई पांडे यांनी केला होता, आणि मला चांगल्यानी माहित आहे कि, प्रशासनानी त्यावेळी त्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही, ज्यावेळी मा.आभाताईनी या विषयाचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी मा.आभा ताईना कुठल्याही प्रकारची माहिती दिली नाही, मात्र मा.महापौरजी मी आपले अभिनंदन करु इच्छितो, हा सर्व पारदर्शक कारभार व्हावा याकरिता आपण स्वत: इनिशेटीव्ह घेतला, मा.आभाताईना आपल्या चेंबर्समध्ये बोलावुन आपल्या कस्टडीमध्ये सर्व फाईलचे वाचन करण्याकरिता मा.आभा ताईना उपलब्ध करुन दिल्या, व त्यावर पुढच्या कार्यवाहीसाठी त्यांनी त्यांची तयारी केली. मा.महापौरजी, एकीकडे एखाद्या सदस्यांनी माहिती मागितल्यानंतर प्रशासन त्याला योग्य सहकार्य करीत नाही, म्हणुन मा.महापौरजी, या एकंदरीत विषयाच्या अनुषंगाने आतापर्यंत कोविडच्या काळात असो किंवा या काळातील असो, कोण कोणत्या विषयामध्ये काय काय खरेदी झाली, प्रशासनानी काय काय चौकशी केली, प्रशासनानी या संदर्भात काही समिती नेमली काय ? मा.स्थायी समिती अध्यक्षांच्या निर्देशानुसार काही समिती स्थापन झाली काय ? प्रशासनाच्या वतीने या सर्व आर्थिक अनियमिततेमध्ये कोणती कार्यवाही करण्यांत आली, त्याची माहिती प्राप्त व्हावी, अशी आपणांस विनंती करतो.

महापौर :- प्रशासनानी उत्तर द्यावे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, हा जो स्थगन प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे, या विषयात मागण्यांत आलेल्या माहितीच्या अनुषंगाने मी या संदर्भात प्राथमिक स्वरुपाची माहिती देऊ इच्दितो. आपल्याकडे कोविड साधारणत: मार्च २०२० पासून कोविड पसरला. नागपूर शहरामध्ये सर्वांनी कोविडला तोंड देत शहराच्या सिटीझन्सला सोयी सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला. याकरिता आपल्याला मोठयाप्रमाणात साहित्य खरेदी करावे लागले किंवा मोठया प्रमाणात साहित्याचा सल्पाय करावा लागला, पेनडॅमिक ॲक्ट अंतर्गत इमरजन्सीमध्ये काही साहित्य खरेदी कराव्या लागल्या. याच्यानंतर साधारणत: ७ डिसेंबर २०२१ किंवा ८ डिसेंबरच्या दरम्यान आरोग्य विभागातील एम.ओ.एच संवर्ग डॉ.चिलकर यांना डेप्युटेशनवर अति.चार्ज देऊन काम करण्यासाठी आले त्यांच्या एक फाईल वाचतांना असे लक्षात आले कि, फाईलवर जी स्वाक्षरी दिसत आहे ती त्यांच्या स्वाक्षरी सारखी दिसत आहे परंतु ती त्यांची स्वाक्षरी नाही, या संशयावरुन त्यांनी फाईलमध्ये ज्या हेडमधुन प्रोव्हीजन ज्या ज्या बाबीकरिता देण्यांत आल्या होत्या त्या सर्व फाईलचे पेमेंट कफो कडुन देण्यांत आले आहे, अशी त्यांना माहिती प्राप्त झाली आणि ही माहिती प्राप्त झाल्यानंतर हया ४१ फाईल मधुन कोणत्या फाईलमध्ये पेमेंट देण्यात आले नाही त्यामध्ये साधारणत: ५ वेगवेगळया एजंसीला पेमेंट करण्यांत आले आहे, असे निदर्शनास आले, आणि या सर्व बाबीचा अहवाल आम्ही प्राप्त करुन घेतला आणि यामध्ये कोण-कोणत्या पाच एजंन्सी इनव्हॉल आहे, त्याचा शोध घेतला, त्यांनी सुध्दा हा गुन्हा त्यांनी केलेला आहे असे कबुल केले, या ४१ फाईलमध्ये महानगरपालिकेला ६७ लाख ८ हजार रुपयांचा निधी सामाविष्ट झालेला होता. हे ६७ लाख ८ हजार रुपयांचा निधी ५ एजन्सीच्या अकाउंटमध्ये क्रडीट झाला होता हा साधारणत: डिसेंबर २०२० ते मार्च २०२१ या काळामध्ये हा निधी त्या त्या एजंसीच्या अकाउंटमध्ये क्रेडीट झाला होता, हया एजंसीचा घोळ लक्षात आल्यानंतर सर्वप्रथम त्यांना त्यांच्याकडुन महानगरपालिकेचा जो आर्थिक नुकसान झालेला आहे, ते रिकव्हर करण्यासाठी या पाचही एजन्सीला ६७ लक्ष रुपयांचा जो अमाउंट देण्यात आलेला होता तो अमाऊंट त्या एजन्सीकडुन धनादेशव्दारे महानगरपालिकेला मा.आयुक्तांच्या परवानगीने प्राप्त करुन घेण्यांत आला. ज्या दिवशी प्राप्त करुन घेण्यात आला त्या दिवशी शनिवार आणि रविवारची सुट्टी असल्यामुळे तो चेक क्लीअर होऊ शकला नाही. सोमवारी संध्याकाळ पर्यत तो चेक क्लीअर झाला आणि आम्ही खात्री करुन घेतली की ६७ लाख रुपयांचा जो निधी कॉट्रॅक्टरकडे होता तो तो

महानगरपालिकेच्या खात्यामध्ये वळता झाला आणि त्याच दिवशी १३ तारखेला या पांचही एजंसीच्या मालकांविरुध्द पोलिस स्टेशन सदर पोलीस कंम्पलेंट करण्यांत आली.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, त्या एजंसीकडुन आपण चेक जे घेतले त्याला मा.आयुक्तांची परवानगी होती काय ? ती लेखी होती काय ? कि तोंडी होती. जी पोलीस कंम्प्लेंट आपण केली त्याला सध्दा मा.आयुक्तांची लेखी किंवा तोंडी परवानगी घेतली होती काय ?

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, चेक घेतांना आम्ही आयुक्तांची तोंडी परवानगी घेतली, तसेच पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची परवानगी सुध्दा मा.आयुक्तांनी लेखी स्वरुपात दिली होती. त्यानंतर १३ तारखेला पोलिस शिकायत दर्ज करण्यांत आली, त्यावर पोलिस विभागानी त्यांच्या व्यस्त कारभारामुळे १५ तारखेला एफ.आय.आर. नोंदवला, आणि १५ तारखेला एफ.आय.आर. नोंदविल्यानंतर त्याची प्रत प्रशासनाला देण्यांत आली. जेव्हा हया सर्व बाबी निदर्शनास आल्या तेव्हा त्यात प्रशासकीय काही अनियमितता आढळुन आल्या होत्या काय ? याची तपासणी केली असता ज्या ४१ फाईल अकाउंट विभागात सादर करण्यांत आल्या होत्या, त्या वेगवेगळया विभागाच्या मार्फत सादर न करता त्यांनी स्वत:हा आणुन दिल्या आहेत, त्यामुळे कॅफो ऑफीस मधुन प्रक्रिया अशी आहे कि, एक फाईल विभाग प्रमुखांच्या मंजूरीने ती फाईल कॅफो ऑफीसकडे पाठविण्यांत येते, परंतु हया प्रक्रीयेला क्रॉस चेक करण्याकरिता महानगरपालिकेत ई गव्हर्नन्स पध्दत सुरु करण्यांत आली आहे, फाईल तयार करने ही मॅनडेटरी आहे आणि कायदयाने ते करणे आवश्यक आहे. परंतु याला काउंटर चेक करण्याकरिता आपण ई-गर्व्हनेंस सिस्टीम सुध्दा सुरु केले आहे. हया फाईलच्या संदर्भातील ज्या बाबी असतात त्या ई-गर्व्हनेंसच्या पोर्टलवर टाकण्यांत येते. त्यामध्ये फाईल तयार करणारा जो व्यक्ती आहे तसाच ऑनलाईन ई गव्हर्नन्स या पोर्टलवर फाईल तयार करणारा जो व्यक्ती आहे ज्याला क्रीयेटर म्हणतो. अपेक्षित असे आहे की त्या विभागातील व्यक्तीने करावे आणि त्या विभागातील एच.ओ.डी. कडे ती फाईल गेली की ऑनलाईन ती फाईल फॉरवर्ड होते. ऑनलाईन केलेली ही फाईल त्या विभागाला एचओडी अप्रुव्हल करेल आणि त्यानंतर अकाउंट सेक्शनमध्ये फाईल जाईल, आता अकाऊंट सेक्शनला दोन प्रकारच्या फाईल येतात त्यामध्ये एक म्हणजे फिजीकल फाईल, आणि दुसरी ई गव्हर्नन्सच्या माध्यमातून स्क्रीनमध्ये दिसत असलेली फाईल, अकाउंड डिपार्टमेंटला यु.डी.सी. म्हणजे अप्पर डिव्हीजन क्लर्क आहे त्याला आपण ऑडिटरचे काम दिलेले आहे. हे ऑडीटर या फाईलची तपासणी करतात आणि ऑडीटरची तपासणी झाल्यानंतर अकाऊंट ऑफीसर किंवा कॅफो कडे पाठवितो, दोन लाख रुपयांचे अधिकार अकाउंट ऑफीसरकडे जातात आणि त्यावरचे कॅफोकडे जातात आणि तेथुन चेक तयार झाल्यानंतर ते चेक सॅक्शनमध्ये जातात समजा आज दिवसभरात ५० लोकांचे चेक झाले असेल तर ५० लोकांचे आर.टी.जी.एस. करुन बॅंकेकडुन पाठविले जातात ही सर्व प्रक्रिया यामध्ये करण्यांत आली होती. मुळात ही जी फाईल आहे ती बोगस तयार करण्यात आली होती. या पुर्वीच्या मा.आयुक्तांनी एल.एफ.एम.एस. अशी सिस्टीम निर्माण केलेली आहे. या माध्यमातून फाईलची नोंद घेण्यात येते. यामध्ये ऑडीटर आणि अकाऊंट ऑफीसरने केलेल्या ज्या अनियमितता होत्या त्या अनियमिततेच्या आधारे अकाऊंट ऑफीसर राजेश मेश्राम आणि दोन ऑडीटर अफाक अहमद, कोरडे आणि नागदिवे, यांना प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस दिली त्यांचे उत्तर प्राप्त करुन घेतले आणि त्यांना निलंबित केले. या सोबतच ई-गर्व्हनेंसमधुन सुध्दा जी.ए.डी.च्या संदर्भात यु.डी.सी.श्री.मोहन पडवंशी यांनी ई-गर्व्हनेंसमधुन क्रियेट फाईल सामान्य प्रशासन विभागाच्या युजर आयडीवरुन केली होती. त्यांना या बद्यल विचारणा करण्यात आली ही फाईल तुमच्या कडून करण्यात आली काय तर त्यांनी सांगितले की ही फाईल मी केलेली आहे मला ही फाईल बोगस आहे याची कल्पना नव्हती मी युजर आयडी आणि पासवर्ड वरुन ती फाईल पुढे ज्यांच्याकडे अप्रुव्हल होत होते ते पासवर्ड धामेचा साहेबांचे होते ते सुध्दा त्यांनीच वापरले होते त्याप्रमाणे ती फाईल ऑनलाईन ई गव्हर्नन्समध्ये कॅफो ऑफीस पर्यत गेलेली आहे. हा संदर्भ घेउन त्यांनी बिल पेमेंट करण्यात आले आहे. सदर

कॉट्रॅक्टरने आपल्या सगळया सिस्टीम मध्ये असलेल्या त्रुटया जाणुन घेऊन त्याप्रकारे प्रक्रीया करुन प्रशासनाला कसा धोका देऊ शकतो ते त्यावेळी लक्षात आले हा फौजदारी स्वरुपाचा जाणुन बजून केलेला गुन्हा आहे या बाबींवर प्रशासन ठाम आहे म्हणून या या पाच एजन्सीच्या मालकांवर पोलीस स्टेशन सदर येथे गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. हे प्रकरण पोलीसांना दिल्यानंतर त्यांना या प्रकरणामध्ये क्लीष्टता वाटत होती त्यामुळे ही चौकशी आर्थिक गुन्हे अन्वेषण या विभागाकडे वळती करण्यात आले आर्थिक गुन्हे अन्वेषण या विभागाकडून आपल्याला माहिती विचारण्यात येते कशाप्रकारे ही प्रक्रीया आहे. कशाप्रकारची ही सिस्टीम आहे त्यामध्ये काय डेव्हलपमेंट करण्यात आलेले आहे या सर्व बाबींची माहिती आपण त्यांना वेळोवेळी देतो. हे सर्व करीत असतांना पहिल्यांदा या ६७ लक्ष रुपयांची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली सोबतच अशाप्रकारे आणखी काही विभागामध्ये करीत असल्याची बाब लक्षात आल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला की १ एप्रिल, २०२० पासून घ्यावी, ही चौकशी समिती सुरु झाली साधारणत: १३ ते १४ डिसेंबर २०२१ पासून म्हणजे एक वर्षाच्या काळामध्ये कॅफो ऑफीस मधून जेवढेही लोकांचे बिले जनरेट झाले आहे त्यांना जे.व्ही. म्हणजे जनरल व्हाऊचर पहिले जनरल व्हाऊचर तयार होते ते अप्रुव्हल झाल्यानंतर एम.पी. म्हणजे मेक पेमेंटसाठी ती फाईल तयार होते त्यामुळे जेवढया जे.व्ही. झालेल्या आहे साधारणत: १८,००० जे.व्ही. तयार झालेल्या होत्या १ एप्रिल २०२० ते आतापर्यत त्या १८००० जे.व्ही. चा डेटा काढण्यात आला आणि प्रत्येक विभागाच्या विभाग प्रमुखांना वितरीत करण्यात आल्या की आपआपल्या विभागाव्दारे वितरीत करण्यात आलेल्या जे.व्ही आपण आपल्या प्रोव्हीजन रजिस्टरमधून तपासणी करावी की आपली स्वाक्षरी ओरीजनल होती की नाही १ एप्रिल २०२० पासूनची यादी तपासणी करावी यामध्ये अजून लॅप्सेस असेल किंवा चुकीचे पेमेंट झालेले असेल ते निदर्शनास येईल या गोष्टीची बाब मा.आयुक्तांच्या लक्षात आल्यानंतर मा.अति.आयुक्त दिपक मिना साहेबांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमली, आणि ती समिती जे.व्ही. ची माहिती ज्या ज्या विभागाकडून घ्यायची होती ती प्रक्रीया या समितीने सुरु केली. त्यामधील काही भाग समिती पर्यत आलेला आहे. ज्या जे.व्ही. मधे प्रोव्हीजन नाही, काही ठिकाणी फाईल आहे, काही ठिकाणी फाईल उपलब्ध नाही. ज्या एजन्सीवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आला त्या एजन्सीच्या मालकांच्या घरी सुध्दा काही फाईल आपल्या कर्मचा-यांच्या निदर्शनास आल्या त्या फाईल प्राप्त करुन घेण्यात आलेल्या आहेत. त्या फाईल त्यांच्या घरापर्यत कशा गेल्या ती माहिती प्राप्त करुन घ्यायची आहे या दृष्टीकोणातून सुध्दा चौकशी करीत आहे. एफ.आय.आर. दाखल झाला आहे आणि चौकशी समिती सुध्दा दाखल झाली आहे. या दोन्ही बाबीमध्ये दटके साहेबांनी एक मुद्या उपस्थित केला होता त्याचे उत्तर त्यांना प्रशासनाकडून अपेक्षित आहे. स्थायी समितीमध्ये जेव्हा या मुद्यांवर चर्चा झाली तेव्हा मी सुध्दा त्या स्थायी समितीमध्ये उपस्थित होतो. त्या स्थायी समितीमध्ये एक चौकशी समिती नेमण्याचे निर्देश मा.सभापती, स्थायी समिती यांनी दिले. निगम सचिवांच्या माध्यमातून जेव्हा ही फाईल माझ्याकडे आली तेव्हा मी त्या फाईलमध्ये लिहले की ही समिती कुठल्या कायदयाअंतर्गत येते व याची प्रोव्हीजन काय आहे ही माहिती आपल्या माध्यमातून किंवा विधी विभागाच्या माध्यमातून सांगावे, विधी विभागाने ॲड श्री.कासट यांचे ओपिनिअन घेतले त्यांच्या ओपिनिअन प्रमाणे त्यांनी असे कळविले की सेक्शन २४ ,३०,३१ चा एकत्रित विचार केला तर ते अधिकार महासभेचे आहे. त्यामुळे स्थायी समितीला वेगळे अशा चौकशी समितीचे अधिकार असल्याची बाब समोर येत नाही. त्यावरुन ती समिती त्याप्रमाणे निगम सचिवांच्या माध्यमातून स्थायी समिती सभापतींना कळविण्याचे निर्देशित करण्यात आले. यानंतर आता सभागृहापुढे हा विषय आलेला आहे. सभागृह यापुढे निर्देशित करतील.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मला आपल्या माध्यमातून एक माहिती विचारायची आहे की हे कॉट्रॅक्टरला टेन्डर दिले होते ते कुठल्या काळापासून आणि कुठल्या स्थायी समिती अध्यक्षांनी दिले या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

श्री. हरीश ग्वालबंशी :- मा.महापोरजी, प्रशासन ने जो खंडन किया है, नागपूर शहर की जनता के पैसो का

दुरुपयोग हुआ, जो केंद्र सरकार के अधिकारी रहते है अगर उनके हाथ से भ्रष्टाचार हुआ तो उन्हे केंद्र सरकार के कटघरे मे खडे करते है,और राज्य सरकार के अधिकारी, कर्मचारीया के हाथ से भ्रष्टाचार हुआ तो उन्हे राज्य सरकार के कटघरे मे खडे करते है, तो नागपूर शहर की जनता के पैसो का जो दुरुपयोग हुआ है, उस बात के लिये सत्तारुढ भारतीय जनता पार्टी जिम्मेदार है l

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, सत्तारुढ पार्टीला या सर्व गोष्टीचे महत्व माहिती आहे तेव्हाच आम्ही याबाबत स्थगन प्रस्ताव सादर केला आहे.

श्री. हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, सत्तारुढ पार्टी को बचाने के लिये प्रशासन कोशिश कर रहा है

महापौर :- (बेल)

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, प्रशासनाच्या वतीने जे उत्तर मिळाले त्यात मा.अतिरिक्त आयुक्तांनी उल्लेख केल्याप्रमाणे ६७ लाख रुपयांचा हा प्राथमिक घोटाळा आहे असा उल्लेख त्यांनी केला आहे. मला प्रशासनाला एक प्रश्न विचारावयाचे आहे कि हा ६७ लाख रुपयांचा प्राथमिक घोटाळा झाल्याची प्रशासनाची प्राथमिक माहिती आहे काय ? की या घोटाळयाची व्याप्ती मोठी आहे काय. प्रशासनाच्या वतीने येथे सांगण्यात आले की जे.व्ही. झाली आणि डॉ.चिलकर यांची बोगस सही होती मा.महापोरजी, त्या पुर्ण फाईलचा प्रवास कसा झाला, ती फाईल कोणी तयार केली होती, त्या फाईलवर कोणी कोणी सही केली, याबाबतची माहिती सुध्दा प्रशासनानी या सभागृहाला द्यावी, अशी आपणास विनंती आहे दुसरे मा.महापोरजी, प्रशासनाच्या वतीने जी काही चौकशी समिती येथे गठित करण्यांत आलेली आहे, त्या चौकशी समितीचे कोण कोण सदस्य आहे, त्या चौकशी समितीच्या किती बैठका झाल्या त्या चौकशी समितीच्या प्राथमिक फायंडींग काय आहे याबाबत उहापोह होणे गरजेचे आहे. आणि ही जी चौकशी समिती प्रशासनाच्या वतीने गठीत करण्यांत आलेली आहे, ती एमएमसी ॲक्टच्या कोणत्या कायद्यान्वये गठित करण्यांत आली आहे, याची सुध्दा माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यांत यावी.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्षनेते श्री.तानाजी वनवे यांनी विचारल्याप्रमाणे या एजन्सी केव्हापासून कार्यरत होत्या त्यामध्ये ठराव क्र ६५ दिनांक २४.०८.२०२१ येथुन यांना ३ वर्षाकरीता दिले आहे तसेच दिनांक २८.०२.२०१७ पासून ठराव क्र १६० पासुन हे कंत्राटदार कार्यरत होते तसेच मा.सदस्य श्री.विजय झलके यांनी विचारणा केल्याप्रमाणे हा जो घोटाळा समोर आलेला आहे तो ६७ लाखपर्यंत मर्यादित आहे काय ? प्राथमिक दृष्टया हा घोटाळा तीन ते चार विभागामधील असल्याचे सकृत दर्शनी दिसत आहे, लायब्ररी, शिक्षण,हेल्थ सॅनिटेशन, हेल्थ मेडिसीन, आणि जन्म मृत्यु, या चारही विभागामध्ये या एजंसीचे रेट कॉंट्रक्ट होते, आणि या विभागा मधील वेगवेगळे काम कोटेशनच्या माध्यमातून या एजंसीला देण्यांत आले होते, यामध्ये साधारणत: लायब्रेरी, एज्युकेशन विभागाला जो समोर आंकडा आलेला आहे तो जवळपास ७४ लाख रुपयांचा पेमेंट एकच एजंसीला झालेला आहे, आपल्याकडे ती एजंसी रेकॉर्डमध्ये आर.सी. मध्यु सुरा नव्हती, त्यांनी दुस-यां नावांनी नवीन एजंसी क्रयेट करुन त्यांना बोलावुन घेतले त्यांना विचारणा केली की तुम्ही कुठल्या आधारावर ही सर्व प्रक्रीया केली त्यामध्ये त्यांनी आम्हाला सांगितले की साकोरेंनी हया सर्व गोष्टी आम्हाला तयार करायला लावल्या आणि तुमच्या फर्ममध्ये जे पैसा जमा होईल तो आम्हाला वापस करा, या एजन्सीकडुन आणखी ५० लाख रुपये प्रशासनाला प्राप्त झाले, यामध्ये किती बोगस होते हया सर्व बाबी चौकशी समिती समोर येणार आहे. त्याचप्रकारे या ज्या चार फर्म होत्या त्यांच्याकडून ६७ लाख रुपये जमा झालेले आहे, त्यांच्याव्दारे जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी विभाग, लायब्रेरी, सॅनिटायझेशन, हेल्थ मेडिसीन विभागात झालेल्या ज्या काही प्राथमिक बाबी दिसत आहे, त्यावरुन आणखी १३-१३ लाख रुपयांचे चार चेक त्यांच्याकडुन जमा करुन घेण्यांत आले होते, परंतु ते बाउंस झालेले आहे. म्हणजे ते ६७ लाख आणि हे ५२ लाख जवळपास १ करोड १९ लाख रुपये महानगरपालिकेला प्राप्त करु शकलो, उर्वरीत पैसे

बाऊन्स झाल्यामुळे ते बाउंस झाल्यामुळे परत या गोष्टीची चौकशी करावी लागणार आहे, या चौकशी समितीमध्ये ज्या काही बाबी पुढे येतील, किती अमाउंट आहे, यात कोण कोण दोषी आहेत, कुठल्या एजन्सी आहे त्या वरुन पुढच्या कार्यवाहीची दिशा ठरविण्यांत येईल.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, या चौकशी समितीमध्ये कोण कोण आहे, कोणाच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी समिती गठित करण्यांत आलेली आहे, या चौकशी समितीची काम करण्याची पध्दत काय आहे. याची कालमर्यादा ठरविलेली आहे काय ? आणि एन.एम.सी. ॲक्टच्या कोणत्या कलमा अंतर्गत ही चौकशी समिती स्थापन करण्यांत आली आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, ही चौकशी समिती ७ सदस्यीय असून श्री.दिपककुमार मिना यांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी समिती गठित करण्यांत आलेली आहे, या समितीमध्ये मी सह अध्यक्ष म्हणुन आहे. चिफ इंजिनिअर, खवले साहेब, आयटीशी रिलिटेड आयटीची बाजु असल्यामुळे आय.टी. इनचार्ज श्री.बॅनर्जी मॅडम या समितीमध्ये आहे, सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त या पदाचा चार्ज श्री.मिलींद मेश्राम यांच्याकडे आहे ते या समितीमध्ये आहे, लॉ ऑफिसर,ॲड पारोचे ते सुध्दा या समितीचे सदस्य आहे. उपायुक्त रेव्हेन्यु हे सुध्दा या समितीचे सदस्य आहेत परंतु सध्या उपायुक्त रेव्हेन्यु यांच्याकडेच उपायुक्त, सामान्य प्रशासन विभागाचा चार्ज असल्यामुळे ते या समितीमध्ये आहे.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, ही समिती किती तारखेला स्थापन झाली, कोणत्या कायद्यान्वये स्थापन करण्यांत आली, याची कायमर्यादा काय आहे या सर्व गोष्टी आपण सांगाव्यात.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, प्रशासकीय चौकशीच्या कामासाठी ही समिती स्थापन करण्यांत आलेली आहे, या समितीला पहिले मा.आयुक्तांनी सात दिवसाची मुदत दिलेली होती परंतु यामध्ये कामाचे स्वरुप व ब-याच फाईलस प्राप्त न झाल्यामुळे समितीच्या माध्यमातून मा.आयुक्तांना पुन्हा विनंती करण्यांत आली की मुदतवाढ देण्यात यावी, त्याप्रमाणे आयुक्तांनी मुदत वाढवुन दिली आहे.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, एकदम सरळ व सोपा प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आलेला आहे की, ही समिती कोणत्या तारखेला गठित झाली, व कोणत्या कायद्याप्रमाणे गठित झाली व याची कालमर्यादा काय आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी ही समिती दिनांक, १७.१२.२१ रोजी गठित केली आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, प्रशासकीय चौकशी समिती गठित करण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत काय ?

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, या प्रकरणामध्ये संपुर्ण प्रशासन इनव्हाल आहे. त्यामुळे प्रशासनाची ही चौकशी समिती नसुन प्रकरण निस्तारण समिती आहे काय असा आभास निर्माण झालेला आहे, आणि समितीला कोणते संवेधानिक अधिकार असतील आणि त्या समितीला कायद्याच्या कुठल्या कलमान्वये स्थापन केले पाहिजे, या समितीला कायद्याचे संरक्षण असले पाहिजे असे आमचे मत आहे. त्यामुळे हा कायदा कोणता व कोणत्या कलमान्वये चौकशी समिती नेमण्याचे अधिकार कोणाला आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी चौकशी समिती नेमण्याचे अधिकार किंवा कॉन्स्टीटयुट करण्याचे अधिकार मा.आयुक्तांचे आहे काय ? होय किंवा नाही.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, प्रशासकीय कामासाठी जशी वेळोवेळी चौकशी समिती नेमल्या जाते त्याचप्रमाणे चौकशी समिती निर्माण करण्याचे अधिकार मा.आयुक्तांचे आहे. एम.एम.सी. ॲक्टमध्ये यासाठी काय तरतुद आहे, हे मी तपासुन सांगतो. मा.आयुक्तांनी एक प्रशासकीय समिती तयार केली आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जर ही प्रशासकीय समिती आहे व चौकशी समिती नाही. होय किंवा नाही.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, होय ही प्रशासकीय समिती आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जर ही प्रशासकीय समिती आहे तर यांचा अहवाल काय ॲथेंटींक राहणार आहे काय ? मा.महापौरजी ऐवढया मोठया प्रकरणाची चौकशी समिती नाही आहे आणि प्रशासकीय समिमी आहे आणि या समितीचे अध्यक्ष श्री. मिना साहेब आहे, आता मी आपणांस एक उदाहरण देतो कि, मा.मिना साहेबांचे जे स्वीय सहायक आहे, त्यांनी लायब्रेरी विभागाचे श्री.सनीस गोखे यांनी ७४ लाख रुपयांचे ई-गर्व्हनेंस केला आहे, ते मीना साहेबांचे स्वीय सहायक आहे. त्यांनी हे काम कनिष्ठ अभियंता इंगळेच्या पोस्टींग वरुन व आयडी वरुन केला आहे व याचे कंन्फर्मेशन केले आहे श्री.नरेश बोरकर साहेबांच्या कंम्प्युटर वरुन आणि ७४ लाख रुपयांचे पेमेंट झाले आहे, ही स्थिती आहे. आणि या प्रकरणामध्ये कुठलाही एफ.आय.आर. झाला नाही आणि हे चौकशी करुन राहिले आहे. ७ दिवस झाले १५ दिवस झाले, माझ्याजवळ महानगरपालिकेचे डाक्युमेंट आहे आणि त्यावर कनिष्ठ अभियंता श्री.इंगळेचे नाव, श्री.नरेश बोरकरचे नांव आणि ई-गर्व्हनेंस कुठुन झाले तर श्री.सनिस गोखे नावाचा हा कर्मचारी आहे त्याने केला आहे. आज धामेचा साहेबांचा एक क्लर्क श्री.मोहन पडवंशी त्यांनी ई-गर्व्हनेंस केले तर तो पोलीस कस्टडीमध्ये गेला आहे, आणि मिना साहेबांच्या कार्यालयात काम करणारा हा कर्मचारी श्री.सनिस गोखे ज्यांनी ७४ लाख रुपयांच्या बिलांचे ई-गर्व्हनेंस केले, त्यांच्यावर अजूनपर्यंत काहीच कार्यवाही करण्यांत आली नाही, श्री.इंगळे नांवाचे एक जे.ई. आहे त्यांच्या ई-गर्व्हनन्सच्या पासवर्डवरुन आणि कंन्फर्मेशन एन.एच.आय. चे कार्यकारी अभियंता श्री.नरेश बोरकर साहेबांच्या कम्प्युटरवरुन करण्यांत आले आहे. हा कागद महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिला आहे. असे किती कागद आहे. हया सहा कंपनी आहे, हेल्थ विभागाचे खरेदीचे सगळे हेड, लायब्रेरी विभागाचे खरेदीचे सगळे हेड असे सात विभाग आहे. येथे एखादया मानसाने तक्रार केली. मी भ्रष्टाचाराला समर्थन करणार नाही. परंतु येथे मा.सदस्यांचे तीन लाख रुपयांच्या कोटेशनचे काम थांबवुन दिले आहे, आणि सहा कोटीचे बील तीन तीन लाखाच्या कोटेशनने केले आहे. सन २०१७ पासून हे जे साकोरे ॲन्ड कंपनी आहे आणि भगत नांवाची एजंसी आहे, असे सहा, हे भगत म्हणजे कोण तर एक भगत नावाचा कर्मचारी वित्त विभागामध्ये काम करीत होता, त्याचा हा भाऊ आहे. ही सहावी एजन्सी, असे मिळुन २१ कोटी रुपयांचा भुगतान या कंपनीला झालेले आहे. प्रशासनाला या सर्व प्रकाराची गंम्मत वाटत आहे, मी तुम्हाला एक गोष्ट सांगु इच्छितो की स्थायी समितीला आयुक्तांची सुटटी मंजूर करण्याचा अधिकार आहे, ज्या स्थायी समितीला आर्थिक निर्णय घेण्याचे अधिकार आहे, त्या स्थायी समितीनी या अनुषंगाने एक उपसमिती केली तर त्याच्यासाठी लिगल ओपिनियन कासट नावांच्या वकिलाचे, स्थायी समितीला अधिकार नाही काय ? समिती गठित करण्याचे, येथे मा.सदस्या आभाताई पांडे बसल्या आहेत त्यांनी ३०० फाईल्स वाचल्या आहेत. मा.सदस्या सौ.आभाताईंनी आरोप केले तर अति.आयुक्त श्री. राम जोशी साहेबांनी भाषण दिले दीड तास की आम्ही किती पारदर्शी आहोत. स्थायी समितीच्या उपसमितीला हे कागदपत्र द्यावयाचे नाही, काही तरी लपवायचे असल्यामुळे त्यांनी लिगल ओपिनियन मागविण्यांत आलेले आहे. मा.महापौरजी, यामध्ये काही कलमा त्या मा.सदस्य श्री पिंटुजी झलके वाचतील त्याप्रमाणे स्थायी समितीला उप समिती नेमण्याचे १० प्रतिशत अधिकार आहे.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, या समितीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे या समितीने गेल्या काही दिवसामध्ये काय काय चौकशी केली, कोण-कोणते स्टॉक बुक त्यांनी चेक केले काय ? कुठले डाक्युमेंट त्यांनी कलेक्ट केले आहे काय ? हा घोटाळा फक्त स्टॅशनरी खरेदीपर्यंत मर्यादित नाही, या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या मेंनटेनेंसच्या कामाचे छोटे छोटे तुकडे करुन त्याचे वर्षभरामध्ये अनेक वेळा कोटेशन करुन वारंवार त्यांचे लिपापोती करण्याचे काम केले आहे त्यामध्ये ५० हजार, १ लाख, २ लाख या कोटेशनच्या निमित्ताने करण्याचे काम या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या मेटेनन्सच्या मेंनटेनेंसच्या नांवाखाली करण्यांत आले आहे. मा.महापौरजी, हा गंभीर विषय आहे आणि ही जी प्रशासकीय समिती स्थापन करण्यांत आली आहे, त्याला आता

चौकशी समिती म्हणता येणार नाही, कारण कि आताच सांगण्यात आले आहे कि ही फॅक्ट फायंडींग समिती आहे, म्हणजेच तथ्य शोधण्याची समिती आहे. यामध्ये खरच भ्रष्टआचरण झाले आहे की आर्थिक अनियमितता झालेली आहे हे तपासण्याकरिता ही चौकशी समिती नाही. ही फॅक्ट फायंडींग समिती आहे, काय घडले, कसे घडले. मा.महापौरजी, अत्यंत महत्वाचा गंभीर विषय असतांना प्रशासन याबाबत सिरीअस नाही, असा माझा आरोप आहे. मा.महापौरजी, या सर्व चुकांमुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर मोठा भुर्दंड पडलेला आहे. मा.महापौरजी, हा घोटाळा केवळ एकच विभगाचे नाही, अनेक विभागामध्ये कर्मचा-यांचे पासवर्ड आयडी दुसरे युज करुन असे घोटाळे करण्यांत आलेले आहे. टॅक्स विभागामध्ये असेच काम सुरु आहे, टॅक्स विभागामध्ये अधिका-यांचे पासवर्ड युजर आयडी वापरुन टॅक्स कमी करण्याचा गोरखधंदा सुरु आहे. त्यामुळे हे अत्यंत गंभीर विषय आहे, या प्रकरणामध्ये प्रशासनानी पोलिस चौकशी करण्याकरिता मा.आयुक्तांच्या अधिनस्त ज्यांना पाठविले जी काही कार्यवाही केली आहे याबाबत प्रशासनानी मा.महापौरजी व स्थायी समितीला याबाबत अवगत केले आहे काय ? याची माहिती प्रशासनानी द्यावी, अशी विनंती मी आपल्याला माध्यमातुन करीत आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, हा रेट काँट्रक्ट कोणत्या अधिका-यांच्या कार्यकाळामध्ये झाला आहे, आणि हा रेट कॉर्ट्रक्ट कोणी फायनल केले आहे. रेट कॉर्ट्रक्ट कोणत्या पदाधिका-यांच्या कार्यकाळामध्ये झाला, रेट काँट्रक्ट कोणत्या अधिका-यांच्या कारकिर्दीमध्ये झाला आहे, याची माहिती देण्यांत यावी.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी):- मा.महापौरजी, दिनांक २८-०९-२०१७ च्या स्थायी समिती ठराव क्रमांक १०७ अन्वये ती निविदा आहे आणि १ जुलै, २०१७ च्या अनुषंगाने स्टेशनरी साहित्य पुरविण्याकरीता दरकरार करण्यात आलेला होता.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, हे काम किती वर्षाकरीता होते. व या सहा कंपन्या किती वर्षापासून मनपा मध्ये आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, ते ३ वर्षाकरीता काम होते मा. महापौरजी चार महिन्यापुर्वी ठराव क्रमांक ७९ विषय क्र ६५ या माध्यमातून एक्सटेंशन देण्यात आले होते. ३५ ते ४० वर्षापासून या सहा कंपन्या वेगवेगळया रेट कॉर्ट्रक्टमध्ये आलेल्या आहे.

श्री.संदिप सहारे :-मा.महापौरजी, ज्याप्रमाणे यांनी रेट काँट्रक्ट केला, त्याप्रमाणे यांनी साहित्य खरेदी केले आपण ही बाब वर्तमानपत्रात वाचत आहे. मी सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणुन देऊ इच्छितो जसे कॅनॉन झेरॉक्सची मशीन बाजारामध्ये २३८१ त्याचे टोनर २८५० रुपयात आहे. हा जो रेट मे सांगत आहे तो मी ॲमेझॉन मधुन काढला आणि तो रेट मी नागपूर शहरातील ठोक विक्रेतेकडुन आणलेले आहे. याचे बाजार मुल्य आहे फक्त ३०५ रुपये आहे. कॅनॉन झेरॉक्स मशीन मॉडेल नंबर २३८१ आहे ते १७९०० रुपयात महानगरपालिकेत घेतलेला आहे. याचे बाजार मुल्य १०९० रुपये आहे, कंम्प्युटर पेजेस जेके २६८ रुपये घेतले त्याचे बाजार मुल्य २०० रुपये आहे. कॅम्प्युटर पेजेस ए४ २२५ रुपयांमध्ये विकत घेतले ज्याचे बाजार मुल्य १६५ रुपये आहे. कार्बन पेपर प्रति पॅकेट यांनी १९०० रुपयांमध्ये विकत घेतले बाजारामध्ये त्याची किंमत २०० रुपये आहे. झेरॉक्स मधीन टोनर ओशीयारा कंपनीचा ४१५० रुपयांत घेतले बाजारामध्ये त्याची किंमत १२४९ रुपये आहे. इको झेरॉक्स मशीनचा ड्रम यांनी २४००० रुपयांमध्ये विकत घेतला बाजारामध्ये याची किंमत फक्त ११९९ रुपये आहे. कॅनॉन झेरॉक्स मशीनचा ड्रम १७९०० रुपयांत विकत घेतले आहे बाजारामध्ये त्याची किंमत ८९९ रुपये आहे. कॉडलेस फोन ६८०० रुपयांमध्ये विकत घेतले, बाजारामध्ये त्याची किंमत १२९९ रुपये आहे. इमरजन्सी लॅम्प १९०० रुपयाला विकत घेतले, बाजारामध्ये त्याची किंमत ७४९ रुपये आहे. कॅनॉन झेरॉक्स मशीनचा ड्रम २७,९०० रुपयाला विकत घेतले, बाजारामध्ये त्याची किंमत १४९९ रुपये आहे. ४० लिटर क्षेमतेचे कुलर यांनी ५९,००० हजारामध्ये विकत घेतले

आहे बाजारामध्ये त्याची किंमत ८,०२४ रुपये आहे. १२० लिटर पाणी क्षमता असणारा कुलर ७९००० रुपये मध्ये विकत घेतला आहे. त्याचे बाजार मुल्य ८४९६ रुपये आहे. डॉट पेन युज अॅन्ड थ्रो वाला प्रति पेन ५० पैशाला आहे यांनी तो पेन १ रुपया ७५ पैशामध्ये विकत घेतले यु पिन चा एक पॉकेट यांनी १९८ रुपयामध्ये विकत घेतला आहे. त्याचे बाजारमुल्य २२ रुपये आहे. प्लॉस्टिक फोल्डर यांनी १८७ रुपयात विकत घेतले आहे बाजारामध्ये त्याची किंमत १० रुपये आहे. जेल पेन ३४ रुपयाला विकत घेतले त्याची बाजारमुल्य किंमत ४ रुपये आहे. एक्झीकेटीव्ह पेपर स्टॅन्ड २९९५ रुपयांचे विकत घेतले आहे त्याचे बाजारामध्ये किंमत ९० ते ११५ रुपये आहे. पेपर स्टॅन्ड ४४५० रुपयाला विकत घेतले बाजारामध्ये त्याची किंमत १४०० रुपये आहे. गोंदची बॉटल १५० एम.एल. १२५ रुपयामध्ये खरेदी केली बाजारामध्ये त्याची किंमत ३६ रुपये आहे. सहीचे पेड प्रति पॅड ६० रुपयात विकत घेतले, बाजारामध्ये त्याची किमत १४ रुपये आहे. स्टॅपलर पिन प्रति पॉकेट १३ रुपयात विकत घेतले बाजारामध्ये त्याची किंमत ६ रु २० पैसे आहे. १२ डिजीटल असलेला कॅलकुलेटर ७८५ रुपयाला विकत घेतले बाजारामध्ये त्याची किंमत ४४० रुपयाला आहे. हे सर्व मोघम मध्ये नाही. आता माझा प्रश्न आपल्या माध्यमातून प्रशासनाला असा आहे कि, ज्यांनी रेट चार्ट तयार केले, जर मी बाजारामध्ये पेन घ्यायला गेलो तर त्याची किंमत किती आहे तसेच मी बाजारामध्ये कुलर घ्यायला गेलो तर त्याची किंमत किती आहे त्याची माहिती असते त्यामुळे कोणत्या लोकांनी हे रेट चार्ट फायनल केली आहे, त्याची माहिती देण्यांत यावी.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापोरजी, आपण ज्या गाडयामध्ये फिरतो, त्याचे लॉकबुक जे आहे ते ६० रुपयांचे आहे त्याला आपण ३२० रुपयांमध्ये विकत घेतलेले आहे. ज्या लॉकबुकमध्ये सर्व पदाधिकारी फिरतो ते लॉकबुक सुध्दा सोडले नाही.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, मी सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये म्हणुन या ठिकाणी पुर्ण माहिती ठेवली नाही. कमीत कमी २००अॅटममध्ये फार मोठी तफावत आहे. म्हणुन हे रेट कोणी फायनल केले, कुठुन घेतले त्याची माहिती देण्यात यावी.

श्री विजय झलके :- मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री संदिप सहारे यांनी सांगीतले आहे कि, २०० अॅटम मध्ये तफावत आहे तर संदीपजी हे २०० अॅटम नाही तर हा पुर्ण विषयच अॅटम आहे. कोविडच्या काळामध्ये जे साहित्य घेतले त्यामध्ये सुध्दा दर तफावत मोठया प्रमाणात आहे. आपण सागितले की मार्केटमध्ये १२ रुपयांची वस्तु आपण ५० रुपयात विकत घेतली, ५-५ आयटमचे रेट परचेसिंग केले तर ही गंभीर बाब आहे, हे सर्व प्रकरण उजेडात आल्यानंतर ज्या कर्मचा-यांवर एफ.आय.आर. दर्ज करण्याची सूचना मा.आयुक्त महोदयांनी प्रशासनाला दिली, ही बाब मा.महापौरजी किंवा मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांच्या निदर्शनास आणुन देण्यांत आली काय ? याची माहिती देण्यांत यावी.

श्री.संदिप सहारे :- मा.महापौरजी, याच्यामध्ये जे रेट कॉट्रॅक्ट केले आहे त्यावर उपायुक्त सा.प्र.वि यांची सही आहे. म्हणुन त्यांनी सांगावे की ते दोषी आहे की दुसरी कोणी दोषी आहे. की रेट कॉट्रॅक्ट कोणी फायनल केला. हा महत्वाचा मुद्या आहे त्याची माहिती देण्यांत यावी.

अति.आयुक्त, (श्री जोशी) :- मा.महापौरजी, या एफआयआर ची माहिती मा.महापौरजी किंवा स्थायी समिती अध्यक्षांना अवगत केली नव्हती. ज्यावेळी स्थायी समितीमध्ये हा मुद्या चर्चेस आला तेव्हा त्यांच्या ही बाब निदर्शनास आणुन दिली. रेट कॉट्रॅक्ट बद्यल टेन्डर झाले आहे त्यामध्ये जी एजन्सी सहभागी झाली होती त्यांनी कोड केले असेल त्यावेळी एजन्सीला अप्रुव्हल देण्यात आले आहे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सदस्यांचा मुद्या लक्षात आला आहे. बाजार भावानुसार कोणी रेट कॉन्ट्रक्ट केला, याला कोण जबाबदार आहे ही माहिती सध्या उपलब्ध नाही, यामध्ये संपुर्ण फाईल बघावी लागेल, यामध्ये किती एजंसीनी काम केले आहे, हीसर्व माहिती काढायला सांगतो आणि तुम्हाला माहिती देण्यास सांगतो.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, हा फार गंभीर विषय आहे, याच्यामध्ये महानगरपालिकेची फार मोठी बदनामी होत आहे, म्हणुन या सभागृहाला अधिकार आहे, याकरिता सभागृहाची एक चौकशी समिती नेमण्यांत यावी अशी मी आपणाला मागणी करतो.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, मी अति.आयुक्त श्री.राम जोशी साहेबांचा वक्तव्य ऐकत होतो, त्यांनी सांगीतले कि १ वर्ष ९ महिने या कालावधीत ४१ बीलाच्या माध्यमातुन ६७ लाख रुपयांचा घोटाळा झाला आहे हे कबुल केले.प्रशासन अत्यंत चुस्त व दुरुस्त आहे असा कालपर्यंत नागपूर शहरातील लोकांचा समज होता. समजा १ वर्ष ९ महिन्यापर्यंत हया गोष्टी प्रशासनाच्या लक्षात येणार नसतील तर प्रशासन किती चुस्त व दुरुस्त आहे ही बाब सगळयांच्या निदर्शनास आलेली आहे. मा.महापौरजी, मागच्या ४० वर्षापासून फक्त एकच संस्था सातत्याने या संदर्भात काम करीत आहे. येवढेच नव्हे तर एकच माणसाच्या परिवारातील पांच सदस्यांच्या वेगवेगळया अस्थापनाच्या माध्यमातुन अश्या पध्दतीचा घोटाळा करण्यांत आलेला आहे, जर एकाच परिवारातील पांच सदस्यांच्या वेगवेगळया आस्थापनांना आपल्या महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत करण्यांत आल्या असेल तर नोंदणीकृत करणारी व्यवस्था किंवा अधिकारी हे देखील त्यात दोषी आहे. असे प्रथमदृष्टया दिसुन येते म्हणुन माझी आपणांस विनंती आहे कि, या दृष्टीकोणातुन आपण आपल्या विषयाला नेले पाहिजे. मा.महापौरजी, खरेतर मा.आयुक्तांना अश्यापध्दतीची चौकशी समिती निर्माण करण्याचे अधिकार आहेत काय ? हा प्रश्न सभागृहात आला आणि एम.एम.सी. ॲक्टच्या कोणत्या कलमान्वये ही समिती गठित करण्यांत आलेली आहे याचा प्रशासन मात्र उत्तर देवु शकला नाही. याचे उत्तर असे आहे कि, मा.आयुक्तांना अश्या पध्दतीची कोणतीही समिती निर्माण करण्याचे अधिकार नाही. आणि म्हणुन अतिरिक्त आयुक्त, श्री.मिना साहेबांच्या अध्यक्षतेखाली जी काही समिती स्थापन करण्यांत आलेली आहे ती बोगस आहे. बोगस मग माझी आपणांस विनंती आहे कि, ही समिती बरखासत करण्याचे निर्देश आपण सभागृहात देणार आहात काय ? मा.महापौरजी, जोशी साहेबांनी बोलतांना हे सांगीतले कि, श्री धामेचा यांच्या युजर आयडी पासवर्ड मधुन हे सगळे ऑपरेशन करण्यांत आले आहे आणि आता एखाद्या अधिका-यांचा युजर आयडी व पासवर्ड चोरीला गेला तर त्या अधिका-यांनी तश्यापध्दतीची तक्रार आपल्या वरिष्ठांना दिली काय ? किंवा पोलिसामध्ये तश्यापध्दतीचा एफआयआर नोंदविला काय ? तर त्या पध्दतीची माहिती देखील उपलब्ध झाली नाही. याचा दुसरा अर्थ आम्ही असा काढावयाचा काय कि ज्या अधिका-यांचा युजर आयडी पासवर्ड चोरीला गेला त्या देखील अधिका-यांचा त्यामध्ये हात आहे काय ? यापध्दतीने देखील चौकशी करणे क्रमप्राप्त आहे असे देखील मला याठिकाणी नमुद करावेसे वाटते आहे. मा.महापौरजी, ज्या तीन लाख रुपयांचे कोटेशन झाले त्या फाईली खालच्या कर्मचा-यांपासून वरच्या अधिका-यापर्यंत हस्ताक्षर करण्यांत आले आहे ते सगळे अधिकारी याठिकाणी दोषी आहे असे बोलण्यास वाव आहे. मग त्या सगळया अधिका-यांना आपण का वाचविण्याचा प्रयत्न करतो हा देखील प्रश्न माझ्या मनात आहे. राम जोशी साहेब म्हणाले कि, फक्त कॉन्ट्रक्टरच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची परवानगी आयुक्तांनी दिली, मग आयुक्त साहेबांनी त्या पध्दतीचे निर्देश प्रशासनाच्या अधिका-यांना नाही दिले काय ? याच्यात जे अधिकारी दोषी दिसत आहे त्याच्या विरोधात एफआयआर दाखल झाला पाहिजे, याचा दुसरा अर्थ असा कि, मला अत्यंत दुदैव्याने याठिकाणी नमुद करावेसे वाटते कि,आपल्या प्रशासनाच्या अधिका-यांना वाचविण्याचा देखील घात मा.आयुक्तांनी चालविला आहे काय ? असे देखील मला याठिकाणी म्हणण्यासाठी वाव आहे. मा.महापौरजी, जेव्हा सभापती, स्थायी समिती श्री.प्रकाशजी भोयर यांनी तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली ॲडसंजय बालपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, स्थायी समितीला अश्या पध्दतीची चौकशी समिती नियुक्त करण्याचे अधिकार नाही, अश्या पध्दतीचा लिगल ओपिनियन आणण्याचे काम देखील प्रशासनानी आपले अधिकार वापरुन केल्याचे दिसुन येत आहे. २४/१ व २४/२ मध्ये स्थायी समितीला हे अधिकार आहे या अटीवर कि, सभागृहाला तत्काळ प्रभावाने तशी माहिती देणे आवश्यक आहे. असे असतांना त्यावर लिगल ओपिनियन

आणण्याचा घात घालण्यांत आला म्हणजे स्थायी समितीच्या अधिकारांना फाटा देण्याचा काम ज्या अधिका-यांनी केलेला असेल त्यांना देखील या चौकशीच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे. असे याठिकाणी नमुद करावेसे वाटते, खरेतर मी विधी समितीचा सभापती असतांना मी सांगीतले होते कि स्टेशनरीमध्ये घोटाळा झालेला आहे. जवळ जवळ ५० लक्ष रुपयांपेक्षा जास्त आपण त्यावर खर्च करतो. ज्याठिकाणी पेपरलेस काम करणे आवश्यक आहे त्या ठिकाणी स्टेशनरी घेण्याचा प्रश्न येतो कुठुन, मी लॅपटॉप आणि मोबाईल घेण्याचा अधिका-यांनी घात केला आहे त्याबाबतची सर्व माहिती मी विधी समितीच्या सभेत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या समितीच्या उपाध्याक्ष श्रीमती मिनाक्षीताई तेलगोटे यांच्या अध्यक्षतेखाली मी एक चौकशी समिती तयार केली होती, त्याच्या मध्ये सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग व लॉ ऑफिसर देखील होते. मा.महापौरजी, मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो कि मांजर जेव्हा दुध पेतो तेव्हा त्याचे डोळे बंद असतात, त्याला असे वाटते कि मला कोणी पाहत नाही, जर नगरसेवकांच्या कामाची जांच करण्याकरिता नंदलाल समिती बसवु शकते त्या पध्दतीची चौकशी समिती ज्या पध्दतीने विरोधी पक्षनेत्यांनी सूचिविले, सभागृहाची चौकशी समिती असली पाहिजे, त्यांच्या या मागणीला समर्थन करतांना जी समिती प्रशासनानी तयार केली आहे ती समिती आपण बरखास्त करणार आहात काय ? हे देखील या सभागृहाला सांगणे अपेक्षित आहे, मा.महापौरजी, अश्या पध्दतीचा मोठा घोटाळा जवळपास सात विभागामध्ये आदरणीय आमदार श्री प्रविणजी दटके यांनी नमुद केल्याप्रमाणे २१ करोडो रुपयांचा घोटाळा झालेला आहे, अश्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी हे सभागृह एसआयटी स्थापन करण्याची शिफारस करणार आहे काय ? मला या ठिकाणी आपणांस प्रश्न नमुद करावासा वाटतो. धन्यवाद.

श्री.संदिप सहारे :- मा.महापौरजी, मगाशी माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही, रेट कॉन्ट्रक्ट कोणी डिसाईड केले, कोणत्या आधारावर केले, कोण-कोणत्या कंपनीला काम दिले, त्या कंपनीचे नांव सांगण्यात यावे. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार एकच परिवारातील सदस्यांना हे कॉन्ट्रक्ट देण्यांत आले, रेट कॉन्ट्रक्ट करतांना स्वत:चा फायदा होवुन त्याचा ही फायदा व्हावा, अश्याप्रकारची सवलत रेट कॉन्ट्रक्टमध्ये टाकली, म्हणुन रेट कॉट्रॅक्ट करणारे कोण ? मग त्या रेट कॉट्रॅक्टला स्थायी समितीमध्ये मंजूरी मिळाली होती काय ? कि प्रशासनानी चुक केली त्याच्या रेट कॉन्ट्रक्टमध्ये आणि बाजार भावामध्ये तफावत असेल तर तितकीच दोषी स्थायी समिती आहे. कारण कि त्यांनी रेट कॉन्ट्रक्टला मंजूरी कशी दिली आहे. त्यांनी वापस का पाठविले नाही. मी अभिनंदन करतो स्थायी समिती अध्यक्ष श्री.प्रकाश भोयर यांचे की हा प्रकार घडल्यानंतर त्यांनी सांगितले की यामध्ये गडबड झालेली आहे. ते स्वत:चा फायदा करण्याकरीता, स्थायी समितीचा फायदा करण्याकरिता, कॅफो सुध्दा यामध्ये तितकेच दोषी आहे कारण की बील मंजूर करीत असतांना हे माहित करुन घ्यावयास पाहिजे होते कि कोणत्या दराने त्यांनी हे रेट लावले आहे म्हणुन रेट कॉन्ट्रक्ट कोणी तयार केला आहे. आणि म्हणुन रेट कॉन्ट्रक्ट कोणी फिक्स केले हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकरणामध्ये एसआयटीचे गठत करण्यास काही अर्थ नाही, एखाद्या उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांच्या मार्फत याची चौकशी करण्यांत यावी. निवृत्त न्यायाधिशांचे पैसेही महानगरपालिकेनी द्यावयास पाहिजे, यामुळे काय होईल की सेटींग होणार नाही. त्यामध्ये निर्णय होईल, मी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती करतो की या सर्व प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या मार्फत चौकशी करण्यांत यावी. ज्यांना वाटते त्यांनी या गोष्टीचे समर्थन करावे व हे पाप बाहेर निघाले नाही पाहिजे त्यांनी या गोष्टीचा विरोध करावा, परंतु उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांमार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यांत यावी. आणि रेट कॉन्ट्रक्ट कोणी केले, त्यांचे नांव सांगण्यात यावे. सन २०१६ ते २०१९ मध्ये जे रेट कॉन्ट्रक्ट झाले ते कोणी केले, याची माहिती देण्यांत यावी. व कॉट्रॅक्टरचे सुध्दा नाव सांगण्यात यावे. त्याचबरोबर मा.महापौरजी, ते रेट त्यामध्ये निश्चितच टाकले असेल परंतु ते रेट कोण डिसाईड करणार, जसे आपल्याकडे रस्त्यांची फाईल बनते त्यानंतर आपण त्याचे इस्टीमेट बनवितो त्यानंतर आपण त्याला टेन्डरला पाठवितो त्यानुसार हे जे रेट कॉट्रॅक्ट तयार केले ते रेट कॉट्रॅक्ट कोणी तयार केले.

सहा.आयुक्त, सा.प्र.वि (श्री.धामेचा) :- मा.महापौरजी, या पुर्वीचे जे रेट कॉट्रॅक्ट झाले होते ते दिनांक ३१-१०-२०१७ च्या कार्यादेशामध्ये स्थायी समिती ठराव क्रमांकानुसार १६० दिनांक २८-०९-२०१७ अन्वये झाले होते, सुरुवातीला आपण टेन्डर फ्लोट केले होते त्यामध्ये आपल्याला जे जे आयटम लागतात ते त्यामध्ये टाकले होते आणि त्यामध्ये ओपन टेन्डर होतात. त्याच्यासाठी सीएसआर रेट अव्हेलेबल नसल्यामुळे त्याचे रेट टाकले होते.

श्री संदिप सहारे :- मा.महापौरजी, तुम्हाला माल मिळत असेल म्हणुन तुम्ही ते रेट टाकले असेल, तुमच्या घरी ए.सी. नाही, कुलर नाही, कंम्प्युटर नाही, तुम्हाला माहिती नाही की मार्केटमध्ये कितीला मिळते, म्हणजे ठेकेदारांनी जे रेट दिले त्याच रेटवर आपण ते आयटम खरेदी करुन घेतले, हे कितपत योग्य आहे, हा तुमच्या घरचा पैसा आहे काय, नागपूर महानगरपालिकेचा पैसा आहे. मग ठेकेदारांनी रेट कॉन्ट्रक्ट दिले आणि त्यांनी आपली सोय करुन टाकली.

निगम आयुक्त :- एखादा रेट सी.एस.आर. मध्ये नसला तर आपण कसे ते फाइंड आऊट करु, मा.सदस्य येथे संभ्रम निर्माण करीत आहे. तुमचे म्हणणे बरोबर असेल तर संबंधित अधिका-यांवर निश्चितच कारवाई करण्यात येईल परंतु मा.सदस्य तुम्ही वक्तव्य करीत असतांना जबाबदारीने क्लीअर कट सांगावे ज्या ठिकाणी पी.डब्लु.डी. चे काम असतात त्या ठिकाणी सी.एस.आर. रेट असतात तो त्यामधील बेस आहे. परंतु यामध्ये सी.एस.आर. रेट नाही. यामध्ये मा.सदस्य लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करीत आहे. वॉटर कुलर असेल त्यामध्ये दहा कंपनी आहे त्यामध्ये कोणती कंपनीचा कुलर पुरविला तो जर ७०,००० हजार रुपयांचा असेल आणि तोच कुलर मार्केटमध्ये ५००० रुपयांचा मिळत असेल तर ते चुकीचे आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आपले जे प्रोसीजर आहे, जी प्रक्रिया आहे, त्या प्रक्रियेमध्ये दुसरी कोणती प्रोसीजर आहे काय ? मा.सदस्यांचे म्हणणे पुर्ण होऊन जाऊ दया त्यानंतर आपले वक्तव्य पुर्ण करावे. मा.महापौरजी माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की अशा प्रकारचे आरोप या सभागृहामध्ये होत राहते परंतु यामध्ये वादावादी करण्याची गरज नाही त्यामुळे मा.सदस्यांना या ठिकाणी आपले मत मांडायचे आहे त्यांच्या मांडणीमधुन एखादी गोष्ट सुटुन गेली असेल त्यामुळे आपणांस विनंती आहे की मा.सदस्यांचे म्हणणे ऐकुण घ्यावे त्यानंतर मा.आयुक्तांनी वक्तव्य करावे.

निगम आयुक्त :- एखादा रेट सी.एस.आर. मध्ये नसला तर आपण कसे ते फाइंड आऊट करु, मा.सदस्य येथे संभ्रम निर्माण करीत आहे. तुमचे म्हणणे बरोबर असेल तर संबंधित अधिका-यांवर निश्चितच कारवाई करण्यात येईल परंतु मा.सदस्य तुम्ही वक्तव्य करीत असतांना जबाबदारीने क्लीअर कट सांगावे ज्या ठिकाणी पी.डब्लु.डी. चे काम असतात त्या ठिकाणी सी.एस.आर. रेट असतात तो त्यामधील बेस आहे. परंतु यामध्ये सी.एस.आर. रेट नाही. यामध्ये मा.सदस्य लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करीत आहे. वॉटर कुलर असेल त्यामध्ये दहा कंपनी आहे त्यामध्ये कोणती कंपनीचा कुलर पुरविला तो जर ७०,००० हजार रुपयांचा असेल आणि तोच कुलर मार्केटमध्ये ५००० रुपयांचा मिळत असेल तर ते चुकीचे आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आपले जे प्रोसीजर आहे, जी प्रक्रिया आहे, त्या प्रक्रियेमध्ये दुसरी कोणती प्रोसीजर आहे काय ? मा.सदस्यांचे म्हणणे पुर्ण होऊन जाऊ दया त्यानंतर आपले वक्तव्य पुर्ण करावे. मा.महापौरजी माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की अशा प्रकारचे आरोप या सभागृहामध्ये होत राहते परंतु यामध्ये वादावादी करण्याची गरज नाही त्यामुळे मा.सदस्यांना या ठिकाणी आपले मत मांडायचे आहे त्यांच्या मांडणीमधुन एखादी गोष्ट सुटुन गेली असेल त्यामुळे आपणांस विनंती आहे की मा.सदस्यांचे म्हणणे ऐकुण घ्यावे त्यानंतर मा.आयुक्तांनी वक्तव्य करावे.

महापौर :- मा.सदस्य का भाषण होने के बाद प्रशासन को पुरा समय दिया जायेंगा

श्री.संदिप सहारे :- मा.महापौरजी, ज्या दिवशी हे रेट कॉन्ट्रक्ट करण्यांत आले, त्या दिवशी कोण अधिकारी

होते. आपण लहान कर्मचा-यांना आंतमध्ये टाकत आहे, व मोठे अधिकारी बिंदास्त फिरत आहे, रेट कॉन्ट्रक्ट कोणत्या अधिका-यांनी केले, कोणत्या स्थायी समितीमध्ये झाले तेव्हा कोण अधिकारी होते त्यांची नावे तसेच स्थायी समिती अध्यक्ष कोण होते त्यांचे सुध्दा नावे सांगण्यात यावे. तसेच या मध्ये जे दोषी आहे त्यांची चौकशी करण्याकरिता उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती तयार करावी. अशी माझी आपणांस विनंती आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, दिनांक २३२.०६.२०१७ चा ठराव होता त्यावेळी एच.जी.सी. म्हणुन श्री.गजभिये निगम अधिक्षक म्हणुन श्री.राजन काळे, सहा.आयुक्त श्री.धामेचा, उपायुक्त श्री.देवतळे तसेच अति.आयुक्त श्री.सिध्दीकी होते.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, या प्रकरणामध्ये मी मागणी करतो की मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिश मार्फत चौकशी व्हावी ही चौकशी झाल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी,अशी माझी आपणांस विनंती आहे.

श्रीमती.आभा पांडे :- मा.महापौरजी, आताच अतिरिक्त आयुक्त यांनी सांगीतले कि हे जेवढा घोळ आहे हे २०२० पासून निदर्शनास आलेला आहे. मा.महापौरजी, २८-०६-२०२८ ला मी प्रशासनाला एक पत्र दिले होते कि शिक्षण विभागामध्ये झालेल्या खरेदीबाबतची मला पुर्ण माहिती देण्यांत यावी आणि लेखा व वित्त अधिका-याना दिले होते कि जेवढा व्यवहार झालेला आहे जेवढी खरेदी झालेली आहे त्या सर्वांचा ऑडिट रिपोर्ट लेखा परीक्षण झाला पाहिजे, त्याची रिपोर्ट मला देण्यांत यावी.मा.महापौरजी, १२-०७-२०१८ रोजी विभागानी मला ऑडिट रिपोर्टचा अहवाल सादर ककेला त्या अहवालामध्ये स्पष्ट नमुद आहे म्हणजे माझ्या म्हणण्याचे तात्पर्य हे आहे कि, आता अतिरिक्त आयुक्तांनी सांगीतले कि २०२० पासून हे सुरु आहे परंतु मला हे सांगावयाचे आहे कि हे सगळे २००९ पासून सुरु आहे.मा.महापौरजी, लेखा परीक्षण अहवालामध्ये ती माहिती लेखा अधिका-यांनी मला दिली कि सन २००९ मध्ये सायकल खरेदी करतांना वित्त विभागाचा व खरेदी प्रकियेचा अवलंब करण्यांत आलेला नाही त्यामुळे झालेल्या नुकसानाबाबत त्यांनी अहवाल सादर केला. मा.महापौरजी, वस्तुची खरेदी करतांना एका वस्तुची किमत ५० हजार व त्यापेक्षा अधिक असेल अश्यावेळी राजपत्राची चौकशी करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. त्या निवेदेची माहिती मोजक्या शब्दात माहिती व जनसंपर्कात देणे आवश्यक आहे. मा.महापौरजी, परंतु संबंधित कार्यालयानी सायकल खरेदी करतांना वरील नियमाने पालन न करता सायकल खरेदी २००८ पासून केल्याचे दिसुन येत आहे. मा.महापौरजी, हया जया सायकली खरेदी करण्यांत आल्या त्यांच्याकडुन टाय सायकल आणि इंडियन लेडिज सायकल नरेशचंद्र कंपनी आणि त्यांचे अधिकृत विक्रेते यांच्याकडुन घेण्यांत आली. याबाबत आवेदने कशी प्राप्त झाली त्याचा तपशील कोणत्याही फाईलमध्ये नमुद नव्हता, मा.महापौरजी, सदर सायकल खरेदीच्या नस्तीमध्ये ही माहिती उपलबध नाही, असा माझा आरोप आहे. आता बील त्या नस्तीमध्ये उपलब्ध नव्हते म्हणुन माझा आरोप आहे कि, हा घोटाळा २०२० पासून नाही तर हा घोटाळा २००९ च्या आधीपासून २००७ पासून सुरु आहे. मा.महापौरजी, मे.भाग्यलक्ष्मी कंपनी यांच्याकडुन खरेदी केलेल्या १९८ सायकली मध्ये तफावत आहे असा लेखा विभागाचा अहवाल सांगत आहे, परंतु सदर कंपनीनी संपुर्ण सायकलीचा पुरवठा केल्याचे दिसुन येत नाही. मा.महापौरजी, तिसरा मुद्या शाळेला वाटप केलेल्या सायकलीची नोंद पुस्तिकेमध्ये न केल्यामुळे आलेल्या तफावतीबाबत, मा.महापौरजी, नस्तीमध्ये नमुद आहे कि बॅरीस्टर.शेषराव वानखेडे विद्यानिकेतन ला ६६ सायकली देण्यांत आल्या परंतु तफावत जी दाखवत आहे ती ६६ सायकलीची दाखवत आहे. एम.ए.के.आजाद उर्दु शाळेला ६४ सायकली देण्यांत आल्या परंतु येथे १६ सायकलीची तफावत दिसत आहे. मा.महापौरजी, अश्या अनेक बाबी त्या लेखा परीक्षण अहवालामध्ये दर्ज करण्यांत आल्या आहेत. सायकलीचा पुरवठा केल्यानंतर ही संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या साठया पुस्तकात नोंद केलेली नाही. आणि अश्या परिस्थितीत त्या सायकलीमधुन किती

सायकली वाचल्या आहेत याची कुठे ही नोंद नाही. मा.महापौरजी, अश्याप्रकारे ३१-१२-२०१८ ला सुध्दा लेखा परीक्षणाचा एक अहवाल मागितला होता त्यामध्ये २०१७-१८ चा लेखा परीक्षण अहवाल त्यांनी मला दिला. सुवर्णनाणी खरेदी करतांना दरपत्रके प्राप्त करण्यांत आली नाही, ही बाब लेखा परीक्षण अहवालामध्ये नमुद आहे, १३-११-२०१७ रोजी एकुण ५ नाणे दोन ग्राम वजनाचे २४ क्रॅटचे खरेदी करण्यांत आली, सदरची खरेदी करतांना कोणतीही निविदा प्राप्त करुन घेण्यांत आलेली नाही. १३-११-२०१७ रोजी मान्यता प्राप्त ज्वेलर्सकडुन दरपत्रके प्राप्त केली नाही त्यामुळे केलेली खरेदी नियमाप्रमाणे झाली असे म्हणता येणार नाही.मा.महापौरजी, गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक देतांना संबंधित पोचपावती किंवा रक्कम प्राप्त झाल्याबद्यल कुठे ही त्या फाईलमध्ये स्वाक्षरी नाही, कुठुन घेतली आणि किती घेतली याची माहिती त्या फाईलमध्ये नाही. मा.महापौरजी, त्याचप्रमाणे पुरवठाधारकांकडुन टेबल व खुर्चीची खरेदी करण्यांत आलेले आहे त्याच्यामध्ये जी नोंदी करण्यांत आलेली आहे त्यामध्ये स्पष्टता दिसत नाही. कार्यालयीन कामाकरिता गुरुकृपा स्टेशनरी यांच्याकडुन केलेली साहित्याची खरेदी केलेली आहे ते नियमबाहय आहे असे लेखा परीक्षण अहवालामध्ये म्हटलेले आहे. मुद्या क्रमांक ५ मागणी करतांना सुध्दा अनावश्यक साहित्य खरेदी केल्या गेले आहे. आमच्या महापौर मॅडम होत्या नंदाताई जिचकार त्यांच्याशी मी तीन वेळा पत्रव्यवहार केला स्वत: जावुन त्यांना सांगीतले, ते आता सांगत होत्या कि कुत्रयांना अॅडाप्ट करावयास पाहिजे, त्या मॅडमकडे मी तीन वेळा गेले, त्यांना सांगीतले होते कि मॅडम हा विषय आर्थिक दृष्टया खुप संवेदनशील आहे, याच्यामध्ये आर्थिक दृष्टया किती तफावत आहे, ही बाब लेखा परीक्षण अधिकारी म्हणत आहे, मग मा.महापौरजी याच्यावर तुम्ही कार्यवाही केली पाहिजे. नाही तर असाच घोळबंगाल सुरु राहिल ते आपल्या डोळयादेखत होईल व आपल्या सगळयांकरिता खुप लाजास्पद बाब राहिल. परंतु त्या महापौरांनी ऐकले नाही. मा.महापौरजी, महापुरुषांना सुध्दा सोडला नाही, महापुरुषांच्या फोटोच्या खरेदीमध्ये सुध्दा मोठा घोटाळा केला आहे, मा.महापौरजी जी सायकल १२ हजार रुपयात येत होती, ती सायकल ६० हजार रुपयांत घेण्यांत आली आहे, जेवढया सायकल घेण्यांत आल्या तेवढया देण्यांत आल्या नाही, म्हणजे दिल्या नाही तर तुम्ही घेतल्या कशाला, मा.महापौरजी, एक जनप्रतिनिधी म्हणुन मला लाजिरवाणी  बाब वाटते कि डाकारले, कामगारनगरच्या शाळेमध्ये ५३ विद्यार्थ्यांकरिता चित्रकलेचे साहित्य खरेदी केले, आश्चर्याची बाब येथे ९ व १० वी विद्यार्थी आहे या विद्यार्थ्यांना चित्रकला हा विषय नव्हता, मग ५०-५० हजार रुपयांचे चित्रकला साहित्य खरेदी केले. त्यावेळेस मी हे सर्व उजेडात आणले होते, परंतु विरोधी पक्षाचा नगरसेवक ओरडत आहे म्हणुन लक्ष न देणे यामुळे आज नागपूर महानगरपालिकेत मागील १० वर्षात कोटयावधी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. असा माझा आरोप आहे. मा.महापौरजी, कोविडचा विषय निघाला मी अभिनंदन करते आमचे लहान भाउ आहे, प्रविण दटके ज्यांनी विधान परिषदेत हा प्रश्न आणला कि, येवढे घोटाळे या महानगरपालिकेत झालेले आहे. आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी जे आहे त्याच्यावर कार्यवाही झाली परंतु मोठे जे अधिकारी आहे ते अजून ही आपल्या खुर्चीवर ठाम बसलेले आहे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यांनी अनेक अधिका-यांची नांवे पदाची नांवे सुध्दा घेतलेली आहे. मा.महापौरजी, मी २५८ फाईल वाचल्या त्यात ज्या काही तफावती होत्या त्या मी आपल्या निदर्शनास आणुन दिल्या आहे सभागृहाच्या माध्यमातुन आणि मी खुप दुखाने म्हणत आहे कि तो विषय मांडत असतांना एक विरोधी पक्षाची नगरसेविका किंवा अपक्ष नगरसेविका म्हणुन मी तो विषय मांडत नव्हती परंतु त्याचा निकर्ष असा काढण्यांत आला कि सत्ताधारी पक्षाचे जे मा.सदस्य होते ते ज्या अधिका-यांना सपोर्ट करीत होते त्या अधिका-यांना त्यांनी सेनापती म्हणुन म्हटले होते.  त्यांचे कौतुक करण्याचे काम त्यांनी केले होते, कौतुक आम्ही ही करतो, जर कोणता अधिकारी चांगला काम करीत असेल तर त्याचे कौतुक करण्याचे काम आम्ही पण करतो, आणि आपण तारीफ केली पाहिजे.आणि हे काम आभा पांडे या नगरसेविकांनी वेळोवेळी केलेला आहे. ज्यावेळेस जो विषय मी उचललेला होता, मा.महापौरजी, त्यावेळे शासनाला जो आदेश होता तो मी सभागृहात दाखविला होता, आणि

त्याच्यामध्ये म्हटले होते कि ज्यांना अधिकार नाही, त्या अधिका-यांनी नस्तीवर स्वाक्षरी केलेली आहे. ती चुक होती कि नाही होती परंतु त्या गोष्टीला ही दाबण्याचा प्रयत्न सत्ताधारी नगरसेवकांनी केला आहे. परंतु आता मला आनंद आहे कि आपणांस हे जाणवले कि आभा पांडेनी जे आरोप लावले त्यामध्ये तथ्य आहे. आणि दुख हया गोष्टीचा आहे कि त्यावेळेस आपण संवेदनशीलता दाखविली असती जतर येवढा मोठा घोळ झाला नसता, या कामात कोटयावधी रुपये नागपूर शहरातील जनतेचे वाया गेले आहे आणि कोटयावधी रुपयांचा घोळबंगाल झालेला नसता आणि मला आरोप करण्याची पाळी आली नसती, मा.महापौरजी, ज्या अधिका-यांलना अधिकार नव्हते त्यांनी नस्तीवर स्वाक्षरी केली आहे, मला हे माहित आहे कि ते अधिकारी प्रतिनियुक्तीवर येथे आलेले आहे परंतु आपण आपल्या नियमाप्रमाणे त्याच्यावर काय कार्यवाही करु शकतो, आपण विधवान महापौर आहात, मला हे म्हणावयाचे आहे कि ज्यांना अधिकार नस्तांना ज्यांनी अनेक नस्तीवर स्वाक्षरी केली आहे, म्हणजे त्यांना पावर डेलिगेशन झालेले नव्हते तरी आर्थिक वस्ती खरेदी करण्यांत आली, डिसीजन घेण्यांत आले, मा.महापौरजी, त्या नस्त्यावर ज्या अतिरिक्त आयुक्तांनी स्वाक्षरी केली, त्यांना शासनाकडे परत पाठविण्यांत यावे.ही माझी कळकळीची विनंती आहे, मा.महापौरजी माझी विनंती कोणाच्या विरोधाला धरु नाही मी २५८ फाईली वाचल्या आहेत आपण ही सुविधा करुन दिली होती, मी आपले अभिनंदन करते. परंतु त्यामध्ये मोठयाप्रमाणात तफावत आढळुन आल्या आहेत जर त्यावर कार्यवाही होणार नसेल तर आम्ही काहीच करुन शकत नाही, असे दिसुन येईल, प्रशासन काल ही हावी होता आणि आज ही हावी आहे, हे चालणार नाही, आणि असे आपल्या नेतृत्वात घडवु अशी आमची इच्छा नाही, मा.महापौरजी, एकाच दिवशी दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते, याचे कागदोपत्री पुरावे मी दिले आहे, आपण ते ही मानावयास तयार नव्हते, रेट कॉन्ट्रक्टचा विषय आता घेतला, रेट कॉन्ट्रक्ट ठिक आहे एखाद्या वेळेस आपण सांगीतले कि २०१७ मध्ये कोविड नव्हता, तुम्ही त्या पिरीअडमध्ये ही सगळी खरेदी केली आहे, तरी यामध्ये जी तफावत आढळुन आली आहे, ती लेखा परीक्षण अधिका-यांनी सांगीतला आहे.मा.महापौरजी, एखाद्य वेळेस पुणे महानगरपालिकेचा किंवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा उदाहरण देवुन आपण ते काम करुन शकतो परंतु भंडारा, गोंदिया, तुमसर या शहराचे रेट कॉन्ट्रक्ट धरुन आपण काम केले आहे, ही तफावत ही मी आपल्या समोर उजागर केली आहे. थर्मामिटर किती हजार रुपयात घेतले, त्याच्यात किती मोठा घोळ करण्यांत आला त्यासंदर्भात ही मी सभागृहात विषय ठेवला आहे. मा.महापौरजी, त्यावेळेस फक्त एकच वातावरण सभागृहात बनविण्यांत आला कि अरे त्याच्यात काहीच नाही, आमचे मोठे भाउ सत्तापक्षनेते श्री अविनाशजी ठाकरे यांनी ही म्हटले होते कि याच्यामध्ये काही तांत्रिक त्रुटया दिसत आहे.मा.महापौरजी, हया तांत्रिक त्रुटया जे तुम्ही म्हणत होते ते आज भ्रष्टाचार कसा झाला आहे. मा.महापौरजी, टॅक्नीकल मिस्टेक हुई थी लेकिन उस टॅक्नीकल मिस्टेक के आधार पर आज इतने करोड रुपयो का भ्रष्टाचार होता है और हम उस तरफ ध्यान नही देते तो शहर की जनता हमको कभी माफ नही करेगें, मा.महापौरजी, मैं बहुत खुश हुॅं कि, मैं अकेली लढरही थी, लैकिन मैं इस शहर के जनता के हित के लिये लढ रही थी और आज यह जो भ्रष्टाचार निकला है, वह बहुत ज्यादा हुआ है मा.महापौरजी, आपने उसमे बहुत अच्छा रुलिंग दिया था कि इसमे ए.जी. ऑफिस के ऑडिटर रहेगें इसकी चौकशी होंगी, मा.महापौरजी, आपकी विधवत्ता का हम लोहा मानते है, नये वर्ष के सरहद पर हम खडे है, और हमे यह कहना पडरहा है कि, हमारे विद्यवान महापौर जिन्होने रुलिंग दिया था, उस रुलिंग को न्यायसंगत न बताते हुऐ उस रुलिंग को विखंडीन के लिये भेजा जाता है, माझा भाउ आमदार असल्यामुळे मला असे वाटते कि हे सुध्दा माझ्या पाठीशी उभे राहिल. मा.महापौरजी, ज्यावेळी आपण रुलिंग दिले त्यावेळेस मा.आयुक्त बाजुला बसले होते, त्यावेळी त्यांनी सांगावयास पाहिजे होते कि यामध्ये एजी ऑफिसचे ऑडिटर येवु शकत नाही, आपण मग तसे रुलिंग दिले असते परंतु याच्यामध्ये प्रशासनाकडुन आपल्याला काही ही मार्गदर्शन करण्यांत आलेले नाही. आणि कोविड फंडाचा दुरुपयोग सामान खरेदीच्या कामात करण्यांत आला आहे, त्याचा आजपर्यंत तोडगा निघालेला नाही, ते फंड राज्य सरकारचे असो, केंद्र सरकारचे असो मी अनेक उदाहरण दिले होते

कि एका एका वस्तुचे खरेदीचे बिल हे केंद्र सरकारच्या फंडातुन ही खतविण्यांत आलेले आहे व राज्य सरकारच्या फंडातुनही खतविण्यांत आलेले आहे.मा.महापौरजी, मी आपणांस विंनती करते कि ज्या अधिका-यांनी याच्यामध्ये हात धुतलेले आहे त्यांना पिठासीन अधिकारी म्हणुन आपण कोणतीही मुभा देवु नये, ही आमची आपणाकडुन अपेक्षा नाही, विश्वास आहे, कारण दया भैया म्हटला तर दया भैयानी नेहमी प्रिंसीपलला धरुन राजकारण केला आहे, त्यांनी प्रिंसीपलला धरुन सभागृह चालविला आहे या बाबीचा आम्हाला अभिमान आहे. आणि या अभिमानाला धरुन आम्हाला विश्वास आहे कितुम्ही जो रुलिंग द्याल त्याच्यामध्ये ज्या अतिरिक्त आयुक्तांचा नांव मा.आमदार महोदयांनी सभागृहात घेतला होता,त्यांना परत शासनाकडे पाठवावे आणि त्यांची चौकशी शासनाच्या मार्फत करुन आणा, कारण आपण त्यांना निलंबित करु शकत नाही, परंतु आपण त्यांची सेवा शासनाला परत करावी. आणि त्याच्यानंतर असे वाटत असेल कि ज्या ज्या अधिका-यांनी जनतेचा एक एक पैसा जिस समय लोग अपनी जान बचाने के लिये झुंझ रहे थे कोई पैसा काम नही आरहा था, और अच्छे अच्छे धनाढय लोगो को हमने मृत्युमुखी पडते हुऐ देखा है कोई पैसा काम नही आया है,  लैकिन गरीबो के जेब के भरे हुऐ पैसे का दुरुपयोग महानगरपालिका के प्रशासन ने किया है, यह मेरा आरोप है, आपने मेरी सारी बातो को सुना, मैंने जिस प्रिंसीपल की बात की उस प्रिंसीपल को ध्यान मे रखते हुऐ, मेरी मांग पर उस तरह के निर्देश आप प्रशासन को देगें, और वह ठराव हम सब लोग मिलकर लेगें तो मुझे लगता है कि शहर की जनता के साथ न्याय करेगें, और अगर सारे सत्ताधारी नगरसेवको को लगता है कि, शहर की जनता की साथ न्याय करना है तो निश्चित रुपसे मैंने जो मांग की है, उसका समर्थन करेगें।

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी,मा.सदन, हा घोटाळा जेव्हा उघडकीस आला स्थायी समिती अध्यक्ष या नात्याने मा.आयुक्तांच्या माध्यमातून किंवा संबंधित अधिका-यांच्या माध्यमातून, लेखा व वित्त अधिका-यांच्या माध्यमातून स्थायी समितीला कळविण्यात यायला पाहिजे होते. पण मा.महापौरजी, त्या संपुर्ण बातमी वर्तमानपत्रामधून वाचल्यानंतर आम्हाला कळल्या, मी प्रशासनाच्या माध्यमातून डॉ.चिलकर यांनी पोलीस स्टेटमेंटमध्ये असे नमूद केले की त्यांनी ई प्रशासन वापरले नाही. आरोग्य विभाग हा ई प्रशासन वापरत नाही. डॉ भटकर होते तेव्हापासून म्हणजे 2011 पासून महाराष्ट्रात ई प्रशासन लावण्याचा प्रयत्न केला. जर ई प्रशासन आपल्या माध्यमातून करण्यात आले असते तर त्या पध्दतीने ते समोर गेले असते. ई प्रशासनाची लॉग ईन कोणी वापरली, काय वापरली याचा उहापोह झाला, धामेचा साहेबांच्या माध्यमातून ई लॉग इन वापरण्यात आले आणि त्या माध्यमातून वित्त विभागाकडे गेले आणि नंतर पैसे काढले, आणि हा घोटाळा समोर आला तो डॉ.चिलकर यांच्या माध्यमातून समोर आला की वित्त विभागाच्या माध्यमातून समोर आला कारण की पैसे तर वित्त विभागातून कॉट्रॅक्टरला दिले परंतु त्याचे रितसर पोलीस स्टेशनमध्ये डॉ.चिलकर गेले. ॲक्चुअली यामध्ये कॅफोच्या माध्यमातून तक्रार करायला पाहिजे होती परंतु यामध्ये मा.महापौरजी वरच्या अधिका-यांचा गौडबंगाल दिसत आहे. यांनी मा.आयुक्तांच्या माध्यमातून एक समिती तयार केली समितीच्या आताच संपुर्ण गोष्टींचा उहापोह झाला समितीला अधिकार नसुन सुध्दा मा.आयुक्तांनी समिती गठीत केली. आजकाल नागपूरमध्ये सुध्दा ऑटोनॉमस युनिर्व्हसिटी आहे. ही समिती ऑटोनॉमस युनिर्व्हसिटीसारखी वाटली, याकरीता त्या ऑटोनॉमस युनिर्व्हसिटीमध्ये मा.महापौरजी, विद्यार्थी शिकतो तिथेच, परिक्षा सुध्दा तिथेच देतो, आणि पास सुध्दा तिथेच होतो आता परिस्थिती ही आहे ही समिती लावली या ऑटोनॉमस युनिर्व्हसिटीमध्ये 46 परसेंट असलेला विद्यार्थी सुध्दा इंजिनिअर होतो जेव्हा तो नौकरी मागायला जातो तेव्हा दहा हजार रुपयांची सुध्दा नौकरी मिळत नाही. प्रशासनानी ही समिती लावली तर खरच या समितीच्या माध्यमातून खरच चौकशी होणार आहे काय ?  हे तर चोराच्या हातातच चाबी देण्यासारखे होईल, या समितीला कोणत्याही माध्यमातून घोटाळा काढण्याचे अधिकार देण्यात येऊ नये, आपल्या माध्यमातून चौकशी समिती लावण्यात यावी, कारण की यामध्ये अनेक प्रकारच्या गोष्टी आहे. हा घोटाळा कोरोना काळात झाला, कोरोना

काळात जे पैसे होते ते महाराष्ट्र सरकार कडुन आले होते काय ? आले असेल तर ते वापरण्याचे अधिकार होते काय ? हा निधी कोणी खर्च केला ? प्रत्यक्ष खरेदी करण्याकरीता शासनाने काही मार्गदर्शक सुचना दिल्या होत्या काय ? अशा ब-याच गोष्टी या समितीच्या निदर्शनास आणण्याची माझी जबाबदारी आहे. मा.महापौरजी, 41 नस्ती बोगस असून त्यापैकी 24 नस्ती प्राप्त आहे व 16 नस्ती अजून अप्राप्त आहे. या संदर्भात किती नस्त्या बनविण्यात आल्यात याची चौकशी होण्याची जबाबदारी आहे. कोणती नस्ती बोगस आहे आणि कोणती नस्ती खरी आहे याचे सर्व मापदंड समितीच्या माध्यमातून करण्यात यावी. कार्यादेशावर एच.ओ / क्यु असे नमूद करण्यात आले आहे. कार्यादेशावर एच.ओ. म्हणजे काय आणि क्यु म्हणजे काय याची माहिती संबंधित अधिका-यांनी दयावी अशी मी विनंती करतो.

वैद्यकीय अधिकारी (डॉ.चिलकर) :- मा.महापौरजी, एच.ओ. म्हणजे हेल्थ ऑफीसर आणि क्यु हा इमरजन्सी साठी देण्यात आलेला आहे.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, तुम्हाला घोटाळा सहीच्या माध्यमातून केव्हा लक्षात आले.

वैद्यकीय अधिकारी (डॉ.चिलकर) :- मा.महापौरजी, ऑक्टोबर महिन्यात एक फाईल माझ्या निदर्शनास आणुन दिली होती त्यावेळी अशा पध्दतीच्या ज्या फाईल आहे तशा 35 फाईल त्यांनी मला दाखविल्या आणि त्या फाईल मी लगेच राम जोशी साहेबांच्य निदर्शनास आणुन दिल्या.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, तुम्हाला कोणी तक्रार करायला लावले होते.

वैद्यकीय अधिकारी (डॉ.चिलकर) :- मा.महापौरजी, राम जोशी साहेबांनी मला तशा प्रकारचे आदेश दिले होते त्याप्रमाणे मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, या सर्व घटनेची सूचना मा.महापौरजीला दिली होती काय ?

वैद्यकीय अधिकारी (डॉ.चिलकर) :- :- मा.महापौरजी, माझ्या स्तरावरुन सूचना देण्यात आली नव्हती.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, हे सर्व तुमच्या स्तरावरच करायचे होते काय, येथे पाठविलेले जे 155 नगरसेवक आहे ते या नागपूर शहराच्या तीस लाख लोकांनी निवडून दिले आहे. आणि निवडुन दिलेल्या लोकांना त्यांना महापौर केले आहे. तुम्ही प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेमध्ये आहेत तर हे सर्वच्या सर्व तुमच्याच माध्यमातून करायचे आहे काय ? हा पुर्णच्या पुर्ण भ्रष्टाचार अधिका-यांच्या माध्यमातून दाबण्याचा प्रकार सुरु आहे. त्यांना स्थायी समितीला 24 (2) चे अधिकार असतांना सुध्दा मा.प्रशासन ही समितीला नाकारते आणि त्यांच्या स्वत:च्या समितीला अधिकार समिती तयार करते. मा.महापौरजी, वर्ग 3 ते 4 च्या कर्मचा-यांना पोलीसांनी उचलले अशी माझी माहिती आहे. त्यांचा दोष कोणता होता त्यांनी त्यांच्या सहीने पैसे काढले काय ? तर त्यांना अटक केली सदसदविवेक बुध्दीचा जर विचार केला तर खरच त्यांचा किती दोष असेल आणि दोष जर नसेल तर त्यांच्या समाजिक प्रेस्टीजचा जो इशु असेल त्याच्या स्वत:च्या इज्जतचे किती खच्चीकरण आहे. यामध्ये वरीष्ठ अधिका-यांचा हात असल्यावर सुध्दा छोटया कर्मचा-यांना आतमध्ये टाकुन दयायचे आणि मोठया अधिका-यांना वाचविण्याचा प्रकार आहे. संदीप सहारे साहेबांनी सांगितले की ही चौकशी निवृत्त न्यायधिशांच्या माध्यमातून लावावी, त्यामुळे ही समिती निवृत्त न्यायधीशांच्या माध्यमातून करावी, मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये सुध्दा मी तेच रुलिंग दिले होते की आयुक्तांनी 1 एप्रिल 2020 पासून तर आतापर्यंतची चौकशी लावली, माझे म्हणण्याचे तात्पर्य आहे की कोणताही मानुस एकाच दिवसात 67 लाख रुपयांचा भ्रष्टाचार करतो काय ? मग परत 52 लक्ष रुपयांचे चेक सुध्दा आणुन देतो, कोणताही व्यक्तीने 2020 पासून तर आतापर्यत ऐवढी मोठी हिम्मत दाखवितो काय ? त्यांनी या पुर्वी 40 लाखांचा केला असेल, त्याच्या पुर्वी 30 लाखांचा केला असेल मा.महापौरजी, कमीत कमी 20 ते 30 वर्षात घोटाळा झाला असेल, मी या सभागृहाचा पाच वर्षापासून सदस्य आहे. परंतु माहिती घेतल्यावर मला असे कळले की हा परिवार मागच्या 40 वर्षापासून स्टेशनरीचे साहित्य सप्लाय करतो, त्यामुळे मा.महापौरजी माझी आपणांस विनंती

आहे की स्थायी समितीचा अध्यक्ष या नात्याने मागच्या पाच वर्षाची चौकशी मागितली होती मागच्या पाच वर्षामध्ये 100 टक्के घोटाळा झालाच आहे. आणि त्याची व्याप्ती ही मागच्या 30 ते 35 वर्षापर्यत न्यावी, आजच्या परिस्थितीमध्ये जे लोक दोषी असतील त्यांना निलंबित करण्यात यावे, ही आपणांस विनंती करतो.

श्री जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, निश्चितरुपाने आजच्या सदनामध्ये या भ्रष्टाचाराच्या संदर्भात चर्चा चालु आहे, मला तर असे वाटते कि आंधळा दळतो आणि कुत्रे पिट खात आहे.आणि संपुर्ण शहर मा.सदस्यांवर दोषारोप करीत आहे कि महानगरपालिकेत इतका मोठा घोटाळा झाला आहे, जेव्हा कोविडच्या काळामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातुन मिळणा-या निधीमधुन महानगरपालिकेत इतका मोठा घोटाळा झाला आहे, मा.सदस्या,श्रीमती आभा पांडे यांनी सविस्तर या घोटाळयाच्या संदर्भात हाउसमध्ये आपले मत मांडले आहे. त्यानंतर अनेक प्रश्न उदभवले आणि हा घोटाळा लक्षात आला, निश्चितरुपाने जो पर्यंत या प्रकरणाची संपुर्ण चौकशी होत नाही, तोपर्यंत आपण त्या विभागातील अधिका-यांना दुस-याठिकाणी हलविले पाहिजे. नागपूर महानगरपालिकेत अधिका-यांच्या पासवर्डची ई-गर्व्हनेंसच्या माध्यमातुन एलएफएमएसची चोरी झालेली आहे, आम्ही या प्रकरणात चौकशीची मागणी करीत आहे, हे सगळे प्रकरण निश्चित रुपाने समोर यावयास पाहिजे, या प्रकरणात जे बडे अधिकारी दोषी आहे त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे, लहान कर्मचा-यांना न्यायाय मिळावयास पाहिजे. लहान कर्मचाप-यांना जेलमध्ये टाकण्यांत येते व वरिष्ठ अधिकारी छातीटोकपणे या सदनामध्ये आपले उत्तर देत आहे, असे होता कामा नये, जे अधिकारी कर्मचारी चांगले काम करीत आहे, निश्चितरुपाने त्यांच्यावर विशेष लक्ष दिले पाहिजे, आमच्या दटके साहेबांनी, श्रीमती आभा पांडेनी, सत्तापक्षनेत्यांनी ज्या गोष्टी मांडल्या आहेत त्याची निश्चितरुपाने चौकशी झाली पाहिजे. महानगरपालिकेतील अधिका-यांच्या संपत्तीची चौकशी करण्यांत यावी, जोपर्यंत अधिकारी वर्गाची चौकशी होत नाही, तोपर्यंत त्यांना त्यांच्या विभागातील चार्ज व फाईल साईन करण्याची अनुमती देण्यांत येवु नये, जोपर्यंत हा घोटाळा उघडकीस येत नाही, संपुर्ण प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यंत त्यांच्याकडुन चार्ज काढुन घेण्यांत यावा. जे दोषी आहे त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यांत यावी.

श्री संजय बंगाले :- मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री विजय झलके व मा.विरोधी पक्षनेते श्री तानाजी वनवे यांनी जो स्थगन प्रस्ताव मांडला त्यावर मगापासून या सदनात चर्चा सुरु आहे. याठिकाणी महानगरपालिकेत या विषयावर चर्चा सुरु असतांना अनेक सदस्यांनी या संपुर्ण घोटाळयाच्या संदर्भात प्रशासनाला या घोटाळयाचे सगळे संदर्भ विचारले. हा घोटाळा याठिकाणी महानगरपालिकेची प्रचंड प्रमाणात बदनामी करीत आहे. आम्ही महानगरपालिकेत विकासाच्या दृष्टीने इतकी उंची गाठली होती.नागपूर महानगरपालिकेनी नागपूर शहराचा सर्वांगिण विकास करतांना नागपूर महानगरपालिकेनी या नागपूर शहराला या उपराजधानीच्या शहराला विकासाकडे नेला होता. आणि शहराचा विकास होत असतांना याठिकाणी प्रशासनाच्या माध्यमातुन ज्याप्रकारे हा घोटाळा उघडकिस आला आहे, यामुळे याठिकाणी प्रशासनाकडुन जे उत्तर आले ते संुयुक्ति नव्हते, अश्याचप्रकारचा एक क्रिडा घोटाळा तत्कालीन सरकारनी त्यावेळेस नंदलाल समिती नियुक्त केली होती, त्याठिकाणी नगरसेवकांना प्रशासकीय अधिकार नसतांना त्या सगळयांवर दोषारोपण करण्यांत आले होते. त्यावेळेस न्यायालयात केस दाखल झाली, आजही तत्कालीन नगरवेवक दोनदा न्यायालयात तारीखवर जातात, आजही ती केस संपलेली नाही, हा प्रशासकीय घोटाळा होता, प्रशासनातील अधिका-यांची त्यामध्ये चुक लक्षात आली परंतु त्याचे भुगतभोगी कोण ठरले तर ते नगरसेवक होते.महानगरपालिकेत लोकांच्या आर्शिवादाने जे नगरसेवक निवडुन येतात, आणि कोणतेही प्रशासकीय अधिकार नसतांना याठिकाणी शहराच्या विकासाकरिता काम करतात, नगरसेवकांना या प्रशासकीय चुकांमुळे जनतेमध्ये उत्तर द्यावे लागतात. याठिकाणी कार्यकारी महापौरजी यांना मी विनंती करेल, अनेक मा.सदस्यांनी याठिकाणी आपले मत मांडले आहे, अनेक लोक याठिकाणी बोलले आहे कि निवृत्त न्यायाधिशामार्फत चौकशी करण्यांत यावी,मी तर असे म्हणीण कि या सभागृहामध्ये अनेक सदस्य असे आहे कि ज्यांना प्रशासकीय कामाचा चांगला अनुभव आहे, कोणी

स्थायी समितीचे अध्यक्ष होते, कोणी महापौर होते, कोणी विरोधी पक्षनेते होते तर कोणी सत्तापक्षनेते होते, माझी याठिकाणी विनंती आहे कि महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुका पुन्हा फेब्रुवरीमध्ये होवु घातल्या आहे आणि वेळेवर ही निवडणुक झाली तर या निवडणुकीची आचार संहिता जनवरी महिन्यात लागेल.आज याठिकाणी डिसेंबरच्या शेवटच्या तारखेला आपण ही सभा घेत आहे त्यामुळे एक निर्धारीत अवधीत महानगरपालिकेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे, महानगरपालिकेचे हे सभागृह सार्वभौम आहे, सभागृहाचे अधिकार सर्वात मोठे आहे, त्यामुळे या सभागृहाच्या ज्येष्ठ सदस्यांची एक समिती ताबडतोब तयार करण्यांत यावी, एका समय सीमेच्या आंत हा जो घोटाळा झालेला आहे त्या घोटाळयाची संपुर्ण तपासणी करुन यात जे दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी. हा घोटाळा खूप पूर्वी लक्षात यावयास पाहिजे होता तो खूप उशिरा प्रशासनाच्या लक्षात आला आहे, तीन लाखाचे आम्ही ज्यावेळेस कोटेशनव्दारे कोणतेही काम करतो, कोविडच्या काळामध्ये राज्य व केंद्रसरकारचे जे अनुदान महानगरपालिकेत आले आहे त्यावेळी तत्कालीन आयुक्त यांच्या काळात जर काही खरेदी झाली असेल तर या खरेदीमध्ये त्यावेळी एचओडी, सहा.आयुक्ता यांचा समावेश नसेल तर मला असे वाटते कि जेवढया कामाचे ई-टेंडर करीत असतांना ई-टेंडर करणारे जे सन्मान्नीय आहे त्यांनी एकदा तपासुन घेतले पाहिजे. याठिकाणी मगाशी बोलत असतांना अतिरिक्त आयुक्त यांचे जे स्वीय सहायक आहे तो रात्री १० वाजता बिलींग करीत असेल तर आणि कोणाचे काय लक्ष नसेल तर तो काय करीत आहे हे कसे कळेल, अनेक अधिकारी सहजपणे आपले ई-पासवर्ड कोणाला ही देवुन देतात, ही गंभीर बाब आहे, त्यामुळे याठिकाणी त्या सर्व बाबी तपासण्याची वेळ आलेली आहे, त्यांना जो अधिकार दिले आहे त्या अधिकाराचा त्यांनी दुरुपयोग केला आहे, म्हणुन या सवर् प्रकरणाची सर्वकक्ष चौकशी करण्यांत यावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आमचे मित्र सन्माननिय सदस्य श्री.पिंटु झलकेजी आणि सन्माननिय विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेत जो घोटाळा झाला त्यावर चर्चा उपस्थित करण्यासाठी स्थगण प्रस्ताव दिला.मा.महापौरजी, चर्चेची सुरुवात पिंटुभाऊ झलके यांनी केली. नागपूर महानगरपालिकेमध्ये स्टेशनरी घोटाळा झाला आणि या स्टेशनरी घोटाळयामध्ये मोठया प्रमाणात कर्मचारी आणि अधिकारी सहभागी आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, आणि सोबतच प्रशासनाने जी चौकशी समिती नेमली त्या चौकशी समितीच्या अधिकार क्षेत्रावर त्यांनी आक्षेप घेतला, सोबतच दुसरीकडे ही चौकशी करण्याचे अधिकार स्थायी समितीला कसे आहे आणि प्रशासनाने ते स्थायी समितीचे अधिकार नाकारुन स्थायी समितीच्या अधिकाराचे कसे फसवणुक केले अशा पध्दतीने त्यांनी आपला विषय मांडला. मा.महापौरजी, महानगरपालिका आणि भ्रष्टाचार हे समीकरण झाले आहे. रस्त्यांवरचे अपघात आणि महानगरपालिकेचे भ्रष्टाचार आता सारखेच झाले आता रस्त्यावरच्या अपघातावर चर्चा करता येत नाही तशी महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारावरच्या चर्चा आता निरर्थक राहिल्या आहे. आपण वर्तमानपत्रामध्ये बघतो की एक अपघात झाला, दोन मृत्युमुखी आणि चार जखमी, नागरिक त्याची गंभीरतेने दखल घेत नाही. दारु पिऊन गाडी चालविली म्हणुन अपघात झाला म्हणुन मी उदयापासून दारु पिणे बंद करतो आणि दारु पिलो तर गाडी चालविणार नाही असा कोणी निर्णय घेतो काय ? तसेच महानगरपालिकेमध्ये चर्चा होते आणि जेव्हापासून ही सभा निश्चित झाली तेव्हापासून माझ्या मनामध्ये सातत्याने एक प्रश्न येत होता की महानगरपालिकेतील भ्रष्टाचारावर चर्चा, महानगरपालिकेला ही प्राथमिक झळ आहे भ्रष्टाचाराची, या महानगरपालिकेच्या श्वासाश्वासामध्ये भ्रष्टाचार आहे. आता तो भ्रष्टाचार कोणाच्या बाजुने आहे या बाजुने आहे की त्या बाजूने आहे ज्यावेळी आम्ही त्या बाजुने होतो तेव्हा त्या बाजुले लोक आनंदी होते आणि ज्यावेळी या बाजूने होतो त्या वेळी त्या बाजुचे लोक आनंदी होते. मुळात भ्रष्टाचार संपतो काय, मा.महापौरजी मी चार तासापासून ही चर्चा ऐकत आहे. भ्रष्टाचाराच्या चर्चेत सहभागी होण्याने मी पवित्र होऊ शकतो ही अनुभुती मला जाणवत होती गंगेत स्नान करुन डुबकी मारली तर पवित्र झाल्याचा अहसास होतो तसेच भ्रष्टाचारावर या

सभागृहात चर्चेच्या निमित्ताने स्व:ताला पवित्र करुन ही अनुभुती घेण्याचा चान्स मी सुध्दा घेऊन टाकला. सर्वच गंगेत डुबकी मारते आणि पवित्र होऊन राहिले तर मी का मागे मी पण डुबकी मारली पाहिजे आणि पवित्र झालो पाहिजे म्हणुन मी पण डुबकी मारुन घेतली या चर्चेमध्ये सहभागी होण्याची, मा.महापौरजी या ठिकाणी आमचे मित्र संदीपभाऊ यांनी एक विषय मांडला महानगरपालिकेचे दरपत्रक काय आहे आणि बाजारामुल्य काय आहे. मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी त्यावर सांगितले की प्रक्रीया म्हणुन शंभर टक्के बरोबर आहे. नियम म्हणुन शंभर टक्के बरोबर आहे. कायदा म्हणुन शंभर टक्के बरोबर आहे. परंतु मा.महापौरजी हा नियम बजेटच्या आतमध्ये असेल तर तो नियम बदलुन नियमाला फाटा देऊन आपण नविन काही प्रोसिजर प्रस्थपित करु शकतो काय ? मा.महापौरजी, त्यांच्या भाषणातील एक मुद्या मला अत्यंत महत्वाचा वाटला, माझ्या घरी मी पेन विकत घेतो,माझा पेन हा 10 रुपयांचा आहे आणि तोच पेन सेम रेट कॉन्ट्रॅक्टमध्ये मी पदाधिकारी म्हणुन ज्यावेळी माझ्या ठेवता तेव्हा दरपत्रकामध्ये त्यावेळी त्याचा 50 रुपयांचा बजेट येत असतो त्यावेळी माझा पदाधिकारी जागृत राहतो, मी नाही. त्यावेळी मी हा मृत अवस्थेत असतो. त्यावेळी माझा पदाधिकारी जागृत असतो. त्यावेळी माझ्यातला अधिकारी जागा असतो. मा.महापौरजी, आपण आपल्या व्यक्तीगत जिवनामध्ये खरेदी करीत असतांना सांबाराची जोडी जरी घ्यायची असेल तरी आपण भाव करीत असतो आणि संस्थेचा पैसा खर्च करीत असतांना या संपुर्ण गोष्टीसाठी कोणी एक व्यक्ती जबाबदार नाही, कोणा एकाचा कार्यकाळ जबाबदार नाही, मी कोणा व्यक्तीगत मानसाला दोष देणार नाही. आता जे लोक आरोपी आहे ते जात्यात आहे आणि बाकीचे सुपात आहे. उदया आपण केव्हा जात्यात येऊ याचा नेम नाही. मी मुद्याम या ठिकाणी डॉ.चिलकर यांचे अभिनंदन करतो की त्यांनी त्याची सुरुवात केली. त्यांच्या निर्देशनास आल्यानंतर त्यांनी आपल्या वरीष्ठास ही गोष्ट सांगितली की असा प्रकार सुरु आहे. मा.महापौरजी, आता याची चौकशी कोणी करायची, हा अनेकांच्या चर्चेमधुन हा सुर आला याची चौकशी कोणाच्या मार्फत होईल, अधिका-यांच्या की सभागृहांच्या मा.महापौरजी, कोणाच्याही नेतृत्वामध्ये चौकशी समिती स्थापन करा, अधिका-यांच्या करा नाहीतर पदाधिका-यांच्या करा, आतापर्यतच्या अनेक चौकशी समितीच्या अहवालांची स्थिती काय आहे. या सभागृहाने अनेक समित्या कॉन्स्टीटयुट केलेल्या आहेत त्यात अधिका-यांना निर्देशित केले आहे. त्या पदाधिका-यांना चौकशीचे अधिकार दिले आहे. मा.महापौरजी, या आधी सुध्दा या सभागृहात चर्चा उपस्थित करीत असतांना अनेकदा हा विषय मांडला या सभागृहामध्ये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी कशा पध्दतीने होते,अंमलबजावणी होते किंवा नाही हे तपासण्यासाठी एक यंत्रणा असली पाहिजे, एक समिती असली पाहिजे म्हणुन ती समिती या सभागृहाने स्थापन केली. त्या समितीची बैठक पाच वर्षातून एकदा सुध्दा झालेली नाही. आपण रुलिंग दिले त्या रुलिंगवर काय कारवाई झाली या संदर्भात त्या समितीच्या बैठका झालेल्या नाही. आता या चौकश्या समित्या आहे की निपटारा समित्या आहेत. आता हे प्रकरण चौकशी समिती साठी नाही पाहिजे ते निपटारा करण्यासाठी समिती पाहिजे, मी कुठल्या एका बाजुने बोलत नाही. मी एक उदाहरण देतो मी नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक मंडळावर या महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणुन संचालक म्हणुन गेलो होतो आणि आदरणिय बाबासाहेब केदार त्यावेळी आमच्या संचालक मंडळामध्ये होते, आणि तेथे कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ 2005-06 मध्ये 100 कोटी रुपयांची एफ.डी. होती मला आश्चर्य वाटत होते की या संस्थेची 100 कोटी रुपयांची एफ.डी. कशी राहु शकते. तर ती एफ.डी करण्यासाठी ज्यावेळी संचालक मंडळाची बैठक झाली त्यावेळेस सर्व बँकर्सला त्यांनी बोलावून घेतले होते. त्यांना सांगितले की, आम्ही एफ.डी. धारक आहे तुमची बॅक किती परसेंट व्याजदर देणार ते म्हणाले की मी 7 परसेंट देतो, दुस-यांना म्हटले तो 7 देत आहे तु सांग किती देतो, तो सांगायचा 7.25 देतो, तिसरा म्हणे 8 परसेंट देतो, असे करता करता 7 पासून एफ.डी. देण्याचा जो आमचा प्रस्ताव होता तो 9 टक्यावर इंम्पोज केला होता. इन्स्टीटयुटसाठी काम करीत असतांना ती संस्था असली पाहिजे, त्या संस्थेच्या संदर्भामध्ये माझे काही उत्तरदायीत्व आहे ही जबाबदारी जो पर्यत आम्ही स्वीकारणार नाही. तो पर्यत अशा प्रकारचे घोटाळे सातत्याने होत

राहणार ते थांबू शकत नाही. कुठलिही चौकशी समिती ते थांबवू शकत नाही. कुठलेही आयुक्त थांबवू शकत नाही, कुठलेही महापौर थांबवू शकत नाही. मा.महापौरजी आज आपण चर्चा करीत असतांना आम्हाला खुप चिंता वाटत होती की आमच्या महानगरपालिकेची बदनामी होत आहे. व्हीजीलन्स आपण आपल्या सत्ताकाळामध्ये निर्माण करण्यामध्ये आपले अपयश झाले हे मी तुम्हाला या ठिकाणी सांगत आहे. की अशाप्रकारचे लिकेजेस, या लिकेजेसच्या माध्यमातून महानगरपालिकेचे आपण येथे आकडे सांगितले 67 लाख, सव्वाकरोड, आणखी काही आकडे सांगितले, जर आपण व्हीजीलन्स व्यवस्था महानगरपालिकेमध्ये उभी केली तर 100 कोटी पेक्षा अधिक रक्कम आपण वाचवु शकतो. मी अनेक उदाहरण देतो. मा.महापौरजी भ्रष्टाचार हा वेगळा विषय आहे. घोटाळा वेगळा विषय आहे आणि इन्स्टीटयुशनल करप्शन वेगळा विषय आहे. मी तुझे काम करुन देतो त्या बदल्यात मला काही तरी दया हा सुध्दा भ्रष्टाचारामध्ये मोडणारा प्रकार आहे. हा जो घोटाळा आहे तो क्रीमीनल माईन्डने तयार केलेली एक साजीश आहे. हे लिकीजेस आहे व्यवस्थेचे त्यामधुन आपण गैरफायदा घेऊन पैसे काढु शकतो, पाच क्रमीनल माईन्डेंड लोकांनी तयार केलेली ही व्यवस्था आहे. तिसरा प्रकार इन्स्टीटयुशल करप्शन, व्यवस्थेमधे असे काही बदल करणे की त्यातून आम्हाला अप्रत्यक्ष मोठया प्रमाणात लाभ मिळु शकेल अशा प्रकारचा सुध्दा नविन प्रकार आता नजीकच्या काळामध्ये सुरु झाला आहे. नजीकच्या म्हणजे तुमच्या सत्ताकाळामध्ये सुरु झाला असे माझे म्हणणे नाही. मा.महापौरजी, खरचं सर्व राजकीय पक्षांना ही व्यवस्था बदलण्याची मनामध्ये इच्छा आहे काय, पावित्र्याचा अहसास करीत आहे यातुन निष्पन्न काहीच होणार नाही म्हणून आता फक्त अनुभूती यावी ऐवढयाच कारणाने मी या ठिकाणी माझे वक्तव्य या ठिकाणी केले, माझी कुठलिही मागणी नाही. याला ससपेन्ड करा, त्याला ससपेन्ड करा, याच्यावर कारवाई करा, मा.न्यायाधीशांच्या माध्यमातून चौकशी करा, ईकडच्या माध्यमातून करा किंवा तिकडच्या माध्यमातून करा, चौकशी करा किंवा करु नका अशी माझी कुठलिही मागणी नाही. मा.महापौरजी, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो, धन्यवाद.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी मला येथे बोलण्याची संधी दिली त्याबद्यल मी आपले धन्यवाद करतो. मा.महापौरजी, मा.पिंटु झलके, मा.विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांच्या स्थगण प्रस्तावावर अनेक लोकांनी अनेक गोष्टी सांगितल्या, प्रफुल्लजींच्या काही मताशी मी पण सहमत आहे. भाषण करुन खरचं कारवाई होणार असेल तर पोटतिळकीने भाषण करण्याचा खरचं फायदा आहे मी सुध्दा सभागृहाचा 2002 पासून ते 2022 पर्यत सदस्य आहे. या सभागृहात अनेक विषयांवर बोलण्याची संधी मिळाली, शिकण्याची संधी मिळाली, अनेक अहवालातून काहीना काही निष्पन्न सुध्दा झाले परंतू महानगरपालिकेच्या इतिहासात एखादया अधिका-यांनी स्वत:ची स्वाक्षरी खोटी आहे म्हणून हे बिल बोगस आहे अशी पोलीस तक्रार करण्याचे पहिले प्रकरण आहे. मा.महापौरजी, चिलकर साहेबांच्या सहीचे काही बिले माझ्याकडे आहे. एका ओरिजनल बिलांवर चिलकर साहेबांच्या चार वेगवेगळया सहया आहेत. मी जेव्हा प्राथमिक चर्चा मा.अकाऊंट ऑफीसर कोल्हे साहेबांशी केली तेव्हा त्यांनी सांगितले की, चिलकर साहेबांच्या ओरिजनल बिलांवरच्या सहया चार वेगवेगळया प्रकारच्या आहेत. मा.महापौरजी, एक पत्र माझ्या हाती लागले आहे. मा.अकाऊंट ऑफीसर साहेबांनी एक पत्र त्यांच्या कॉम्प्युटर मध्ये तयार केले, परंतु याच्यावर सही नाही केली. त्यामुळे हे पत्र त्यांचे आहे असे मी म्हणणार नाही कारण की या पत्रावर कॅफो साहेबांची सही नाही परंतू हे महानगरपालिकेच्या कोणत्या विभागाच्या कोणत्या कॉम्प्युटर मधुन निघाले, हे पत्र माझ्याकडे आहे ते मी पटलावर ठेवतो आहे आपण प्रशासनाला दयावे, हे पत्र मी सचिवांना वाचायला दयायला पाहिजे परंतु ते वाचु नये कारण की याच्यात मा.कोल्हे साहेबांनी जे 12 मुद्ये लिहले आहे. ही माहिती खोटी सुध्दा राहु शकते इतके स्पष्ट मी सांगत आहे. या कोल्हे साहेबांनी जर हे पत्र त्यांनी त्यांच्या कंम्प्युटरवर केले असेल परंतु ते देऊ नसेल शकले याच्यात डॉ.चिलकर, मा.राम जोशी, श्री.भातकुलकर यांच्यावर स्पष्ट आरोप केले आहे. आणि माझ्या माहिती नुसार पोलीस विभागामध्ये जी माहिती घेतली तेव्हा मा.कोल्हे साहेबांचे बयाण हे अर्थवट झाले आहे. आणि त्यांनी सांगितले की

माझ्याजवळ काही ऑडीयो रेकॉर्डींग आहे. मग ती राम जोशी साहेबांची आहे की, भातकुलकरची आहे की चिलकर साहेबांची आहे की दटकेची आहे ही माहिती मी योग्यवेळी देईल अशी माहिती आहे. मा.महापौरजी, ज्या महानगरपालिकेचे कुंपणच जर शेत खायला तयार असेल तर मी सुध्दा मा. प्रफुल्लजी गुडधे यांची जी भावणा आहे किंवा त्यांचा जो विचार आहे मी येथे पोटतिळकीने जे भाषण देतो आहे आहे आणि ही भावना तेव्हाच होऊ शकते की येथे जेव्हा वारंवार वारंवार अशा गोष्टी घडतात. वर्तमानपत्रामध्ये अनेक वेळा लोकप्रतिनिधींवर आरोप होतात मी तुम्हाला उदाहरण सांगतो की 3 लाखांच्या कोटेशन पासूनचे उदाहरण आहे आणि त्यावर 13 प्रशासकीय अधिकारी कशी चर्चा करतात हे मी बघितले आहे. आज तुम्ही आमच्यावर आरोप केले म्हणून आज तूमच्यावर आरोप करावा हा आमचा धंदा नाही आणि ते करणार सुध्दा नाही. परंतु पेपरच्या माध्यमातून सुध्दा आजपर्यंत लायब्रेरी डिपार्टमेंटच्या घोटाळयावर एफ.आय.आर. सुध्दा झालेला नाही. माझी माहिती आहे की, मिश्रीकोटकर मॅडमनी परमीशन मागितली परंतु प्रशासन ती देत नाही. मा.महापौरजी, आपले जन्ममृत्यु विभागाचा विषय आहे. जन्ममृत्यु सर्टीफिकेटचा जो कागद आहे त्या संदर्भात सुध्दा घोटाळा आहे या विभागाचा सुध्दा अजुन पर्यंत एफ.आय.आर. झालेला नाही. मा.महापौरजी, एज्युकेशन डिपार्टमेंटमध्ये 8 असे बिले आहे त्यावर मिश्रीकोटकर मॅडमची सही बोगस आहे. शाळा बंद असतांना शाळेतुन सॅनिटाझर खरेदी करण्याचे बिले आले आहे. तसेच असे एक बिल नाही असे करोडो रुपयांचे बिले आहे. मी मागे आयुक्तांशी जेव्हा बोललो होतो ही प्रक्टीस अनेक वर्षापासून सुरु आहे मी मान्य केले. परंतु ही प्रॅक्टीस अशीच सुरु ठेवायची काय हे काम आता तुमच्या हातात आहे. ज्या विभागाने एफ.आय.आर. केला त्या विभागाचे प्रोव्हीजनचे जे रजिस्टर आहे आणि इतर विभागाचे प्रोव्हीजनचे रजिस्टर बघा तर गेल्या दोन ते तिन महिन्यात या विभागाचे रजिस्टर नविन कोरे करकरीत आहेत. कारण की ते सर्व रिफरनिश केलेले आहे हा माझा आरोप आहे. येथे राठोड नावाचा मानुस आहे तो फारमसीस्ट आहे तो त्या विभागात बसला आहे. भातकुलकर आहे तो त्या विभागात बसला आहे. डॉ.चिलकर साहेबांच्या आधी डॉ.सवई साहेबांचे नाव सुध्दा त्या एफ.आय.आर. मध्ये लिहले आहे त्या एफ.आय.आर. ची प्रत माझ्याकडे आहे. चिलकर साहेब या डिपार्टमेंटचे हेड आहे परंतु आजपर्यंत त्यांचा लॉगइन आयडी आणि पासवर्ड अस्तित्वात नाही. हे खरे आहे काय याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

कार्यकारी अभियंता, आय.टी डिपार्टमेंट (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, डॉ.चिलकर साहब का लॉग इन आय.डी. आयटी डिपार्टमेंट से 17 डिसेंबर, 2021को क्रीयेट हुआ है।

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, डॉ.चिलकर साहब का इस महानगरपालिका मे कब पोस्टींग हुआ।

कार्यकारी अभियंता, आय.टी डिपार्टमेंट (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, डिसेंबर 2020

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, एक साल बाद लॉग इन आय डी और पासवर्ड बनाया गया तो इसका कारण क्या है ? उनको जरुरत नही थी क्या ?

कार्यकारी अभियंता, आय.टी डिपार्टमेंट (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, एच.ओ.डी. अप्लाय करते है लॉग इन आय.डी. और पासवर्ड के लिये लेकीन इनका अप्लीकेशन हमारे डिपार्टमेंट मे आया नही।

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, बॅनर्जी मॅडमनी स्पष्ट उत्तर दिले आहे. वर्षभर चिलकर साहेबांना त्यांचा लॉग इन आय.डी. व पासवर्ड करण्याची गरज भासली नाही. जर हे आरोग्य विभागाचे एच.ओ.डी. आहे आणि हेल्थ ऑफीसर आहे नागपूर महानगरपालिकेचे त्यांच्या माध्यमातून कोव्हीडच्या काळामध्ये औषधांची खरेदी झाली तर त्यांचे ई गर्व्हनन्स करण्याकरीता लॉग इन आय.डी. व पासवर्डची गरज नव्हती काय ? मा.महापौरजी, माझ्या माहिती नुसार डॉ.चिलकर साहेबांनी हा सर्व विषय ते जॉईन झाल्यानंतर लगेच कळला होता परंतु जी प्रॅक्टीस सुरु आहे तीच प्रॅक्टीस सुरु ठेवा, म्हणुन 17 डिसेंबर, 2021 पर्यत लॉग इन आय डी व पासवर्ड क्रीयेट केला गेला नाही. मा.महापौरजी हे प्रकरण जेव्हा उघडकीस आले तेव्हा परम श्रध्देय श्री.भातकुलकर साहेब आपल्या कॅफो साहेबांच्या घरी गेले आणि मी कॅफो साहेबांना धन्यवाद देतो जसे प्रफुल्लजी यांनी चिलकर साहेबांचे धन्यवाद केले तसे मी कॅफो

साहेबांचे करतो, त्यांनी या सर्वांचे रेकॉर्डींग करुन घेतले आणि या बिलांचे ॲडजसमेंट करायला त्यांनी नकार दिला. फक्त त्यांना आपल्या काही वरीष्ठ अधिका-यांनी हा जर एफ.आय.आर. कॅफो साहेबांनी केला असता तर संपुर्ण हेल्थ डिपार्टमेंट, लायब्ररी, एज्युकेशन, जी.ए.डी. या विभागातील अनेक अधिकारी आतमध्ये असते परंतु त्यांना अंधारात ठेऊन आपल्या विभागाच्या काही अंगावर येऊ नये म्हणुन एफ.आय.आर.मा.चिलकर साहेबांनी केला असा माझा स्पष्ट आरोप आहे. मा.महापौरजी, येथे काही कागद मला मिळाले आहे. हे ते बिल जे तयार केले आपल्या डिपार्टमेंटने, ही त्या बिलाची प्रत, या बिलाच्या प्रतवर या सहया आहे. या सहया आणि चिलकर साहेबांच्या ओरीजनल सहयांशी चेक करण्याचा मी प्रयत्न केला, चिलकर साहेबांची एकही सही ओरीजनल सहीशी मिळत नाही. माझे म्हणणे आहे की हे प्रकरण जेव्हा 3 ऑक्टोबरला आपल्या लक्षात आले तर ही सही चिलकर साहेबांची आहे की अजुन कोणी केली आहे हे तपासण्याकरीता जी संविधानिक यंत्रणा आहे यांच्याकडे साधी फाईल पाठविण्याची तरी कोणाची हिम्मत झाली नाही. फॉरनसिक डिपार्टमेंटला जर ही फाईल 3 ऑक्टोबरला गेली असती तर याचा रिपोर्ट आपल्या सर्वासमोर आला असता. परंतु असे राम जोशी  साहेबांना वाटले नाही, ना कॅफो साहेबांना वाटलं, ना भातकुलकर ला वाटलं, या सहया बोगस आहे, या सहया खोटया आहेत हे तपासण्याकरीता आजपर्यत महानगरपालिकेने फॉरेन्सीक डिपार्टमेंट किंवा तत्सम संविधानिक संस्थेला पाठविले नाही. मा.महापौरजी, अकाऊंट डिपार्टमेंटचे जे काम आहे. ऑडीटरचे काम आहे की बिले तपासणे, त्यांच्याकडुन ही चुक 100 टक्के झालेली आहे परंतु स्पेसिफीक सही तपासण्याचे काम कोणाचे आहे याची माहिती जर कॅफो साहेबांनी दिली तर बरे होईल.

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी, जेव्हा बिले विभागात येते तेव्हा प्राथमिक चेकींग करण्याची जबाबदारी ही ऑडीटरची आहे.

प्रविण दटके :- मा.महापौरजी, कॅफो साहेबांना आणखी एक विचारु इच्छितो की, वर्षभर डॉ.चिलकर साहेबांचा आयडी नव्हता तर वर्षभर कोणाच्या आयडी व पासवर्ड मधुन लिगल बिलांचे ई गव्हर्नन्स झालेले आहेत. ई गव्हर्नन्सचे शेवटचे बिल वानखडे नावाच्या कर्मचा-यांनी दिले आहे ही सर्व माहिती माझ्याजवळ आहे. तुमच्याकडे ही माहिती नसेल तर आय.टी. डिपार्टमेंटनी ही माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता, आय.टी. डिपार्टमेंट (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, हेल्थ डिपार्टमेंट के जो बिल है वह डॉ.बहीरवार साहबसे जाते थे।

प्रविण दटके :- मा.महापौरजी, यह जो  बिल है उसका किसने डेटा एंन्ट्री कीया, किसके पासवर्ड से किया और किस एचओडी ने कंन्फर्म किया।

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, ई  गव्हर्नन्सचे जे पोर्टल आहे त्यामध्ये हे बिल  कोणाकडुन रिकमंड केले आहे ते त्यामध्येच असते.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मला आरोग्य विभागाकडुन माहिती पाहिजे की वर्षभर आरोग्य विभागाचे बिले हे भातकुलकर स्टोअर किपर कडे होते ते कुठल्या अधिका-यांच्या लॉग इन आयडी मधुन झाले ऐवढा साधा सोपा प्रश्न आहे.

वैद्यकीय अधिकारी (डॉ.चिलकर) :- मा.महापौरजी, सुनिता शाहु असे त्या कर्मचा-यांचे नाव आहे कंन्फर्म मी एकदा तपासून सांगतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, एकदा परत तपासून सांगा माझ्याकडे ही माहिती आहे. वर्षभर आपल्या हाताखालून बिले गेले आहे. आपली सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे. मा.महापौरजी यांच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो की मा.महापौरजी हे फक्त हेल्थ डिपार्टमेंट मध्ये सुरू आहे असे नाही पी.डब्लु.डी. डिपार्टमेंटमध्ये ई गव्हर्नन्स करणारे जे कर्मचारी आहे ते गांधीबाग झोनमधले बिल सिव्हील लाईन्समधुन ई गव्हर्नन्स होते, सिव्हील लाईनचे बिल लकडगंज मधे ई गव्हर्नन्स होते, ज्याला वाटते तो तो तसा तसा ई गव्हर्नन्स करतो. ही ओटीपीची पध्दत

जुनीच आहे ही काही नविन नाही. पण आपल्याकडे ऐवढा बिनधास्त कारभार चालतो. काल मी पोलीस विभागामध्ये गेलो होतो आपला लॉगइन पासवर्ड दुस-यांना देणे हा संविधानिक गुन्हाआहे. आणि हा गुन्हा कुठल्या कलमा अंतर्गत आहे याचे परिपत्रक काल मी गुन्हे शाखा आहे तेथुन मी मिळवले आहे. आणि या महानगरपालिकेत अनेक एक्झीकेटीव्ह इंजिनिअर, अनेक बिल क्लर्क, अनेक एच.ओ.डी. यांचे लॉग इन आय.डी. व पासवर्ड आपल्या येथे कॉंट्रॅक्ट बेसीसवर असलेल्या कर्मचा-यांच्या हातात आहे. म्हणुन मिना साहेबांकडे म.न.पा. चा जो कर्मचारी आहे श्री.गोखे नावाचा त्याने लायब्ररी डिपार्टमेंटच्या बिल ई गव्हर्नन्स केले आहे त्याच्यावर अजुनपर्यत कुठलीही कारवाई केलेली नाही. असे अनेक प्रकरण आहे की ते सभागृहात आलेले नाही. माझी आपणांस विनंती आहे की, सभागृहातील पाच नगरसेवक त्या समितीला अधिकार देऊन त्यामध्ये एक निवृत्त न्यायधीश त्या समितीमध्ये असावा त्या पुढच्या सभागृहात हा विषय सभागृहाच्या पटलावर असावा तो पर्यत संबंधित अधिकारी असतील त्यामध्ये अति.आयुक्त राम जोशी साहेब असतील, डॉ.चिलकर साहेब असतील, कॅफो साहेब असतील, ऑडीटर असतील, धामेचा साहेब असतील, ज्यांचे ज्यांचे नावे आहे त्या सर्व अधिका-यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, माझे म्हणणे नाही की यांना निलंबित करावे परंतू सक्तीच्या रजेवर पाठवावे कारण की, ऑक्टोबर महिन्यापासून तर डिसेंबर महिन्यांपर्यत हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाला. या प्रकरणात काही लोकप्रतिनिधींवर चुकीच्या पध्दतीने आरोप करण्यात आला मी त्यांचे नावे मी घेत नाही. आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आरोप सुध्दा चर्चेला आले. जे आतमध्ये गेले आहे त्यांनी सुध्दा कॅफो साहेबांना काही माहिती दिली आहे त्यामुळे या संबंधी ज्या ज्या अधिका-यांवर दोषारोप आहे आणि विशेषत: हेल्थ विभाग या विभागातील जे अधिकारी आहे. त्यामध्ये राठोड, भातकुलकर, राम जोशी साहेब, चिलकर साहेब जे जे कोणी असतील या सर्वांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, रिपोर्ट येईपर्यत यांनी आपल्या कार्यालयात येऊ नये असा आदेश दयावा, कारण की आपल्या येथे अति.चार्ज देण्याची प्रचंड पध्दत आहे. कारण की प्रशासनिक काम करण्यास प्रचंड अडचण येत आहे. जर यांची चौकशी समिती असेल तर ती चौकशी वांझोटी असेल माझा तरी या समितीवर विश्वास नाही. त्यामुळे मी सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो की सभागृहाचे पाच सर्वपक्षीय सदस्य, निवृत्त न्यायधीशांनी पुढच्या 15 ते 20 दिवसात चौकशी करावी, चौकशी होईपर्यत जे जे नावे यामध्ये आहे त्या सर्वांना आपण सक्तीच्या रजेवर पाठवावे ही विनंती करतो

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या घोटाळा संबंधित जो स्थगण प्रस्ताव श्री.पिंटुजी झलके यांनी उपस्थित केला त्यावर मोठया प्रमाणामध्ये सर्व सदस्यांनी भाष्य केले. श्री.संदीप सहारे यांनी त्याचा पुर्ण आरखडा सांगितला की काय किंमत असेल व कोणत्या किंमतीमध्ये आपण विकत घेतले याचा पुर्ण माहितींचे वाचन येथे केले आहे. केंद्र सरकारचे एक पोर्टल आहे. त्या मध्ये सर्व रेट दिले आहे. परंतु आपल्या येथे एक काम करण्याची जी पध्दत आहे त्यामुळे महानगरपालिकेमध्ये सदस्य काय करतात आताच प्रफुल्लजी येथे बोलले आता तीन लक्ष रुपयांचा विषय निघाला की त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण हा वेगळा असतो. 1985 मध्ये जेव्हा आम्ही निवडूण आलो तेव्हा 50 हजार रुपये मिळायचे आणि 3000 रुपयांची फाईल रहायची आता जी 3 लक्ष रुपयांची आहे. त्यावेळी माझ्यासोबत प्रविणजींचे वडील श्री.प्रभाकरराव दटके, प्रफुल्लजींचे वडील गुडधे पाटील साहेब, अटल बहादुर सिंग होते तो कार्यकाळ वेगळा होता. एक जर डब्लु.बी.एम. रोड बनवायचा असेल मा.महापौरजी तर त्यामध्ये 3000 रुपयांचे पत्र घेण्यासाठी अनेक कॉंट्रॅक्टर आमच्याकडे सकाळ पासून बसले असायचे, या पत्रामध्ये नाव असल्यामुळे त्या कॉंट्रॅक्टरला घरी या लागत असे परंतू पुर्वी मात्र कॉंट्रॅक्टर यायचे आणि त्या 3000 हजार रुपयांच्या रोडची क्वॉलिटी चांगली होती. त्यावेळी सखाराम चौधरी, गोमाजी जाधव, मोठमोठी मंडळी श्री.देवेंद्र फडणवीस यांचे वडील त्या काळामध्ये सेवेच्या भावनेतून काम करण्याची लोकांची सवय होती. त्यावेळी रजिस्टरवर प्रोव्हीजन मिळायचे, परंतु जशी जशी पारदर्शकता आली तस तसं याच्यामध्ये भानगडी निर्माण झाल्या,आरोग्य विभागामध्ये रॉड नसतात, नगरसेवकांकडे संबधित लोक येतात रॉड संपले रॉडचे एक पत्र देऊन दया, आम्ही

स्टोअरला पत्र देतो की की या भागामध्ये रॉड संपलेले आहे तर ताबडतोब सफाई कामगारांना रॉड उपलब्ध करुन देण्यात यावे. आता ते रॉड कोणाला दिले, किती वापरले माहिती नाही. पुर्वीच्या काळामध्ये आम्हाला औषधे मिळत होते.मी तर फार कमी औषध घेतले आहे. कोव्हीडच्या काळातील बिले सुध्दा मी सबमिट केलेले नाही ते तसेच पेंडींग पडलेले आहे. महानगरपालिकेकडून काही मिळावे ही अपेक्षा फार लोकांची नव्हती परंतु आपल्या विभागातून सर्व भानगडी निर्माण होतील, यामध्ये बोगस बिले बनवून एक कॉट्रॅक्टर गेल्या 40 वर्षापासून महानगरपालिकेची सातत्याने फसवणूक करण्याचे काम तो करतो आहे आणि त्याच्याकडे कोणाचे लक्ष नाही. प्रविणजी बोलले की, प्रफुल्लजी यांनी डॉ.चिलकर यांचे अभिनंदन केले, मी कॅफोचे अभिनंदन करतो, परंतु यामध्ये ज्यांनी निश्चीत चांगले काम केले असेल आम्ही निश्चितपणे त्यांचे अभिनंदन करतो परंतू ज्यांच्यामुळे हा घोटाळा समोर आला त्याची चौकशी पोलिस विभागामार्फत सुरु आहे. मी मा.आयुक्तांना धन्यवाद देतो की त्यांनी या चौकशीचे आरोप पत्र दाखल करुन ज्यांच्यावर आरोप दाखल झाला आहे तो फार छोटे कर्मचारी आहे ते दोषी आहे का हे मी नाही सांगणार, ते निर्दोष आहे का हे मी नाही म्हणणार, याच्यामध्ये जो पर्यत एच.ओ.डी. आणि मोठया लोकांचे संगणमत होत नाही. तो पर्यत कुठलाही घोटाळा होत नाही यामध्ये ज्यांच्या ज्यांच्या स्वाक्षरी असतील त्यांची चौकशी करा, मी विभागामध्ये जाऊन सर्व माहिती घेतली, महानगरपालिका जेव्हापासून निर्माण झाले तेव्हापासून स्टोअर विभाग आणि आरोग्य विभागात काम सुरु आहे परंतु शिक्षण विभागामध्ये, लायब्ररी विभागामध्ये सर्वीकडे सातत्याने जे सुरु आहे या महानगरपालिकेमध्ये काय चालले आहे आपण आता दीड ते दोन वर्षापुर्वी आलात परंतु कोरोनाच्या काळात भ्रष्टाचार झाला त्यामध्ये जी खरेदी झाली त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असे वर्तमानपत्रामध्ये मी वाचले, आपल्या येथे हॉस्पीटल तयार करण्यात आले, त्याचे बेड कुठे आहे, त्याचे साहीत्य कुठे आहे आणि तो दवाखाना कुठे आहे. या नागपूर शहरामध्ये कोव्हीड या महाभयंकर परिस्थितीमध्ये आम्ही डोळयाच्या नजरेच्या समोर जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी, आणि आमच्या प्रभागातील लोकांना जातांना आम्ही बघितले, लोकांवर उपासमारीची वेळ आली, शासनाने लोकप्रतिनिधींना मदत केली, कोव्हीडचा काळ संपला आणि कोव्हीडच्या काळामध्ये नागपूर शहरामध्ये कोरोडो रुपयांची जी विकासाची कामे होती ती विकासाचे कामे पैसे नसल्याचे कारण सांगून बंद करण्यात आले, मी मा.आयुक्तांना धन्यवाद देतो त्यांनी नागपूर शहरातील जी बंद झालेली कामे होती ती सुरु करण्यासाठी त्यांनी बजेटमध्ये तरतुद करुन थोडया का प्रमाणात होईना परंतू ते कामे करण्याचा मानस त्यांनी दाखवला. महानगरपालिकेचे हे मावळते वर्ष आहे नविन वर्षामध्ये निवडणुका होणार आहे. आणि महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचार आणि घोटाळा झाला असा वर्तमानपत्रामधुन विषय आला, स्टेशनरी घोटाळा, लायब्ररी घोटाळा, आरोग्य घोटाळा, आता औषध कोण घेते, कोणाला मिळते, हॉस्पीटलची काय हालत आहे हे सर्व कोणी बघत नाही आणि ज्या प्रशासनावर आमचा विश्वास होता, मा.महापौरजी, व्यक्तीश: फार तत्ज्ञ आहे, सुज्ञ आहे आणि त्यांचा पारदर्शक असा व्यवहार सर्वांशी असतो त्यामुळे मी महापौंराचे अभिनंदन तर आपण करुच परंतु त्यांना सुध्दा असे होईल असे माहिती नव्हते परंतु हे घडले आहे आणि असे महानगरपालिकेमध्ये होऊ शकत नाही परंतु हे घडले आहे आणि एखादया छोटयाश्या कर्मचा-यांचे किंवा व्यक्तींचे काम घेऊन गेलो तर काम करण्यासाठी अधिकारी मागे पुढे होतात. आम्ही एखादया बिल्डींग विभागामध्ये गेलो बिल्डींग प्लॅनमध्ये फार कमी आम्हाला पडते परंतु ए.डी.टी.पी. मध्ये सुध्दा काम करण्यासाठी फार जिनेवर चढावे लागते परंतू या महानगरपालिकेत ऐवढा मोठा भ्रष्टाचार, ऐवढा मोठा घोटाळा आणि यावर कोणाचेही लक्ष नाही ही मोठी शोकांतिका आहे. सर्वांचे लक्ष हे जनप्रतिनिधींकडे असते परंतू या ठिकाणी जे उंदीराचे काम करतात उंदीर म्हणुन पुर्ण महानगरपालिकेला पोखरण्याचे काम केले आहे. नगरसेवक काम काही करीत नाही कुठेतरी कॉट्रॅक्टर येतो आणि तो काम घेतो आणि त्यांच्या कामांची व बिलांची तपासणी सुध्दा संबंधित विभाग करतो. नगरसेवक नाही करत. नगरसेवकांचे काम फक्त सुचविण्याचे आहे. नगरसेवक जे प्रस्ताव देतात त्यामध्ये या ठिकाणी हे हे काम करण्यात यावे, आता ते काम किती रुपयांचे झाले, कसे झाले त्याची

चौकशी करणे,आणि बिल सादर करणे हे प्रशासनाचे काम आहे. त्याच्यामध्ये कुठल्याही नगरसेवकांचा काही विषय आहे असे मला वाटत नाही. परंतू ते ही काम करण्यासाठी आम्हाला दोन ते तीन वर्षामध्ये फार अडचणी आल्यात, ही सर्व महानगरपालिका पोखरुन टाकली आणि तो म्हणतो माझी सही नाही, ही आय.डी. माझी नाही, ओटीपी ची पध्दत आमच्या काळामध्ये नव्हती. मला तर हे सुध्दा माहिती नव्हते की बीओटी काय आहे कशाची बोओटी आहे. म्हणजे सिस्टम बदलले आणि पारदर्शीपणा आल्यानंतर सुध्दा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो तर प्रशासन झोपलेले आहे काय, याला जबाबदार कोण आहे. या ठिकाणी ज्या उंदीराने पोखरले त्यासाठी आम्हाला मांजरेची गरज आहे. आणि ती मांजर जो पर्यत त्या उंदीरावर झडप घेणार नाही तो पर्यत झालेला भ्रष्टाचार हा निघणार नाही. आणि म्हणून या ठिकाणी सांगण्यात आले की चौकशी ही निवृत्त न्यायधीशा मार्फत करा, सभागृहाची समिती तयार करा, आणि जो भ्रष्टाचार झालेला आहे शेवटी हा पैसा महानगरपालिकेचा आहे, हा पैसा जनतेचा पैसा आहे ज्या प्रमाणे भारताची लोकसभा, राज्याची विधानसभा, हे एक पवित्र भुमी आहे त्या ठिकाणी लोकांचे कल्याणाच्या विषय घेऊन कायदे तयार होतात, लोक हिताच्या दृष्टीने त्या ठिकाणी अनेक निर्णय होतात याही महानगरपालिकेमध्ये अनेक लोकहिताचे निर्णय झालेले आहेत आणि त्या लोकहिताच्या निर्णयाला सभागृह साक्षी आहे त्यामुळे या सभागृहामध्ये जर कुठला घोटाळा झाला असेल किंवा या महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचार झालेला असेल तर त्याची निश्चितपणाने चौकशी करावी, कुठल्याही दोषी व्यक्तीला सोडण्याचे काम होऊ नये, या महानगरपालिकेच्या सभागृहाची एक समिती तयार करुन या समिती जर सभागृहाचे अधिकार असतील तर त्या अधिकाराचा वापर करुन आपण हा भ्रष्टाचार कायमचा संपवावा  त्यासाठी जर काही कायदे तयार करावे लागत असतील तर तसे कायदे तयार करावे, माझी मा.आयुक्तांना विनंती आहे आयुक्त चांगले आहे मा.आयुक्तांची काम करण्याची पध्दत व्यवस्थित आहे परंतू यामध्ये त्यांनी मोठी कारवाई करुन यानंतर कोणी भ्रष्टाचार करु शकणार नाही मग ते तीन लक्ष रुपयांचा असो की 30 लक्ष रुपयांचा असो  या संदर्भात सभागृहामध्ये कायदे तयार करावे, आणि दोषी व्यक्तीला या ठिकाणी सजा मिळाली पाहिजे, अशी मी आपल्या मार्फत विनंती करतो, धन्यवाद.

श्री.अविनाश ठाकरे :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय आयुक्त, सन्माननिय उपमहापौरीजी, सन्माननिय सदन, उपस्थित सर्व अधिकारी वर्ग माजी स्थायी समिती अध्यक्ष विजयजी झलके आणि मा.विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी स्थगण प्रस्ताव मांडलेला आहे आणि तिन ते चार तासापासून यावर चर्चा सुरु आहे. मी चर्चेमध्ये सहभागी होण्यापूर्वी मला प्रशासनाला एक प्रश्न विचारायचा आहे आणि त्यानंतर मी चर्चेमध्ये सहभागी होऊ इच्छितो. प्रशासनाच्या निवेदनामधून जी गोष्ट समोर आली की 41 फाईल मधून 67 लक्ष रुपयांचे बिल  पेमेंट केले. या 41 फाईल आहे  यामध्ये आर.सी. कॉट्रॅक्टर आहे की कोटेशन मधील किती फाईल आहे याची माहिती प्रशासनाकडून दयावी,

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) : - मा.महापौरजी, 41 प्रकरण असे आहे की त्यांनी बिल व्हाऊचर आहे. त्यापैकी केवळ  35 फाईल सापडले आहे. त्या बिलांमधून लक्षात येत नाही आहे की कुठे कोटेशन आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे केवळ 4 कोटेशनचे आहे उर्वरीत सर्व आर.सी. कॉट्रॅक्ट आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, राम जोशी साहेबांच्या अनेक गोष्टी लक्षात येत नाही असे अनेक निवेदनामधून दिसुन आले. चौकशी समिती स्थापन होऊन 7 दिवसाचा वेळ झाला आहे परंतु अजुन पर्यत त्यांच्या लक्षात येत नाही हे स्पष्ट होत आहे या ठिकाणी, मा.महापौरजी, महानगरपालिका हा शब्द गेल्या अनेक वर्षापासून आपण चर्चेमध्ये आणतो आणि वर्तमानपत्रामध्ये येते की महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. तर महानगरपालिका या शब्दावर अनेक वेळा या सभागृहामध्ये चर्चा झाली. महानगरपालिका या शब्दाचा अर्थ जाणुन घ्यायचा असेल तर या सभागृहातील प्रत्येक सदस्य सभागृहात गेला आणि प्रत्येक वेळी महानगरपालिका हा शब्द आला की इकडचे लोक म्हणतात आम्ही आणि तिकडचे लोक म्हणतात आम्ही या पर्टीकुलर केसमध्ये

महानगरपालिका या शब्दाची व्याख्या केली  आहे आणि प्रशासन या ठिकाणी सातत्याने सांगत आले आहे की महानगरपालिका म्हणजे प्रशासन या पर्टीकुलर केसमध्ये जी बदनामी नागपूर शहरामध्ये नागपूर महानगरपालिकेची होत आहे त्याचे कारण असेल तर ते महानगरपालिकेचे प्रशासन आहे हे स्पष्टपणे आतापर्यंत झालेल्या चर्चेतून स्पष्टपणे निदर्शनास येत आहे. सर्व सन्माननिय सदस्यांनी अनेक पैलुवर चर्चा केली आहे. अनेक तथ्य समोर आले आहे अनेक गोष्टींचा या ठिकाणी उलगडा झालेला आहे आणि एक गोष्ट त्यामधुन निश्चितपणे समोर आलेली आहे की, सकृत दर्शनी जे अधिकारी या प्रकरणामध्ये संबंधित आहे ते सर्व अधिकारी त्या चौकशी समितीमध्ये आहे आणि त्यामुळे प्रशासनाची चौकशी समिती योग्य की स्थायी समितीची चौकशी समिती योग्य, महानगरपालिका या शब्दामध्ये सर्वच आलेले आहे प्रशासनाला वाटते आम्ही नगरसेवक म्हणजे कोण तर एक विश्वस्त मंडळ या देशामध्ये थ्री टायर सिस्टीम लागू केलेली आहे ती म्हणजे लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व संस्थामध्ये जे जनप्रतिनिधी  जे आहे ते विश्वस्त आहे. ते विश्वस्त का आहे प्रशासनाचे जे अधिकारी आहे किंवा कर्मचारी आहे नागरिकांच्या सेवेकरीता नियुक्त केलेले आहे ते नागरिकांना त्या परीने सेवा देतात का, किंवा त्या तत्परतेने काम करतात काय त्यांच्यावर वॉच ठेवण्यासाठी विश्वस्त मंडळ आहे परंतु आतापर्यंतच्या सभागृहामध्ये असे लक्षात आलेले आहे या विश्वस्त मंडळाचे मत नाकारुन प्रत्येक वेळी दोषारोपन करण्यात आलेला आहे आणि त्यातच हा परिपाठ आहे की या सभागृहामध्ये जे नागपूर शहराचे कायदेमंडळ आहे त्या सभागृहामध्ये या विश्वस्तांना अशा विषयावर चर्चा करावी लागून राहिली ज्याची गरज या सभागृहामध्ये नव्हती तरी सुध्दा यावर चर्चा करावी लागत आहे. आणि आताच माझे मित्र श्री.प्रविणजी दटके यांनी मुद्या मांडला आणि आभा ताईंनी सुध्दा मुद्या मांडला आपने जो बात कही थी उसके उपर मै स्पष्टीकरण देना चाहुंगा उस सभागृह मे मैने समिती बनाओ ऐंसा कहा था। उसमे एक कलेक्टर ऑफीस की समिती है कोनसी मिटींग कोनसे कोनसे तारीख को लिये थे उसके उपर चर्चा की थी और चर्चा के बाद मैने कहा था की तत्कालीन आयुक्त के कार्यकाल मे अभी के आयुक्त इस तरीके का मैने वक्तव्य किया था तांत्रिक दृष्या आयुक्त के उपर आरोप करना नही चाहिये क्यौंकी वह आयुक्त के कार्यकाल का विषय था, चर्चा शुरु होती गरीबों की रेखापर और खतम होती है रेखा के गरीबीपर। मा.महापौरजी या सर्व प्रकरणामध्ये सर्वांनी सर्व गोष्टी मांडल्या आहे परंतु प्रशासनाने जे निवेदन या ठिकाणी केले आहे ते निवेदन इतके तकलादु होते आणि त्या निवेदनामध्ये अनेक गोष्टींचे त्यांनी निवेदन करण्याचे टाळले, त्यामध्ये एक सिस्टीम आहे पहिले वर्कऑर्डर, परचेस बिल, डिलीव्हरी सिस्टीम, स्टोरेज त्यानंतर बिल सबमिशन त्यानंतर पेमेंट सबमिशन ही एक कंम्प्लीट सिस्टीम आहे. आणि मग 35 फाईलमध्ये समोरच्यांनी माल सप्लाय केला तो मिळाला की नाही त्याचा स्टोअर रेकॉर्ड तेथे स्टोअर रेकॉर्डची कॉपी लागली आहे की नाही, त्यानंतर त्याचे प्रोव्हीजन झाले की नाही हे तपासण्याचे काम, त्यानंतर ई गव्हर्नन्स झाले की नाही किंवा डिजीटल सही तपासण्याचे काम म्हणजे सरकारी कार्यालयामध्ये 21 टेबल वरुन फाईल फिरत असेल तर 21 टेबल पैकी एकाही टेबल वाल्यांना असे वाटले नाही की एक वर्षापासून अशाप्रकारच्या फाईल या प्रकरणामध्ये फिरत आहे. इतका निग्लीजन्स,मा.विरोधी पक्ष नेता यांनी कायदे करण्याचे सांगितले आहे परंतु ते करण्याची बिलकुल गरज नाही त्याचे कारण असे आहे की महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये असे म्हटले आहे की जे जे वित्तीय अधिकार कॅफो किंवा प्रशासन वापरत असेल किंवा पेमेंट जरी केले असेल त्याचा ऑडीट रिपोर्ट प्रत्येक आठवडयाला स्थायी समितीच्या पटलावर ठेवणे आवश्यक आहे. गेल्या कित्येक वर्षापासून  हा रिपोर्ट सुध्दा स्थायी समितीच्या पटलावर ठेवला जात नाही कारण आमचा ईगो आडवा येतो. आम्ही प्रशासन, आम्ही मोठे आमची जबाबदारी नाही. प्रशासनाची जबाबदारीच आहे आम्हाला सांगण्याची आणि आमची जबाबदारी आहे तुम्हाला विचारायची मग आम्ही तुम्हाला विचारल्यावर तुम्हाला सांगायला काय अडचण आहे. जे काही संविधानाने या ठिकाणी सांगितले आहे त्यामध्ये म्हटले आहे दर महिन्याला ऑडीट रिपोर्ट स्थायी समिती समोर ठेवण्यात यावा. मघाशी मा.सदस्य श्री.कमलेश चौधरी यांनी म्हटले होते स्थायी समितीके पहले सभा मे स्थायी सारे सदस्य मिलकर

के स्थायी समिती के सभापती को अपने अधिकारी देते है स्थायी समिती का अधिकार है प्रोव्हीजन बाटना वह अधिकार मा.अध्यक्षको दिऐ जाते है I

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, मी जे म्हटले होते त्यामध्ये मा.सत्तापक्ष नेता श्री.अविनाश ठाकरे यांची थोडीशी दिशाभुल होत आहे. 25 लक्ष रुपयांपेक्षा कमीचे जे अधिकार आहे त्या संदर्भात जी तरतुद आहे त्या संदर्भात खुलासा करण्यात यावा, ती जी तरतुद केलेली आहे ती चुकीची आहे काय ?

महापौर :- (बेल) विषयावर चर्चा करावी.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, 2017 चा रेट कॉट्रॅक्टवर चर्चा झाली हे सुध्दा चौकशीमध्ये आले पाहिजे की आपण जे प्रशासनावर भ्रष्टाचाराचे आरोप लावतो आहे. मार्केट रेटपेक्षा 100 ते 200 रुपयांनी महाग हा सुध्दा चौकशी समितीचा विषय आहे. यामध्ये महाराष्ट्र गर्व्हनमेंट आणि सेंट्रल गव्हर्नमेंट असो महाराष्ट्र गव्हर्नमेंटने तर जी.एम. नावाचे पोर्टल उघडले आहे ज्याच्यावर जाऊन रेट सुध्दा पाहु शकतात आणि इलेक्ट्रीक वस्तु असो किंवा स्टेशनरी असो याचे रेट फ्लक्चुअेट आहे तर आपण 3-3 वर्षाचे कॉट्रॅक्ट करतो ही कोणाची जबाबदारी आहे तर ती प्रशासनाची जबाबदारी आहे आणि या सर्व बार्बीमध्ये प्रशासन चुकलेले आहे. मी या विषयावर जास्त चर्चा करणार नाही कारण की सर्व नगरसेवकांनी यावर आपले मत नोंदविले आहे माझी फक्त सभागृतील मानस लक्षात घेऊन आपल्याला एकच विनंती आहे की या सभागृहाच्या जेष्ठ नगरसेवकांची एक समिती गठीत करावी माझे तर यावर जाऊन अजुन एक म्हणणे आहे सभागृहाच्या माध्यमातून ते सुटलेले आहे मिना साहेबांना सुध्दा त्या समितीमध्ये घ्यावे आणि निवृत्त न्यायधीशांना सुध्दा त्या समितीमध्ये घ्यावे आणि या सर्व प्रकरणांची चौकशी करावी, आणि मा.श्री.प्रविणजी दटके यांनी जे म्हटलेले आहे की या प्रकरणाशी जे जे अधिकारी संबंधित असेल त्या समितीचा अहवाल येईपर्यत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, नाहीतर या समितीला अर्थ राहणार नाही पोलीसांची जी चौकशी सुरु आहे परंतु पोलीसांना माहिती कोण देत आहे आणि यांच्याच बयानावर हे प्रकरण समोर जाणार आहे त्यामुळे या सर्व अधिका-यांना सक्तीच्या रजेवर पाठवून समिती गठीत करावी त्याप्रमाणे आपण निर्देश दयावे असे मी आपणास विनंती करतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मी माफी मागतो की सत्तापक्ष नेता बोलल्यानंतर बोलत आहे दिनांक 20-02-2021 ला कॅफो साहेबांचे एक पत्र आहे की सर्व विभाग प्रमुखांनी आपले स्पेसिफीक सही आपआपल्या डिपार्टमेंट मार्फत येथे जमा करावे, माझी कॅफो साहेबांना विनंती आहे आपल्या मार्फत कुठल्या कुठल्या विभागाने आपल्या सहया जमा केलेल्या आहे याचा उहापोह या ठिकाणी करावा.

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी 8 ते 10 अधिका-यांच्या आलेल्या आहेत.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आरोग्य अधिका-यांची स्पेसीफीक सही आलेली आहे काय ?

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी, दोन ते तिन दिवसापुर्वी आलेली आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, वर्षभरा आधीचे हे पत्र आहे आणि स्पेसिफीक सही केव्हा आली तर दोन ते तीन दिवसापुर्वी ही गोष्ट सुध्दा आपण रेकॉर्डवर घ्यावी, कॅफोनी पत्रामध्ये स्पष्ट लिहले आहे वेळोवेळी अधिकारी बदलले तर डिपार्टमेंटने सलग तिस-या दिवशी सही दिली पाहिजे. हेल्थ डिपार्टमेंटच्या एच.ओ.डी. ने वर्षभर झाले तरी स्पेसिफीक सही दिली नाही. त्यामुळे हा सुध्दा विषय रेकॉर्डवर घ्यावा आणि या सर्व बाबींची आपण चौकशी करावी.

महापौर :- सभागृह मे पिंटुजी झलके और विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे इन्होने संयुक्त स्थगण प्रस्ताव था सभागृह के समस्त सदस्योंने उसपर सखोल चर्चा की, स्थगण प्रस्ताव के बाद प्रशासन को यह अधिकार है की प्रशासन अपना पक्ष जो जो विषय चर्चा के लिये आये है उसपर प्रशासन अपना वक्तव्य करे मै मा.आयुक्तजी से

निवेदन करुंगा की स्थगण प्रस्ताव के उपर वह निवेदन करे।

निगम आयुक्त :- मा.महापौर महोदय, मा.सभागृह, या स्थगण प्रस्तावाच्या अनुषंगाने स्टेशनरी घोटाळा झाला आहे त्या संदर्भात मी निवेदन करु इच्छितो, या ठिकाणी सर्व पक्षाचे सर्व सिनिअर नगरसेवकांनी त्यांचे त्यांचे मत नोंदविले आहे. परंतु एक गोष्ट प्रत्येकाने समजुन घेणे आवश्यक आहे की जी काही घटना घडली आहे ती आज घडलेली आहे असा मुद्दा नाही. पहिले समजून घेतले पाहिजे की विषय काय आहे. तुम्ही फाईल बघितली नसल्यामुळे विषय आपल्या लक्षात आला नसेल, त्यामध्ये त्यांनी जी काही प्रोसेस केली आहे ती म्हणजे वर्कऑर्डर पासून तर ई गर्व्हनन्स पोर्टलमध्ये बिल जनरेट करण्यापासून तर खोटी सही करुन एक प्रकारची चिटींग केलेली आहे. ही चिटींग करीत असतांना सिस्टीमचा त्याने फायदा करुन घेतला आहे आणि अशा प्रकारचा प्रश्न निर्माण केला आहे. एखादा बाहेचा व्यक्ती किंवा कॉट्रॅक्टर सिस्टीमच्या सिस्टीममध्ये असलेल्या व्यक्तीचा फायदा करुन घेत आहे. सिस्टीमध्ये असलेल्या व्यक्तीना विश्वासात घेऊन ते होऊच शकत नाही. यामध्ये सर्वात महत्वाचे असे आहे की जे काही झाले आहे ते कोरोनाच्या काळामध्ये झालेले आहे असा मुद्दा नाही ते 10 ते 15 वर्ष किंवा त्याच्या आधीपासून झालेले आहे. अशा प्रकारचे बिल बनवणे, मी कोणाचीही बाजू घेत नाही हे सर्वप्रथम आपणांस सांगतो. समजा डॉ.चिलकर यांनी हा मुद्दा कोणाच्याही लक्षात आणुन दिले नसते तर अशाच प्रकारे चालले असते कदाचित पुढच्या चार ते पाच महिन्यानंतर लक्षात आले असते परंतु त्यांनी आपल्याला सांगितले की कशाप्रकारे त्यांनी ॲडमिनीस्ट्रेटीव्ह अप्रुव्हल वापरले हा सर्व चौकशीचा भाग आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा आहे की हे सर्व निदर्शनास आल्यानंतर आपण केव्हाही कोणाला वाचविण्याचा प्रयत्न केलेला नाही आणि वाचविणार सुध्दा नाही. चुक लक्षात आणुन दिल्यानंतर त्यांनी तातडीने आपण त्याला मान्यता दिलेली नाही. त्यांनी स्वत: कबुल करुन घेतले आहे की चिटींग केली आहे. हे खुप वर्षानुवर्ष होत आहे  आणि तो कॉट्रॅक्टर येथे 30 ते 40 वर्षापासून कॉट्रॅक्टर आहे. आणि त्यामध्ये पाच ते सहा कंपनी त्यांच्या नातेवाईकांनी तयार केली आहे ते लक्षात आल्यानंतर आपण तातडीने त्यांना ब्लॅक लिस्ट केले त्यांच्यावर गुन्हा दाखल केले, जे काही आपल्या प्रथम दर्शनी लक्षात आले त्यांच्यावर आपण डी.ई.बसविली आहे. निलंबित केले आहे. येथे चर्चा सुरु असतांना फक्त एकाच गोष्टीवर भर देण्यात आला आहे की ई गव्हर्नन्स पोर्टल तपासले नव्हते काय, हा सुध्दा एक पॉइंट आहे. परंतु लार्जर पॉइंट काय आहे. लार्जर पॉइंट असा आहे की संबंधित व्यक्ती बोगस डॉक्युमेंट तयार केले आहे आणि ते स्वत: त्याने कबुल केले आहे त्यानंतर त्याने चेक जमा केले आहे. त्यानंतर प्रशासनातील कर्मचा-यांनी जे काही तपासयाला पाहिजे होते त्यामध्ये जे बेसिक गोष्ट आहे त्यामध्ये एल.एफ.एम.एस. एक ॲक्टीव्हीटी आहे आणि ई गव्हर्नन्स अशी एक दुसरी आहे. त्यावर नंबर बरोबर आहे आहे ही तिसरे आपण या ठिकाणी आयसोलेटेड मुद्दा पकडतो आणि कोणाला तरी टारगेट करण्याचा आपण विचार करतो किंवा वाचविण्याचा प्रयत्न करतो आणि विषयाला कुठेतरी डायव्हर्ट करतो. माझे या ठिकाणी म्हणणे आहे की, या विषयाचा तपास सुरु आहे याकरीता मी सुध्दा प्रयत्न केले आहे. यामध्ये आम्हाला शंका होती की फक्त आरोग्य विभागाच्या संदर्भात या ठिकाणी प्रत्येक व्यक्ती फाईल घेऊन फिरतात त्याच्यामुळे सिस्टीम कशा पध्दतीने फोलोअप करायची आहे. एखादया व्यक्तीला दोषी धरणे चुकीचे ठरेल त्यापेक्षा आपला प्रयत्न असा राहील की या प्रकरणाची डिटेल चौकशी झाली पाहिजे, सभागृहाचे म्हणणे आहे की प्रशासनाने तयार केलेली समिती आणि सभागृहाने तयार केलेली समिती योग्य याबद्यल शंका आहे त्यामुळे संदीप सहारे यांनी सागितल्याप्रमाणे किंवा स्थायी समिती सभापती यांनी सांगितल्याप्रमाणे निवृत्त न्यायधिशांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार केली पाहिजे 15 दिवसात यामध्ये आऊटपुट निघणार नाही हे मी आताच सांगतो यामध्ये डेप्थ फार मोठे आहे. यामध्ये कोणत्या वर्षापासून कोणत्या वर्षापर्यत केले पाहिजे या करीता कालावधी निश्चित करावा लागेल, कदाचित  चिलकर साहेबांची सही, उदया माझी सही सुध्दा करु शकेल आपण सुरुवात केली आहे तीन लक्ष रुपयांचे किती बिले निघाले आहे. त्यामध्ये तीन ते चार प्रकारचा रेकॉर्ड सुध्दा सापडला आहे. दटके साहेब बोलत असतांना माझ्या एक मुद्दा

लक्षात आला दिपक मिनाच्या पी.ए. ला वाचविण्याचे प्रयत्न करतो, असे बिलकुल नाही मी सभागृहात क्लीअर कट सांगत आहे मी फाईल सुध्दा लिहीली होती 67 लक्ष रुपयांच्या संदर्भामध्ये त्यावर ताबडतोब कारवाई केली. आपण 18 ते 19 महिन्याचे जर रोस्टर काढले त्यामध्ये मी एच.ओ.डी. ला कामाला लावले, तीन ते चार क्लर्क लावले, यामध्ये सखोल अभ्यास करुन कंम्पलीट फॅक्ट बाहेर काढायला पाहिजे आणि तो पर्यत आयसोलेटेड कारवाई केली पाहिजे. ती कारवाई करतांना कुठेतरी छोटे कर्मचारी अडचणीमध्ये येतो आणि बाकीचे लपुन बसतो हे होता कामा नये, कुठल्याही व्यक्तींना आपण सोडणार नाही. यामध्ये डिटेल चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे. हे 15 दिवसात बिलकुल होणार नाही. यामध्ये पुर्ण कालावधी दयायला पाहिजे आणि कालावधीच्या अनुषंगाने यांना रेफरन्स दयायला पाहिजे हे करण्याकरीता मा.संदीप सहारे तसेच मा.प्रविणजी दटके यांनी तसेच मा.स्थायी समिती सभापती यांनी सांगितल्याप्रमाणे निवृत्त न्यायधीश आणि त्यांच्यासोबत निवृत्त प्रशासकीय अनुभव असलेले अधिकारी स्पेशली ए.जी. च्या अधिका-यांना यामध्ये समाविष्ट करुन घेतले पाहिजे. परंतु त्यांना संपुर्ण वेळ देऊन काय कारण आहे, कोणत्या सिस्टीमचा दोष आहे हे आपण दुरु करु शकतो. दुसरा महत्वाचा मुद्या आहे की पासवर्ड कशाला दिला यामध्ये तुम्ही दोषी आहे. माझी विनंती आहे सभागृहामध्ये की निर्णय घेण्यापुर्वी तुम्ही चौकशी करा, चौकशी मध्ये जे काही दोषी आढळल्यास कोणीही असो सुपर क्लास वन असो की, खालचा अधिकारी असो त्यांच्यावर नियमानूसार प्रशासनाच्या वतीने निश्चितपणाने कारवाई करणार आहे. मात्र प्रिव्हेंटीव्ह पध्दतीने तुम्ही सक्तीच्या रजेवर जा अशाप्रकारे करणे आजच्या घडीला बरोबर नाही. परंतू जी काही सदस्यांची मागणी आहे जी चौकशीची मागणी आहे त्यामध्ये आणखी एक अॅड करा की त्यामध्ये रिटायर्ड जज घ्या, रिटायर्ड अकाउंटचा अनुभव असलेले ऑफीसर घ्या, जेष्ठ नगरसेवकांना सुध्दा घ्या, परंतू प्रॉपर यामध्ये सोलुशन काढले पाहिजे. आमच्या समितीचे मुळ काम ते आहे. जे काम आतापर्यत झाले आहे ते काढायला पाहिजे, ओटीपी सिस्टीम आणली आहे. ई गव्हर्नन्स पोर्टल एक प्रकारचे अॅडव्हान्स आहे काम करतांना अधिकारी वर्गानी लक्षात आले पाहिजे की एका दिवशी हजारो फाईल करावे लागते त्यामध्ये त्यांना सांगितले की हे ओटीपी शिवाय करायचे नाही. आपण त्यामध्ये सुधारणा करणे महत्वाचे आहे. गुडधे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे या प्रक्रीयेमध्ये जी काही बाब आहे त्यावर नक्की कारवाई करायला पाहिजे मी दटके साहेबांना सांगितले होते की तुमच्याकडे जे काही पुरावे असतील तर ते दया मी अपेक्षा करतो की देतील मला, आणि कारवाई करीता जे काही कागदपत्रे मला प्राप्त होतील आपण निर्णय घेता असतांना ही बाब सुध्दा लक्षात घेतली पाहिजे की आपल्या शहरात अॅमीक्रॉनचा त्रास आहे. आणि या परिस्थितीमध्ये सर्वांना घरी जा हे सांगणे बरोबर नाही. सर्वानी सिस्टीम इम्प्रुव्ह करण्याची सुचना दिली पाहिजे.

श्री.विजय (पिंटु) झलके :- मा.महापौरजी, या स्थगण प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर प्रशासनाची भुमिका मा.आयुक्तांनी विषद केली. अॅमीक्रॉनचा वाढता प्रकोप आहे परंतु या संपुर्ण प्रकरणात जो सस्पेक्ट आहे मी कोणाला दोषी ठरविण्याचा अधिकार मला नाही परंतु यामध्ये काही लोक लिप्त असतील किंवा संदीग्ध असतील अशा लोकांवरी काय करवाई करायची हा पिठासीन अधिका-यांचा अधिकार आहे आणि ते आपल्या रुलिंग मधुन येईलच, या सर्व परिस्थितीमध्ये येत्या काही दिवसांमध्ये निवडणुकीला समोर जायचे आहे त्यामुळे शहराच्या विकासावर याचा कुठलाही परिणाम होता कामा नये, याची सुध्दा प्रशासनाने तसदी घेतली पाहिजे. जी काही आपली रुटीन प्रोसेस आहे ती कुठेही थांबता कामा नये या सर्व गोष्टीची प्रशासनाने काळजी घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

महापौर :- स्थगन प्रस्ताव के उपर सभी जेष्ठ सदस्योंने सखोल चर्चा की, जिस विषय के उपर किसीका ध्यान नही था वह भी विषय सभागृह के पटल पर रखा गया, प्रशासन की तरफ से जो बात सदन के पटल पर आयी और बहोत सारी बाते सन्माननिय सदस्योंने सभागृह के पटल पर रखी है, कुछ बाते निश्चितरुप से गंभीर है। किसी व्यक्ती को वर्कऑर्डर ना देते हुए भी ६७ लाख रुपये के बिल सबमिट करना, यह कही ना कही प्रशासन की संजीदगीपर प्रश्नचिन्ह उठाता है, और व्यवस्थापर भी प्रश्नचिन्ह उठाता है। पासवर्ड किसी दुसरे व्यक्ती को देना यह पहली घटना

नही है, इसके पहले भी टॅक्स डिपार्टमेंट मे पासवर्ड का उपयोग करके टॅक्स के बिल मे गडबडी करने की बात उजागर हुई और यह भी विचित्र संयोग था की जिसने सुचना दी थी की पासवर्ड का गलत इस्तीमाल किया है उसपर ही कारवाई हुई अगर उसपर कारवाई हुई तो इनपर भी कारवाई हो सकती है, क्यौकी एक के लिये एक कानुन और दुसरे के लिये दुसरा कानुन संभव नही हो सकता। हस्ताक्षर करने का अधिकार न होते हुए भी हस्ताक्षर करने की हिम्मत जिन अधिकारीयोंने की इसप्रकार के आरोप आभाताई ने लगाया, की जिन्हे अधिकार नही था उन्होने भी हस्ताक्षर किया और वह बिल प्रोसेस हुऐ है अगर इस प्रकार से प्रशासन संचालित हो रहा है और पुरावे के साथ आभाताई कह रही है यह भी प्रशासन के लिये एक गंभीर बाब है की हम लोग क्या कर रहे है। ऑक्टोबर महिने मे जानकारी होने के बाद डिसेंबर महिने मे कारवाई पर पोहचते है अर्थात ऑक्टोबर पुरा गया, नोव्हेंबर पुरा गया, अधा डिसेंबर भी गया, पुरे ढाई महिने इसपर कारवाई नही हुई अर्थात ७५ दिन, यह बहोत संदेहास्पद लगती है की, ७५ दिन तक कारवाई करने के लिये हम क्यो रुके है। जब पहले ही बात हमारे ध्यान मे आयी थी तो पहले ही इस बात को उजागर करना था तो उसके बाद अगर इसप्रकार की प्रोसेस होते तो इससे हम बच सकते थे। आदरणीय जोशी साहब ने यहापर वक्तव्य मे ४१ बिल, ५ एजन्सी, ६७ लक्ष ८ हजार आकडा बताया और संदेह व्यक्त किया और संदेह व्यक्त किया की ६ करोड से २१ करोड तक गडबड हो सकती है। ७४ लक्ष रुपयो का जो बिल हुवा था जिसको कार्यादेश भी प्राप्त नही हुआ था यह सारी बाते प्रशासन की कार्यप्रणालीपर संभ्रम उत्पन्न करती है। एक व्यक्ती महानगरपालिका की व्यवस्था को पंगु समझ कर के अपने मन से संपुर्ण व्यवस्था का संचालन कर रहा था और किसीके कान पर जू तक भी नही आयी यह समझ के बाहर का विषय हो सकता है। लेकीन यह घटना हुई है इस घटना की निंदा करते है, इसके लिये प्रशासन ने आत्ममंथन करना चाहिये, क्या कारण है की महानगरपालिका के व्यवस्था मे व्हिजीलन्स ऑडीट की पोस्ट है वह खाली पडी है उसका क्या कारण है ? क्या व्हीजीलन्स ऑडीटर रहता तो यह बात उजागर होकर बाहर नही आती, क्या कारण है की स्पॉट ऑडीटर के रुप मे वहापर सक्षम अधिकारी होना चाहिये वैसा अधिकारी हमारे पास नही है यह दोनो पोस्ट हमारे पास होती तो शायद आज इसप्रकार की व्यवस्था को हम शुरुवात मे ही रोक लेते और इनके माध्यम से इसपर अंकुश लग सकता था। लेकीन हमने इन दोनो पोस्ट पर नियुक्ती करनी चाहिये थी लेकीन यह पोस्ट खाली पडी है यह भी कहीना कही एक कारन है। सदन मे जो चर्चा हुई उस चर्चा के अनुरुप महानगरपालिका के सेक्शन ३१ के अंतर्गत सभागृह की एक समिती गठीत की जाती है, सभागृह के इस समिती की अध्यक्षता महानगरपालिका के सत्तापक्ष नेता श्री.अविनाश जी ठाकरे करेंगे, उनके साथ विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे, इसमे बहुजन समाज पक्ष की नगरसेविका श्रीमती वैशाली नारनवरे रहेंगी इनके साथ मे जिन्होने स्थायी समिती मे यह विषय उठाया था वह स्थायी समिती के सदस्य ॲड संजयकुमार बालपांडेजी रहेंगे और स्थायी समिती के पुर्व अध्यक्ष श्री.संदीप जाधव यह भी समिती मे रहेंगे, सेक्शन ३१ मे इस समिती को अधिकार है इस समिती को अगर लगता है की किसी न किसी और व्यक्ती को ॲड करना है और वह महानगरपालिका के बाहर का हो तो वह समिती मे ॲड कर सकते है ऐंसे और भी व्यक्तीयों को जो प्रशासनिक तौर पर समिती को मदत कर सकते है वह रिटायर्ड जज भी हो सकते है, रिटायर्ड कमीश्नर भी हो सकते है जो भी इस समिती को उचित लगेंगा रिटायर्ड जज की नियुक्ती करना है तो बहोत लंबी प्रोसेस है और वह प्रोसेस मे रिटायर्ड जज नियुक्त नही हुऐ तो हम काम की शुरुवात नही कर पायेंगे इसलिये अगर यथाशिघ्र रिटायर्ड जज मिल जाते है तो समिती के साथ मे रहकर के समिती के नेतृत्व मे कार्य करे अन्यथा ऑडीट के किसी रिटायर्ड अधिकारी और कमीश्नर को कोई भी दो अधिकारी को साथ मे लेकर के सात लोगों के समिती के माध्यम से हम एक माह के अंदर इस वर्तमान प्रकारण को उजागर करे और साथ ही साथ मे मा.आयुक्त महोदयजी ने जो निवेदन दिया है उससे ऐंसा परिलक्षीत होता है की महानगरपालिका मे परंपरा चली आ रही है जब से इस यादी मे समाविष्ट जो एजन्सीया है वह जब से काम कर रही है उनके संपुर्ण कार्यकाल की चौकशी इस समिती के माध्यम से की जाये इसप्रकार के निर्देश इस सभागृह के माध्यम से दिये जाते है। साथ ही साथ

मा.आयुक्त महोदयजी को यह सुचित किया जाता है कोविड के दृष्टी से महानगरपालिका के सारे अधिकारी काम पर होना नितांत आवश्यक है यह बिलकुल सही है लेकीन जिनपर संदेह की सुई घुम रही है ऐंसे सारे अधिकारीयोंके फायननशिअल अधिकार आप अपने पास रख ले आप अपने सही से जिनको भी यह पावर डेलीगेट करना है वह कर ले ऐंसा सभागृह मे मानस व्यक्त किया है इसमे प्रशासन की व्यवस्था भी काम करती रहे और कोविड के कार्यकाल मे किसी प्रकार की व्यवस्था मे कोई अडचण भी ना आये लेकीन जिनपर संदेह की सुई घुम रही है मै किसी पर संदेह करना नही चाहता सभी अधिकारीयोंसे मेरे व्यक्तीगत संबंध है, लेकीन किसीपर संदेह आ जाता है तो कही ना कही आत्मपरिक्षन से गुजरना पडता है इसलिये आयुक्त महोदय इसप्रकार की कार्यप्रणाली को अंगीकृत करे, इस प्रकार के निर्देश दिये जाते है l

महापौर :- हम विषयपत्रिका की शुरुवात करेंगे, नागपूर महानगरपालिका सभेचे खालील कार्यवृत्त कायम करणे.

**<u>ठराव क्रमांक १९५</u> :- नागपूर महानगरपालिका, महासभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.**

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 08.09.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 08.09.2021 सकाळी 11.55 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 08.09.2021 दुपारी 01.05 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. विशेष सभा दिनांक 13.10.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त

**<u>ठराव क्रमांक १९६</u> :-**नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

१. स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती
   - १) सोमवार दि. ०७-०६-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त
   - २) शुक्रवार दि. ०९-०७-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त
   - ३) मंगळवार दि. ३१-०८-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

२. वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती
   - १) सोमवार दि. ३०-०८-२०२१ दुपारी ०२-०० वाजता चे कार्यवृत्त
   - २) सोमवार दि. ११-१०-२०२१ दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त

३. शिक्षण विशेष समिती
   - १) गुरुवार दि. १६-०९-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

४. क्रीडा विशेष समिती
   - १) सोमवार दि. ०५-०७-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त
   - २) सोमवार दि. २३-०८-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

५. गलिच्छ वस्ती निमुर्लन व घरबांधणी विशेष समिती
   - १) गुरुवार दि. २६-०८-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

६. महिला व बालकल्याण विशेष समिती
   - १) गुरुवार दि. २३-०९-२०२१ दुपारी ०२-०० वाजता चे कार्यवृत्त

**<u>ठराव क्रमांक १९७</u> :-**नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे तिमाही अहवाल मा. सदस्यांच्या माहितीस्तव सादर प्रश्नाची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

१. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०२—०७—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता
२. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ३०—०७—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता
३. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०६—०८—२०२१ रोजी दुपारी ०३—०० वाजता
४. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १८—०८—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता
५. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २४—०८—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता

६. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २७–०८–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
७. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २४–०९–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता

**ठराव क्रमांक १९८ /वि.क्र.८० {सार्व. आरो. अभि.विभाग}** :-नागपूर शहर २४X७ पाणी पुरवठा या योजनेअंतर्गत एकुण ६८ कमांड एरिया पैकी २० कमांड एरिया मधे २४X७ पाणीपुरवठा करण्यात आला आहे व १८ कमांड एरीयामधे प्रायोगिक तत्वावर २४X७ पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या योजनेतील मुळ BOQ मधे अस्तीत्वात असलेल्या पाईप लाईन बदलविणे (Rehabilitation)च्या कामाचा समावेश होता, मात्र प्रत्यक्ष कामास सुरूवात झाल्यावर अस्तित्वात असलेल्या पाईपलाईन शिवाय नविन पाईपलाईन सुद्धा बदलविण्यात आल्या, या कारणास्तव BOQ मधील Quantity संपुष्ठात आल्या आहेत. शहरातील इतर Command Area मध्ये २४X७ पाणीपुरवठा करण्याचे दृष्टीने ऑपरेटर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा.लि. यांनी रू. ८८.४६ कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे. (GST + Esclation वगळून)ऑपरेटर यांनी सादर केलेला प्रस्ताव हा २४X७ पाणी पुरवठा योजनेतील करारामधील Sehedule – १६ वर आधारीत आहे.

यात प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश आहे.

| Sr. No | Item | Unit | BOQ Qty | Work done upto Sept.२०२० | Add Qty Req. for Conversion of C.A.in २४X७ | Amt Req. (As per Sehedule - १६) Rs in Cr. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Pipeline laying | Kms | ६८८ | ६८८ | १२५.५ | ४३.१९ |
| २ | HSC | Nos | ३२१३२७ | २,४१,८६० | -- | -- |
| ३ | ESR / GSR Rehabilitation | L.S | १९ | १८ | २० Nos | ११.८९ |
| ४ | Rehabilitation of Pench -II WTP | L.S | १ | १००% | -- | -- |
| ५ | Replacement of GATES & VALVES Chambers | L.S | १ | १००% | ७५ Nos (Chamber for valves & Flow Meter) | ३.०० |
| ६ | Development of Billing Software SCADA & GIS | L.S | १ | ९५% | -- | -- |
| ७ | NESL Building | L.S | १ | -- | -- | -- |
| ८ | Laying २००० m.m. dia M.S. २ Km. | Kms | २.०० | १००% | -- | -- |
| ९ | Rehabilitation of Sitabuldi Fort ESR | L.S | १ | १००% | -- | -- |
| १० | For Improvement in power factor (Pench – I & III) | L.S | | | -- | ३.३२ |
| ११ | Installation EMF Flow Meter | -- | | | १५० Nos | ८.६० |
| १२ | ESR Byepass Arrangement | -- | | | ६८ Nos | १६.२९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | Other miscellaneous work | L.S | | | Lumsum | २.१६ |
| | | | | | | ८८.४६ Cr (Excluding GST & Escalation) |

ऑपरेटर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा.लि. यांनी सादर केलेला रू. ८८.४६ कोटीचा प्रस्तावावर NESL BOD च्या दि. २६.१०.२०२० च्या बैठकीत चर्चा करण्यात आली व M/s OCWPL यांनी सादर केलेला प्रस्ताव हा MJP २०१९-२०२० CSR चे दर घेऊन प्रस्ताव सादर करण्यास्तव निर्देश देण्यात आले व यानुसार रू. ७८,६५,२९,३४९/- या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला, व ऑपरेटरला या दरांवर काम करण्यास तयार असल्यास तसा प्रस्ताव सादर करण्यास्तव निर्देशित करण्यात आले. मात्र ऑपरेटर M/s OCWPL यांनी सदरहु काम MJP च्या दरांवर करण्यास्तव नाकार दिला या कारणास्तव हे काम नियमीत निविदा बोलावुन करण्यास्तव व याद्वारे प्राप्त निम्नतम दरावर ऑपरेटर M/s OCWPL काम करण्यास तयार असल्यास तसे प्रस्तावित करण्यास्तव निर्देशीत करण्यात आले.

सबब वरिल बाबी विचारात घेवून खालीलप्रमाणे प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यात आला.

१. नागपूर शहरातील २४X७ योजनेअंतर्गत उर्वरित ३० कमांड एरिया २४X७पाणीपुरवठा करण्याच्या रू. ७८,६५,२९,३४९/- या रकमेच्या प्राकलनेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व पुढील १७ वर्षे केलेल्या कामाचे देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामास मंजुरी प्रदान करणे.

२. याकरिता तयार करण्यात आलेल्या निविदा प्रपत्रे यांना मंजुरी प्रदान करणे.

निविदा राष्ट्रीय स्तरावर मागविण्यात येतील. प्राप्त निम्नतम निविदा दरावर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा. लि. काम करण्यास तयार असल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

या संदर्भात म.न.पा. ठराव क्र. ५८ दि. २५.०३.२०२१ अन्वये, सभागृहापुढे सादर करण्यात आलेल्या रू. ७८,६५,२९,३४९/- या अतिरिक्त कामाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव होता. मात्र, मा. महापौर यांनी या विषयावर सखोल चर्चा करणे आवश्यक असल्याने सभागृहातील मा. सदस्यांना निवेदन केले की, सदर्हू विषयाबाबत ज्या सदस्यांनी माहिती हवी असल्यास त्यांनी लेखी स्वरूपात महापौर कार्यालयात सादर करावे व त्यानुसार विषय पुढच्या सभेमध्ये संपुर्ण माहितीसह सादर करावा असा मा. महापौर यानी Ruling दिले. मात्र या संदर्भात मा. महापौर यांनी केलेल्या निवेदनप्रमाणे मा. सदस्यांना प्रत्यक्ष कोणती माहिती हवी आहे, याबाबत लेखी स्वरूपात प्राप्त झाले नाही.

तरी प्रस्तावित काम हे नागपूर शहर २४x७ पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टिने अत्यंत आवश्यक असल्याने व यास अद्याप मंजुरी प्राप्त न झाल्याने प्रकल्प पुर्ण करण्यास व शहरातील सर्व कमांड एरीयामधे २४x७ पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तरि विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या रू. ७८,६५,२९,३४९/- या रक्कमेच्या अतिरिक्त कामाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून हा विषय प्रशासनाला परत करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १९९ /वि.क्र.८२</u> :-** नागपूर महानगरपालिकेची मालकिच्या मौजा - धंतोली/जाटतरोडी, **{मालमत्ता(स्थावर) विभाग}** येथील भंगी हाऊसींग सोसायटीला देण्यात आलेल्या ४.५८ एकर जागेवर बोरकर नगर वसाहत तयार करण्यात आली होती. त्या वसाहतीत वास्तव्यास असलेल्या धारकांना पट्टयेवाटप करण्याबाबत.

मा. विपक्ष नेता, विधान सभा, महाराष्ट्र शासन यांचे दि. ०२.०८.२०२१ ला मा. आयुक्त यांचे कक्षात

झालेल्या बैठकित त्यांनी दिलेल्या आदेशा नुसार भंगी को ऑप सोसायटीची जुनी लिज निरस्त करून सदर्हु जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात यावी व तद्नंतर पट्टेवाटप कक्षाव्दारे पट्टावाटप करण्यात यावे, असे निर्देश दिले. त्या अनुषंगाने सहा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव खालील प्रमाणे.

मौजा-जाटतरोडी येथील भंगी हाऊसींग सोसायटीला निवासी उपयोगातील हस्तांतरीत करण्यात आलेल्या ४.५८ एकर जागेवर बोरकर नगर वसाहत तयार करण्यात आली होती. त्यात एकुण ७६ भुखंड आवंटीत करण्यात आली होते परंतु प्रत्यक्षात मुळ धारक अस्तीतवात (मृत्यू झाल्यामुळे) नसुन त्यांचे वारसानांनी व इतर लोकांनी रस्त्याची जागा, मोकळा भुखंड, गडर लाईन, नाला यावर अतिक्रमण करून वास्तव्य केले असल्याने व जागेच्या क्षेत्रफळात सुध्दा अनियमीतता झालेली असल्याचे दिसुन येते

सदर वसाहतीचा मौजा-जाटतरोडी नसुन मौजा-धंतोली असल्याचे आढळुन येते. दरम्यानचे काळात खुल्या जागेवर रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे तयार झालेल्या झोपडपट्टीचा स्थावर विभागाद्वारे प्लेन टेबल सव्हे करण्यात आला. करण्यात आलेल्या प्लेन टेबल सव्हे नुसार त्यात ८४ पक्के व ७ अर्ध कच्चे असे एकुण ९१ बांधकामे आढळून आलेली आहेत.

१. मनपा. ठराव क्र. ३९ दि. ०३/०३/१९५६ नुसार मौजा धंतोली येथील ४.५८ एकर जागा भंगी हाऊसींग सोसायटीस सन १९५६ मध्ये ३० वर्षीय स्थायी भाडेपट्टयावर (निवासी वापराकरीता) आवंटीत करण्यात आलेली आहे.

२. भंगी हाऊसींग सोसायटीद्वारे अभिन्यास निर्माण करून ७६ (नस्तीस उपलब्ध नकाशा नुसार) भुखंडे पाडण्यात आली व यावर सोसायटीद्वारे सभासदासाठी घरे (Quarter) बांधण्यात येऊन त्यात ७६ सभासदांना आवंटीत केल्याची नोंद मुळ नस्तीत उपलब्ध असुन या सर्व भुखंडाची आखीव पत्रीका नस्तीत संलग्न आहे. आखीव पत्रिकेनुसार “हक्काचा मुळ धारक महानगरपालीका, पट्टेदार-भंगी सहकारी सोसायटी” असुन प्रत्येक आखीव पत्रीकेवर इतर भार म्हणुन सभासदाचे नाव आहे. परंतु सोसायटीद्वारे नागरीकांना भाडेपट्टा दिल्याचा एकही दस्तावेज नस्तीत उपलब्ध नाही.

३. मनपा ठराव क्र. ३९, दि. ०३/०३/१९५६ अन्वये सन १९५६ मध्ये ३० वर्षीय स्थायी भाडेपट्टयावर आवंटीत करण्यात आलेल्या जागेची मुदत सन १९८६ ला संपलेली असुन भंगी हाऊसींग सोसायटीद्वारे सदर्हु भाडेपट्टयाचे नुतणीकरण केलेले नाही.

अ) सोसायटीद्वारे सदर्ह जागेवरील भुखंडाचे वाटपामध्ये अनियमितता झाली असल्याचे, सभासदांचे मौखीक आक्षेप प्राप्त होते

ब) सदर्ह जागेवर अनियमित/अतिक्रमण होवुन वसाहत निर्माण झाली आहे. यास्तव सोसायटीस भाडेट्टयाने जागा आवंटीत करण्यापेक्षा भुखडधारकास मालकी हक्काचे पट्टे देणे योग्य राहील असे मत आहे.

क) सदर वसाहतीचा PTS करण्यात आला आहे. आवश्यक असल्यास पुन्हा PTS करून पात्रतेबाबतची खात्री करून तथा वसाहत ‘घोषीत झोपडपट्टी’ होण्यास्तव आवश्यक कार्यवाही करून शासन निर्णयानुसार मालकी पट्टेबाबतची पुढील कार्यवाही पट्टावाटप विभागाद्वारे’ करणे योग्य होईल.

४. सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जमीनीवरील अतिक्रमणे नियमानुकुल करून भाडेपट्टेयाने देण्याबाबत. महाराष्ट्र शासन, नगर विभागाचे शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१८/प्र.क्र. ३०९/नवि-१४ दि. ०६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये निर्देश प्राप्त आहे. सदर शासन निर्णयानुसार अतिक्रमीत जागा ही घोषीत झोपडपट्टी असने बंधनकारक नसुन दिनांक १ जानेवारी २०११ किंवा त्यापुर्वी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण करण्यात आलेले भुखंड नियमानुकुल करण्यास पात्र आहे.

५. दि. ०६ फेब्रुवारी, २०१९ चे शासन निर्णयाच्या अनुषंगाने मनपा महासभेचे ठराव क्र. ४०० दि.२०/६/२०१९

अन्वये नागपुर महानगरपालीकेच्या मालकीच्या जागेवरील घोषीत/अघोषीत झोपडपट्टी क्षेत्रातील सोसायटीला यापुर्वी स्थावर विभागाने दिलेला भाडेपट्टा निरस्त करून महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम १९४९ चे कलम ७९ खंड 'ग ' मधील उपखंड 'अ' ची तरतुद व शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.३०९/नवि-१८ दि. ०७/०२/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीतील अटी व शर्तीचा अंतर्भुत करून प्रस्तुत केलेल्या भाडेपट्टयाच्या प्रारूपाप्रमाणे सुधारीत भाडेपट्टा देणे व तसेच ज्या अतिक्रमणधारकांना यापुर्वी भाडेपट्टा देण्यात आलेला नव्हता अशा रहीवाशांना सुध्दा प्रस्तुत प्रारूपाप्रमाणे भाडेपट्टा देण्याबाबत मंजुरी प्राप्त आहे.

करीता, उपरोक्त वस्तुस्थिती बघता सदर्ह वसाहतीत सध्या वास्तव्यात असलेल्या नागरीकांना पात्रतेच्या निकषाचे अनुषंगाने नव्याने पट्टेवाटप करावयाचे असल्यास सर्व प्रथम मनपा. ठराव क्र. ३९ दि. ०३/०३/१९५६ नुसार मौजा-धंतोली येथील ४.५८ एकर जागा भंगी हाऊसींग सोसायटीस सन १९५६ मध्ये ३० वर्षीय स्थायी भाडेपट्टयावर (निवासी वापराकरीता) आवंटीत करण्यात आलेला भाडेपट्टा स्थावर विभागाद्वारे ट्टयाची मुदत संपुष्टात आलेला असुन अदयापपावेतो भाडेपट्टयाचे नुतनिकरण करून देण्यात आलेली नसल्यामुळे भडेपट्टा निरस्त झाला असे म्हणने सोईचे होईल.

परंतु तरी सुध्दा सदर्हु भाडेपट्टा निरस्त करण्याचे तसेच नगर भुमापण कार्यालयातील मालमत्ता पत्राकातील जुने नावाची नोंद खारीज करून फक्त म.न.पा चे नाव दर्ज करण्यास्तव व पट्टेपाटप कक्षाव्दारे पट्टेवाटप केल्या नंतर नव्याने मालमत्ता पत्राकात नाव दर्ज करण्याबाबतचा विषय सभागृहाच्या निर्दशनास आणून देण्याकरिता महासभेसमोर ठेवण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून प्रभाग के नागरिकों का नगरसेवको को पत्र प्राप्त हुआ है, मा.आयुक्त को भी सन्माननीय विरोधी पक्ष नेता इन्होने सभागृह मे पत्र दिया है इसलिये यह विषय सुधारित प्रारुप मे सभागृह के समक्ष दुबारा प्रस्तुत करना चाहिए इसलिये प्रशासन को यह विषय वापस किया जाता है । या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक २०० /वि.क्र.८७ :-** विकास योजना — नागपूर.

**{नगर रचना विभाग}** शासन अधिसुचना क्र.टिपीएस — २४१६/ शिकाना—४१/प्र.क्र. ७५/२०१७/नवि—९, दि. २० एप्रिल २०१७ रोजी मिहान अधिसुचीत क्षेत्रातुन वगळलेल्या २२०.२१ हेक्टर क्षेत्रापैकी नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील जयताळा (भाग), भामटी(भाग) येथिल एकूण २१७.६६ हेक्टर या जमिनीचा वापर बदलवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रहिवासी वापर क्षेत्रात अंतर्भुत करण्याबाबत.

विषयांकित मौजा — जयताळा येथील खसरा क्र. २०४/१, २०४/२, २०५, २१०, १७०/१, १७०/२, १७०/३ व १७०/५ या महानगरपालिका, नागपूरच्या हद्दीमधील जमिनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या 'मिहान' अंतर्गत क्षेत्रातुन वगळण्यांत आल्यानंतर व आता सदर जमिनीच्या विकासासाठी महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असल्याने तसेच सन २००१ पासून आजपर्यंत सातत्याने जमिनीचा वापर बदलत असल्याने सदरहु जमिनीचा विकास करण्यापासून अर्जदार वंचित असल्यामुळे तसेच सदर्हु क्षेत्राच्या सभोवताली रहिवास क्षेत्र विकसीत झाल्याने या मिहानमधून वगळलेल्या जमिनींना रहिवाशी वापर अनूज्ञेय करावा, अशी विनंती अर्जदार यांनी महानगरपालिका, नागपूर यांचेकडे केलेली होती. त्याअनुषंगाने अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेने यापुर्वी शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालावरील सहाय्यक संचालक, नागपूर शाखा यांनी त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. तथापी शासन स्तरावरून कार्यवाही झालेली नाही. आता उक्त जागा शासनाकडील दि. २०.०४.२०१७ रोजीच्या निर्णयान्वये International Multimodel Air Cargo & Passenger Hub या आरक्षणातून वगळल्या असून उक्त जागेच्या जमिन वापराबाबत शासन निर्णयात नमुद नसल्याने व तसेच उक्त जागेच्या परिसरातील जमिनीचा वापर रहिवास वापराकरीता होत असल्याने उक्त २२०.२१ हे. क्षेत्राच्या जमिनीचा वापर रहिवास विभागात समाविष्ठ करणेकरीता

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मुळ DPR नुसार उक्त दोन जलकुंभाची किंमत रू. ८.२३ कोटी होती व MJP CSR २०१९-२० नुसार Double Decker ESR सह Feeder Main, Distribution, Office block, Compound wall इत्यादीची एकूण प्राकलनीय राशी रू. ८.८४ कोटी इतकी येते. यामध्ये ३०% जास्त रक्कमेच्या निविदा प्राप्त होईल असे गृहित धरल्यास प्राकलनीय राशी रू. ११.५० कोटी व १२% GST सह रू. १२.८७ कोटी येते. दोन्हीमधील फरक रू. ४.६४ कोटी येतो. सदर जास्तीच्या खर्चास म.न.पा. ठराव क्र. १४५ दि. २२.०७.२०२१ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदर दोन्ही ESR वेगवेगळया जागी प्रस्तावित बांधकाम केल्यास त्याकरिता MJP CSR २०१९-२० वर आधारित प्राकलन तयार केले असता ओंकारनगर-२ क्षमता २० लाख लिटर्स, २१.५० मी. उंचीवरील जलकुंभासह

Feeder Main, Distribution, Office block, Compound wall इत्यादीसह एकूण प्राकलनीय राशी रू. ५.२४ कोटी (जीएसटी वगळून) इतकी व ओंकारनगर+म्हाळगीनगर क्षमता २० लाख लिटर्स, २१.०० मी. उंचीवरील जलकुंभासह Feeder Main, Distribution, Office block, Compound wall इत्यादीसह प्राकलनीय राशी रू. ४.३४ कोटी असुन एकूण दोन्ही ESR सह Feeder Main, Distribution, Office block, Compound wall इत्यादीसह ची प्राकलनीय राशी रू. ९.५८ कोटी (जीएसटी वगळून) येते व दोन्ही प्रस्तावित ESR वेगवेगळया जागेत बांधकामाचे प्राकलन व Double Decker ESR चे प्राकलनाची तुलना केली असता Double Decker ESR चे प्राकलनाची राशी रू. ७४.०० लाखाने कमी येत असुन खर्चात बचत होईल.

या Double Decker ESR करिता प्रथम निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या. तांत्रीक मुल्यमापनामध्ये एकच निविदा पात्र ठरल्याने फेर निविदा (२nd call) बोलाविण्यात आली असता मे. एस.एम.सी.इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची प्राकलनीय राशीपेक्षा ५३.१० % जास्त दराची रू. १३.५३ कोटीची एकच निविदा प्राप्त झाली.

अधिक्षक अभियंता (सा.आ.अ.) यांचे स्तरावर झालेल्या वाटाघाटीत ५३.१% ने अधिक दराचा देकार कमी करून ४६.००% ने अधिकचा देकार निविदाकाराने सादर केलेला आहे. मुख्य अभियंता स्तरावर मे. एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना पुन:श्च वाटाघाटी करिता बोलविण्यात आले तथापी त्यांनी पत्राद्वारे ४६.००% ने अधिक दराचा देकार अंतिम असुन यापेक्षा कमी करण्यास असमर्थता दर्शविली आहे.

अशा प्रकारचा Double Decker ESR पहिल्यांदाच नागपूरमध्ये प्रस्तावित असल्याने व सदर जलकुंभाची उंची जास्त असल्याने Risk factor, बांधकाम साहित्यातील GST मधील फरक, पाईप व स्टीलच्या बाजारभावामध्ये वाढ झाल्याने सदर निविदेत अधिक दराचा देकार प्राप्त झाला.

स्थायी समितीने दि. २४.०९.२०२१ रोजीच्या ठराव क्र. १०२/ विषय क्र. ८५ अन्वये निविदाकार मे. एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची निविदा, मुळ प्राकलनीय राशी रू. ८८३९०५३५/- पेक्षा वाटाघाटीप्रमाणे ४६.००% ने अधिक दराची एकूण रू. १२,९०,५०,१८१/-(Excluding GST) रकमेच्या निविदेस मंजूरी आणि १२% GST सह एकूण राशी रू. १४,४५,३६,२०३/- च्या खर्चास मंजुरी प्रदान केलेली आहे. या ठरावात म.न.पा. महासभेचा ठराव क्र. १४५ दि २२.०७.२०२१ अन्वये सदर कामासाठी १२.८७ कोटी रकमेची मंजुरी व कंत्राटदाराने निविदेच्या वाटाघाटी अंतिम देकारात सादर केलेली राशी GST सह रू. १४.४५ कोटी यातील फरक रू. १.५८ कोटीच्या अतिरिक्त खर्चास मंजुरी व सदर निविदेस महासभेची मंजुरी घ्यावी लागेल असे नमूद आहे.

सबब ESRs करिता निविदापूर्व येणा-या रू. १२.८७ कोटी खर्चास म.न.पा. महासभेने ठराव क्र. १४५ दि. २२.०७.२०२१ अन्वये मंजुरी प्रदान केली असल्याने परंतु कंत्राटदाराने निविदेच्या वाटाघाटीतील अंतिम देकारात सादर केलेली राशी GST सह रू. १४.४५ कोटी येत असल्याने त्यातील फरक (१४.४५ – १२.८७) रू. १.५८ कोटीच्या अतिरिक्त खर्चास व सदर निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक २०५ /वि.क्र.९३</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती बाबतचा विषय दि. 28/09/2021 रोजी पदोन्नती तपासणी समितीपुढे ठेवण्यात आला असता, त्यात उप विभागीय अभियंता (Sub Divisional Engineer) या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र. 1, 2, 4, 5, 6, 7, 8, 9 व 10 वरील अनुक्रमे (1)श्री. व्ही. ओ. गुरूबक्षाणी, (2) श्री. पंकज पाराशर, (3)श्री. एस.पी. रक्षमवार, (4)श्री. मनोज सिंग,(5) श्री. ए. एन. डहाके (6) श्री. अजय पझारे, (7)श्री. संजय माटे, (8) श्री. अनिल गेडाम व (9) श्री. नरेश शिंगणजोडे हे व उप विभागीय अधिकारी (Sub Divisional Officer) या संवर्गातील

**{सा.प्र. विभाग}**

सेवाजेष्ठता क्र. 2, 4, 6 व 9 वरील अनुक्रमे (1) श्री. एम. वाय. गणवीर, (2) श्री. एस. एस. उईके, (3) श्री. रविंद्र बुंधाडे, व (4) श्री. एस. ए. वाईकर हे पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले पात्रतेचे निकष पूर्ण करितअसल्याने सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरत्या पदोन्नतीस पात्र ठरवून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वेतनमान रू. 15600–39100–ग्रेड पे 6600 (सातवे वेतन आयोगानुसार 67700–208700) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केलेली असून नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 08/09/2021 रोजीच्या सर्व साधारण सभेत मा. महापौरजी यांनी प्रशासनाला दिलेल्या निर्देशान्वये सदर पदोन्नतीस अग्रीम मंजूरी प्रदान केलेली आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असलेले कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीचा विषय, मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाकडून दाखल याचीका क्र. 28306/2017 चे निर्णयास अधीन राहुन कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीस अंतिम मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.संदीप सहारे :-मा.महापौरजी, हा प्रमोशनचा मुद्दा आहे. विभागाने फायनल सिनॅरिटी लिस्ट जारी केली होती आणि त्यामध्ये १८ लोकांचे नावे होते आणि हा जो विषय आला आणि या विषयामध्ये क्रमांक ३ वर असणारे श्री.कमलेश चव्हाण यांचे नाव वगळण्यात आले, तर यांचे नाव का वगळण्यात आले या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.महेश धामेचा) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे की श्री.कमलेश चव्हाण यांचे नाव का सेवाजेष्ठता यादीमधून वगळण्यात आले आहे. त्यांचे नाव सेवाजेष्ठता यादीमध्ये होते परंतु शासन परिपत्रक ३० ऑगस्ट २००६ ज्यांची व्यवसायीक तांत्रिक व्यवसायीक परिक्षा .....

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी या संदर्भात शासनाचा २०१६ चा शासन निर्णय आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी या विषयाच्या संदर्भात आणखी दोन ते तीन तक्रारी आलेल्या आहेत त्यामुळे हा विषय फेरतपासणी करीता डिपी.सी. कडे पाठवावा ही आपणांस विनंती आहे.

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती बाबतचा विषय दि. 28/09/2021 रोजी पदोन्नती तपासणी समितीपुढे ठेवण्यात आला असता, त्यात उप विभागीय अभियंता (Sub Divisional Engineer) या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र. 1, 2, 4, 5, 6, 7, 8, 9 व 10 वरील अनुक्रमे (1)श्री. व्ही. ओ. गुरूबक्षाणी, (2) श्री. पंकज पाराशर, (3)श्री. एस.पी. रक्षमवार, (4)श्री. मनोज सिंग,(5) श्री. ए. एन. डहाके, (6) श्री. अजय पझारे, (7)श्री. संजय माटे, (8) श्री. अनिल गेडाम व (9) श्री. नरेश शिंगणजोडे हे व उप विभागीय अधिकारी (Sub Divisional Officer) या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र. 2, 4, 6 व 9 वरील अनुक्रमे (1) श्री. एम. वाय. गणवीर, (2) श्री. एस. एस. उईके, (3) श्री. रविंद्र बुंधाडे, व (4) श्री. एस. ए. वाईकर हे पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले पात्रतेचे निकष पूर्ण करित असल्याने सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरत्या पदोन्नतीस पात्र ठरवून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वेतनमान रू. 15600–39100–ग्रेड पे 6600 (सातवे वेतन आयोगानुसार 67700–208700) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केलेली असून नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 08/09/2021 रोजीच्या सर्व साधारण सभेत मा. महापौरजी यांनी प्रशासनाला दिलेल्या निर्देशान्वये सदर पदोन्नतीस अग्रीम मंजूरी प्रदान केलेली आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असलेले कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीचा विषय, मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाकडून दाखल याचीका क्र. 28306/2017 चे निर्णयास अधीन

राहुन कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीस अंतिम मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाची प्रशासनाने फेरतपासणी करून पुढच्या सभागृहात हा विषय सगळया नगरसेवकांचे म्हणणे ऐकण्यासाठी सभागृहाच्या पटलावर ठेवावा या मा.सत्तापक्ष नेते श्री. अविनाश ठाकरे यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय प्रशासनाला परत करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक २०६ /वि.क्र.९४** :-लिंक रोड,सदर येथील म.न.पा. बाजार विभागाची इमारत शिकस्त झाल्याने **{मालमत्ता विभाग}** क्षेत्रिय कार्यालय मंगळवारी झोन क्र. १० यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे सदर संपुर्ण इमारत बांधकाम तोडण्याबाबत म.पा.न.सभागृहा पुढे खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मा.महापौरजी, म.न.पा.यांनी दि. २६/०६/२०२१ रोजी लिंक रोड नाला सफाईची पाहणी दरम्यान भेट दिली असता, तेथील नागरीकांनी तक्रार केली कि, नाल्यावर बांधकाम करण्यात आलेल्या इमारती खाली असलेल्या नाल्याची अनेक वर्षापासुन साफसफाई करण्यात येत नाही. त्याचबरोबर इमारत ४० ते ५० वर्ष जुनी असुन शिकस्त झालेली आहे.त्यामुळे धोका निर्माण झालेला आहे.या अनुषंगाने त्वरीत कार्यवाही करण्याचे मा.महापौरजी यांनी सहा.आयुक्त, मंगळवारी झोन क्र. १० यांना निर्देश दिले.

त्यानुसार कार्यकारी अभियंता, मंगळवारी झोन क्र. १० यांनी अहवाल सादर केला कि, लिंक रोड सदर येथे म.न.पा.ने व्यावसायीक संकुलनाच्या दृष्टीकोणातुन एकुण १७२ दुकाने G+१ इमारतीचे इमारत क्र. ०१ ते ०५ चे बांधकाम केलेले आहेत. सदर इमारतीचे बांधकाम अंदाजे ५० ते ६० वर्षापुर्वी केलेले आहे. सदर इमारत ही लिंक रोडच्या बाजुने वाहणाऱ्या नाल्यावर उभारण्यात आलेली आहे.यामुळे सदर नाल्याची तांत्रिक अडचणीमुळे ज्या वर्षा पासुन इमारत बांधलेली आहे तेव्हापासुन साफसफाई झालेली नाही असे दिसुन येते.यामुळे दरवर्षी पावसाळ्याचा पाण्याचा निचरा होण्यास अडचण निर्माण होत आहे.त्यामुळे स्थानिक लोकांना अनेक समस्यांना पुढे जावे लागत आहे.

सदर इमारत नाल्यावर बांधकाम केलेली अत्यंत जुनी असल्याने प्रथम दर्शनी शिकस्त आढळल्यामुळे सदर इमारतीचे Structural Audit म.न.पा.पॅनल वरील Structural Auditor डॉ.एस.एस.कुलकर्णी यांचेव्दारे करण्यात आले.त्यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार सदर इमारत पुर्णपणे शिकस्त झालेली असुन ती तोडण्यात यावी असे सुचविलेले आहे.

सदर इमारतीमध्ये एकुण १७२ गाळे आहेत व सर्व गाळे बाजार विभागाव्दारे ११ महिन्याच्या अस्थायी परवान्यावर देण्यात आलेले आहे.प्राप्त Structural Auditor डॉ.एस.एस. कुलकर्णी यांचे अहवालानुसार मंगळवारी झोन क्र. १० यांचे कडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये इमारतीतील परवानेधारकांवर उक्त इमारत शिकस्त झालेली असुन मोडकीस आलेली आहे. व त्यापासुन धोका निर्माण झालेला आहे.जीवीत व वित्त हाणी टाळण्याच्या दृष्टीने इमारत/दुकान/गाळे रिक्त करण्याबाबत नोटीस कार्यवाही दि.०३/११/२०२१ रोजी केलेली आहे.

लिंक रोड,सदर येथील म.न.पा. बाजार विभागाची इमारत शिकस्त झाल्यामुळे क्षेत्रिय कार्यालय मंगळवारी झोन क्र. १० यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे व Structural Auditor डॉ. एस.एस. कुलकर्णी यांचे प्राप्त अहवालानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये मोडकीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेली इमारत तोडण्याबाबत नागपूर महानगरपालिकानी निर्णय घेवुन मा.आयुक्त .म.न.पा.स अधिकार प्रदान करून घेणे.उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, या विषयाला स्थगित ठेवण्यात यावे.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, हा जो विषय आहे त्याच्यामध्ये एक स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट सादर करण्यात आला परंतु त्या ऑडीटरच्या रिपोर्टमध्ये दोन ते तिन मुद्दे असे आहे की, मानवतेच्या दृष्टीकोणातून बघितले तर सभागृहाने निर्णय घेतला पाहिजे की लगेच त्यांना न काढता त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे कारण की त्या जागेवर बसविण्याचे काम सुध्दा नागपूर महानगरपालिकेनेच केले आहे.

महापौर :- मा.सदस्या यामध्ये दोन विषय आहे स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टमध्ये दोन ते तीन मुद्दे आहे त्यामध्ये मानवतेचा दृष्टीकोणाचा मुद्दा नाही.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टमध्ये दोन ते तीन मुद्दे आहे त्यामध्ये खूप जास्त खराब परिस्थिती नाही आहे.

महापौर :- या विषयासंदर्भात प्रशासनाने खुलासा करावा.

उपायुक्त (श्री.विजय देशमुख) :- मा.महापौरजी, लिंक रोड सदर येथील मनपाची जी इमारत आहे तेथे १७२ गाळेधारक आहे. सर्व गाळे बाजार विभागाव्दारे ११ महिन्याच्या अस्थायी परवान्यावर देण्यात आलेले आहे. याकरीता प्राप्त स्ट्रक्चरल ऑडीटर डॉ.एस.एस. कुलकर्णी यांचेव्दारे करण्यात आले आहे त्या अहवालामध्ये इमारत शिकस्त झालेली असून वापरण्यास अयोग्य आहे त्यामुळे येथील भोगवटा धारकास आपण नोटीस दिलेली आहे. आणि सदर इमारत शिकस्त असल्यामुळे भविष्यामध्ये दुर्घटना होऊ शकते.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी या प्रस्तावा संदर्भात विनंती आहे की त्यांचे पुनर्वसण करुन पुन्हा हा प्रस्ताव सभागृहात आणावा

वरील चर्चेनंतर लिंक रोड,सदर येथील म.न.पा. बाजार विभागाची इमारत शिकस्त झाल्याने क्षेत्रिय कार्यालय मंगळवारी झोन क्र. १० यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे सदर संपुर्ण इमारत बांधकाम तोडण्याबाबत म.पा.न.सभागृहा पुढे खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मा.महापौरजी, म.न.पा.यांनी दि. २६/०६/२०२१ रोजी लिंक रोड नाला सफाईची पाहणी दरम्यान भेट दिली असता, तेथील नागरीकांनी तक्रार केली कि, नाल्यावर बांधकाम करण्यात आलेल्या इमारती खाली असलेल्या नाल्याची अनेक वर्षापासुन साफसफाई करण्यात येत नाही. त्याचबरोबर इमारत ४० ते ५० वर्ष जुनी असुन शिकस्त झालेली आहे.त्यामुळे धोका निर्माण झालेला आहे.या अनुषंगाने त्वरीत कार्यवाही करण्याचे मा.महापौरजी यांनी सहा.आयुक्त, मंगळवारी झोन क्र. १० यांना निर्देश दिले.

त्यानुसार कार्यकारी अभियंता, मंगळवारी झोन क्र. १० यांनी अहवाल सादर केला कि, लिंक रोड सदर येथे म.न.पा.ने व्यावसायीक संकुलनाच्या दृष्टीकोणातुन एकुण १७२ दुकाने G+१ इमारतीचे इमारत क्र. ०१ ते ०५ चे बांधकाम केलेले आहेत. सदर इमारतीचे बांधकाम अंदाजे ५० ते ६० वर्षापुर्वी केलेले आहे. सदर इमारत ही लिंक रोडच्या बाजुने वाहणाऱ्या नाल्यावर उभारण्यात आलेली आहे.यामुळे सदर नाल्याची तांत्रिक अडचणीमुळे ज्या वर्षा पासुन इमारत बांधलेली आहे तेव्हापासुन साफसफाई झालेली नाही असे दिसुन येते.यामुळे दरवर्षी पावसाळ्याचा पाण्याचा निचरा होण्यास अडचण निर्माण होत आहे.त्यामुळे स्थानिक लोकांना अनेक समस्यांना पुढे जावे लागत आहे.

सदर इमारत नाल्यावर बांधकाम केलेली अत्यंत जुनी असल्याने प्रथम दर्शनी शिकस्त आढळल्यामुळे सदर इमारतीचे Structural Audit म.न.पा.पॅनल वरील Structural Auditor डॉ.एस.एस.कुलकर्णी यांचेव्दारे करण्यात आले.त्यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार सदर इमारत पुर्णपणे शिकस्त झालेली असुन ती तोडण्यात यावी असे सुचविलेले आहे.

सदर इमारतीमध्ये एकुण १७२ गाळे आहेत व सर्व गाळे बाजार विभागाव्दारे ११ महिन्याच्या अस्थायी परवान्यावर देण्यात आलेले आहे.प्राप्त Structural Auditor डॉ.एस.एस. कुलकर्णी यांचे अहवालानुसार मंगळवारी

झोन क्र. १० यांचे कडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये इमारतीतील परवानेधारकांवर उक्त इमारत शिकस्त झालेली असुन मोडकीस आलेली आहे. व त्यापासुन धोका निर्माण झालेला आहे.जीवीत व वित्त हाणी टाळण्याच्या दृष्टीने इमारत/दुकान/गाळे रिक्त करण्याबाबत नोटीस कार्यवाही दि.०३/११/२०२१ रोजी केलेली आहे.

लिंक रोड,सदर येथील म.न.पा. बाजार विभागाची इमारत शिकस्त झाल्यामुळे क्षेत्रिय कार्यालय मंगळवारी झोन क्र. १० यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे व Structural Auditor डॉ. एस.एस. कुलकर्णी यांचे प्राप्त अहवालानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये मोडकीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेली इमारत तोडण्याबाबत नागपूर महानगरपालिकानी निर्णय घेवुन मा. आयुक्त .म.न.पा.स अधिकार प्रदान करून घेणे.उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून व्हीएनआयटीकडून १५ दिवसाच्या आंतमध्ये याचे पुर्ण ऑडीट करावे. जो ऑडीट रिपोर्ट येईल त्या रिपोर्टसह विषय सभागृहाच्या पटलावर पुन्हा सादर करावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक २०७ /वि.क्र.९५</u> :-** महानगरपालिका नागपूरच्या बाजार विभागातील दुकान,गाळे/ओटे/जागा **{ मालमत्ता विभाग}** यांच्या परवाना शुल्का बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मा. महापौरजी, म.न.पा. यांच्या सुचनेप्रमाणे मा. नगरसेवक, श्री. संजयजी बंगाले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल दिला असुन, त्या अहवालाबाबत प्रशासनाचे मत मुद्येनिहाय खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मा. बंगाले समितीचे मुद्ये | प्रशासनाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १ | नागपूर महानरगपालिका बाजार विभाग अंतर्गत येणारे दुकान / ओटे / जागा ११ महिन्याचे परवान्यावर न देता १० वर्षाकरीता Registered Lease Agreement करण्यात यावे तसेच दुकान / ओटे / जागा यांची मुळ मालकी नागपूर महानगरपालिका नागपूरची असल्याने संबंधीत मिळकत / मालमत्ता बॅकेकडे गहाण किंवा तारण करता येणार नाही. म.न.पा.व्दारे वेळो - वेळी घेण्यात येणारे धोरणात्मक निणर्य परवानेधारकांना बंधनकारक राहील. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ नुसार नगरपालिका बाजारातील दुकान/ओटे/जागा हे स्थायी समितीच्या मान्यतेने भाडे तत्वावर देण्याचा मा.आयुक्त यांना अधिकार आहे आणि भाडे तत्वावर देतांना तो कालावधी एक वर्षा पेक्षा अधिक होता कामा नये अशी तरतुद आहे. त्यामुळे ११ महिन्याचा कालावधी वाढवुन १० वर्ष करणे नियमबाह्य ठरेल.<br>परंतु जर दुकान/ओटे/जागा या भाडेपट्याने १० वर्षा करीता द्यावयाचे असल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) तसेच महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाच्या दि. १३/०९/२०१९ च्या अधिसुचनेप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहील त्यानुसार सर्व दुकान/ओटे/जागा यांचे ई-लिलाव करुन पुढील कार्यवाही करावी लागेल. परंतु यामुळे भविष्यामध्ये न्यायालयीन प्रकरणे वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मा. बंगाले समिती व्दारे केलेली सदर शिफारस मान्य्ा करणे योग्य्ा होणार नाही. |
| २ | स्थायी समिती ठराव क्र. ३११ दि. ०९/१०/२०१८ नुसार सिध्द शिघ्र गणकानुसार आकारण्यात येणारे | स्थायी समिती ठराव क्र. ३११ दि. ९/१०/२०१८ नुसार शिघ्र सिध्द गणकानुसार आकारण्यात येणारे |

| | | |
|---|---|---|
| | वापरशुल्का मध्ये कपात करून ठराविक वर्षाकरीता येणारे सिध्द शिघ्र गणकदर Lock करून त्यानुसार वापरशुलकामध्ये दर ३ वर्षानी १०% वाढ करणे. | वापरशुल्का मध्ये कपात करून ठराविक वर्षाकरीता येणारे सिध्द शिघ्र गणकदर Lock करून त्यानुसार वापरशुलकामध्ये दर ३ वर्षानी १०% वाढ करणे हि शिफारस मान्य्ा करता येणार नाही. कारण यामुळे शिघ्र सिध्द गणकदर Lock केल्यास म.न.पा.चे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान होईल. तसेच वापर शुल्कामध्ये दर वर्षानी करण्यात येणारी १०% वाढ हि जर ३ वर्षाच्या कालावधी नंतर केली तर म.न.पा.चे प्रचंड आर्थीक नुकसान होईल. त्यामुळे सदर शिफारस मान्य्ा करता येत नाही. |
| ३ | दुकान / परवानेधारक यांचे परिवर्तन करतांना आकारण्यात येणारे वापरशुल्क स्थायी समिती ठराव क्र. १०६ दि. १८/०६/२०१९ अन्वये दि. ०१/०४/२०१८ पासून आकारणे. | स्थायी समिती ठराव क्र. १०६ विषय क. १०२ दि. १८/०६/२०१९ नुसार परवाना हस्तांतरीत करतांना परिवर्तन शुल्क किती आकारावे याबात धोरण निश्चित केलेले आहे. तरी सदर ठरावानुसार ज्या दिवशी परवाना परावर्तीत करावयाचा असल्यास त्या कालावधीतील शिघ्र सिध्द गणकाच्या दरानुसार परिवर्तन शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.<br>भाडेपट्टा/परवाना कुटुंबाव्य्ातिरीक्त्ा इतर व्यक्तीच्या नावे परवर्तीत करावयाच्या असल्यास मुळ परवानेधारक ज्या कींमतीत परवाना/भाडेपट्टा दुसऱ्या व्यक्तींस विकतो ती किंमत महानगरपालिकेनी ठरविलेली किंमत यामधील फरकांच्या रकमेच्या ५० % रक्कम किंवा शिघ्र सिध्द गणकानुसार येणारे तीन महिन्याचे भाडे/वापर शुल्क यामध्ये जे जास्त्ा असेल ते शुल्क परिवर्तन शुल्क म्हणुन महापालिका निधीत जमा करणे. हि तरतुद योग्य्ा वाटत असल्यामुळे या अटिच्या अधिन राहुन रितसर कार्यवाही करण्यास हरकत नाही.<br>परंतु परवानेधारकांचे परवाने परिवर्तन पुर्वलक्षी प्रभावाने करणे योग्य नाही. |
| ४ | महा मेट्रो मध्ये नागपूर महानरगपालिकेच्या ज्या जागा वर्ग होत आहे त्या वर्ग होणा-या जागेच्या संदर्भामध्ये महा मेट्रो व नागपूर महानरगपालिका मध्ये झालेल्या करारनामा मधील अटी व शर्तीच्या अधिन राहुन घेण्यात येणारा निर्णय परवानेधारकांना बंधनकारक राहील. | ही अट मान्य करता येईल. |
| ५ | बाजार विभागा अंतर्गत येणारे दुकान / ओटे / जागा यांना म.न.पा. कर विभागाव्दारे मालमत्ता कर देखील भरावे लागतात. अशा परिस्थितीत संबंधीत दुकानाकरीता परवानेधारकांना येणारे मालमत्ता कर याचे समायोजन बाजार विभागाच्या अर्थसंकल्पातून | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १३९ (१) अन्वये महानगरपालिकेच्या मालकिच्या जागेवरील मालमत्ता कर हा भोगवटाधारककाकडून वसूल करण्याची तरतूद आहे. त्यामुळे सदर मुद्या अधिनियमाशी विसंगत असल्यामुळे मान्य करता येणार |

| | | |
|---|---|---|
| | करेल व रक्कमेचे समायोजन करेल व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १३९ अन्वये जबाबदारी निश्चित करणे. | नाही. |
| ६ | बाजार विभागाचे स्वतंत्र खाते तयार करणे व त्यामध्ये वापरशुल्काचा Online Payment भरण्याची सुविधा परवानेधारकांना उपलब्ध करून देणे. | सदर शिफारस मान्य करण्यास हरकत नाही. |

उपरोक्त प्रमाणे मा.बंगाले समितीचे मुद्दे प्रशासनाच्या अभिप्रायासह मा. सभागृहाच्या विचारार्थ सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मा.बंगाले समितीने जो रिपोर्ट सबमिट केला आहे त्यामध्ये प्रशासन आणि समितीचे वेगवेगळे मत आहे. त्यामुळे या सभागृहाच्या माध्यमातून मी आपल्याला विनंती करतो की, या संदर्भात आपण प्रशासनाची आणि समितीची एक बैठक घेऊन आणि जे असोसिएशन आहे त्यांची बैठक घेऊन त्यानंतरच या विषयावर निर्णय घ्यावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक १३.०९.२०१९ च्या अधिसुचनेप्रमाणे कारवाई केली आहे. त्या अधिसुचनेमध्ये काय आहे की रेडीरेकनर दर कंन्सीडर करावा. आता राज्य शासनाची अधिसुचना बदलण्याचा अधिकार या सभागृहाला आहे काय ? हा जो मुळ प्रश्न निर्माण झालेला आहे तो अधिसुचनेचा जो नियम आहे आणि त्याच्या परस्पर विरुध्द आपल्या सभागृहाचे म्हणणे आहे त्यामुळे अधिसुचना बदलण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ?

महापौर :- सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल्लजी समितीने निर्णय घेतला की ११ महिन्याच्या ठिकाणी आपण १० वर्षाकरीता दयावे त्यावर प्रशासनाचे असे म्हणणे आहे की जर आम्ही १० वर्षासाठी दिले तर अधिसुचना लागूच होणार नाही हे सर्व संभ्रम आहे म्हणून त्याप्रमाणे निवेदन केले आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, ११ महिन्याचा जो रेट आहे तर १३ सप्टेबर चा जो जी.आर. आहे तो लागू होणार नाही. मागे व्यापारी संघटनेने जी मागणी केली होती त्यामुळे त्यांच्या सोबत चर्चा करुन ११ महिने कंटीन्युव राहिले तर हा जी.आर. तुम्हाला लागू होत नाही. त्याकरीता आपण व्यापारी संघटना, समितीचे सदस्य आणि विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे यांची बैठक घेऊन त्याप्रमाणे आपण निर्णय घ्यावा.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, नविन बाजार बननार आहेत काय , कारण की नागपूर शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेतली पाहिजे. माझ्या प्रभागात आरखित जागा आहे त्यावर अतिक्रमण होत आहे म्हणून माझी विनंती आहे की चौकशी करुन तेथे नविन बाजार रस्त्यावर भरत आहे त्यामुळे दुर्घटना होऊ शकते म्हणुन माझी आपणांस विनंती आहे की दक्षित नगरच्या मागे मौजा नारी खसरा क्र ८२,८३ हे आरक्षित आहे. म्हणुन माझी आपणांस विनंती आहे की नविन बाजार बनविता येत असेल तर त्याप्रमाणे आपण कारवाई करावी.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांनी फार महत्वाचा प्रश्न मांडला आहे. अनेक ठिकाणी बाजार रस्त्यांवर आहेत. आपण प्रशासनाला निर्देश दयावे की ज्या जागा आपल्या वाचलेल्या आहेत त्यावर तात्काळ उपाययोजना करुन तेथे बाजार कसा मांडता येईल या संदर्भात एक सखोल अभ्यास करुन प्रशासनाने आपले मत ठेवले पाहिजे. कारण की बाजारांच्या जागेवर अतिक्रमण होऊन राहिले आहे. नितीनजींच्या घरासमोर बाजार, पुलांवर बाजार, रस्त्यांवर बाजार, असे अनेक बाजार आहे त्यामुळे माझी विनंती आहे कि ज्याप्रमाणे मा.मनोज सांगोळे यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व बाजारांची एकत्रित चौकशी करावी,

वरील चर्चेनंतर महानगरपालिका नागपूरच्या बाजार विभागातील दुकान,गाळे/ओटे/जागा यांच्या परवाना

शुल्का बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मा. महापौरजी, म.न.पा. यांच्या सुचनेप्रमाणे मा. नगरसेवक, श्री.संजयजी बंगाले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल दिला असुन, त्या अहवालाबाबत प्रशासनाचे मत मुद्येनिहाय खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मा. बंगाले समितीचे मुद्ये | प्रशासनाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १ | नागपूर महानरगपालिका बाजार विभाग अंतर्गत येणारे दुकान / ओटे / जागा ११ महिन्याचे परवान्यावर न देता १० वर्षाकरीता Registered Lease Agreement करण्यात यावे तसेच दुकान / ओटे / जागा यांची मुळ मालकी नागपूर महानगरपालिका नागपूरची असल्याने संबंधीत मिळकत / मालमत्ता बॅकेकडे गहाण किंवा तारण करता येणार नाही. म.न.पा.व्दारे वेळो - वेळी घेण्यात येणारे धोरणात्मक निणर्य परवानेधारकांना बंधनकारक राहील. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ नुसार नगरपालिका बाजारातील दुकान/ओटे/जागा हे स्थायी समितीच्या मान्यतेने भाडे तत्वावर देण्याचा मा. आयुक्त यांना अधिकार आहे आणि भाडे तत्वावर देतांना तो कालावधी एक वर्षा पेक्षा अधिक होता कामा नये अशी तरतुद आहे. त्यामुळे ११ महिन्याचा कालावधी वाढवुन १० वर्ष करणे नियमबाह्य ठरेल.<br>परंतु जर दुकान/ओटे/जागा या भाडेपट्याने १० वर्षा करीता द्यावयाचे असल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) तसेच महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाच्या दि. १३/०९/२०१९ च्या अधिसुचनेप्रमाणे कार्यवाही करणे आवश्य्ाक राहील त्यानुसार सर्व दुकान/ओटे/जागा यांचे ई-लिलाव करुन पुढील कार्यवाही करावी लागेल. परंतु यामुळे भविष्यामध्ये न्यायालयीन प्रकरणे वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मा. बंगाले समिती व्दारे केलेली सदर शिफारस मान्यता करणे योग्य होणार नाही. |
| २ | स्थायी समिती ठराव क्र. ३११ दि. ०९/१०/२०१८ नुसार सिध्द शिघ्र गणकानुसार आकारण्यात येणारे वापरशुल्का मध्ये कपात करून ठराविक वर्षाकरीता येणारे सिध्द शिघ्र गणकदर Lock करून त्यानुसार वापरशुलकामध्ये दर ३ वर्षानी १०% वाढ करणे. | स्थायी समिती ठराव क्र. ३११ दि. ९/१०/२०१८ नुसार शिघ्र सिध्द गणकानुसार आकारण्यात येणारे वापरशुल्का मध्ये कपात करून ठराविक वर्षाकरीता येणारे सिध्द शिघ्र गणकदर Lock करून त्यानुसार वापरशुलकामध्ये दर ३ वर्षानी १०% वाढ करणे हि शिफारस मान्य करता येणार नाही. कारण यामुळे शिघ्र सिध्द गणकदर Lock केल्यास म.न.पा.चे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान होईल. तसेच वापर शुल्कामध्ये दर वर्षानी करण्यात येणारी १०% वाढ हि जर ३ वर्षाच्या कालावधी नंतर केली तर म.न.पा.चे प्रचंड आर्थीक नुकसान होईल. त्यामुळे सदर शिफारस मान्य करता येत नाही. |
| ३ | दुकान / परवानेधारक यांचे परिवर्तन करतांना आकारण्यात येणारे वापरशुल्क स्थायी समिती ठराव क्र. १०६ दि. १८/०६/२०१९ अन्वये दि. ०१/०४/२०१८ | स्थायी समिती ठराव क्र. १०६ विषय क. १०२ दि. १८/०६/२०१९ नुसार परवाना हस्तांतरीत करतांना परिवर्तन शुल्क किती आकारावे याबात |

| | | |
|---|---|---|
| | पासून आकारणे. | धोरण निश्चित केलेले आहे. तरी सदर ठरावानुसार ज्या दिवशी परवाना परावर्तीत करावयाचा असल्यास त्या कालावधीतील शिघ्र सिध्द गणकाच्या दरानुसार परिवर्तन शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.<br>भाडेपट्टा/परवाना कुटुंबा व्यतिरीक्त इतर व्यक्तीच्या नावे परवर्तीत करावयाच्या असल्यास मुळ परवानेधारक ज्या कींमतीत परवाना/भाडेपट्टा दुसऱ्या व्यक्तींस विकतो ती किंमत महानगरपालिकेनी ठरविलेली किंमत यामधील फरकांच्या रकमेच्या ५० % रक्कम किंवा शिघ्र सिध्द गणकानुसार येणारे तीन महिन्याचे भाडे/वापर शुल्क यामध्ये जे जास्त असेल ते शुल्क परिवर्तन शुल्क म्हणुन महापालिका निधीत जमा करणे. हि तरतुद योग्य वाटत असल्यामुळे या अटिच्या अधिन राहुन रितसर कार्यवाही करण्यास हरकत नाही.<br>परंतु परवानेधारकांचे परवाने परिवर्तन पुर्वलक्षी प्रभावाने करणे योग्य नाही. |
| ४ | महा मेट्रो मध्ये नागपूर महानरगपालिकेच्या ज्या जागा वर्ग होत आहे त्या वर्ग होणा-या जागेच्या संदर्भामध्ये महा मेट्रो व नागपूर महानरगपालिका मध्ये झालेल्या करारनामा मधील अटी व शर्तीच्या अधिन राहुन घेण्यात येणारा निर्णय परवानेधारकांना बंधनकारक राहील. | ही अट मान्य करता येईल. |
| ५ | बाजार विभागा अंतर्गत येणारे दुकान / ओटे / जागा यांना म.न.पा. कर विभागाव्दारे मालमत्ता कर देखील भरावे लागतात. अशा परिस्थितीत संबंधीत दुकानाकरीता परवानेधारकांना येणारे मालमत्ता कर याचे समायोजन बाजार विभागाच्या अर्थसंकल्पातून करेल व रक्कमेचे समायोजन करेल व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १३९ अन्वये जबाबदारी निश्चित करणे. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १३९ (१) अन्वये महानगरपालिकेच्या मालकिच्या जागेवरील मालमत्ता कर हा भोगवटाधारकाकडून वसूल करण्याची तरतूद आहे. त्यामुळे सदर मुद्या अधिनियमाशी विसंगत असल्यामुळे मान्य करता येणार नाही. |
| ६ | बाजार विभागाचे स्वतंत्र खाते तयार करणे व त्यामध्ये वापरशुल्काचा Online Payment भरण्याची सुविधा परवानेधारकांना उपलब्ध करून देणे. | सदर शिफारस मान्य करण्यास हरकत नाही. |

उपरोक्त प्रमाणे मा. बंगाले समितीचे मुद्दे प्रशासनाच्या अभिप्रायासह मा. सभागृहाच्या विचारार्थ सादर प्रश्न नागृहाने विचारात घेवून बाजाराचे जेवढे आरक्षण डीपीमध्ये आहे त्याची तपासणी करुन पुढच्या वर्षी रस्त्यावर बसणारे वढे बाजार आहेत त्यांना निर्धारित जागेत कसे बसावता येईल या प्रकारची योजना प्रशासनाने तयार करावी आणि

च्या बजेटमध्ये त्यासाठी प्रोव्हीजन करुन निर्धारित जागेत बाजार बसविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने प्रस्ताव तयार ावा, म.न.पा. गाळेधारकोकी जो अधिकृत संघटना है, इस समिति के जो मा.सदस्य है वह प्रशासन के साथ बैठकर के विषयपर सर्वकष निर्णय लेने का अधिकार मा.महापौरजी को प्रदान किया जाता है इस सत्तापक्ष नेता श्री.अविनाश करे इन्होने की हुई सूचना के अंतर्गत इस विषय को मंजूरी प्रदान की जाती है, मा.महापौरजी इन्होने की की हुई षणाको सभागृह ने मंजूर मंजूर की आवाज मे एकमतसे मान्यता प्रदान की।

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, हा जो क्रीडा समितीचा अहवाल आहे तो सर्व नगरसेवकांपर्यत पोहचला नाही नस्तीमध्ये आहे त्यामुळे याची कॉपी सर्व नगरसेवकांना दयावी त्यानंतर पुढच्या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा करण्यात यावी.

**<u>ठराव क्रमांक २०८ /वि.क्र.९६</u> :-** नागपूर शहराचा व परिसराचा जलद गतीने विकास होत आहे. क्रीडा क्षेत्राचा विकास सुध्दा याच क्षमतेने होणे अपेक्षित आहे. नागपूर क्षेत्रातील विद्यार्थ्यांची व खेळाडूंची क्रीडा क्षेत्रात उच्च कोटींची गुणवत्ता निर्माण करण्यास्तव क्रीडा धोरण आखणे गरजेचे आहे. तरी खेळांचा प्रचार व प्रसार करणे, खेळाडूवृत्ती निर्माण करण्यास्तव व खेळाची जोपासना करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारे "क्रीडा धोरण" आखून त्याची अंबलबजावणी करण्याचा नागपूर महानगरपालिकेचा मानस आहे.

**{क्रीडा व सांस्कृतिक विभाग}**

नागपूर महानगरपालिकेद्वारे राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, महापौर चषक स्पर्धा व शालेय स्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थानिक खेळाडूंनी उत्तम कामगिरी करावी. याकरीता खेळाडूंचा सत्कार, गुणगौरव करुन त्यांना शिष्यवृत्ती व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन दिल्या जाते. खेळाडूंना पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम म.न.पा. द्वारे केल्या जाते. खेळाडू दत्तक योजना व इतर योजना महानगरपालिकेद्वारे राबविल्या जातात.

नागपूर शहराला क्रीडा नगरी म्हणून नवलौकीक प्राप्त करुन देण्यास्तव क्रीडा धोरण आखून त्याची अंबलबजावणी करण्याचा उदात्त हेतु पूर्ण करण्यास्तव क्रीडा धोरणाचे प्रारुप तयार करण्यात आले आहे.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून क्रीडा समितीने तयार केलेल्या क्रीडा धोरणाच्या प्रारुपाची प्रत सगळया नगरसेवकांच्या घरी पोहचविण्याची व्यवस्था करावी आणि त्यानंतर पुढच्या सभागृहामध्ये यावर चर्चा करण्यात यावी. या मा.सत्तापक्ष नेते श्री. अविनाशजी ठाकरे यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय पुढच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या अहवालाची कॉपी सर्व नगरसेवकांना दयावी त्यानंतर पुढच्या सभागृहामध्ये यावर चर्चा करण्यात यावी.

**<u>ठराव क्रमांक २०९ /वि.क्र.९७</u> :-** महानगरपालिका ठराव क्र. ६६/ वि. क्र. ३२ दि.२५.०३.२०२१ अन्वये गठीत समितीत मा. अध्यक्ष संदिप जोशी, मा. विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे, मा. नगरसेवक श्री संजय बंगाले, मा. नगरसेविका श्रीमती दिव्या धुरडे व मा. नगरसेविका सौ.वैशाली नारनवरे या समितीने आपला अहवाल दिला असून हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास्तव सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयात सादर केलेल्या अहवालाची प्रत सगळया नगरसेवकांना पोहचविण्यात यावी या मा.सत्तापक्ष नेते श्री.अविनाशजी ठाकरे यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय पुढच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**{स्थावर विभाग}**

**<u>ठराव क्रमांक२१०/वि.क्र.९८</u>:-** म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वय मा.महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक

**{सचिवालय}**

08/10/2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून परमपुज्य पुंडलीक महाराजांचा नामकरणाचा एक विषय आणि स्व. राजीव गांधी चौकाचा विषय प्रलंबित आहे. असे हे दोन्ही विषय पुढच्या सभागृहात निकाली काढावे या मा.विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे यांनी केलेल्या सुचनेनुसार प्रशासनाने या विषयाच्या अनुषंगाने सुचना करावी आणि प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करून पुढच्या सभागृहात विषय निकाली काढावे या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दि. ०८.१०.२०२१ रोजी दुपारी ०१.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

उपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे, उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ३ | मा. सौ. चेतना राजू टांक | सदस्या |
| ४ | मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ५ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अनुपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री. दिनेष बसंतलाल यादव | सदस्य |
| २ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |

अध्यक्षा :— सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे आठ प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे आठ प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. ०८.१०.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

हस्ता/- मनिषा आशिष धावडे
अध्यक्ष
नामकरण समिती,

**ठराव क्रमांक२११/ वि.क्र.९९:-**
**(सचिवालय)**

म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये मा. महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक 09/11/2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दि. ०९.११.२०२१ रोजी दुपारी ०१.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

उपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे, उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ४ | मा. श्री. मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री. दिनेष बसंतलाल यादव | सदस्य |
| २ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ३ | मा. सौ. चेतना राजू टांक | सदस्या |

अध्यक्षा :– सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे आठ प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे आठ प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. ०९.११.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. महेन्द्र धनविजय नगरसेवक प्र. क्र. १<br>सौ. सुषमा चौधरी नगरसेविका प्र. क्र. १<br>सौ. प्रमिला मथरानी नगरसेविका प्र. क्र. १<br>श्री. विरेन्द्र कुकरेजा नगरसेवक प्र. क्र. १ | प्रभाग क्र. १ येथिल जरीपटका पोलिस स्टेशन ते साई मंदिर पर्यतच्या मार्गाला ''श्री. साई मंदिर मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |
| २ | श्री. महेन्द्र धनविजय नगरसेवक प्र. क्र. १<br>सौ. सुषमा चौधरी नगरसेविका प्र. क्र. १<br>सौ. प्रमिला मथरानी नगरसेविका प्र. क्र. १<br>श्री. विरेन्द्र कुकरेजा नगरसेवक प्र. क्र. १ | प्रभाग क्र. १ येथिल जरीपटका भाजीमार्केट रस्त्याला ''डॉ. ॲड. डी. पी. लालवानी मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |
| ३ | श्री. महेन्द्र धनविजय नगरसेवक प्र. क्र. १<br>सौ. सुषमा चौधरी नगरसेविका प्र. क्र. १<br>सौ. प्रमिला मथरानी नगरसेविका प्र. क्र. १<br>श्री. विरेन्द्र कुकरेजा नगरसेवक प्र. क्र. १ | प्रभाग क्र. १ येथिल बॅक कॉलनी मधील पुंशी हॉस्पिटलच्या समोरील मार्गाला ''श्री. मेघराज रूघानी मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री. सुनिल हिरनवार नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ गोकुलपेठ, देशमुख निवास ते वैष्णवी अपार्टमेंट, वाल्मिकी नगर येथील मार्गाला ''स्व. जितेंद्र डोंगरे मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| ५ | श्री. सुनिल हिरनवार नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ रामदासपेठ मेन रोड येथिल इंडसन्स बॅक, आय.आय.टी. होम समोरील चौकाला ''श्रीमद् राजचंद्रजी चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| ६ | श्री. सुनिल हिरनवार नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ कॉफी हाऊस चौक ते वि.आय.पी. रोड या मार्गाला ''दाता हनूमान मंदिर मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| ७ | श्री. सुनिल हिरनवार नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ धरमपेठ/अग्रेसेन रोड, लक्ष्मीनिवास बिल्डींग समोरील चौकाला ''स्व. रामसिंह सुखईसिंह कश्यप चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | श्री. सुनिल हिरनवार<br>नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले<br>नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ धरमपेठ झेंडा चौक, राशीधाम बिल्डींग ते ए.पी.फुलझेले (आनंद झेरॉक्स) चौथी गल्ली या मार्गाला ''हरीभाऊ फाटक मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| ९ | श्री. सुनिल हिरनवार<br>नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले<br>नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ आनंदनगर बुध्दविहार सिताबर्डी येथील टी—पॉईटला ''धम्मसेनानी स्व. वामनराव गोडबोले टी—पॉईट'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| १० | श्री. सुनिल हिरनवार<br>नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले<br>नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ हकिम आर्केड सुयोग बॅन्ड पार्टी समोरील टी—पाईटला ''स्व. शेखर भास्कर केदार टी—पॉईट'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| ११ | श्री. सुनिल हिरनवार<br>नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय<br>नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले<br>नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ कॉफी हॉऊस चौक ते ओबेराय निवास, हील रोड, गोकुलपेठ या मार्गाला ''स्व. सूरजीतसिंग जूनेजा मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | श्री. सुनिल हिरनवार नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ खरे चेम्बर गोकुलपेठ ते गुबरे निवास गोकुलपेठ या मार्गाला ''स्व. पंडित मुरलीधर रामप्रसाद दुबे मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| १३ | श्री. सुनिल हिरनवार नगरसेवक प्र. क्र. १५<br>सौ. उज्वला शर्मा नगरसेविका प्र. क्र. १५<br>सौ. रूपा राय नगरसेविका प्र. क्र. १५<br>श्री. संजय बंगाले नगरसेवक प्र. क्र. १५ | प्रभाग क्र. १५ अतंर्गत धरमपेठ/ गिरीपेठ येथिल आर्य समाज भवन समोरील चौकाला ''स्व. गजाननराव कृष्णाजी बापट चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| १४ | श्री. लखन येरवार नगरसेवक प्र. क्र. १६<br>सौ. वनिता दांडेकर नगरसेविका प्र. क्र. १६<br>सौ. तारा (लक्ष्मी) यादव नगरसेविका प्र. क्र. १६<br>श्री. संदिप जोशी नगरसेवक प्र. क्र. १६ | प्रभाग क्र. १६ अंतर्गत अजनी रेल्वे स्टेशन समोरील अजनी रेल्वे ब्रिज जवळील चौकाला ''पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर चौक'' तसेच अजनी रेल्वे पुल ते कृपलानी टी पॉईट चौक (रहाटे मेट्रो रेल्वेस्टेशन) पर्यतच्या मार्गाला ''पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| १५ | श्री. दयाशंकर तिवारी नगरसेवक प्र. क्र. १९<br>ॲड. संजयकुमार बालपांडे नगरसेवक प्र. क्र. १९<br>सौ. विद्या कन्हेरे नगरसेविका प्र. क्र. १९<br>सौ. सरला नायक नगरसेविका प्र. क्र. १९ | प्रभाग क्र. १९ (ड) येथे नालसाहाब चौक ते धोडंबा चौक या मार्गाला ''महादेवराव प्रजापती मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | श्री. दयाशंकर तिवारी<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>ॲड. संजयकुमार बालपांडे<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>सौ. विद्या कन्हेरे<br>नगरसेविका प्र. क्र. १९<br>सौ. सरला नायक<br>नगरसेविका प्र. क्र. १९ | प्रभाग क्र. १९ (ड) धोडंबा चौक ते सेवासदन चौक या मार्गाला ''मेवालाल बाथो मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| १७ | श्री. दयाशंकर तिवारी<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>ॲड. संजयकुमार बालपांडे<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>सौ. विद्या कन्हेरे<br>नगरसेविका प्र. क्र. १९<br>सौ. सरला नायक<br>नगरसेविका प्र. क्र. १९ | प्रभाग क्र. १९ (ड) येथे भोईपूरा मच्छि मार्केट या चौकाला ''महर्षी नाथुबाबा चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| १८ | श्री. दयाशंकर तिवारी<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>ॲड. संजयकुमार बालपांडे<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>सौ. विद्या कन्हेरे<br>नगरसेविका प्र. क्र. १९<br>सौ. सरला नायक<br>नगरसेविका प्र. क्र. १९ | प्रभाग क्र. १९ (ड) येथे खान मजिद, गितांजली चौक येथील निलगिरी अर्पाटमेंट समोरील टी—पॉईटला समाजसेवी ''नामदेव मोगरकर टी—पॉईंट'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | श्री. दयाशंकर तिवारी<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>ॲड. संजयकुमार बालपांडे<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>सौ. विद्या कन्हेरे<br>नगरसेविका प्र. क्र. १९<br>सौ. सरला नायक<br>नगरसेविका प्र. क्र. १९ | प्रभाग क्र. १९ (ड) मधील गितांजली चौक येथिल गुडलक ट्रॅव्हल्स समोरील टी—पॉईटला ''माणिकराव मोटघरे त्रिवेणी पथ'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| २० | श्री. दयाशंकर तिवारी<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>ॲड. संजयकुमार बालपांडे<br>नगरसेवक प्र. क्र. १९<br>सौ. विद्या कन्हेरे<br>नगरसेविका प्र. क्र. १९<br>सौ. सरला नायक<br>नगरसेविका प्र. क्र. १९ | प्रभाग क्र. १९ (ड) मधील सेवासदन चौक येथिल स्टार रेसिडेन्सी हॉटेल समोरील चौकाला समाजसेवी ''मनिराम प्रजापती चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| २१ | सौ. उषा पॅलट<br>नगरसेविका प्र. क्र. ३१<br>श्री. सतिश होले<br>नगरसेवक प्र. क्र. ३१<br>सौ. शितल कामडे<br>नगरसेविका प्र. क्र. ३१<br>डॉ. रविंद्र (छोटु) भोयर<br>नगरसेवक प्र. क्र. ३१ | प्रभाग क्र. ३१ अंतर्गत रेशीमबाग येथील दोडके कॉम्प्लेस ते गजानन चौक या मार्गाला ''वै. वंदनीय संतकवी कमलासुत श्री. चंद्रशेखर वराडपांडे मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| २२ | सौ. साक्षी राऊत<br>नगरसेविका प्र. क्र. १०<br>सौ. रश्मी धुर्वे<br>नगरसेविका प्र. क्र. १०<br>श्री. नितीश ग्वालबंशी | प्रभाग क्र. १० येथील पोलिस लाईन टाकळी येथील तलावाला व चौकाला ''निष्काम कर्मयोगी श्री. संत गाडगेबाबा'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नगरसेवक प्र. क्र. १० सौ. गार्गी चोपरा नगरसेविका प्र. क्र. १० | | | |
| २३ | सौ. साक्षी राऊत नगरसेविका प्र. क्र. १० सौ. रश्मी धुर्वे नगरसेविका प्र. क्र. १० श्री. नितीश ग्वालबंशी नगरसेवक प्र. क्र. १० सौ. गार्गी चोपरा नगरसेविका प्र. क्र. १० | प्रभाग क्र. १० येथील गिट्टीखदान, दशरतनगर येथिल मनपा अंगणवाडी केंद्राला ''स्वातंत्र संग्राम सैनिक वस्ताद लहुजी साळवे सभागृह'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| २४ | सौ. साक्षी राऊत नगरसेविका प्र. क्र. १० सौ. रश्मी धुर्वे नगरसेविका प्र. क्र. १० श्री. नितीश ग्वालबंशी नगरसेवक प्र. क्र. १० सौ. गार्गी चोपरा नगरसेविका प्र. क्र. १० | प्रभाग क्र. १० गिट्टीखदान, चौक ते दशरतनगर गोरेवाडा रोड वरील पुर्व दिशेला असलेल्या वस्तिला ''स्वातंत्र संग्राम सैनिक वस्ताद लहुजी साळवे नगर'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

**हस्ता/— मनिषा आशिष धावडे**
**अध्यक्ष**
**नामकरण समिती**

**<u>ठराव क्रमांक २१२:-</u>** मा.सत्तापक्ष यांनी सादर केलेला खालील ठराव मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिवांनी सभागृहात वाचून दाखविला. रेल्वे बोर्डाचे वाणिज्य परिपत्रक १२/१९९९ तथा २६/२००५ चे पेरा XII अनुसार फक्त भारत सरकारच्या गृह मंत्रालयास कोणत्याही स्टेशनचे नामकरण करण्याचे अधिकार आहेत. करिता भारत सरकारला विनंती करते की, अशा प्रकारचा प्रस्ताव पारीत करुन पुढील कार्यवाही संपादीत करावी या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव</u>**

भारतरत्न नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी, १८९७ मध्ये झाला. हे वर्ष नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे १२५ वे जयंतीवर्ष आहे. भारत सरकार पुर्ण देशामध्ये हे वर्ष मोठया उत्साहाने साजरे करीत आहे. १९४० मध्ये फॉरवर्ड ब्लॉकचे गठन केल्यानंतर नेताजी सर्वप्रथम नागपूर नगरीमध्ये आले होते आणि त्यांनी आपल्या नविन राजनैतिक पार्टीचा शुभारंभ नागपूर शहरात केला होता. वर्तमान स्थितीत असलेल्या रा.पै.समर्थ स्टेडियम या ठिकाणी

नेताजी यांची सार्वजनिक सभा झाली होती. नेताजींच्या पावन चरणाने या नगरीला या भुमीला स्पर्श केले आहे. नागपूर शहरातील "इतवारा" रेल्वे स्टेशनचे नांव भारतरत्न नेताजी सुभाषचंद्र बोस रेल्वे स्टेशन असे करण्यात यावे, या विषयाला ही सभा एकमताने मंजूरी प्रदान करते.

हस्ता/-सुचक श्री.अविनाश ठाकरे
हस्ता/-अनुमोदक श्री.तानाजी वनवे

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**